जिल्हाधिकारी कार्यालय

सुवर्ण जयंती राजस्व अभियान

जानेवारी २०१३ । किंमत ₹ १०

# लोकराज्य


## महसूल प्रशासनाचे नवे रूप

## सुलभ, गतिमान आणि लोकाभिमुख ...

- सातबारा
- जमाबंदी
- पीक पाहणी
- फेरफार
- तगाई




- ई-सातबारा
- ई-चावडी-गाव जमाबंदी
- ई-मोजणी
- ई-फेरफार
- भूमी अभिलेखांचे संगणकीकरण
- जलद व पारदर्शक अकृषिक परवानगी



# महा ई-सेवा

## (महा ई-सेवाकेंद्रामार्फत दिली जाणारी प्रमाणपत्रे/दाखले)

- वय व राष्ट्रीयत्व
- सांस्कृतिक कार्यक्रम परवाना
- शस्त्र परवाना नूतनीकरण
- हॉटेल परवाना (बेबाकी प्रमाणपत्र)
- तात्पुरता फटाकाविक्री परवाना
- स्वातंत्र्यसैनिकाचे (दुय्यम) ओळखपत्र
- स्वातंत्र्यसैनिकांचे आई-वडील, पतीच्या अंत्यविधीसाठी आर्थिक साहाय्य
- स्वातंत्र्यसैनिकाच्या वारस/पत्नीला वैद्यकीय आर्थिक साहाय्य
- स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलींच्या शुभविवाहाप्रीत्यर्थ आर्थिक साहाय्य
- अकृषिक (एन.ए) परवाना
- ऐपतीचा दाखला (जिल्हाधिकारी कार्यालय)
- दगड खाणपट्टा परवाना
- गौण खनिज परवाना
- स्टोन क्रशर परवाना
- प्रमाणित प्रत (जिल्हाधिकारी कार्यालय)
- प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त प्रमाणपत्र
- लाभक्षेत्रातील जमीन विक्री/वाटणी/गहाण/बक्षीस परवानगीबाबत
- प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र बदलून देणे
- महिलाप्रधान क्षेत्रबचत एजन्सी परवाना
- महिलाप्रधान क्षेत्रबचत एजन्सीचे नूतनीकरण
- अधिकृत अल्पबचत एजन्सी (एस.ए.एस) परवाना
- महिलाप्रधान क्षेत्रीय बचत एजन्सी रद्द करणे
- अल्पबचत एजन्सी रद्द करणे
- अल्पबचत एजन्सीचे नूतनीकरण
- ऐपतीचा दाखला (उपविभागीय अधिकारी)
- लॉजिंग बोर्डिंग परवाना
- प्रमाणित प्रत (उपविभागीय अधिकारी)
- गौण खनिज परवाना (उपविभागीय अधिकारी)
- शस्त्र परवाना नूतनीकरण (उपविभागीय अधिकारी)
- उत्पन्नाचा दाखला
- उत्पन्नाचे प्रमाणपत्र (३ वर्ष)
- नॉन क्रिमिलियर जातीचे प्रमाणपत्र
- रहिवासी प्रमाणपत्र (१५ वर्षे वास्तव्याबाबत)
- वय व अधिवास प्रमाणपत्र
- खाद्यपदार्थ परवाना
- श्रावण बाळ सेवा योजना (राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना) (ग्रामीण)
- संजय गांधी निराधार/आर्थिक दुर्बलासाठी अनुदान योजना (ग्रामीण)
- इंदिरा गांधी निराधार व भूमिहीन शेतमजूर महिला अनुदान योजना (ग्रामीण)
- कुटुंब अर्थसाहाय्य योजना (ग्रामीण)
- गौण खनिज परवाना (फक्त माती)
- नवीन कौटुंबिक शिधापत्रिका
- रद्द प्रमाणपत्राधारे नवीन कौटुंबिक शिधापत्रिका मिळण्याबाबत
- कौटुंबिक शिधापत्रिकेत नाव समाविष्ट करणे
- द्वितीय शिधापत्रिका मिळणेबाबत/कौटुंबिक शिधापत्रिकेत नाव कमी करणे किंवा रद्द करणे
- शिधापत्रिका नूतनीकरण

वर्ष ६४ वे | अंक १० | जानेवारी २०१३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

■ मुख्य संपादक प्रमोद त्र्यं. नलावडे
■ व्यवस्थापकीय संपादक प्रल्हाद जाधव
■ संपादक सुरेश वांदिले
■ कार्यकारी संपादक प्रभाकर मुराळकर
■ उपसंपादक किरण केंद्रे
■ प्रशासन व वितरण अधिकारी दिगंबर पालवे
■ वितरण अधिकारी विलास बोडके
दत्तात्रय कोकरे
■ साहाय्य विद्या कदम
■ मुखपृष्ठ राभा
■ मांडणी, सजावट संदीप पवार
■ मुद्रण एच. टी. मीडिया लि.
दिघे, नवी मुंबई

■ संपादकीय पत्ता ■
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८
e-mail : lokrajya@dgipr.maharashtra.gov.in
lokrajya2011@gmail.com
ई-लोकराज्यसाठी
Website : http://dgipr.maharashtra.gov.in
वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७
e-mail : lokvitran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग



## ई-गव्हर्नन्स हाच पर्याय

येत्या तीन-चार वर्षांत संगणक प्रणालींमध्ये मोठा बदल होईल. तुम्ही बोलणार ते तत्काळ संगणकात फीड होईल, प्रशासनापुरते बोलायचे तर ही चौथी क्रांती आता फार दूर नाही. ६

## ई-महाभूमी



अभिलेखांचे कायदेशीर महत्त्व अनन्यसाधारण असून त्यांचे व्यवस्थापन/ साठवणूक व सांभाळणे ही आव्हानात्मक बाब आहे. या अभिलेखांचे दैनंदिन जीवनातील स्थान व महत्त्व लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालयाकडून सन २००८ पासून राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. १८

## शिवरायांची जमीन महसूल व्यवस्था

जमीन महसुलाची व्यवस्था लावून देण्याच्या बाबतीत शिवाजी महाराजांनी बरीच सुधारणा घडवून आणली. स्थानिक परिस्थितीनुसार, आवश्यक तेथे योग्य बदल केले. त्यानंतर



शेतीव्यवस्थेचा कणा हळूहळू गिळंकृत करीत चाललेल्या वसुली - यंत्रणेतील मधल्या सर्व दलालांना व मध्यस्थांना त्यांनी नामशेष केले. २६

## मातृतीर्थ

बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा या गावची ओळख राजमाता जिजाऊ यांचे माहेर म्हणून आहे. सिंदखेडराजाला शिवशाहीची गंगोत्री मानली जाते. ६४


| | | |
|---|---|---|
| | संपादकीय | ५ |
| लोकाभिमुख महसूल प्रशासन | उपमुख्यमंत्री | ८ |
| प्रशासनाचा मानवी चेहरा | बाळासाहेब थोरात | १० |
| पारदर्शक आणि लोकाभिमुख | प्रकाश सोळंके | १५ |
| गतिमानतेला नवा आयाम | स्वाधीन क्षत्रिय | १६ |
| नव्या संकल्पना...नवे उपक्रम | अर्चना शंभरकर | २१ |
| पाऊल पडते पुढे... | विजय वाघमारे | २४ |
| वाळूचा ई-लिलाव | पी. वेलरासू | २५ |
| सुपरफास्ट दाखले | वि. पा. राणे | ३० |
| 'पोलादी चौकटी'समोरील आव्हान | चंद्रकांत दळवी | ३२ |
| पुनर्मोजणी आणि पुनर्बांधणी | डॉ. लक्ष्मण खिलारी | ३४ |
| ७/१२ : जमिनीचा आरसा | मनोज रानडे | ३६ |
| विक्रमी महा-फेरफार | एस. एस. पाटील | ३७ |
| बेदखल कुळांची दखल | डॉ. किरण मोघे | ३९ |
| ऑनलाइन प्रशासन | वेणुगोपाल रेड्डी | ४० |
| नझुल जमिनींचे धोरण | शेखर गायकवाड | ४२ |
| शेतजमीन : व्यवहार, वाद आणि संवाद | आप्पासाहेब धुळाज | ४६ |
| कोल्हापूरची 'ई-चावडी' | मुक्ता पवार | ४८ |
| सहज नोंदणीला 'सरिते'चे साहाय्य | एकनाथ डवले | ५० |
| शेतरस्त्यांचा मोकळा श्वास | पांडुरंग गायकवाड (पाटील) | ५३ |
| खंडकऱ्यांचा यशस्वी लढा | ए. एल. जऱ्हाड | ५६ |
| इंद्रधनू : संकल्पना आणि यश | | ५७ |
| द्रष्टे निर्णय... अभिनव योजना | डॉ. अशोक चौसाळकर | ५८ |
| अभिजात अनुवाद | श्री. वा. नेर्लेकर | ६० |
| ठाणे : महत्त्वाकांक्षी आणि झपाटलेले | | |

### ऋणमुक्तीचा स्पृहणीय प्रयत्न



# ‘वसंतराव नाईक विशेषांक म्हणजे ऋणमुक्तीचा स्पृहणीय प्रयत्न’

▸यवतमाळ / वार्ताहर

हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने डिसेंबर महिन्याचा लोकराज्यचा अंक ‘वसंतराव नाईक जन्मशताब्दी विशेषांक’ म्हणून प्रसिध्द करून त्यांच्या कार्याचा करून दिलेला परिचय हा वसंतरावांच्या ऋणातून अंशतः मुक्त होण्याचा स्पृहणीय प्रयत्न असल्याची प्रतिक्रिया सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे आणि विधानसभेचे उपाध्यक्ष प्रा. वसंत पुरके यांनी येथे व्यक्त केली.

लोकराज्यच्या वसंतराव नाईक जन्मशताब्दी विशेषांकात मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार, केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे, राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री मनोहरराव नाईक, शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा व प्रा. फौजिया खान, माजी खासदार



हरिभाऊ राठोड, या राजकीय ने... मधुकर भावे, मधु मंगेश क... सुरेश द्वादशीवार, न.मा.जोशी... आकोलकर, युधिष्ठीर जोशी, ...

गुलहाने, माधवी गुलहाने या ज्ये... पत्रकारांचे, तसेच कृषीतज्ज्ञ... डॉ.एम.एस. स्वामीनाथन, ज्येष्ठ क... दिवंगत ग.दी. माडगुळकर, ... आमटे यांचे लेख आहेत. शिक्ष... भी.म. कौसल, मोहन राठोड, कि... केंद्रे या अधिकाऱ्यांचे लेखही ... अंकात आहेत. लोकराज्यचे मुख्... संपादक प्रमोद नलावडे यां... हरितक्रांतीचा अक्षय फुलोरा ... प्रस्तावनेत वसंतराव नाईक यांच...

हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने डिसेंबर महिन्याचा लोकराज्यचा अंक ‘वसंतराव नाईक जन्मशताब्दी विशेषांक’ म्हणून प्रसिद्ध करून त्यांच्या कार्याचा करून दिलेला परिचय हा वसंतरावांच्या ऋणातून अंशत: मुक्त होण्याचा स्पृहणीय प्रयत्न असल्याची प्रतिक्रिया विधानसभेचे उपाध्यक्ष प्रा. वसंत पुरके यांनी व्यक्त केली.

**– दै. लोकसत्ता**

### युवा पिढीला प्रेरणादायी

स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने डिसेंबरमध्ये प्रकाशित केलेल्या विशेषांकामध्ये महत्त्वपूर्ण विश्लेषण, ठळक नोंदी, दुर्मीळ छायाचित्रे यांची अत्यंत आकर्षक पद्धतीने मांडणी केलेली असून, हा अंक एक उत्तम संदर्भ म्हणून संग्रही ठेवण्यासारखा आहे. याशिवाय त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांचे बदलत्या काळाच्या संदर्भाने केलेले विश्लेषणदेखील या अंकाचे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते.

लोकराज्यच्या अंकातून कृषी, सहकार, आदिवासी, कामगार, शिक्षण आदी क्षेत्रांत स्व. वसंतराव नाईक यांनी केलेल्या योगदानाबद्दल मान्यवरांनी लिहिलेले लेख आजच्या युवा पिढीला दीपस्तंभासारखे प्रेरणादायी ठरतील.

या उपक्रमास माझ्या मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा.

**– शिवाजीराव देशमुख,**
सभापती, महाराष्ट्र विधान परिषद

---

### यशाची पोचपावती

लोकराज्यचा नोव्हेंबर २०१२चा अंक वाचला. या विशेषांकात शासनाच्या प्रत्येक विभागाने केलेल्या कामाची माहिती तसेच शासनाने घेतलेले लोकहितकारी निर्णय या सर्वांची एकत्रित माहिती दिल्यामुळे सर्वसामान्य जनतेचा फायदा होईल, यात शंका नाही. अशा माहितीपूर्ण लिखाणामुळे लोकराज्य अंकाला फार मोठा वाचकवर्ग लाभला आहे. ही आपल्या यशाची पोचपावती आहे. यापुढेही आपणाकडून अशाच लोकोपयोगी माहितीपूर्ण अंकांची निर्मिती होवो, ही सदिच्छा!




– शिवाजीराव मोघे
मंत्री, सामाजिक न्याय

### प्रभावी माध्यम

आघाडी शासनाच्या तीन वर्षपूर्तीनिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रकाशित करण्यात आलेले मराठी, इंग्रजी व उर्दू भाषेतील ‘लोकराज्य’चे विशेषांक वाचून आनंद वाटला. संग्राह्य आणि माहितीपूर्ण असे हे विशेषांक झाले आहेत.

राज्याच्या अविकसित भागाला न्याय देण्याच्या हेतूने राज्य शासनाने महत्त्वाकांक्षी असे वस्त्रोद्योग धोरण नुकतेच जाहीर केले आहे. या धोरणाविषयी समग्र माहिती या विशेषांकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. अल्पसंख्याक विकासविषयक विविध योजनांची माहितीही या अंकात देण्यात आली आहे. शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, शासनाचे लोककल्याणकारी निर्णय जनतेपर्यंत पोहोचविण्यात ‘लोकराज्य’ हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रभावी असे माध्यम ठरत आहे.




‘लोकराज्य’ने यापुढेही प्रबोधनाचे कार्य अखंड सुरू ठेवावे. विशेषत: वंचित राहिलेल्या अल्पसंख्याक समाजाचे प्रबोधन करणे, त्यांना शासकीय योजनांची माहिती देणे तसेच त्यांना मूळ प्रवाहात सहभागी होण्यास चालना देणे यासाठी ‘लोकराज्य’ने योगदान द्यावे.

**– मो. आरिफ (नसीम) खान**
मंत्री, वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक
विकास आणि औकाफ

‘लोकराज्य’मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा ‘लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई’ यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी

http://dgipr.maharashtra.gov.in

# लोकाभिमुख महसूल प्रशासन



जानेवारी महिना हा नेहमीच नवा उत्साह घेऊन अवतरतो. सरत्या वर्षाचे सिंहावलोकन करून नवीन संकल्पांचे बीजारोपण या महिन्यात केले जाते. या महिन्यात येणारा प्रजासत्ताक दिन भारतीयांसाठी अभिमानाचा आणि गौरवाचा राहिला आहे. परस्परातील स्नेहबंध वृध्दिंगत करणारा, मनातील किल्मिषे दूर सारून नात्यातील गोडवा वाढविणारा संक्रांतीचा सणही याच महिन्यात आपण उत्साहात साजरा करतो. शिवरायांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा देणाऱ्या राजमाता जिजाऊ यांचा १२ जानेवारी आणि महिला शिक्षणाची पायवाट आखून देणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा जन्मदिवस. मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिन ६ जानेवारीला 'पत्रकार दिन' म्हणून साजरा होतो. परकीय अंमलाविरूध्द लढ्यासाठी बलिदान देणारे गुरू गोविंदसिंग आणि अध्यात्माच्या क्षेत्रात भारताची पताका विश्वभरात फडकविणारे स्वामी विवेकानंद तसेच स्वातंत्र्यलढ्यात अतुलनीय योगदान देणाऱ्या सुभाषचंद्र बोस आणि लाला लजपतराय यांची जयंती याच महिन्यात यावी हा सुंदर योगायोग आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना ३० जानेवारी रोजी त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करणे हे आपले कर्तव्य ठरते. मुस्लीम बांधवांचा ईद-ए-मिलाद हा पवित्र सणही याच महिन्यात येतो.

नव्या वर्षाचा प्रारंभ लोकराज्यच्या महसूल विशेषांकाने करीत आहोत. प्राचीन काळापासून महसूल व्यवस्था हा प्रशासनाचा गाभा राहिला आहे. जमीन, जमिनीबाबतचे हक्क, महसूल याबाबत प्राचीन काळापासून विविध पध्दती व नियम अस्तित्वात आहेत. खेडे हा घटक मानून त्या अंतर्गत येणाऱ्या जमीन महसुलासंबंधी नियम असत. लढाया, परकीय आक्रमणे व निरनिराळ्या राज्यपद्धती यामुळे जमीन महसूल व तत्संबंधित प्रचलित पद्धतीमध्ये काळानुरूप बदल झाले. राजाचे विशिष्ट भूभागातील जमिनीवर स्वामित्व असते आणि त्याचे निदर्शक म्हणून महसूल गोळा करण्याचे अधिकार त्याला प्राप्त होतात, हा या व्यवस्थेचा आधार होता. या शेतमहसुलाच्या मोबदल्यात राजाने परचक्रापासून संरक्षण करावे अशी अपेक्षा असे. साधारणपणे उत्पन्नाचा सहावा हिस्सा शेतसारा म्हणून दिला जाई. राजा हाच शेतीचा मालक असून शेती कसणारा 'कब्जेदार' म्हणून ओळखला जाई. कृषिआधारित अर्थव्यवस्था आणि उत्तम शेती-मध्यम व्यापार-कनिष्ठ नोकरी ही भावना दृढ असल्याने शेती संबंधित मालकी/व्यवहार यांना महत्त्वाचे स्थान होते. शेतमहसुलाकडे उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणून पाहिले जात असे.

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात शेतीच्या समृद्धीकरिता विविध उपाय सांगितले असून या कामासाठी सरकारी यंत्रणा सुचविली आहे. मौर्यकाळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. लहान पाटबंधारे बांधून पाण्याची सोय करणे, शेतकऱ्यांना चांगले बी पुरविणे, अवर्षणाच्या काळी तगाई देणे, संभाव्य दुष्काळ टाळण्यासाठी सरकारी कोठारात धान्य भरून ठेवणे इ. अनेक गोष्टी सरकारतर्फे केल्या जात. मौर्यकाळात शेतीवरील मुख्य कराला 'भाग' म्हणत असत. त्याशिवाय 'बली', 'कर' हे दुसरे दोन कर होते.

मौर्योत्तर काल, गुप्त-हर्ष काल, महाराष्ट्रात वाकाटक, चालुक्याचा काल आणि दक्षिणेत पल्लवांचा काल ह्या मोठ्या कालखंडामध्ये शेतीचा व्यवसाय भरभराटीस आला. चरक आणि सुश्रुत या संशोधकांनी वनस्पतीशास्त्रात शोध लावले. त्याचा मोठा फायदा शेतीला झाला. ह्युएन्त्संग या चिनी प्रवाशाने भारतात पिकणाऱ्या धान्य आणि फळांच्या दिलेल्या विस्तृत यादीवरून भारत त्या काळी सुजलाम्, सुफलाम् असल्याचे प्रत्यंतर येते.

मध्ययुगीन कालखंडात महंमद बिन तुघलक याने दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शेतीच्या वाढीची एक योजना आखली. 'अमीर-इ-कुही' या नावाने त्याने या योजनेसाठी एक अधिकारी नेमला. जास्तीतजास्त धान्य पिकविण्याच्या दृष्टीने या योजनेची वाढ करण्यात आली. पुढे फिरोजशहा तुघलक यानेदेखील पडीक जमिनी लागवडीखाली आणून राज्याचे उत्पन्न वाढविले. यमुना व सतलज नद्यांवरील मोठ्या कालव्यांबरोबरच इतरत्रही कालवे खोदले.

शेतसारा उत्पन्नाच्या प्रमाणात वसूल न करता जमिनीची मोजणी, वर्गीकरण करून तिच्या प्रतवारीप्रमाणे व सरासरी उत्पन्नाच्या आधारे ३३ टक्क्यांपर्यंत वसूल करण्याचे धोरण सम्राट शेरशाह सुरीने आखले. त्याने शेतकऱ्यांकडून कबुलायतनामे घेऊन त्यांच्या नावे पट्टे करून दिले. पुढे सम्राट अकबराने शेरशहाच्या राजस्व धोरण व प्रशासनाच्या धर्तीवर शेतसाऱ्याची आखणी केली. मलिक अंबरने 'मलिकंबरीधारा' व्यवहारात आणली. त्यामुळे जमीन महसूल प्रशासनात अनेक सुधारणा झाल्या.

१७९३ साली लॉर्ड कॉर्नवॉलिसने बंगालमध्ये कायमधारा पद्धत सुरू केली. शेतसारा निश्चित करून तो वसूल करण्याचा अधिकार जमीनदारांना देण्यात आला. या पद्धतीत शेतसाऱ्याचा १०/११ भाग सरकारकडे जमा करायचा आणि १/११ भाग जमीनदाराने घ्यायचा, असे निश्चित करण्यात आले. पुढे अन्य प्रदेशात ब्रिटिशांनी महालवारी, मालगुजारी व रयतवारी अशा वेगवेगळ्या पद्धती सुरू केल्या.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अस्तित्वात आला. याद्वारे महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांत असलेल्या जमीन महसुलासंबंधीच्या नियमांमध्ये सुसूत्रता आणण्यात आली. तुकडेबंदी, कूळ वहिवाट कायदा, कमाल जमीन धारणा कायदा, भूसंपादन अधिनियम, मामलेदार कोर्ट ॲक्ट या कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे महाराष्ट्राचे महसूल प्रशासन आदर्श समजले जाते.

सद्यःस्थितीत महसूल प्रशासनात आमूलाग्र परिवर्तन घडून आले आहे. जमीन अधिकार अभिलेख व्यवस्थापन, भूसुधार कायद्यांची अंमलबजावणी यासोबत वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना, निराधार अनुदान योजना यांसारख्या सामाजिक साहाय्य योजनांची अंमलबजावणी, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, रोजगार हमी योजना संनियंत्रण, प्रकल्पग्रस्त पुनर्वसन आणि कायदा सुव्यवस्थेचे संनियंत्रण, टंचाई निवारण, जीवनावश्यक अन्नधान्य/वस्तू पुरवठा व्यवस्थापन, गौण खनिज, करमणूक कर वसुली या जबाबदाऱ्यांमुळे महसूल प्रशासन प्रशासकीय व्यवस्थेचा कणा समजला जातो. राज्यात सुवर्ण जयंती राजस्व अभियान यशस्वीपणे राबविले जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे गतिमानता वाढून कारभारात पारदर्शकता आली असून ते हायटेक झाले आहे. महसूल प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख होत आहे. प्रशासनाची कार्यक्षमता वाढत असतानाच नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक सुलभपणे होत आहे.

महसूल विभागाशी संबंधित विविध बाबींचा वेध या विशेषांकात घेण्यात आला आहे. लोकराज्यच्या समृद्ध परंपरेतील नव्या वर्षातला हा विशेषांकही आपल्याला आवडेल असा विश्वास वाटतो.

लोकराज्यच्या सर्व वाचक, वर्गणीदार आणि लेखकांना नवीन वर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!


**प्रमोद त्र्यं. नलावडे**

मुख्य संपादक तथा महासंचालक

(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६

dg@dgipr.maharashtra.gov.in



# ई-गव्हर्नन्स हाच पर्याय

**राज्याच्या प्रशासनात महसूल विभागाचे महत्त्व वेगळे अधोरेखित करण्याची गरज नाही. महसूल म्हणजे प्रशासनाचा आरसा. सर्वसामान्यांना शासनाविषयी काय वाटते? शासनाच्या सेवा-सुविधा समाधानकारक आहेत का? शासनाकडून त्यांना आणखी कुठल्या अपेक्षा आहेत? हे सगळे जाणून घ्यायचे तर महसूल यंत्रणेकडे पाहावे लागते. आज संगणकाने संपूर्ण प्रशासनात एक नवी क्रांती आणली आहे. ई-गव्हर्नन्सशिवाय प्रशासनात पुढचे पाऊल टाकणे अवघड आहे... सांगताहेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.**

महसूल विभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. या विभागाशी सर्वसामान्य जनतेचा संबंध येतो आणि म्हणूनच कमी त्रास आणि कमी वेळेत जनतेला अचूक माहिती देणे, हे आव्हान आम्ही स्वीकारले ते तंत्रज्ञानाच्या जोरावरच. अशा परिस्थितीत सुवर्ण जयंती राजस्व अभियानाचे महत्त्व आणखी वाढते हे लक्षात घेतले पाहिजे, कारण आज महसूल विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या अनेक सुविधा आणि भविष्यातील नियोजनाचा आधार हा माहिती तंत्रज्ञानच आहे. या अभियानात ग्रामीण भागात शेतीसाठी आवश्यक असलेले पांदन रस्ते, विविध दाखले देण्यासाठी विविध शिबिरांचे आयोजन, जनतेची गाऱ्हाणी तसेच तक्रारी सोडविण्यासाठी चावडीवाचन, अर्जाचे सुलभीकरण व ऑनलाइन उपलब्ध करून देणे असे विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित करण्यात येतात, त्यांचा फायदा जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचविणे मला महत्त्वाचे वाटते.

बऱ्याचदा असे होते की, अनेक चांगल्या गोष्टी आपण तयार केलेल्या असतात पण लोकांना त्याचा प्रत्यक्ष फायदा पोहचविण्यात आपल्याला काही अडचणी येतात; परंतु मला खात्री आहे, महसूल विभाग यावर मात करून प्रशासनात एक चांगला पायंडा या अभियानाच्या माध्यमातून पाडल्याशिवाय राहणार नाही.

नुकतीच मी सिंधुदुर्ग जिल्ह्याला भेट दिली. प्रशासनात संपूर्णपणे ई-ऑफिसचा उपयोग करणारा तो पहिला जिल्हा ठरला आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी संगणक क्रांती घडविताना २१ व्या शतकाचे स्वप्न पाहिले होते. भारतीय भाषेत संगणकाचा वापर हे त्याकाळी ठरले होते. पंतप्रधान कार्यालयाचा मंत्री असताना ही जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली होती आणि आज मुख्यमंत्री म्हणून काम पाहताना या सगळ्या गोष्टींचा महाराष्ट्रात किती चांगला प्रसार झाला आहे हे पाहणे निश्चितच समाधान देणारे आहे. अशा ई-ऑफिस प्रकल्पामुळे प्रशासनाची गतिमानता निश्चितपणे वाढणार आहे. पुढील काळात पेपरलेस ऑफिसचे स्वप्न साकारताना पाहणे अवघड नाही याची मला यामुळेच खात्री वाटते. ई-ऑफिस हा प्रकल्प सिंधुदुर्ग महसूल विभागाने राबविला, आता संपूर्ण कोकणात आणि नंतर नंदुरबार, जालना जिल्ह्यात तो राबविला जाईल आणि मग जिल्हा परिषदाही हा प्रकल्प हाती घेतील. तलाठी ते मुख्यमंत्री अशा सर्व पायऱ्यांवर ई-ऑफिस प्रकल्पामुळे क्रांती होईल. येत्या तीन-चार वर्षांत संगणक प्रणालींमध्ये मोठा बदल होईल. तुम्ही बोलणार ते तत्काळ संगणकात फीड होईल, प्रशासनापुरते बोलायचे तर अशी ही चौथी क्रांती आता फार दूर नाही.

भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या पायाभूत प्रशिक्षणाच्या धर्तीवर स्टेट कॅडरच्या अधिकाऱ्यांनाही प्रशिक्षण देण्याबाबत मध्यंतरी मी यशदात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्या राज्यस्तरीय परिषदेत बोललो होतो. सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून, प्रशासनाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे आणि त्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्टेट कॅडरच्या अधिकाऱ्यांना उच्च प्रतीचे प्रशिक्षण देणे ही आता काळाची गरज आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून हे उपक्रम सुरू करण्यास काही हरकत नाही. स्टेट कॅडरच्या अधिकाऱ्यांच्या सेवा-शर्तींबाबत आढावा घेणे आवश्यक झाले आहे. दुर्गम भागात चांगले अधिकारी जावेत, यासाठी




विशेष प्रयत्न यापुढे केले जाणार आहेत, उत्कृष्ट काम केलेल्या जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार महसूल दिनी करून त्यांच्या चांगल्या कामांची नोंद घेण्याच्या सूचनाही मी दिल्या आहेत, हेही या ठिकाणी सांगणे आवश्यक वाटते.

नव्याने निर्माण झालेल्या जिल्ह्यातील शासकीय इमारतींचे बांधकाम करणे, रिक्तपदे भरण्याबाबत धडक कार्यक्रम हाती घेणे, जलद व पारदर्शक पद्धतीने अकृषक परवाना देणे, शासकीय जमिनींची डाटा बँक तयार करणे, जमिनीच्या फेर सर्व्हेक्षणाबाबत पथदर्शी प्रकल्प राबविणे हे उपक्रम खूप महत्त्वाचे आहेत. राज्यातील जिल्ह्यांमध्ये अनेक अधिकाऱ्यांनी नवनवे प्रयोग केले आहेत. त्याचा एकत्रितरीत्या कशा पद्धतीने उपयोग करता येईल, हेही पाहिले जाईल.

गौण खनिज वाहतूक परवाना व पावत्यांवर बार कोडचा वापर करणे, वाळूचा लिलाव ई-टेंडरिंगच्या माध्यमातून करणे, शून्य प्रलंबितता मोहीम राबविणे, जुन्या अभिलेखाचे स्कॅनिंग करणे, तसेच सात-बारा फेरफार, जन्म-मृत्यू नोंद यासारखी कागदपत्रे सहजरीत्या उपलब्ध करून देणे, अकृषिक परवाना १० दिवसांत देणे, सात-बारा संगणकीकृत नांदेड जिल्हा पॅटर्न सर्व जिल्ह्यात लागू करणे, कोतवाली पुस्तक अभिलेख्याचे स्कॅनिंग करणे, जिल्हाधिकारी सातारा यांनी राबविलेल्या अर्धन्यायिक कामकाजाचे संकेतस्थळ तयार करणे, गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमित बंद झालेले गाडी रस्ते, पाणंद रस्ते मोकळे करणे, मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत घेणे, एका छताखाली सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समाधान योजना राबविणे, ई-लोकशाही सेवा उपलब्ध करून देणे, ई-चावडी योजना पुनर्मोजणी, खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटप, वेगवेगळ्या अर्जांचे प्रमाणीकरण अशा काही महत्त्वाचा सेवा देण्यात झालेले बदल खूप परिणामकारक आणि गैरव्यवहार थांबविणारे आहेत.

लातूर जिल्हाधिकाऱ्यांनी सेतू केंद्रामार्फत ३५४ विविध सेवा उपलब्ध करून देण्याचा अभिनव कार्यक्रम राबविला आहे. सिंधुदुर्ग जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ई-प्रशासनाच्या दिशेने अनेक योजना राबविल्या आहेत. त्यातील टपाल व्यवस्थापन पद्धत अन्य जिल्ह्यात राबविण्याचा निर्णय झाला आहे. औरंगाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आधार कार्डाचा विशेष साहाय्य योजनेसाठी




उपयोग करून घेतला आहे. तशा पद्धतीने अन्य जिल्ह्यातही काम केले जाणार आहे. आज आधार नोंदणीच्या पहिल्या टप्प्यात ४ कोटी नोंदणी करून महाराष्ट्र देशभरात प्रथम आला आहे. दुसऱ्या टप्प्यात ७ कोटी लोकांची नोंदणी ३१ मार्च २०१३ पर्यंत करायची आहे. हा प्रकल्प आपल्या सगळ्यांच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी आहे.

पुढील काळात त्याच दिशेने आपल्याला जावे लागणार आहे. तंत्रज्ञानाने प्रशासनाचे काम गतिमान होण्यास मदत होणार आहे. पण त्यासाठी आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे.

मध्यंतरी खंडकरी शेतकऱ्यांचा प्रश्न आम्ही मार्गी लावला. मागील ५०-६० वर्षांपासूनचा ऐतिहासिक अन्याय दूर करण्यात आम्हाला यश आले. या प्रकरणात वेळोवेळी शासनाने न्यायालयीन लढा दिला होता. महाराष्ट्राचा इतिहास लिहिताना खंडकरी शेतकऱ्यांच्या चळवळीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. आपल्या न्याय्य हक्कासाठी प्रदीर्घकाळ लढा देणाऱ्या खंडकरी शेतकऱ्यांनी आता स्वत:च्या शेत जमिनीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविले पाहिजे. राज्यात ८५ हजार एकर जमीन शेती महामंडळाकडे होती. त्यामध्ये ४०१५ खंडकरी शेतकरी आहेत. शासनाने खंडकरी शेतकऱ्यांसाठी खंबीर भूमिका घेतल्याने आज त्यांना जमिनी परत मिळत आहेत. शेती महामंडळाच्या कामगारांचे प्रश्न आहेत. पडीक जमिनींचा प्रश्न आहे. या संदर्भात सहानुभूतिपूर्वक विचार करून प्रश्न सोडविले जाणार आहेत.

शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या न्याय्य हक्कासाठी शासनाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. महसूल विभाग अधिक लोकाभिमुख व पारदर्शक करण्यासाठी प्रलंबित ६८ हजार जमीन मोजणीच्या प्रकरणांपैकी ६१ हजार प्रकरणे आम्ही निकाली काढली आहेत. ई-टेंडरिंग सुरू केले. महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या नूतनीकरणाचा निर्णय घेतला आहे. टंचाईच्या काळात मागेल त्याला काम, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, छावण्या देण्याचा प्रयत्न सुरू आहे. काही भागातली सध्याची दुष्काळी परिस्थिती १९७२ पेक्षा भयानक आहे, हे कबूल करावेच लागेल. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर होत चालला आहे. अशा परिस्थितीत महसूल विभागासमोरचे आव्हान मोठे असले तरी अवघड नाही.

(शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे)

❐❐

# प्रशासनाचा मानवी चेहरा



**राज्य शासनाचा अत्यंत महत्त्वाचा विभाग म्हणून महसूल विभागाकडे पाहिले जाते. लोकांशी थेट संबंध असणारा हा विभाग आहे. या विभागाची बहुतांश कामे ही जमिनीशी आणि जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असल्यामुळे शेतकऱ्यांपासून कष्टकऱ्यांपर्यंत आणि ग्रामीण माणसापासून शहरी माणसापर्यंत, प्रत्येकाचाच या विभागाशी नियमितपणे संबंध येतो. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विकासयोजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी प्रामुख्याने हाच विभाग पार पाडत असतो... सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार.**

महसूल विभागाशी संबंधित असलेले सर्वच प्रश्न हे जनतेच्या अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न असतात. त्यामुळे या विभागातील अधिकारी जनतेशी कसे वागतात, लोकांची कामे किती तत्परतेने करतात यावरूनच सर्वसामान्य माणसाच्या मनात शासनाबद्दलची प्रतिमा निर्माण होत असते. या अधिकाऱ्यांमध्ये कार्यसंस्कृती रुजावी आणि वाढावी यासाठी सर्वच स्तरांवर प्रयत्न होण्याची गरज आहे, असे मला वाटते.

राज्याच्या सर्वांगीण विकासात अनेक विभाग आपले योगदान देत असतात. कृषी, सिंचन, शिक्षण, सहकार, आरोग्य, उद्योग, ऊर्जा अशा शासनाच्या विविध विभागांच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी योजनांची आणि विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी सुरू असते. या कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाच्या या सर्व विभागांचे संनियंत्रण आणि समन्वयन आवश्यक असते. ती जबाबदारी महसूल विभागाकडून पार पाडली जाते. महसूल अधिकाऱ्यांकडील जबाबदाऱ्यांचा विचार करता तो प्रशासनाचा कणा आहे, असेही म्हटले जाते, आणि ते खरेही आहे. महसूल अधिकाऱ्यांकडे लोकप्रतिनिधी आणि जनतेतील दुवा म्हणूनही पाहिले जाते. महसूल विभागाचे हे सारे महत्त्व लक्षात घेता या विभागाचा कारभार अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान आणि पारदर्शक व्हावा, यासाठी आपल्या सर्वांचे प्रयत्न सुरू आहेत. त्याला यशही चांगले मिळत आहे.

शासनाच्या विविध विभागांमध्ये अनेक चांगले अधिकारी आणि कर्मचारी आहेत. ते आपापल्या परीने प्रशासनात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असतात. प्रशासकीय कामकाजात सुलभता, सुसूत्रता आणि गतिमानता आणण्यासाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम ते राबवित असतात. त्यांच्या प्रयत्नांना अनेकदा जनतेकडूनही चांगला प्रतिसाद मिळतो. राज्यभरात सुरू असलेल्या अशा विविध उपक्रमांची आणि प्रयोगांची माहिती संकलित करून ते उपक्रम अधिक व्यापकपणे संपूर्ण राज्यात राबविण्याबाबतचा विचार गेल्या वर्षी पुण्यात आयोजित जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत पुढे आला. त्यातून १ मे २०११ पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सुवर्ण जयंती राजस्व अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्याची अंमलबजावणीही तत्काळ सुरू झाली. या अभियानाच्या माध्यमातून लोकांना अधिकाधिक चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच माहिती-तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून शासकीय कामकाजात सुधारणा घडवून आणण्याचा महसूल विभागाचा प्रयत्न असून, तो निश्चितच कौतुकास्पद आहे.

या अभियानाच्या माध्यमातून अनेक कामांना गती मिळाली. महसूल विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या दाखल्यांची प्रक्रिया ऑनलाइन करणे, माहिती मिळण्यापासून तक्रार निवारणापर्यंतच्या कामकाजासाठी ई-लोकशाही प्रणालीसारखी हेल्पलाइन उपलब्ध करून देणे, ई-चावडी योजना राबवणे, शासकीय कामकाजासाठी मोबाइल, इंटरनेट, व्हिडीओ कॉन्फरन्स, जीपीएस, सॅटेलाइट इमेज अशा अत्याधुनिक यंत्रणा आणि सुविधांचा उपयोग करून जनतेची कामे तातडीने मार्गी लावणे, प्रलंबित महसूल प्रकरणे व अपिलीय प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढणे, प्रत्येक जिल्हाधिकारी आणि तहसील कार्यालयात मदत आणि जनसंपर्क कक्ष स्थापन करणे, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदविण्याकरिता बायोमेट्रिक यंत्रणा बसविणे, अशा अनेक छोट्या-मोठ्या निर्णयांची अंमलबजावणी सुवर्ण जयंती राजस्व अभियानाच्या माध्यमातून राज्यभर करण्यात आल्यामुळे प्रशासकीय व्यवस्था गतिमान झाल्याचे चित्र आज सर्वत्र दिसत आहे.

साहजिकच या अभियानाला मिळणारा लोकांचा प्रतिसाद बघता महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्साहही वाढला आहे. महसूल विभागाची आणि पर्यायाने राज्य शासनाची प्रतिमा उंचावण्याचे फार मोठे काम या अभियानाच्या माध्यमातून होत आहे, असेच म्हणावे लागेल.

सुवर्ण जयंती राजस्व अभियानाच्या माध्यमातून शासकीय-प्रशासकीय व्यवस्था अधिक लोकाभिमुख करण्यात येत असली तरी या प्रयत्नांमध्ये सातत्य राखण्याची तसेच नावीन्य आणण्याची गरज आहे. या अभियानाने महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये कार्यसंस्कृती रुजविण्यास आणि वाढण्यास मदत केली आहे. यापुढे या अभियानात लोकांचा सहभाग वाढविण्याची आणि अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची गरज आहे. या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीतून भविष्यकाळात महसूल विभागाच्या कामकाजात आणि राज्याच्या प्रशासनातही एक आमूलाग्र बदल घडून येईल, असा मला विश्वास आहे.

सध्याचे युग हे माहितीचे आणि माहिती-तंत्रज्ञानाचे युग आहे. माहितीच्या अधिकाराने सर्वसामान्य जनतेला कुठलीही माहिती प्राप्त करण्याचा अधिकार दिला आहे. सर्वसामान्य माणसाला मिळालेल्या या माहितीच्या अधिकाराच्या शक्तीमुळे प्रशासनातील अपप्रवृत्ती आणि गैरप्रकारांवर निश्चितच निर्बंध

आले असून, प्रशासनावर एक प्रकारचा वचक निर्माण झाला आहे. याचा उपयोग होऊन निर्णयप्रक्रिया अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि स्वच्छ झाली आहे. परंतु, अधिकाऱ्यांनी भीतीपोटी काम करण्यापेक्षा लोककल्याणाच्या भावनेतून काम केले पाहिजे. लोकांच्या अडीअडचणी समजून घेऊन संवेदनशील मनाने त्यांना मदत करण्यासाठी पुढे आले पाहिजे. नियम-कायद्यांचे अनावश्यक अवडंबर न माजवता प्रशासनाचा मानवी चेहरा लोकांसमोर येईल, अशा पद्धतीने काम करीत राहिले पाहिजे.

गेल्या काही वर्षांमध्ये महसूल विभागाने आपल्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. अनधिकृत बांधकामे रोखणे, नागरिकांना कमीतकमी वेळेत आणि कष्टात अकृषिक परवाने देण्यासाठी नाशिक जिल्हाधिकाऱ्यांनी संगणकीय कार्यप्रणाली उपयोगात आणली होती. त्याच धर्तीवर राज्यभरात तशी प्रणाली लागू करण्याचा निर्णय आपण घेतला. वाळू लिलावासाठी ई-टेंडरिंग पद्धत सुरू केली. त्यामुळे या क्षेत्रातील अपप्रवृत्तींना आळा बसण्याबरोबरच महसुली उत्पन्न वाढण्यासही मदत झाली. ई-मोजणी, ई-फेरफार, ई-नकाशा, ई-चावडी, भूमी अभिलेखांचे स्कॅनिंग अशा अनेकविध उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना तत्पर सेवा दिल्यामुळे महसूल विभागाचे जनतेशी असलेले नाते अधिक दृढ होण्यास मदत झाली आहे.

प्रशासनाचा मानवी चेहरा अधिक ठळकपणे समोर येईल, असे अनेक निर्णय महसूल विभागाने घेतले आहेत. महसूल विभागाच्या प्रयत्नांमुळे खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटपाचा प्रश्न सोडवण्यात राज्य शासनाला यश आले आहे. यासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या सकारात्मक निकालानंतर खंडकरी शेतकऱ्यांना आणि त्यांच्या वारसांना आपण न्याय देऊ शकलो, याचे समाधान आम्हा सर्वांना आहे. कोकणातील बेदखल कुळांना मालकी हक्क देण्याबाबतचे प्रलंबित दावे निकाली काढून या कुळांना न्याय देण्यात आपल्याला यश मिळाले. विदर्भातील भूमिधारी शेतकऱ्यांना भूमिस्वामी करण्यासाठी विशेष मोहीम राबवून त्यांना त्यांचा हक्क देऊ शकलो. नागपूर-अमरावती विभागातील चाळीस हजार नझुल जमिनींचा प्रश्न सोडवून महसूल विभागाने विदर्भातील जनतेला फार मोठा दिलासा दिला आहे. महाराष्ट्रात जन्मलेल्या परीक्षार्थींसाठी अधिवास प्रमाणपत्राची अट शिथिल करून जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य मानण्याचा निर्णय आपण घेतला. या निर्णयामुळे या राज्यातील हजारो विद्यार्थ्यांची आणि युवकांची फार मोठी गैरसोय आपण दूर शकलो. आदिवासींच्या वनजमिनींवरील हक्कांचे जवळपास साडे तीन लाख दावे मंजूर करून या राज्यातल्या आदिवासींना जमिनीचे मालक करण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रात अकृषिक परवाने देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे.

महसूल विभागाने घेतलेल्या अशा अनेक लोकोपयोगी निर्णयांमुळे शासन आणि जनता यांच्यातले अंतर निश्चितच कमी झाले असून, शासन आणि प्रशासन हे लोकांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याची खात्री या राज्यातल्या जनतेला पूर्णपणे पटली आहे. महसूल विभागाचे कार्य यापुढेही असेच लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान, पारदर्शक पद्धतीने सुरू राहील, असा मला विश्वास आहे.

**(शब्दांकन : संजय देशमुख)**




ई-चावडी प्रकल्पांतर्गत तलाठ्यांना लॅपटॉपचे वाटप.

## द्रष्टे निर्णय... अभिनव योजना

### ग्रामीण भागातील छोट्या व्यवसायांना अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही

ग्रामीण भागातील निवासी इमारतीतील छोटी दुकाने, किराणा दुकान, पिठाची गिरणी, कांडप मशीन इत्यादी व्यवसायांसाठी आता अकृषिक परवानगीची आवश्यकता राहणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सुधारित धोरणामुळे छोटे व्यवसाय सुरू करणाऱ्यांना अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. हे धोरण फक्त वैयक्तिक निवासी वापराखालील इमारतीतील ज्या उपक्रमांचे क्षेत्रफळ ४० चौरस मीटर (४३० चौरस फूट) पेक्षा जास्त नाही, अशा सूक्ष्म उपक्रमांना लागू राहील. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४२ नुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय शेतजमिनीचे शेतीव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी रुपांतर करता येत नव्हते. २००७ मध्ये कलम ४२ मध्ये सुधारणा करून, ग्रामीण भागात जमीनधारकास वैयक्तिक निवासी वापरासाठी अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता काढून टाकण्यात आली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४२ मध्ये सुधारणा करण्यासाठी येत्या अधिवेशनात विधेयक मांडण्यात येईल. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर हे सुधारित धोरण अंमलात येईल. रुपांतरित कर आणि अकृषिक आकारणी नियमाप्रमाणे लागू राहील.

‘महसूल विभागाच्या कामाचा आवाका प्रचंड आहे. जन्माच्या नोंदीपासून मृत्यूनंतरच्या वारस दाखल्यापर्यंत ग्रामस्थांच्या दैनंदिन आयुष्यातील अनेक टप्प्यांवर या विभागाचा संबंध येतो. राज्यातील कोट्यवधी जनतेच्या जमिनींची मालकी, विश्वस्त या नात्याने हा विभाग सांभाळतो. कुटुंब कल्याण, अल्पबचत, सार्वजनिक वितरण व्यवस्था, निवडणुका, रोजगार हमी योजना, जमिनीचे संपादन, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, जातीचे दाखले इत्यादी विविध प्रकारची कामे, या विभागामार्फत कार्यक्षमतेने हाताळली जातात. गावपातळीपर्यंत पोहोच असल्याने व कोणतेही काम आव्हान म्हणून स्वीकारून यशस्वीपणे करून दाखविण्याची परंपरा असल्याने पल्स पोलिओ, जनगणना यांसारख्या इतर विभागांच्या योजना राबवून दाखवणारा हा विभाग आहे’... सांगताहेत महसूल मंत्री **बाळासाहेब थोरात.**



# पारदर्शक आणि लोकाभिमुख

**महसूल विभागाची धुरा सांभाळण्याची संधी मिळताना काय भावना होत्या?**

**उत्तर** - महसूल विभागाला दीडशे वर्षांपेक्षा जास्त अशी गौरवशाली परंपरा लाभली आहे. ब्रिटिशांनी भारतामध्ये प्रशासन व्यवस्था निर्माण करण्याची सुरुवात करताना महसूल विभाग व पोलीस विभाग या दोन विभागांची सर्वप्रथम निर्मिती केली होती. तेव्हापासून महसूल विभाग कार्यरत आहे. अशा विभागाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो. सुमारे २७ वर्षे विधानसभा सदस्य, व त्यापैकी सुमारे १२ वर्षे विविध विभागांचे राज्यमंत्री / मंत्री या नात्याने नेतृत्व करण्याची संधी मिळाली. त्यामुळे महसूल विभाग हा पूर्णत: अपरिचित नव्हता.



या विभागातील कामाची व्याप्ती, जमीन या घटकाला प्राप्त झालेले अनन्यसाधारण महत्त्व, भूसंपादनासारखे संवेदनाक्षम विषय यासारख्या बाबींच्या पार्श्वभूमीवर या विभागाचे कामकाज हाताळताना अधिक अभ्यासपूर्ण व जोमाने काम करावे लागेल, ही खूणगाठ विभागाची सूत्रं हातात घेताना मनाशी बांधली होती.

**प्रश्न - विभागाचे कामकाज हाताळण्यास सुरुवात करताना काय अनुभव आले?**

**उत्तर** - मी यापूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे या विभागाच्या कामाचा आवाका प्रचंड आहे. जमीनविषयक विविध कायदे, नियम, शासनाने वेळोवेळी घेतलेले धोरणात्मक निर्णय या सर्वांचा दैनंदिन कामकाज हाताळताना नियमितरीत्या संबंध येत असतो. नोव्हेंबर २०१० मध्ये या विभागाचे मंत्रीपद स्वीकारल्यानंतर हिवाळी अधिवेशन तोंडावर असल्याने या सर्व बाबींचा अभ्यास करण्या इतपत वेळ उपलब्ध नव्हता. मात्र, माझे स्वत:चे मत असे आहे की, कोणत्याही विभागाचा अनुभव येण्यासाठी, कामकाजातील खाचाखोचा समजण्यासाठी विधिमंडळ अधिवेशनात जे कामकाज हाताळले जाते, त्याच्याइतकी उत्तम संधी मिळत नाही. विधिमंडळामधील प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना, कपात सूचना, अर्धा तास चर्चा इत्यादी सर्व माध्यमातून जे विषय मांडले जातात, त्याची विधिमंडळ कामकाजाच्या निमित्ताने जरी आपण माहिती करून घेतली तरी त्या विभागाच्या कामकाजाची बरीचशी माहिती आपल्याला मिळते. माझ्या सुदैवाने नोव्हेंबर २०१० मध्ये या विभागाचे मंत्रीपद स्वीकारल्यानंतर लगेचच नागपूरला हिवाळी अधिवेशन होते. अनेक महत्त्वपूर्ण व संवेदनशील विषयांवर या अधिवेशनात चर्चा होणार होती. विधिमंडळ कामकाजाच्या निमित्त जमीन वाटपाची धोरणे, त्या संदर्भातील कायदे, नियम, या बाबींचा अभ्यास करता आला. विभागाचे कामकाज हाताळण्यास सुरुवात करतानाच या सर्व बाबींचा अनुभव मिळाला. हा अनुभव त्यानंतर विभागाचे कामकाज हाताळताना उपयुक्त ठरत आहे.

**कृषी विभागाचे मंत्रीपद भूषविताना तुम्ही ‘महापीक’ अभियान यशस्वीरीत्या राबविले होते. महसूल विभागात असा काही उपक्रम सुरू केला काय?**

**उत्तर** - महसूल विभागाचे एक वैशिष्ट्य आहे. या विभागात नियमित कामकाज हे नेहमीच्या गतीने सुरू असतेच. पण, त्याचबरोबर वर्षभर कोणता ना कोणता उपक्रम मोहीम स्वरूपात राबविला जात असतो. मतदार याद्यांची दुरुस्ती

**वन हक्क अधिनियमांची अंमलबजावणी करून आदिवासी धारकांचे ३,३३,३३७ इतके वन जमिनीवरील हक्कांचे दावे मंजूर केले.**


असो, शाळांची पटपडताळणी असो, अशा मोहिमा वर्षभर चालू असतात. यापूर्वीदेखील परंपरेने राजस्व अभियान राबविले जायचे. पावसाळा सुरू झाल्यानंतर चार महिन्यांच्या कालावधीत हे अभियान राबविले जायचे. मात्र, यामध्ये महसुली दप्तरे अद्ययावत करणे, वसुलीचा ताळमेळ घेणे, दप्तरांच्या तपासण्या अशा अंतर्गत बाबींचाच समावेश असायचा. अशा अभियानाचा महसूल विभागाचे अंतर्गत कामकाज सुधारण्यासाठी निश्चितच उपयोग व्हायचा. मात्र, सर्वसामान्य जनतेस या अभियानाचा फारसा उपयोग व्हायचा नाही. १ मे २०११ पासून राज्यभर सुरू करण्यात आलेल्या सुवर्ण जयंती राजस्व अभियान या कार्यक्रमांतर्गत गेल्या वर्षी आपण वेगवेगळ्या ११ उपक्रमांचा समावेश केला होता. या वर्षी आपण त्यात १९ उपक्रमांचा समावेश केला आहे. हे सर्व उपक्रम समाविष्ट करताना सर्वसामान्य जनता हा केंद्रबिंदू ठेवण्यात आला आहे.

**सुवर्ण जयंती राजस्व अभियानाची फलनिष्पत्ती कशी आहे?**

**उत्तर** - हे अभियान अतिशय उत्तमरीत्या राबविले गेले व जात आहे. गेल्या वर्षी या अभियानांतर्गत जातीचे, उत्पन्नाचे, रहिवासाचे असे वेगवेगळे ४२ लाख ४० हजार दाखल्यांचे वाटप केले. हे वाटप शिबिरांच्या माध्यमातून केले गेले. म्हणजेच विद्यार्थ्यांना / गरजू व्यक्तींना दाखले देण्यासाठी शासकीय कार्यालयांत जावे लागले नाही. याचप्रमाणे गावातले शेतरस्ते / पांधणरस्ते यांवरील अतिक्रमणे हटवून हे रस्ते वाहतुकीसाठी मोकळे करण्याचा उपक्रम हाती घेतला. गेल्या वर्षी या उपक्रमांतर्गत जवळपास २५ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविली गेली. सुमारे साडे सात लाख शेतकऱ्यांना याचा फायदा मिळाला. विशेष म्हणजे हा संपूर्ण उपक्रम लोक सहभागातून राबविला गेला. म्हणजेच शासनाच्या तिजोरीतून ही अतिक्रमणे हटविण्यासाठी काहीही खर्च करावा लागला नाही. शेतरस्ते मोकळे झाल्याने शेतमालाची ने-आण करणे सोपे झाले. याचबरोबर दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या जमिनीच्या मालकी हक्काबाबतच्या फेरफार नोंदीवर निर्णय घेण्यासाठी आपण महसूल मंडळ स्तरावर फेरफार अदालतींचे आयोजन केले. संपूर्ण राज्यभरामध्ये या उपक्रमांतर्गत नऊ लाखांपेक्षा जास्त फेरफार नोंदीवर निर्णय घेण्यात आले. तालुक्यातील विविध शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांना महसूल मंडळांच्या गावी एकत्रित बोलावून विविध शासकीय विभागांशी निगडित असलेल्या जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आयोजित केलेल्या समाधान योजनेसदेखील उत्तम प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत जनतेच्या १९ लाख ७० हजारांहून अधिक गाऱ्हाण्यांचे निराकरण करता आले. ई-चावडी प्रकल्पांतर्गत तलाठ्यांनी स्वखर्चाने लॅपटॉप विकत घेतले. संपूर्ण दप्तर संगणकीकृत केले. राज्यातील ३५ पैकी २४ जिल्ह्यांत ही योजना प्रगतिपथावर आहे. यंदाच्या वर्षी देखील या अभियानास उत्तम प्रतिसाद मिळतो आहे.

**भूमी अभिलेख हा विभाग महसूल विभागाअंतर्गत येतो. या विभागामध्ये कोणत्या सुधारणा केल्या गेल्या?**

**उत्तर** - महसूल विभाग म्हटले की लोकांना तलाठी, तहसीलदार, प्रांत, जिल्हाधिकारी ही कार्यालये व त्यांच्यामार्फत केली जाणारी कामे याची माहिती असते. मात्र, याचबरोबर तालुका पातळीपर्यंत कार्यरत असलेले मुद्रांक शुल्क विभाग व भूमी अभिलेख विभाग हेदेखील महसूल विभागाचाच भाग आहेत. भूमी अभिलेख विभागांतर्गत जमिनींची मोजणी, हद्द दुरुस्ती, जमिनीचे नकाशे, गाव नकाशे इत्यादीबाबतची कामे हाताळली जातात. या विभागाने जे मूळ महसुली रेकॉर्ड तयार केले, तो महसूल विभागाच्या कामकाजाचा पाया आहे. सर्वसामान्य जनतेचा या विभागाशी संपर्क





येतो, तो जमिनीच्या मोजणीच्या निमित्ताने. विभागाची सूत्रे हातात घेतली त्यावेळी मोजणीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असलेले अर्ज, मोजणीसाठी लागणारा कालावधी, या बाबी विचारात घेतल्या. जमाबंदी आयुक्तांशी चर्चा केली. प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नाही, हे लक्षात आल्यानंतर खाजगी सर्व्हेअरमार्फत मोजणी प्रकरणे पूर्ण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला. त्याव्यतिरिक्त प्रलंबित मोजणी प्रकरणांचा पूर्णत: निपटारा करण्यासाठी एका कालबद्ध योजनेची आवश्यकता भासली. शून्य प्रलंबितता हा उपक्रम राबविण्याचा निर्णय मे २०११ मध्ये घेतला. त्यानुसार ३१ मे २०११ रोजी प्रलंबित असलेली सर्व मोजणी प्रकरणे, डिसेंबर २०११ अखेर पूर्ण करण्याचा आराखडा तयार केला. त्यासाठी काही जिल्ह्यातल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा मोजणीच्या कामाचा जास्त ताण असलेल्या जिल्ह्यात वर्ग केल्या. भूमी अभिलेख विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी देखील चांगला प्रतिसाद दिला. परिणामी, ३१ मे २०११ अखेर प्रलंबित असलेल्या ६५ हजार मोजणी प्रकरणांपैकी जवळपास ९८ टक्के प्रकरणांत मोजणीचे काम पूर्ण करून नकाशे देण्यात आले. ही सर्व कार्यवाही डिसेंबर २०११ अखेर पूर्ण करण्यात आली. जी २ टक्के प्रकरणे शिल्लक राहिली, त्यामध्ये खातेदाराचा पत्ता मिळत नाही किंवा कोर्टाची स्थगिती आहे, अशा कारणांमुळेच मोजणी पूर्ण करता आली नाही.

यापुढचा टप्पा म्हणजे, ई-मोजणी हा प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पांतर्गत मोजणीचा अर्ज द्यायला माणूस गेला की, अर्जाची पोहोच देतानाच, मोजणीची तारीख व मोजणीसाठी कोण सर्व्हेअर येणार त्याचे नाव, लेखी स्वरूपात अर्जदारास कळविण्याची पद्धत सुरू केली.

रिक्त पदांचा प्रश्न भेडसावत होता. भूमी अभिलेख विभागातील रिक्त पदे भरायला मान्यता दिली. भरतीची प्रक्रियादेखील पूर्ण करण्यात आली. मोजणी विभागाची तालुका स्तरावरची व जिल्हा स्तरावरची सर्व कार्यालये इंटरनेटने जोडण्यात आली. नवीन संगणक उपलब्ध करून देण्यात आले.

**भूमी अभिलेख विभागात काही महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतल्यात का?**

**उत्तर** - भूमी अभिलेख विभाग महसूल विभागाचे मूळ रेकॉर्ड तयार करणारा विभाग आहे. या विभागाने तयार केलेले रेकॉर्ड हा महसूल विभागाच्या कामकाजाचा पाया आहे. राज्यात जमिनींची मोजणी करण्याचे काम सन



१८३० साली सुरू करण्यात आले होते. हे काम सन १९३० साली पूर्ण झाले. या कामास जमाबंदी असे नाव आहे. जमाबंदीमध्ये जमिनींची मोजणी करणे हा एक भाग आहे व जमिनींच्या प्रतवारी प्रमाणे शेतसारा ठरविणे, हा दुसरा भाग आहे. आपल्या सर्वांना कल्पना आहे की, गेल्या अनेक दशकांमध्ये सिंचनाच्या आणि शेतीच्या क्षेत्रात जे नवनवीन तंत्रज्ञान वापरात आणले गेले, त्यामुळे अनेक पडीक / पोटखराब जमीन लागवडीखाली आणल्या गेल्या आहेत. वास्तविक, नव्याने जमाबंदी करण्याचे ठरविले तर अशा पूर्वी पोटखराब / पडीक असलेल्या मात्र आता लागवडीलायक झालेल्या जमिनींवर शेतसारा बसविता येईल. पूर्वी जी जमीन हलक्या प्रतीची असेल, ती आता नव्या तंत्रज्ञानामुळे भारी प्रतवारीच्या वर्गात मोडत असेल, तर त्यावर जादा दराने शेतसारा आकारता येईल. तथापि, हे सगळे केल्यानंतर त्याचा अंतिम भार परत सर्वसामान्य शेतकऱ्यांना सोसावा लागेल. या सर्वांचा विचार करून जमाबंदी नव्याने करण्याऐवजी फक्त पुनर्मोजणी म्हणजेच रि-सर्व्हे नव्याने करण्याचा निर्णय घेतला आहे. हे कामदेखील मोठ्या स्वरूपाचे आहे. या कामासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील ६ हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर प्रायोगिक तत्त्वावर या संदर्भातील काम सुरू करण्यात आले आहे. या कामांमध्ये येणारे अनुभव विचारात घेऊन संपूर्ण राज्यातील जमिनींच्या रि-सर्व्हेचा कार्यक्रम हाती घेतला जाईल. या कामाची व्याप्ती प्रचंड आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागणार आहे. केंद्र शासनाच्या नॅशनल लॅण्ड रेकॉर्ड्स मॉडर्नायझेशन प्रोग्राम या कार्यक्रमाअंतर्गत केंद्र शासनाकडून देखील निधी उपलब्ध होणार आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर जमिनींच्या हद्दीवरून, वहिवाटीवरून, हिश्शांवरून होणारे वाद संपुष्टात येतील. सर्वसामान्य जनतेस यामुळे मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळेल. त्याचबरोबर अचूक अभिलेख तयार झाल्यामुळे न्यायालयीन प्रकरणेदेखील कमी होतील.

याचबरोबर ई-फेरफार हा उपक्रमदेखील प्रायोगिक तत्त्वावर हाती घेण्यात आला आहे. जमिनीची खरेदी-विक्री करण्याचा व्यवहार सब रजिस्ट्रारकडे नोंदल्यानंतर तिथेच फेरफाराची नोटीस प्रिंट केली जाते व त्यावर खातेदारांच्या सह्या घेतल्या जातात. व्यवहारावर कोणाला काही आक्षेप घ्यायचा असेल तर त्यासाठी १५ दिवसांचा कालावधी असतो. तो कालावधी संपल्यानंतर नोंद मंजूर करता येते. यामुळे व्यवहार झाल्या झाल्या फेरफाराची प्रक्रिया तत्काळ सुरू होते.

ई-रेकॉर्ड्स या उपक्रमाअंतर्गत जुने सात-बारा उतारे, जुन्या फेरफार नोंदी, खाते-उतारे, इत्यादी बाबी स्कॅन करून त्याच्या प्रती जनतेस उपलब्ध करून देण्यात येत आहेत. हा उपक्रमदेखील पुणे जिल्ह्यातील हवेली व मुळशी तालुक्यात प्रायोगिक तत्त्वावर सुरू असून, येत्या वर्षभरात हा उपक्रम संपूर्ण राज्यभरात राबविण्याचा मानस आहे.

**मुद्रांक शुल्क हादेखील महत्त्वाचा विभाग असल्याचा उल्लेख आपण केलात. या विभागात कोणते नवीन बदल केले जात आहेत?**

**उत्तर** - मुद्रांक शुल्क विभाग हादेखील महसूल विभागाचा एक महत्त्वपूर्ण विभाग आहे. गेल्या वर्षी या विभागाने राज्याला १४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल मिळवून दिला आहे. या विभागाची कार्यालयेदेखील तालुका पातळीपर्यंत उपलब्ध आहेत. जमिनीची खरेदी-विक्री, भाडेपट्टे, विविध प्रकारचे करार, इत्यादीबाबतचे जे दस्त असतात, ते दस्त नोंदणी विभागाकडे नोंदले गेले, तरच त्यांना कायदेशीर अस्तित्व असते. नोंदणीकृत दस्ताचे पुरावा म्हणून असलेले मूल्य पाहता, दरवर्षी नोंदणी होणाऱ्या दस्तांच्या संख्येत वाढ होत आहे.

मोठ्या स्वरूपात दस्तांची नोंदणी करण्यासाठी येणाऱ्या सर्वसामान्य जनतेसाठी प्रतीक्षा कक्ष, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, इत्यादी मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एक बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. या अंतर्गत येत्या ५ वर्षांत रुपये ३०० कोटी इतकी रक्कम खर्च करून राज्यातील सर्व नोंदणी कार्यालयात अद्ययावतीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. गेल्या वर्षी या कार्यक्रमाअंतर्गत रुपये ५५ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या वर्षी देखील रुपये २५ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

नोंदणी कार्यालयांमधील कामाचा ताण पाहता, मुंबई, पुणे व ठाणे येथे नव्याने २९ कार्यालये सुरू करण्यात येत आहेत. यापैकी मुंबई येथील २ कार्यालये सकाळी ७ ते दुपारी २ व दुपारी २ ते रात्री ९ या वेळात सुरू करण्यात आली आहेत. जेणेकरून सर्वसामान्य जनतेस त्यांची दैनंदिन कामे आटोपल्यानंतर नोंदणी कार्यालयाच्या सेवेचा लाभ घेता येईल.

वेगवेगळ्या व्यवहारांसाठी अदा करावे लागणारे मुद्रांक शुल्क ऑनलाइन पद्धतीने अदा करणे शक्य व्हावे, यासाठी ई-पेमेंट हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमाअंतर्गत ऑनलाइन पद्धतीने नेट-बँकिंगच्या माध्यमातून मुद्रांक शुल्क अदा करण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने रोख रकमा हाताळणे, मुद्रांक खरेदी करणे किंवा दस्ताला फ्रँकिंग करून घेणे, या बाबी टाळल्या जातात. गतवर्षी प्राप्त झालेल्या १४ हजार ५०० कोटी इतक्या महसुलापैकी सुमारे ७ हजार ३०० कोटी इतका महसूल ई-पेमेंटच्या माध्यमातून प्राप्त झाला आहे.

नागरिकांना कार्यालयात जाऊन नोंदणीसाठी खोळंबून राहावे लागू नये म्हणून राज्यात ई-स्टँपिंग सुविधा सुरू करण्यात आली आहे. यामुळे इंटरनेटद्वारे नोंदणीची आगाऊ वेळ निश्चित करता येऊ शकते.

खरेदी-विक्री व्यवहार करताना मिळकती संदर्भातील गेल्या ३० वर्षांचा अभिलेख शोधून काही अडचणी आहेत काय, हे पक्षकारांकडून तपासले जात असते. याला सर्च घेणे असे म्हणतात. आतापर्यंत असा सर्च घेण्यासाठी संबंधित कार्यालयात जाऊन सर्च फी भरून कागदपत्रे शोधावी लागायची. नोंदणी विभागाचे संगणकीकरण २००२ पासून सुरू करण्यात आल्यामुळे २००२ ते २०१२ या कालावधीचा संपूर्ण डाटा नोंदणी विभागाकडून उपलबध आहे. त्या आधारे नोंदणी महानिरीक्षक यांच्या

वेबसाइटवर ई-सर्च ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालये सेंट्रल सर्व्हरशी जोडणारा आय-सरिता हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. विविध प्रकारची माहिती तातडीने संकलित करणे, योग्य नियंत्रण ठेवणे, जनतेच्या दस्तांचा डाटा अधिक सुरक्षित पद्धतीने साठविणे, असे अनेक फायदे आय-सरिता या प्रणालीच्या वापरामुळे होणार आहेत.

**प्रश्न - मुद्रांक शुल्क व भूमी अभिलेख विभागाशी संबंधित बाबींवर चर्चा करताना संगणकीकरणाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आल्याचे लक्षात येते. खुद्द महसूल विभागामध्ये संगणकीकरणाचा वापर कसा होत आहे?**

**उत्तर -** २१ व्या शतकात प्रवेश करून एक दशक उलटून गेले आहे. संगणकाबरोबरच इंटरनेट क्रांतीने जग अधिक जवळ आले आहे. मुद्रांक शुल्क विभाग व भूमी अभिलेख विभाग या विभागात संगणकाचा वापर वाढतो आहे. संगणकाच्या वापरामध्ये महसूल विभागदेखील मागे नाही. पुणे महसुली विभागातील सर्व जिल्ह्यांमधील नियमित कामकाजाचा आढावा घेण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे सर्व जिल्ह्यांतील तहसील स्तरापर्यंतची माहिती या प्रणालीच्या माध्यमातून उपलब्ध होते. पुणे विभागातील अनुभव विचारात घेऊन ही प्रणाली पुढच्या वर्षी संपूर्ण राज्यभरात राबविण्यात येणार आहे. बिनशेती परवानगी मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची सद्य:स्थिती घरबसल्या समजावी यासाठी नाशिक जिल्ह्यात ऑनलाइन एन.ए. ही प्रणाली विकसित करण्यात आली. या प्रणालीच्या वापराचा अनुभव विचारात घेऊन ही प्रणालीदेखील संपूर्ण राज्यभर राबविली जाणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात २४ डिसेंबर २०१२ रोजी ई-ऑफिस या प्रणालीचे उद्घाटन मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले. सर्व तहसील कार्यालये जिल्हाधिकारी कार्यालयाशी जोडून ऑनलाइन पद्धतीने फाइलचे सादरीकरण व निर्णय हे या प्रणालीचे वैशिष्ट्य आहे. याचबरोबर नियमित स्वरूपाच्या बैठकांसाठी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना समक्ष बोलाविण्याचे प्रमाण घटले असून, व्हिडीओ कॉन्फरन्सिंगचा वापर वाढला आहे. महसूल विभागाकडून उपलबध होणाऱ्या विविध सेवा प्राप्त करून घेण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी रांगेत (In-Line) उभे राहण्यापेक्षा ऑनलाइन पद्धतीने सेवा उपलब्ध करून देणे हे आता महसूल विभागाचे उद्दिष्ट आहे.

**महसूल विभागाचे नेतृत्व करताना कोणते महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेतले?**

**उत्तर -** धोरणात्मक निर्णय तर अनेक घेतले गेले. परंतु, त्यापैकी सर्वसामान्य जनतेला दिलासा देणारे जे निर्णय आहेत ते माझ्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. खंडकरी शेतकऱ्यांचा लढा आपण ५ दशकांपासून पाहात होतो. खंडकरी शेतकऱ्यांवर झालेला ऐतिहासिक अन्याय (Historical Injustice) दूर करण्यासाठी आपण सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा दिला. खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत करण्याच्या मार्गातील सर्व अडथळे आपण दूर केले. जमिनीचे वाटप आता प्रगतिपथावर आहे. विदर्भातील नझुल जमिनींच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण व भूमिधारी संवर्गातील शेतकऱ्यांना जमिनीच्या मालकीचे हक्क प्रदान करणे, या संदर्भातील निर्णय अनेक वर्षे प्रलंबित होते. या दोन्ही विषयांबाबत धोरणात्मक निर्णय घेतले. नझुल जमिनींबाबतच्या सुधारित धोरणामुळे ४० लाखांपेक्षा जास्त भाडेपट्टाधारकांस दिलासा मिळाला आहे. भूमिधारी संवर्गातील ८६ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना १ लाख २० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राच्या मालकीचे हक्क प्रदान करण्यात आले आहेत. वन हक्क कायद्याची अंमलबजावणी करताना सव्वा तीन लाखांपेक्षा जास्त आदिवासी धारकांना आपण त्यांचे हक्क देऊ शकलो. गावपातळीवर महसूल विभागाचे काम करणाऱ्या कोतवालाचे मानधन वाढविण्याचा निर्णय आपण घेतला. त्याचबरोबर चतुर्थश्रेणी संवर्गातील २५ टक्के पदे कोतवालांमधून भरण्यासाठी आपण आरक्षित



केली. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील साडे अकरा हजारांपेक्षा जास्त बे-दखल कुळांना आपण मालकी हक्क प्रदान करू शकलो. कुळाला मिळालेली जमीन विकण्यासाठी परवानगी घेण्याची अट काढून टाकण्यासाठी आपण कायद्यात दुरुस्ती केली. इतरही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. परंतु, वर उल्लेख केलेल्या निर्णयांमुळे सर्वसामान्य जनतेसाठी आपण काही करू शकलो याचे समाधान लाभले.

**महसूल विभागाच्या भविष्यकालीन आराखड्याबद्दल काय सांगाल?**

**उत्तर** - कामाच्या निमित्त दौरे करताना व विविध बैठकांच्या निमित्त राज्याच्या विविध भागात उपस्थित राहताना असे लक्षात आले की, अनेक जिल्ह्यांत स्थानिक स्वरूपाचे अत्यंत जुने व दीर्घकाळापासून प्रलंबित असे काही प्रश्न आहेत. उदा - गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्याचा दौरा करताना तेथील बंगाली निर्वासितांच्या जमिनी संदर्भात काही समस्या दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याचे समजले. त्याचबरोबर चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा, कोरपना व जिवती हे तालुके पूर्वी हैदराबाद राज्याचा भाग होते. या तालुक्यातील जनतेच्या जमिनीविषयक काही समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे लक्षात आले. जसजशा समस्या समोर येतील, तसतसे त्यावर मार्ग शोधत राहण्यापेक्षा असे प्रश्न शोधणे, त्यावर काय उपाययोजना करावयाची, याबाबत विचारमंथन करणे व ठरावीक कालावधीत त्यावर अंतिम निर्णय घेणे, असा एक नियोजनबद्ध कार्यक्रम हाती घेणे गरजेचे वाटले. प्रत्येक जिल्ह्यातील अशा जुन्या समस्या (Chronic Problems) शोधून त्यांचा आराखड्यात समावेश करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत. या आराखड्याच्या निमित्ताने दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांबाबत विचारमंथन होईल व यापैकी बहुतांश प्रश्न मार्गी लागू शकतील. याचबरोबर महसूल विभागाच्या दैनंदिन कामकाजात IT चा वापर वाढविणे व बहुतांश सेवा On-Line पद्धतीने उपलब्ध करून देणे असादेखील मानस आहे.

महसूल विभागातील अनेक कायदे, नियम, धोरणे जुनी आहेत. कालानुरूप त्यात बदल होणे आवश्यक आहे. तज्ज्ञांची एक समिती नेमून कोणकोणते बदल आवश्यक आहेत, त्याचा अहवाल प्राप्त करून घेण्यात येईल. जेणेकरून कायद्यातील / नियमांतील तरतुदी अधिक सोप्या व जनतेस उपयुक्त अशा राहतील.

अचूक, जलद, सुलभ व पारदर्शक पद्धतीने सर्वसामान्य जनतेस सेवा उपलब्ध करून देणे हे महसूल विभागाचे उद्दिष्ट राहील.

(**शब्दांकन : माणिक गुट्टे,** उपसचिव, महसूल विभाग) ❐ ❐

## द्रष्टे निर्णय... अभिनव योजना

# मानीव खरेदीखताची प्रक्रिया झाली सोपी

राज्य शासनाने मानीव अभिहस्तांतरणाची (डीम्ड कन्व्हेयन्स) ची अंमलबजावणी गतीने होण्यासाठी १ डिसेंबर २०१२ पासून कालबद्ध मोहीम आखली आहे. त्यासाठी राज्यातील ८८ हजार गृहनिर्माण संस्थांची एकत्रित माहिती असलेले संकेतस्थळ तयार करण्यात येत आहे.

खासगी जमिनींच्या भूखंडांवर सर्व पूर्वपरवानग्या घेऊन एक मजली अथवा बहुमजली इमारतींचे बांधकाम पूर्ण करून त्याची विक्री करण्यात आलेली आहे, परंतु भूखंडाच्या अधिकार अभिलेखात संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावाऐवजी जमिनींच्या मूळ मालकाचे किंवा विकासकाचे नाव आहे अशा सर्व प्रकरणात महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिका अधिनियम १९६३ मधील कलम ११ (३) मध्ये सुधारणा करून मानीव खरेदीखत करून देण्याची तरतूद करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला. यासाठी सहकार विभागातील अधिकाऱ्यांना सुनावणी देऊन आदेश पारित करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे.

(Maharashtra Ownership Flat Act - MOFA) १९६३ च्या मोफा कायद्यानुसार एखाद्या बिल्डरने जागेची विक्री सुरू केली आणि ती ६० टक्के पूर्णत्वाला आली की त्याला त्या सदनिकाधारकांची एक सोसायटी बनवून ती नोंदणीकृत करून देणे बंधनकारक आहे. सोसायटी नोंदणीकृत झाल्यानंतर चार महिन्यांच्या आत बिल्डरला त्या जागेचे कन्व्हेयन्स करून देणेही क्रमप्राप्त आहे. म्हणजेच जमीन हस्तांतरित करण्यास तो बांधील आहे. असे असले तरी आजही बऱ्याच सोसायट्यांचे हस्तांतरण झालेले नाही.

शासनाने पुनर्विकासाची घोषणा केली तेव्हा अनेक सोसायट्या आपल्या जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी पुढे सरसावल्या तेव्हा असे लक्षात आले की, जमिनीची मालकी सोसायटीकडे नसेल तर पुनर्विकास करता येऊ शकत नाही. त्यावेळी लोकांना डीम्ड कन्व्हेयन्सचे महत्त्व पटू लागले. आता कन्व्हेयन्स करायचा तर बिल्डर आणि जमीन मालकांच्या सह्या लागतात. पण काही सोसायट्यांचे बिल्डर किंवा जमीन मालक हयात नाहीत, जे हयात आहेत त्यांचे जमीन मालक हयात नाहीत. काहीजण हयात आहेत पण त्यांचे पत्ते सोसायटीला माहीत नाहीत मग अशावेळी सोसायटीला पुनर्विकास करण्यासाठी कन्व्हेयन्स कोण देणार? या सर्व समस्या लक्षात घेऊन विषेश मोहीम राबविण्यात येणार आहे. आवश्यक कागदपत्रे जोडून मुद्रांक शुल्क भरल्यानंतर सक्षम अधिकारी बिल्डर, जमीन मालक आणि सोसायटी या तिघांनाही नोटिसा देऊन सुनावणी घेतो व त्याचे आदेश असलेली फाइल मुद्रांक शुल्क अधिकाऱ्यांकडे पाठवितो. मुद्रांक शुल्क भरले नसेल तर दंडासह ही रक्कम भरल्यानंतर कन्व्हेयन्सचे काम पूर्ण होते.

ज्यावेळी संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था त्या नोंदणीकृत दस्ताआधारे अधिकार अभिलेखात नोंदी करण्यासाठी तलाठी अथवा नगरभूमापन अधिकारी यांच्याकडे अर्ज करतात त्यावेळी महसूल विभागातून फेरफार नोंद अभिलिखित व निर्गमित करण्यापूर्वी अशा मिळकतीमधील संबंधितांना पुन्हा नोटीस देण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय घेण्यात आला असून या निर्णयामुळे मानीव खरेदीखत व अभिहस्तांतरणाची प्रक्रिया सुलभ झाली आहे.

# गतिमानतेला नवा आयाम



**सुवर्ण जयंती राजस्व अभियानाच्या पहिल्या वर्षी जनतेने उत्तम प्रतिसाद दिला. या अभियानांतर्गत १ मे २०११ ते ३० एप्रिल २०१२ या कालावधित विविध दाखले देण्याकरिता शिबिरे आयोजित करण्यात आली. यावेळी ४० लाख दाखले वितरित केले गेले. अतिक्रमित व बंद झालेल्या शेतातून जाणारे २५ हजार ३२३ कि.मी.चे रस्ते लोकसहभागातून तयार करण्यात आले. फेरफार अदालत आयोजित करून ८ लाख ७० हजार २७२ फेरफार मंजूर करण्यात आले. १ एप्रिल २०११ पर्यंत प्रलंबित असलेली ५६ हजार महसूल व अपील प्रकरणे निकाली काढण्यात आली. ई-चावडी अंतर्गत २५०० तलाठ्यांना लॅपटॉप देऊन सातबाराचे उतारे व विविध दाखले अशी ८२ हजार कागदपत्रे तर समाधान योजनेंतर्गत १९ लाख विविध दाखले वितरित केले गेले... सांगताहेत महसूल राज्यमंत्री प्रकाश सोळंके.**

शेतकरी व सामान्य नागरिकांचा महसूल विभागाशी नियमित संपर्क येतो. नागरिकांच्या विविध प्रकरणांची हाताळणी गतिमान पद्धतीने व्हावी तसेच महसूल प्रशासन लोकाभिमुख व्हावे यासाठी राज्यात सुवर्ण जयंती राजस्व अभियान राबविण्याचा निर्णय आम्ही घेतला. विविध जिल्ह्यांमध्ये महसूल विभागातर्फे राबविण्यात आलेल्या यशस्वी उपक्रमांची सर्वत्र अशाच प्रकारे परिणामकारक अंमलबजावणी करणे हा या अभियानामागे उद्देश होता. त्याचबरोबर नागरिकांच्या अर्जावर समाधानकारक उत्तर देण्याच्या दृष्टीने नागरिक हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या अर्जाची पारदर्शक व गतिमान पद्धतीने सोडवणूक करण्यासाठी काही अभिनव योजना या अभियानामार्फत सुरू करण्यात आल्या.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शासनाच्या योजना परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यासोबतच महसूल विभागाचे बळकटीकरण करण्यावर आम्ही भर दिला आहे. महसूल विभागातर्फे देण्यात येणारे दाखले व सेवा याकरिता लागणारे अर्ज, नमुने, प्रतिज्ञापत्र यांचे ई-डिस्ट्रिक्ट प्रकल्पांतर्गत प्रमाणीकरण करण्यात आले आहे. राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत प्रत्येक चार गावांकरिता एक महा ई-सेवा केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. माहिती मिळविण्यासाठी किंवा तक्रार निवारण्यासाठी ई-लोकशाही प्रणाली (हेल्पलाइन) सुरू केली, ई-चावडी योजनेंतर्गत तलाठ्यांनी लॅपटॉपच्या साहाय्याने दप्तरी कामकाज पाहणे सुरू केले. मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ कॉन्फरन्स, जीपीएस, सॅटेलाईट इमेज या सर्व माहिती तंत्रज्ञानाचा वापर विविध शासकीय कामांसाठी वाढविण्यात आला. सातबाराचे संगणकीकरण करण्याचे काम मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले आहे. येत्या दोन वर्षांत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. वाळू लिलावाकरिता ई-टेंडरिंग पद्धतीचा वापर बंधनकारक करण्यात आला; शिवाय जमीन मोजणीसारखे क्लिष्ट काम ई-मोजणी अंतर्गत सुलभ करण्यात आले. मोजणीचे अर्ज संगणकीय प्रणालीद्वारे नोंदवून मोजणीची तारीख देण्यापासून ते मोजणी होईपर्यंत संनियंत्रण आज्ञावलीद्वारे करण्यात येत आहे. याशिवाय ई-फेरफार (ऑनलाइन म्युटेशन), ई-नकाशा (नकाशाचे डिजिटायझेशन), भूमी अभिलेखाचे स्कॅनिंग, बारकोड सिस्टीम, ई-चावडी यांसारख्या योजना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुणवत्तापूर्ण सेवा पुरविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

***राज्याने या वर्षी उद्दिष्टापेक्षा १४३ टक्के जादा महसूल गोळा केला आहे.***

महसूल विभागाकडे महसुली कामकाजाशिवाय इतर बरीचशी कामे सोपविलेली आहेत. जे अधिकारी व कर्मचारी महसुली वसुलीचे उद्दिष्ट ओलांडण्याकरिता तसेच महसूल खात्याच्या मूलभूत जबाबदाऱ्या पार पाडण्याकरिता अथक प्रयत्न करतात अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांचा यथोचित सत्कार करण्याकरिता दरवर्षी महसूल दिन साजरा करण्यात येतो. महसूल विभागात क्षेत्रीय स्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या महसूल अधिकारी, कर्मचारी यांचा महसूल दिनी गौरव करण्यात येतो.



**विदर्भातील भूमिधारी शेतकऱ्यांचे भूमिस्वामी शेतकऱ्यांत रूपांतर करण्याची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.**

याशिवाय गेल्या वर्षभरात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन महसूल विभागाला वेगळी दिशा दिली आहे. भरती प्रक्रियेतील परीक्षार्थ्यांसाठी, तसेच उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरून अधिवास प्रमाणपत्राची अट शिथिल केली. खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटप सुरू केले. बेदखल कुळांना मालकी हक्क प्राप्त करून दिले. प्रलंबित मोजणी पूर्ण करून मोजणी प्रकरणात शून्य प्रलंबितता आणण्यासाठी कालबद्ध पद्धतीने काम केले. शेतकऱ्यांची प्रलंबित मोजणी प्रकरणे विनाविलंब निकाली काढण्यासाठी खाजगी सर्व्हेअरची नियुक्ती केली.

वाळू लिलावात पारदर्शकता आणण्यासाठी ई-टेंडरिंग पद्धती अवलंबिली. महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाचे नूतनीकरण व दुरुस्ती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मोजणी प्रकरणांचे नियोजन करण्याकरिता आज्ञावली (ई-मोजणी) तयार करण्यात आली आहे. नझुल जमिनीचा भाडेपट्टा ठरवून हस्तांतरणाच्या परवानगीची पद्धत सोपी करणारे नागपूर व अमरावती विभागातील नझुल धोरण जाहीर केले. जनतेस उत्तम सेवा आणि सुविधा मिळाव्यात यासाठी मुद्रांक शुल्क कार्यालयांचे अद्ययावतीकरण करण्याचे काम सुरू केले.

(शब्दांकन : मुक्ता पवार)

# नव्या संकल्पना...नवे उपक्रम

**सुवर्ण जयंती राजस्व अभियान यशस्वी होण्याची काय कारणे आहेत?**

सुवर्ण जयंती राजस्व अभियानाला जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाला. वास्तविक शेतसारा वसूल करणे म्हणजे बॉलिवूडच्या भाषेत 'लगान' वसूल करणारा आणि महसूल गोळा करणारा हा विभाग लोकाभिमुख करणे मोठे कठीण काम होते. सतत कार्यक्रम देणे गरजेचे होते. यासाठी गेल्या २ वर्षांत आम्ही अनेक उपक्रम राबवले. सुवर्ण जयंती राजस्व अभियानामार्फत आम्ही शेतातले रस्ते मोकळे करण्याचा कार्यक्रम घेतला. आपल्याकडे जुने रेकॉर्ड आहे. त्यात प्रत्येक गावातल्या शेतरस्त्यांचा उल्लेख आहे. या रस्त्यांवर वर्षानुवर्षे अतिक्रमण झाले. त्यामुळे शेतात गाडी जाणे अशक्य झाले होते. शेतमाल लवकर नेणे कठीण झाले होते. आम्ही गावात गेलो. लोकांना आम्ही नकाशे दाखवले. गावकऱ्यांची बैठक घेऊन त्यांना सांगितले की, ज्यांनी या रस्त्यांवर अतिक्रमण केले त्यांनी स्वत:हून काढून टाकावे; नाहीतर मामलेदाराकडे जो न्यायालयाचा अधिकार असतो तो वापरावा लागेल. गावाने मोकळ्या रस्त्यावर माती टाकली तर पक्का रस्ता सरकार बनवून देईल असे आश्वासन दिले. अशा गावांमध्ये एक दिवस ठरवून रस्ते मोकळे केले गेले. आता लोक खूश आहेत. त्यांना त्यांचा शेतमाल बाजारात लवकर नेणे शक्य झालेय. राजस्व अभियानाचे हे यश आहे.



दाखल्यांचे वितरण करताना अपर मुख्य सचिव श्री. स्वाधीन क्षत्रिय (शिरोळ, जि. कोल्हापूर)

**आदिवासी भागात आपण स्वत: गेला होतात. आपला काय अनुभव आहे?**

आदिवासी भागासाठी आपण पहिल्यांदा एक असा निर्णय घेतला की, आयएएस अधिकाऱ्यांची पहिली नेमणूक आदिवासी भागात करायची. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे, प्रकल्प अधिकारी म्हणून त्यांना आपण नेमले. सहायक जिल्हाधिकारी म्हणून त्यांची पहिली नेमणूक असते. आम्ही त्यांना सांगितलं की, प्रांत अधिकारी म्हणून काम शिकतानाच आदिवासींच्या कल्याणाच्या योजनांवरही त्यांनी देखरेख ठेवावी. मेळघाटात मी स्वत: गेलो होतो. भूमिधारी आणि भूमिस्वामी असा वाद तिथे अनेक दशकांपासून सुरू आहे. विदर्भ भागात काही कायदे वेगळे आहेत. काही बाबतीत कायद्याची भाषाही वेगळी आहे. पश्चिम महाराष्ट्रात भोगवटादार वर्ग १ म्हणजे मूळ जमीन मालक आणि भोगवटादार वर्ग २ म्हणजे शासनाने दिलेल्या जमिनीचा हक्कदार, अशी भाषा कायद्यात आहे. विदर्भात त्यालाच भूमिस्वामी आणि भूमिधारी म्हणतात. हा भाग जेव्हा राज्यात आला, तेव्हा भूमिस्वामी आणि भूमिधारीचा चुकीचा अर्थ लावला गेला. खरं म्हणजे या आदिवासींकडे वडिलोपार्जित जमिनी होत्या. म्हणजे ते आदिवासी भोगवटदार वर्ग १ होते. पण त्यांना भोगवटदार वर्ग २ ठरवले गेले. जेव्हा जुने रेकॉर्ड आम्ही काढले तेव्हा हे कळले, महसूल खात्यात सुदैवाने एक गोष्ट चांगली आहे, ती म्हणजे, या खात्यात कुठलाही रेकॉर्ड काढला तर २०० वर्षांपर्यंत जुना रेकॉर्ड मिळतो. फक्त त्याचा अभ्यास करावा लागतो. शेवटचा सर्व्हे आपल्याकडे १९२० साली झाला. त्यावेळी जर तुम्ही मालक होता तर शासनाने तुम्हाला जमीन देण्याचा प्रश्नच येत नाही. ही चूक दुरुस्त करण्याचा आम्ही प्रयत्न केला. बाळासाहेब थोरात यांची यात महत्त्वाची भूमिका आहे.

खंडकरी शेतकऱ्यांबाबत हेच झाले. कुळाचा

'मी नेहमी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे राज्यभरातल्या महसूल अधिकाऱ्यांशी बोलतो. अशाच एका व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या वेळी गडचिरोलीतल्या चौधरी नावाच्या अधिकाऱ्याशी बोलणे झाले. अहेरीसारख्या दुर्गम भागात तो आहे. मी त्याला विचारले की, दुर्गम भागातला काय अनुभव आहे? त्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगमध्ये ३५ जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी, विभागीय आयुक्त असे सगळे हजर होते. त्यात तो म्हणाला, साहेब, एकच विभाग मी पाहिलाय, ज्याचं स्वागत लोक करताहेत तो म्हणजे महसूल विभाग. नक्षलवाद्यांनीसुद्धा लोकांना सांगितलंय की, हा विभाग ज्या योजना राबवतोय त्याचा लाभ घ्या. मला वाटते की, महसूल विभागाने राबवलेल्या सुवर्ण जयंती राजस्व अभियान योजनेला मिळालेली ही एक पावतीच आहे. सरकारच्या विरोधात असलेल्या नक्षलवाद्यांना वाटतेय हे अभियान लोकाभिमुख आहे. आम्ही जी शिबिरे या भागात आयोजित करतो त्याला मोठ्या संख्येने लोक येतात.' सांगताहेत सुवर्ण जयंती राजस्व अभियानाचे मार्गदर्शक, अपर मुख्य सचिव (महसूल) स्वाधीन क्षत्रिय.

कायदा कारखान्यांना लावला गेला. या कारखान्यांना नियमानुसार १८ एकर जमीन वगळून बाकीची जमीन द्यायला हवी होती; पण ५० च्या ५० एकर जमीन कूळ कायद्यानुसार घेतली गेली. शेतकरी भूमिहीन झाले. माझ्या मते कायद्याचा चुकीचा अर्थ लावला गेला. या जमिनी परत देण्याचा कार्यक्रम आम्ही राबवत आहोत. ५० वर्षे या जमिनींसाठी लोक लढत आहेत. त्यांना आता न्याय मिळेल. महसूल मंत्र्यांनी त्यासाठी पुढाकार घेतला आहे.

वारसाच्या नोंदी आपण कॅम्पमध्ये घेतोय. सरकारी योजना एका छत्राखाली आणण्याचा कार्यक्रम आपण घेतला. फक्त महसूलच्याच नव्हे तर अन्न व नागरी पुरवठा, आदिवासी, सामाजिक न्याय या विभागांच्या योजनांचा लाभ लोकांना देण्यासाठी कॅम्प घेऊन लाभार्थी निश्चित केले. अशा कॅम्पमध्ये लोक खरं बोलतात. अर्जदार जर दारिद्र्यरेषेखालचा नसेल तर ते कॅम्पमध्येच जाहीरपणे सांगतात. वारस ठरवताना एक वारस पुढे आला तर इतर वारसही आहेत असे सांगतात. त्यामुळे पारदर्शीपणा येतो.

अशा छोट्या गोष्टी केल्या तरी लोकांचा त्रास वाचतो. मी या विभागात नवीन आलो तेव्हा तहसील कार्यालयांना भेटी दिल्या. मुंबईत मी पाहिले लांबच्या लांब रांगा लागलेल्या, कशासाठी तर डोमिसाइल काढण्यासाठी. नाव विचारलं तर कुणी वायमारे, कुणी सावंत. म्हणजे महाराष्ट्रातच लहानाचे मोठे झालेले. शासनाकडे आम्ही प्रस्ताव दिला की, जर महाराष्ट्रात जन्म झाल्याचा दाखला असेल आणि दहावीपर्यंत राज्यातच शिक्षण झाले असेल तर अशा व्यक्तीला डोमिसाइलच्या वेगळ्या दाखल्याची गरज नाही. जातीचे दाखलेसुद्धा आम्ही शाळेतच देतोय. त्यामुळे लोकांना सरकारी कार्यालयाच्या खेपा घालण्याची गरज नाही.

कार्यप्रणालीचे सुलभीकरण आवश्यक आहे. महसूल विभाग १६ वेगवेगळ्या प्रकारचे अर्ज वाटप करतो. आता वेळ आली आहे की, आधार कार्डचा वापर यासाठी करावा लागेल. पोलीस भरतीसाठी वेगवेगळ्या महसूल विभागांत वेगवेगळे प्रपत्र होते. काही अधिकारी अमुक प्रपत्र मानायचे. काही मानत नसत. त्याचा फटका उमेदवारांना होत असे. या प्रपत्रात आम्ही सुसूत्रता आणली.

**चावडी वाचन ही नवी संकल्पना राजस्व अभियानात वापरली गेली, त्याबाबत काय सांगाल?**

महसूल खात्याकडे असलेल्या रेकॉर्डचे गावात जाऊन चावडीवर जाहीर वाचन करण्याचा उपक्रम आम्ही राबवला. त्याला लोकांनी उत्तम प्रतिसाद दिला. गावात कुठे मोकळ्या जागा आहेत, कुठे स्मशानभूमी आहे याचे रेकॉर्ड जेव्हा वाचले जायचे तेव्हा गावकरीच सांगायचे की, या जागेवर अतिक्रमण झालेय. महसूल रेकॉर्ड अद्ययावत होण्यासाठी या चावडीवाचन योजनेचा फायदा झाला.

**नझुल जमिनीबाबत आपण निर्णय घेतलात?**

होय. पूर्वी निझामाच्या काळात ज्या सरकारी जमिनी वाटण्यात आल्या त्यांना नझुल जमीन म्हणत. नझुल म्हणजे सरकारी जमीन. ४० हजार पट्टे त्या काळात वाटण्यात आले होते. या सगळ्या जमिनी मराठवाडा आणि विदर्भातल्या आहेत. ३० वर्ष, ६० वर्ष अशा भाडेपट्ट्याने जमिनी दिल्या गेल्या होत्या. या जमिनींच्या भाडेपट्ट्याच्या नूतनीकरणावरून वाद होता. कारण कुठलेच धोरण ठरलेले नव्हते. १९९९ साली सरकारने एक धोरण आणले. त्यावर न्यायालयात ६४२ रिट पिटिशन दाखल झाल्या. न्यायालयाने सरकारला सांगितले की, धोरण मागे घ्या नाहीतर आम्ही रद्द करतो. तेव्हा धोरण मागे घेण्यात आले. नवीन धोरण आम्ही निश्चित करण्यापूर्वी सर्वांशी चर्चा केली. एक धोरण निश्चित केले. त्यावर अजून एकही रिट पिटिशन दाखल झालेले नाही.

मुंबईच्या जमिनीबाबत हाच प्रकार झाला. मुंबईत १६०० जमिनी भाडेपट्ट्याच्या आहेत. ब्रिटिश काळात त्या देण्यात आल्या होत्या. या जमिनींच्या भाडेपट्ट्याच्या धोरणाविरोधात लोक उच्च न्यायालयात गेले. न्यायालयाने सांगितले की, सरकारला भाडे वाढवण्याचा अधिकार आहे पण ते भाडे 'रिझनेबल' असावे. आम्ही धोरण ठरवण्यापूर्वी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे याबाबतचे निकाल वाचले. त्यानंतर भाडेपट्टी ठरवताना ७५:२५ असा फॉर्म्युला आम्ही वापरला. आज सहा महिने झालेत पण अजून कुणी या धोरणाच्या विरोधात न्यायालयात गेलेले नाही.

महसूल विभाग लोकाभिमुख कामे करत असतोच. गरज आहे ती सतत नवे कार्यक्रम देण्याची. आम्ही दरवर्षी आढावा बैठक घेतो. त्यात आदल्या वर्षी जे कार्यक्रम घेतले असतील ते पुढच्या वर्षीच्या कार्यक्रमात घेत नाही. उदाहरणार्थ महसूल कार्यालयात बायोमेट्रिक प्रणाली लावण्याचा कार्यक्रम पूर्ण झालाय. पुन्हा पुढच्या वर्षी तो राबवण्याची गरज नाही. आम्ही कॉलसेंटर सुरू केलेत. लोकांना तिथे टोल फ्री नंबरवर फोन करून आपल्या तक्रारी मांडता येतील.

(शब्दांकन : सुभाष शिर्के)

## द्रष्टे निर्णय... अभिनव योजना

### कालमर्यादित मुदतवाढ

महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ हा ६ जुलै १९७४ पासून अंमलात आला. या अधिनियमामध्ये १ एप्रिल १९५७ ते ६ जुलै १९७४ या कालावधीमध्ये ज्या आदिवासी खातेदारांच्या जमिनीचे बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरण झाले आहे, अशा जमिनी मूळ आदिवासी खातेदार किंवा वारसास परत करण्यासाठी अर्ज करण्याची मुदत ३० वर्षे इतकी होती. ही मुदत ६ जुलै २००४ रोजी संपलेली होती. वरील कालावधीमध्ये आदिवासी जमीनधारकांच्या जमिनीचे बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरण झाले असल्यास त्या जमिनी मूळ आदिवासी धारकाकडे परत करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे अधिकार देण्यात आले. परंतु अधिनियमात कोणतीही कालमर्यादा ठरविण्यात आलेली नव्हती. अशा प्रकरणांची चौकशी जिल्हाधिकारी केव्हाही करू शकत होते. मात्र जिल्हाधिकारी त्यांचे हे अधिकार वापरत नाहीत आणि अशा प्रकरणात मुदत संपली आहे, असे सांगून प्रकरणे निकाली काढत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अधिनियमात केलेल्या सुधारणेनुसार आदिवासी खातेदारांना अथवा त्यांच्या वारसांनी जमीन परत घेण्यासाठी अर्ज करण्याची मुदत सन २००४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने आणखी ३० वर्षांसाठी वाढवली आहे.

# ई-महाभूमी

**चंद्रकांत दळवी**

**ज**मीन ही मूलभूत परंतु मर्यादित संसाधन असून वाढत्या लोकसंख्येमुळे त्यावर ताण येत आहे. त्यामुळे भूमीशी संबंधित अभिलेखांचे व्यवस्थापन प्रत्येक राज्यासाठी/ देशासाठी आवश्यक बाब आहे. भारतात मूळ भूमी मापन हे बहुतांशी स्वातंत्र्योत्तर काळापूर्वी झाल्याने त्यावेळी तयार झालेले भूमी अभिलेख हे शंभर वर्षांपेक्षा जुने अभिलेख असून प्रत्येक राज्यात तत्कालीन वेळी असलेल्या राज्यकारभाराच्या पद्धतीनुसार त्यामध्ये विविधता आहे. या अभिलेखांचे कायदेशीर महत्त्व अनन्यसाधारण असून त्यांचे व्यवस्थापन/ साठवणूक व सांभाळणे ही आव्हानात्मक बाब आहे. या अभिलेखांचे दैनंदिन जीवनातील स्थान व महत्त्व लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालयाकडून २००८ पासून राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत संगणकीकृत सातबाराच्या डाटाचे अद्ययावतीकरण करणे, भूमीविषयक नकाशांचे डिजिटायझेशन करणे, संगणकाद्वारे महसूल कार्यालयांची समांतर जोडणी करणे, तालुका स्तरावर आधुनिक भूमी अभिलेख कक्ष निर्माण करणे, पुनर्मोजणी करणे, दुय्यम निबंधक कार्यालयाचे संगणकीकरण करणे, सूची २ ची डाटा एन्ट्री करणे, दुय्यम निबंधक कार्यालयाची महसूल कार्यालयांशी जोडणी करणे, प्रशिक्षण व क्षमता विकास करणे, ही कार्ये पार पाडली जाणार आहेत. देशात आधुनिक, सर्वंकष आणि पारदर्शक भूमी अभिलेख व्यवस्थापन पद्धती तयार करून निर्णायक मालकी हक्क (Land Titling) पद्धती बरोबरच मालकी हक्काची शाश्वती देणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र राज्यात या कार्यक्रमाची अंमलबजावणी ही ई-महाभूमी या एकात्मिक भूमी अभिलेख आधुनिकीकरण आणि व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत करण्यात येत आहे. ई-महाभूमी अंतर्गत खालील प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

**ई-मोजणी (मोजणी प्रक्रियेचे संगणकीकरण)-**

भूमी अभिलेख विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून मोजणी काम केले जाते. दरवर्षी मोजणी प्रकरणांच्या संख्येत वाढ होत आहे. उपलब्ध कर्मचाऱ्यांचा नियोजित पद्धतीने वापर केल्यास प्रलंबित प्रकरणांची संख्या आटोक्यात येऊ शकते हे मोजणी प्रकरणांच्या निपटाऱ्याच्या अभियानाद्वारे दिसून आल्याने, प्राप्त होणारी मोजणी प्रकरणे व उपलब्ध भूकरमापक व कर्मचारी यांच्या कामाच्या नियोजनासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या तांत्रिक साहाय्याने 'ई-मोजणी' आज्ञावली विकसित करण्यात आली आहे. या आज्ञावलीद्वारे मोजणी अर्ज स्वीकारण्यापासून ते मोजणी प्रकरण निकाली होईपर्यंतच्या कार्यालयातील कार्यपद्धतीचे संपूर्णपणे संगणकीकरण करण्यात आले आहे. ही आज्ञावली वेबबेस्ड असून तिचा सर्व्हर, स्टेट डाटा सेंटर मुंबई, मध्ये ठेवण्यात आला आहे. त्याकरिता राज्यातील सर्व भूमी अभिलेख कार्यालयांत इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून घेण्यात आली आहे. या आज्ञावलीचा वापर संपूर्ण राज्यात १ जानेवारी २०१२ पासून सुरू करण्यात आला आहे.

या आज्ञावलीच्या वापरामध्ये अर्जदारास अर्ज केल्याबरोबर मोजणीकरिता लागणारी फी आकारून, मोजणी फीचे चलन तयार करून दिले जाते. मोजणी फी भरणा केल्यानंतर





**ई-अभिलेख अंतर्गत पथदर्शी प्रकल्पातील सुरू असलेले स्कॅनिंग काम.**

अर्जदारास तत्काळ मोजणीची नियोजित तारीख, भूकरमापकाचे नाव, मोबाइल नंबर यासह पोच दिली जाते. अर्ज स्वीकारल्यापासून अर्ज निकाली होईपर्यंत प्रत्येक स्तरावर कार्यवाहीचे नियंत्रण करता येते. या आज्ञावलीद्वारे मोजणी प्रकरणांचा आढावा तालुका स्तरावरून, जिल्हा स्तरावरून, विभाग स्तरावरून, राज्य स्तरावरून घेणे शक्य झाले आहे.

ई-मोजणी आज्ञावलीच्या वापरामुळे मोजणी करून घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकास अनेक फायदे झालेले आहेत जसे (१) मोजणी अर्जाच्या पोहोचवर मोजणी दिनांक, मोजणी कर्मचारी यांचे नाव, त्याचा मोबाइल क्रमांक, ही माहिती मोजणी फी भरलेल्या दिनांकासच दिली जाते, जी जुन्या पद्धतीत शक्य नव्हती. (२) मोजणी प्रकरण प्राप्त झाल्यापासून निकाली करेपर्यंतच्या कार्यपद्धतीचे संगणकीकरण झाल्यामुळे नागरिकास त्याच्या मोजणी प्रकरणाची माहिती तत्काळ उपलब्ध होते.

**ई-फेरफार (ऑनलाइन म्युटेशन)**

राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमातील या कार्यक्रमांतर्गत संगणकीकृत सातबाराच्या डाटाचे अद्ययावतीकरण करणे, युनिकोडमध्ये रूपांतर करणे, तालुका स्तरावरील महसूल कार्यालयांची समांतर जोडणी करणे व दुय्यम निबंधक कार्यालयांची महसूल कार्यालयांशी जोडणी करणे या बाबी एकत्रित करून राज्यात ऑनलाइन फेरफार प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. याकरिता जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख पुणे यांनी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या मदतीने ई-फेरफार ही आज्ञावली विकसित केली असून याद्वारे गावपातळीवरील फेरफार प्रक्रियेचे संपूर्णपणे संगणकीकरण करण्यात येणार आहे. यामध्ये तालुका स्तरावरील तहसीलदार कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय व नगर भूमापन अधिकारी कार्यालय हे स्टेट डाटा सेंटरबरोबर सुरक्षित संगणकीय कनेक्टिव्हिटीद्वारे जोडण्यात येणार आहेत. तसेच या प्रकल्पासाठी गावपातळीवरील तलाठी व मंडळ निरीक्षक कार्यालयेदेखील वरील कार्यालयांशी जोडण्यात येणार आहेत. या आज्ञावलीद्वारे दुय्यम निबंधक कार्यालयात मिळकतीची दस्त नोंदणी झाल्यानंतर त्या दस्तानुसार तत्काळ फेरफार नोंद घेण्याची कार्यवाही सुरू होते. नोंदणी झालेल्या दस्ताची माहिती आज्ञावलीद्वारे संबंधित तहसील कार्यालयात प्राप्त होऊन, तेथे फेरफार नोटीस आज्ञावलीद्वारेच तयार होते. ही नोटीस स्वाक्षरीत होताच, दुय्यम निबंधक कार्यालयास माहिती मिळते व त्यानंतर दुय्यम निबंधक कार्यालयात ही नोटीस डाउनलोड करून त्याची प्रिंट घेण्यात येऊन ती दस्त नोंदणीकरिता हजर असलेल्या इसमांना बजावली जाते. तसेच संबंधित तलाठी व दस्तातील पक्षकार यांना फेरफार नोंदीचा एसएमएस जातो. याद्वारे दस्त नोंदणी व फेरफार नोंद घेण्याची कार्यवाही एकत्रित होते. यामुळे नागरिकांस त्यांचे नाव मिळकतीस दाखल करण्याकरिता पुन्हा तलाठी कार्यालयात जाण्याची गरज पडणार नाही. हे ई-गव्हर्नन्समधील पुढील पाऊल असून जमीन विषयक वाद कमी होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

या आज्ञावलीच्या वापरामध्ये डिजिटल सिग्निचर व एसएमएस तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

सध्या या आज्ञावलीचा पद्धतशीर वापर पुणे जिल्ह्यातील मुळशी, हवेली व पुणे शहर तालुक्यात सुरू करण्यात आला असून २०१२-१३ या वर्षात राज्यात सर्वत्र वापर सुरू करण्यात येणार आहे. या आज्ञावलीच्या पुढील टप्प्यात तलाठ्यांच्या लॅपटॉपला डाटा कार्डद्वारे कनेक्टिव्हिटी देऊन फेरफाराच्या कार्यवाहीचे संपूर्णत: संगणकीकरण करण्यात येणार आहे.

**ई-चावडी (तलाठी दप्तराचे संगणकीकरण)**

तलाठी यांच्याकडील गाव नमुना नंबर १ ते २१ हे गाव महसूल अभिलेखाचा कणा आहेत. हे नमुने एकमेकांशी निगडित असून, त्यात माहिती भरणे हे क्लिष्ट स्वरूपाचे काम आहे. या पद्धतीच्या संगणकीकरणासाठी 'ई-चावडी' या नावाने आज्ञावली (स्वॉफ्टवेअर) जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या मदतीने विकसित केली आहे. या आज्ञावलीचा वापर तलाठ्यांना त्यांच्या लॅपटॉपद्वारे सुरक्षित कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातून करता येणार आहे. तलाठ्यांचे लॅपटॉप डाटा कार्डद्वारे स्टेट डाटा सेंटरबरोबर सुरक्षित कनेक्टिव्हिटीने जोडले जाणार आहेत. ई-फेरफार आज्ञावलीतील संगणकीकृत सातबाराचा डाटा ई-चावडी आज्ञावलीत वापरला जाणार आहे. जमीन महसूल वसुलीची दैनंदिन माहिती आज्ञावलीद्वारे तयार होणार आहे. त्यामुळे तलाठ्यांचा या कामकाजामध्ये जाणारा वेळ कमी होणार आहे. ई-चावडी आज्ञावलीच्या वापरामुळे तलाठ्यांच्या कामकाजात सुसूत्रता व नियमितता येऊन तलाठ्यांचे श्रम कमी होऊन इतर महसुली कामे प्रभावीपणे करण्यास वेळ मिळणार आहे. या आज्ञावलीचा चाचणी वापर प्रत्येक जिल्ह्यातील एका गावात करण्यात आला आहे. आता या आज्ञावलीचा वापर राज्यात सर्वत्र करण्यात येणार आहे.

**ई-अभिलेख (अभिलेख कक्षाचे आधुनिकीकरण)**

तहसीलदार व उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयातील अभिलेख कक्षात असलेल्या जुन्या अभिलेखांचे उतारे

**ई-मोजणी या आज्ञावलीद्वारे आतापर्यंत संपूर्ण राज्यात १,०५,३८१ अर्ज स्वीकृत करण्यात आले आहेत.**

**राज्यात अंदाजे ३० कोटी अभिलेखांच्या पानांचे भविष्यात स्कॅनिंग केले जाईल. यामुळे नागरिकांना जमीनविषयक त्यांच्या जुन्या अभिलेखांचे उतारे तत्काळ मिळतील आणि संकेतस्थळाद्वारे घरबसल्या पाहता येतील.**

नागरिकास दैनंदिन कामासाठी लागतात. हे जुने अभिलेख शोधून त्यांचे उतारे देणे हे जिकिरीचे व वेळखाऊ काम आहे. याकरिता नागरिकांना कार्यालयात वारंवार पाठपुरावा करावा लागतो. यावर उपाययोजना करण्यासाठी 'ई-अभिलेख' या कार्यक्रमातून अभिलेख कक्षाचे संगणकीकरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत तालुका स्तरावरील तहसीलदार कार्यालयातील जुने फेरफार, जुने सातबारा, खाते उतारा इ. व उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील टिपण, आकारफोड पत्रक, गुणाकार बुक, आकारबंद, एकत्रीकरण स्कीम, शेत पुस्तक इ. अभिलेखांचे स्कॅनिंग करण्यात येऊन ते डिजिटल स्वरूपात साठविण्यात येणार आहेत. तसेच मूळ स्वरूपातदेखील त्यांचे जतन करण्यात येणार आहे. याकरिता अभिलेखांचे स्कॅनिंग करणे, स्कॅनिंग झालेल्या अभिलेखांची साठवणूक करणे व मागणीनुसार नागरिकांस या अभिलेखांचे प्रिंट पुरविणे याकरिता जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून आज्ञावली विकसित करण्यात आली आहे. या आज्ञावलीद्वारे अभिलेखाची साठवणूक व शोध घेता येणार आहे. त्याचबरोबर स्कॅनिंग केलेले अभिलेख संकेतस्थळावर (वेबसाइटवर) पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अभिलेखांच्या स्कॅनिंग कामाचा पथदर्शी प्रकल्प पुणे जिल्ह्यातील हवेली व मुळशी या तालुक्यांत सुरू करण्यात आला असून त्याअंतर्गत जुन्या अभिलेखांचे स्कॅनिंग करण्याकरिता संस्था निवडण्यात आली आहे. त्यांच्याकडून हे काम सुरू करण्यात आले आहे. पथदर्शी प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर हा प्रकल्प संपूर्ण राज्यात एकाचवेळी लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

**ई-नकाशा (नकाशाचे डिजिटायझेशन)**

भूमी अभिलेख विभागाच्या तालुका स्तरावरील कार्यालयात विविध प्रकारचे नकाशे साठवून ठेवले आहेत. या नकाशांच्या आधारेच जमिनीच्या हद्दी कायम केल्या जातात. त्यामुळे कायदेशीरदृष्ट्या या नकाशांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे नकाशे फार वर्षांपूर्वी तयार केले असल्याने नाजूक स्थितीमध्ये आहेत. सबब त्यांचे डिजिटल स्वरूपात संधारण करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे 'ई-नकाशा' हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. नकाशांचे संगणकीकरण करणे या कार्यक्रमामध्ये तालुका स्तरावरील उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील फाळणी नकाशे, भूसंपादन नकाशे, बिनशेती नकाशे, टिपण, गटबुक इ. स्केलात असलेल्या अभिलेखांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. नकाशांचे डिजिटायझेशन झाल्यानंतर त्याची जोडणी संगणकीकृत सातबाराशी करण्यात येणार आहे. यामुळे जनतेला संगणकीकृत सातबाराच्या बरोबर त्या जमिनीचा संगणकीकृत नकाशा उपलब्ध होणार आहे. तसेच भूमी अभिलेख विभागाच्या कार्यालयात सध्या इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन (ई.टी.एस.) या अत्याधुनिक उपकरणाद्वारे मोजणी काम करण्यात येत आहे. या उपकरणाद्वारे मोजणीचा डिजिटल स्वरूपात नकाशा तयार होतो. या नकाशाची मूळ अभिलेखाशी पडताळणी करण्यासाठी 'ई-नकाशा' कार्यक्रमातून तयार होणारा डेटा वापरण्यात येणार आहे. हे नकाशे संकेतस्थळावरून जनतेस पाहण्यासाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत. त्याद्वारे नागरिकांस हे अभिलेख वेबसाइटवरून पाहता येतील.

या कार्यक्रमांतर्गत तालुका मुळशी जिल्हा पुणे या ठिकाणी पथदर्शी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. याकरिता अग्रगण्य खाजगी संस्थेची निवड करण्यात आली आहे. उपअधीक्षक भूमी अभिलेख मुळशी कार्यालयातील अभिलेखाचे डिजिटायझेशन करण्याचे काम प्रगतीत आहे. हा पथदर्शी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्या अनुभवाच्या आधारे संपूर्ण राज्यात अभिलेखांच्या डिजिटायझेशनचे काम हाती घेण्यात येणार आहे.




**ई-मोजणी आज्ञावलीस मिळालेल्या 'ई महाराष्ट्र २०१२'च्या पारितोषिकासह जमाबंदी आयुक्त श्री. चंद्रकांत दळवी व विभागातील अधिकारी.**

**ई-नोंदणी (नोंदणी विभागाचे संगणकीकरण)**

या कार्यक्रमाद्वारे दुय्यम निबंधक कार्यालयाचे संगणकीकरण, सूची-२ ची डाटा एन्ट्री करण्यात येणार आहे. यासाठीचा निधी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्याकडे वितरित करण्यात येणार आहे.

**ई-भूलेख (भूमी अभिलेख भौगोलिक माहिती प्रणाली)**

संगणकीकृत सातबाराचा डाटा, संगणकीकृत नकाशे, स्कॅन केलेले जुने अभिलेख व पुनर्मोजणीनंतरचे नकाशे नागरिकांस एकाच ठिकाणी संकेतस्थळावर (वेबसाइटद्वारे/पोर्टलद्वारे) उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ही आज्ञावली जीआयएसवर आधारित असल्याने जनतेस आपल्या मिळकतीची माहिती स्वत: शोधता येणार आहे. या वेबबेस्ड आज्ञावलीचा उपयोग इतर शासकीय विभागांना नियोजनासाठी होणार आहे.

**प्रशिक्षण व क्षमता बांधणी**

ई-महाभूमी हा कार्यक्रम संपूर्णत: अद्ययावत तंत्रज्ञानाचा अवलंब करणारा कार्यक्रम असून या कार्यक्रमामधील अंतर्भूत होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना सर्व घटकांचे सखोल प्रशिक्षण देणे हे या कार्यक्रमाच्या यशस्वीतेच्या दृष्टिकोनातून अत्यंत आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन केंद्र शासनाने या घटकांचे प्रशिक्षण देण्याकरिता एक स्वतंत्र प्रशिक्षण कक्ष महाराष्ट्र राज्यात स्थापन करण्यास मान्यता दिली असून त्याकरिता निधी पुरविला आहे. औरंगाबाद येथील भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी येथे हा कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. ई-महाभूमी प्रकल्पाद्वारे भविष्यात नागरिकांना जमीनविषयक शासकीय कामे घरबसल्या पार पाडणे शक्य होईल.

(लेखक जमाबंदी आयुक्त या पदावर कार्यरत आहेत.)

# पाऊल पडते पुढे...

महसूल अधिकारी प्रशासनाचा कणा असून लोकप्रतिनिधी व जनतेमधील महत्त्वाचा दुवा आहे. सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांचा त्याच्याशी संबंध येतो. राज्य सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना जनतेच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी अधिक आश्वासक पावले उचलण्याचा निर्धार महसूल प्रशासनाने केला आहे. इतर विभागांशी संनियंत्रण व समन्वय करताना अनेक प्रशासकीय अडचणी येतात. त्यावर मात करण्यासाठी तसेच शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यास व परिणामकारक समन्वयासाठी महसूल प्रशासन बळकट व सक्षम करण्यासाठी महसूल विभाग सातत्याने प्रयत्न करीत आहे. महसूल प्रशासन लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होण्यास मदत होण्यासाठी अनेकांच्या प्रतिभा एकत्र करून सुवर्ण जयंती राजस्व अभियान राबविण्यात येत आहे.

**मुहूर्तमेढ**

एखाद्या राज्याने केलेल्या प्रगतीमधे त्या राज्याच्या लोकप्रतिनिधींची दूरदृष्टी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे कार्य यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. दैनंदिन जीवनात सामान्य माणसांच्या समस्या सोडवित असताना अनेक प्रशासकीय आव्हानांना सामोरे जावे लागते. सामान्य जनतेला सुलभ होईल आणि प्रशासकीय यंत्रणेत गतिमानता, सुसूत्रता आणता येईल अशा प्रकारच्या अनेक अभिनव कल्पना व प्रयोग प्रशासकीय अधिकारी आपल्या जिल्ह्यात करीत असतात. एखाद्या अभिनव प्रयोगाला चांगला प्रतिसाद व यश मिळाले असेल अशा प्रयोगांना राज्यांच्याच नव्हे, तर देशाच्या पातळीवर लागू करण्यात आले. असे सर्व अभिनव प्रयत्न एका ठिकाणी आणून

**अर्चना शंभरकर**

सर्वव्यापी स्वरूपात राज्यभर राबविल्यास जनतेला मोठा लाभ होईल या संकल्पनेतून ८ मार्च २०११ रोजी यशदा, पुणे येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांची परिषद पार पडली. या परिषदेत प्रशासन गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी विभागीय आयुक्त व काही जिल्हाधिकाऱ्यांनी राबविलेल्या यशस्वी योजनांचे सादरीकरण केले. निवडक योजनांचे एकत्रीकरण करून राज्याच्या सर्व जिल्ह्यांत सुवर्ण जयंती राजस्व अभियान १ मे २०११ पासून लागू करण्यात आले.

**अभियानाचे स्वरूप**

सुवर्ण जयंती राजस्व अभियान राबविण्यासाठी दि. १३ एप्रिल २०११ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला. या शासन निर्णयात एकूण ११ उपक्रमांचा समावेश करण्यात आला होता. जिल्ह्याच्या निकडीप्रमाणे यापैकी किमान ८ उपक्रम राबविणे बंधनकारक करण्यात आले. हे उपक्रम असे होते, विविध दाखले देण्याकरिता शिबिर आयोजित करणे, विविध दाखल्यांकरिता आवश्यक असलेले अर्ज ऑनलाइन उपलब्ध करून देणे व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज ऑनलाईन सादर करण्याची पर्यायी सुविधा सेतू केंद्र व ई-सेवा केंद्रामार्फत सुरू करणे. गाव नकाशा प्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले

| अ.क्र. | विभागाचे नाव | वितरित केलेल्या दाखल्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | अमरावती | ४१६५२१ |
| २ | औरंगाबाद | ८९६८३२ |
| ३ | कोकण | ५१७५१६ |
| ४ | नागपूर | ४३१६२५ |
| ५ | नाशिक | ११२९८९६ |
| ६ | पुणे | ५९३२५१ |
| | एकूण | ३९८५६४१ |

पाणंद/ पांधण/ पानधन/ शेतरस्ते/ शिवरस्ते/ शिवाररस्ते मोकळे करणे, एक महिन्याच्या वर प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे. त्याकरिता मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत घेणे. (फेरफार अदालत), माहिती मिळविण्यासाठी व तक्रार निवारण्यासाठी ई-लोकशाही प्रणाली (Help Line) उपलब्ध करून देणे, नागरिकांना एका छत्राखाली सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समाधान योजना राबविणे, ई-चावडी योजना, १ एप्रिल २०११ रोजी प्रलंबित विविध मूळ अधिकारितेमधील महसूल प्रकरणे व अपील प्रकरणे १ वर्षाच्या आत निकाली काढणे, विविध शासकीय कामांसाठी (मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ कॉन्फरन्स, जीपीएस, सॅटेलाईट इमेजचा मोठ्या प्रमाणात वापर करणे), नागरिकांच्या सोईकरिता प्रत्येक जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयात मदत व जनसंपर्क कक्ष (Facilitation Center) सुरू करणे,

**वेगवेगळ्या ठिकाणी पूर्वी घेतलेल्या लोकोपयोगी उपक्रमांचे/यशोगाथांचे एकत्रीकरण करणे हा या सुवर्ण जयंती राजस्व अभियानाचा पहिला उद्देश होता. कायदा/अधिनियम व कार्यपद्धतीचे सुलभीकरण करणे, अधिकारांच्या विकेंद्रीकरणाद्वारे व प्रशासकीय सुधारणांद्वारे लोकहित साध्य करणे, माहिती व तंत्रज्ञानाचा शासकीय कामात प्रभावी वापर करून शासनाची प्रतिमा उंचावण्यासाठी या अभियानाची सुरुवात करण्यात आली.**


ई-मोजणी

अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी/ उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालयात बायोमेट्रिक यंत्र बसविणे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | मोकळे केलेले रस्ते (कि.मी.) |
|---|---|---|
| १ | अमरावती | ३८५३ |
| २ | औरंगाबाद | ११५९०.३ |
| ३ | कोकण | १४४.८१ |
| ४ | नागपूर | २१८६.०३ |
| ५ | नाशिक | २६५८.८५ |
| ६ | पुणे | ४८९०.८१ |
| | एकूण | २५३२३.३३ |

**प्रतिसाद**

या अभियानास राज्यभर उदंड प्रतिसाद लाभला. अधिकाऱ्यांसोबत जनता व लोकप्रतिनिधी मोठ्या उत्साहाने विविध योजनांच्या यशस्वीतेसाठी झटले. दाखल्यांची शिबिरे, फेरफार अदालती व समाधान योजना यांच्या माध्यमातून महसूल प्रशासन जनतेच्या दारी पोहोचल्याने राज्यभर प्रशासनाबद्दल सकारात्मक संदेश गेला. माहिती-तंत्रज्ञानाची भीती गेल्याने कर्मचारी व अधिकारी आत्मविश्वासपूर्वक या तंत्रज्ञानाचा वापर करू लागले.

**दाखल्यांसाठी शिबिरे**

विविध प्रकारचे दाखले हा जनतेच्या अत्यंत निकडीचा विषय आहे. शाळा/ महाविद्यालयातील प्रवेशाच्या वेळी जनतेस सुखद धक्का देण्यास महसूल प्रशासन यशस्वी ठरले. राज्यभरात शेकडो शिबिरे आयोजित करून मोठ्या प्रमाणात दाखले वितरित करण्यात आले. खेडेगावी, दुर्गम आदिवासी भागात तसेच शहरांच्या विविध भागात हा उपक्रम अधिकारी व कर्मचाऱ्यांनी साप्ताहिक सुट्या न घेता राबविला.

**सेतू व ई सेवा केंद्र**

राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत प्रत्येक चार गावांकरिता एक महा ई-सेवा केंद्र सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अनेक जिल्ह्यांनी स्वत:ची वेबसाइट सुरू करून ऑनलाईन दाखले वितरणासाठी पुढाकार घेतला.

**अतिक्रमित शेतरस्ते/शिवाररस्ते मोकळे करणे**

शेतात जाणारे रस्ते हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. गावागावात या रस्त्यांवरून अनेक तक्रारी व भांडणे असतात. रस्ते अडविल्याच्या असंख्य तक्रारी महसूल प्रशासनाकडे नेहमी प्राप्त होत असतात. या अभियानात लोकसहभागातून गावनकाशा-वरील अतिक्रमणे काढून टाकण्यात आली. राज्यातील कित्येक अतिक्रमित/बंद झालेले पाणंद/पांधण/पानधन/शेतरस्ते/शीवरस्ते/ शिवाररस्ते मोकळे करण्यात आले. शिवाय अनेक जिल्ह्यांत महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून अनेक रस्तेदेखील तयार करण्यात आले.

**मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत**

जमिनीच्या कागदपत्रांमध्ये फेरफारास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. फेरफारांची प्रक्रिया सर्वसामान्यांना नेहमीच किचकट व गुंतागुंतीची वाटते. यातून मार्ग काढण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी मंडळ स्तरावर फेरफार अदालतीचे आयोजन करण्यात आले. एक महिन्यावरील प्रलंबित फेरफारच नव्हे, तर महसूल प्रशासनाने एक पाऊल पुढे टाकून जुने बोजे, वारस नोंदी, बँक व सोसायटीच्या कर्जाच्या मुदतबाह्य नोंदी वगैरे त्रुटी काढून टाकण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली.

| अ.क्र. | विभागाचे नाव | लाभ घेतलेल्या नागरिकांची संख्या |
|---|---|---|
| १ | अमरावती | १५९६२१ |
| २ | औरंगाबाद | २३३९४२ |
| ३ | कोकण | २११२७३ |
| ४ | नागपूर | ५४२८३९ |
| ५ | नाशिक | ७३८१८ |
| ६ | पुणे | ६८३५३९ |
| | एकूण | १९०५०६२ |

**ई-लोकशाही प्रणाली (Help Line)**

माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी ई-लोकशाही प्रणाली राज्यभर राबविण्यात आली. नागरिक घरबसल्या आपल्या तक्रारी नोंदवू शकतात. राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये ही प्रणाली कार्यरत आहे.

**समाधान योजना**

नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच विविध शासकीय कामे करण्यासाठी तालुका स्तरावर यावे लागू नये व सर्व योजनांचा फायदा मंडळस्तरावर नागरिकांना मिळावा याद्दष्टीने ही योजना समाधान योजना या नावाने यशस्वीपणे राबविण्यात आली. राज्यभरातील १९,०५,०६२ नागरिकांनी समाधान योजनेचा लाभ घेतला आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | निर्गत केलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| १ | अमरावती | ४१२८ |
| २ | औरंगाबाद | २६९३ |
| ३ | कोकण | १२९१३ |
| ४ | नागपूर | ९५५३ |
| ५ | नाशिक | ११३१० |
| ६ | पुणे | १४९६९ |
| | एकूण | ५५५६६ |

**ई-चावडी**

माहिती तंत्रज्ञानापासून कर्मचाऱ्यांनी दूर पळण्याऐवजी ते आत्मसात करण्याचा महत्त्वाचा प्रयोग राज्यभर यशस्वी झाला. लॅपटॉपच्या साहाय्याने दप्तरी कामकाज तलाठी पार पाडू लागले आहेत. राज्यभर एकूण २२५९ तलाठ्यांनी लॅपटॉप खरेदी केले.

**प्रलंबित प्रकरणे निकाली**

१ एप्रिल २०११ रोजी प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक प्रकरणांची संख्या निश्चित करण्यात आली व त्यापैकी सर्वांत जुनी प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्यात आली. त्यामुळे अर्धन्यायिक प्रकरणांचा कालबद्ध पद्धतीने गुणवत्तापूर्ण निपटारा होण्यास मदत झाली.

**शासकीय कामांसाठी सॅटेलाइट इमेज**

राज्यातील सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांत, जिल्हाधिकारी कार्यालयांत, उपविभागीय अधिकारी कार्यालयांत तसेच तहसील कार्यालयांत माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्यात येत आहे. त्यामुळे कामकाजाला गती प्राप्त होऊन वेळेत व खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होत आहे.

**मदत व जनसंपर्क कक्ष**

कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना मार्गदर्शन करणे, अभ्यागतांशी सुसंवाद व समन्वय साधणे व नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्याच्या हेतूने राज्यभरात सर्व जिल्ह्यांत सुविधा कक्ष उभारण्यात आले आहेत.

**उपस्थिती नोंदविण्यासाठी बायोमेट्रिक यंत्र**

प्रभावी व लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक कर्मचारी/अधिकारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहावे यासाठी बायोमेट्रिक पद्धत सुरू करण्याचे निर्देश

***राज्यभरात एक महिन्यात ८,७०,२८२ नोंदी निर्गत करण्यात आल्या.***

शासनाने २७ ऑक्टोबर २०१० च्या शासन निर्णयान्वये दिले होते. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात वक्तशीरपणा येण्यास मदत झाली. यशस्वी नियोजनातून पुढील वाटचाल अभियानाच्या प्रचंड यशामुळे यापुढेही आवश्यक ते बदल करून अभियान राबविण्याचा संकल्प मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री महोदय व महसूल मंत्री यांच्या उपस्थितीत सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या पार पडलेल्या परिषदेमध्ये सोडण्यात आला. मागील वर्षीच्या अभियानातील उपयुक्त योजना चालू ठेवून आणखीही योजनांचा समावेश या वर्षीच्या नियोजनात करण्यात आला आहे.

**सुधारित अभियान**

सर्व जिल्ह्यांमध्ये १ ऑगस्ट २०१२ पासून सुधारित अभियान राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये खालील योजनांचा समावेश आहे.

**दाखल्यांसाठी शिबिरे**

मागील वर्षीच्या अभियानातील ही योजना चालू वर्षीदेखील सुरू ठेवण्यात येणार आहे. १० वी व १२ वीच्या निकालानंतर दाखल्यांसाठी होणारी धावपळ टाळण्यासाठी दाखले वाटपाची शिबिरे आयोजित करण्यात येतील.

**शेतरस्त्यांवरील अतिक्रमण काढणे**

मागील वर्षीच्या अभियानात या योजनेस मिळालेला प्रतिसाद विचारात घेऊन या वर्षीसुद्धा ही योजना चालू ठेवण्यात येणार आहे. संबंधित तलाठ्यांमार्फत रस्त्यांची माहिती संकलित करून गाव नकाशावर ते नमूद करण्यात येणार आहे. अतिक्रमित व बंद रस्ते मोकळे करण्याची कार्यवाही लोकसहभागातून व कायदेशीर तरतुदींच्या आधारे करण्यात येईल.

**अभिलेखाचे अद्ययावतीकरण**

७/१२ संगणकीकरण पूर्ण करण्यात येऊन संगणकीकृत ७/१२ राज्याच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तथापि, तो पूर्णपणे अद्ययावत करण्यासाठी विशेष मोहीम घेण्यात येणार आहे. अद्ययावतीकरणाचे काम अंतिम टप्प्यावर आहे. संपूर्ण तलाठी दप्तराचे संगणकीकरण करण्यासाठी विज्ञान केंद्र, पुणे यांनी आज्ञावली विकसित केली आहे.

**अर्जांची ऑनलाइन उपलब्धता**

उपलब्ध अर्जाचे प्रमाणीकरण व हे अर्ज नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्याचे नियोजन या वर्षीच्या राजस्व अभियानात करण्यात आले आहे.



**शून्य प्रलंबितता (Zero Pendency)**

सर्व महसूल कार्यालयातील प्रलंबित व थकीत प्रकरणे निर्गमित करून प्रशासकीय कामे विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येणार आहे. याबरोबरच अभिलेख कक्ष अद्ययावतीकरण व सहा गठ्ठा दप्तर पद्धतीदेखील राबविण्यात येणार आहे.

**चावडी वाचन**

दरवर्षी एकदा जाहिर चावडी वाचन करून त्याद्वारे गाव अभिलेख अद्ययावत करणे व आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यात येईल.

**जलद अकृषिक परवानगी**

अनधिकृत बांधकामे रोखणे व नागरिकांना कमी कष्टात व वेळेत अकृषिक परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी नाशिक यांनी अंमलात आणलेल्या संगणकीय कार्यप्रणालीच्या धर्तीवर राज्यभर ही योजना अंमलात आणण्यात येत आहे.

**ई-मोजणी**

जमिनीच्या मोजणीचे अर्ज संगणकीय प्रणालीद्वारे नोंदवून मोजणीची तारीख देण्यापासून ते मोजणी होईपर्यंत संनियंत्रण या आज्ञावलीद्वारे करण्यात येते.

**ई-फेरफार (ऑनलाइन म्युटेशन)**

नोंदणीकृत दस्तऐवजाचा फेरफार नोंदविण्यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये दुय्यम निबंधक कार्यालयाशी आज्ञावलीद्वारे जोडण्यात येतील. संगणकाद्वारे फेरफार नोंदविण्यात आल्यामुळे तलाठी कार्यालयात जाण्याची गरज नागरिकांना पडणार नाही.

**गाव जमाबंदी**

३१ जुलैपर्यंत सर्व गावांची जमाबंदी पूर्ण करण्यात येणार असून, त्याप्रमाणे पुढील वर्षाची मागणी निश्चित करण्यात येईल.

**ई-नकाशा (नकाशाचे डिजिटायझेशन)**

नकाशाचे डिजिटायझेशन करण्यात येऊन तो संगणकीकृत ७/१२ शी संलग्न करण्यात येणार आहे. ७/१२ सोबत नकाशादेखील उपलब्ध होणार आहे.

**भूमी अभिलेखांचे स्कॅनिंग**

सर्व महत्त्वाचे अभिलेख उदा. जुने फेरफार, जुने ७/१२, आकारबंद इत्यादी अभिलेखांचे स्कॅनिंग करून ते जतन करून ठेवण्यात येत आहेत. जनतेने मागणी केल्यास ते उपलब्ध करून देता येतील.

**राज्यात या वर्षी ई-टेंडरिंग पद्धतीने वाळू लिलाव करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.**

**माहिती किऑस्क**

स्कॅन केलेले अभिलेख जनतेस पाहण्यास व प्रिंट काढण्यास सुलभ होईल असे माहिती किऑस्क तयार केले जाणार आहेत.

**बारकोड (Mining Monitoring System)**

गौण खनिज वाहतूक पासचा गैरव्यवहार रोखण्यासाठी व बनावट पावत्यांचा वापर रोखण्यासाठी पावत्यांवर बारकोड पद्धत लागू करण्यात येईल.

**आधार कार्डच्या नंबरद्वारे लाभ**

आधार कार्डाचा वापर वाढविण्यासाठी व विविध योजनांचा लाभ आधार कार्डामार्फत देण्यासाठी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करून राज्यभर ही योजना राबविण्यात येणार आहे.

## मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत

**एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरिता प्रलंबित फेरफार नोंदी निकाली काढण्यासाठी मंडळनिहाय फेरफार अदालती आयोजित करण्यात येतील. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी मंडळाच्या मुख्यालयी फेरफार अदालत आयोजित केली जाईल. दुय्यम निबंधकाकडून प्राप्त पत्रकांच्या नोंदीदेखील या वर्षीच्या अभियानात घेण्यात येतील.**

**ई-चावडी योजना**

तलाठी दफ्तरांचे संगणकीकरण करून लॅपटॉपद्वारे कामकाज केले जाईल. त्यामुळे नागरिकांना जलद सेवा मिळू शकेल.

अभियानाची उपयुक्तता पाहता मागील वर्षीच्या अनुभवाचा वापर करून विस्तारित स्वरूपात या वर्षीदेखील अभियान राबविण्यात येत आहे. ते मागील वर्षीप्रमाणेच यशस्वी होईल याची प्रशासनाला खात्री आहे. अल्पावधीत लोकप्रिय झालेल्या सुवर्ण जयंती राजस्व अभियानात राज्याच्याच नव्हे, तर देशाच्या प्रशासनाची प्रतिमा उंचावण्याची क्षमता आहे.

**संपर्क : ०२२-२२७९३५६०**

---

# वाळूचा ई-लिलाव



**विजय वाघमारे**

**वा**ळू हे नैसर्गिक गौण खनिज आहे. वाळूचा आणि बांधकाम यांचा निकटचा संबंध आहे. सध्या वाळू वेगवेगळ्या कारणांनी वृत्तपत्रातून चर्चेत आहे. लोकसंख्या वाढीमुळे बांधकामात सातत्याने वाढ होत आहे. या बांधकामांना लागणारी वाळू पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. वाढत्या मागणीप्रमाणे वाळू उपलब्ध होण्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी न घेता वाळूचे अवैध मार्गाने उत्खनन केले जाते. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. तसेच पाच फूट किंवा भू-जल सर्वेक्षण विकास यंत्रणेने ठरवून दिलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करून नदी-नाल्याच्या पात्रातून रेती-वाळूचे उत्खनन केले जात आहे. परिणामी नदीलगत असलेल्या शेतीवरही त्याचा परिणाम होत आहे.

यासाठी शासनाने महसूल वाढविण्यासाठी वाळू - रेतीचे उत्खनन व त्यावरील संनियंत्रण सुलभ रीतीने होण्यासाठी २५ ऑक्टोबर २०१० रोजी वाळू, रेती निर्गतीचे नवीन धोरण जाहीर केले. या धोरणात रेतीघाटाच्या लिलाव प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी लिलाव प्रक्रिया ई-निविदा पद्धतीने करणे, वाळू रेतीच्या उत्खननासाठी पर्यावरण विभागाची मान्यता घेणे, पर्यावरणाचा ऱ्हास टाळणे, रेतीचे नदी, नाला या पात्रातून ५ फूट किंवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर ठरवून दिलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन न करणे, ग्रामसभेची शिफारस बंधनकारक करणे, अवैध वाळूसाठा, रेतीचे उत्खनन, वाहतुकीची प्रकरणे सापडल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमन १९६६ मधील ४८(७ व (८) नुसार कार्यवाही करणे, त्यांच्यावर भारतीय दंड विधी संहिता कलम ३७९ प्रमाणे फौजदारी गुन्हे दाखल करणे इ. बाबींचा या धोरणात समावेश आहे.

**चंद्रपूर जिल्ह्यातील खनिज संपत्तीमुळे शासनाच्या महसुलात उल्लेखनीय वाढ होऊन २०११-२०१२ मध्ये जिल्ह्यातून प्रमुख खनिजापोटी ३४० कोटी व गौण खनिजापोटी ४० कोटी असा एकूण ३८० कोटी रुपयांचा महसूल शासनास प्राप्त झाला आहे. डिसेंबर २०१२ रोजी जिल्ह्यातील वाळू घाटाचा ई-निविदा पद्धतीने लिलाव करण्यात आला. रेती लिलाव करून ९.४२ कोटी रुपयांच्या महसुलाची भर शासनाच्या तिजोरीत पडली आहे.**

या धोरणाला अनुसरून नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात ई-निविदा प्रक्रियेने रेतीघाटाचा लिलाव घेण्यात आला.

जिल्हास्तरीय यंत्रणेने पर्यावरण अनुमतीविषयक आवश्यक माहितीचा प्रस्ताव राज्य पर्यावरण समितीकडे सादर केला. या समितीने (SEAC) चंद्रपूर, भंडारा व नागपूर जिल्ह्याचे रेतीघाट लिलावास काही अटी व शर्तींच्या आधारे आठ दिवसांतच मान्यता देऊन हा प्रस्ताव SEIAA कडे मान्यतेसाठी पाठविला. यामुळे रेतीघाट लिलावाचा मार्ग जिल्ह्यातील उपलब्ध यंत्रणेकडूनच पूर्ण झाला. चंद्रपूर जिल्ह्यातील रेतीघाटाच्या प्रस्तावास विभागीय आयुक्त नागपूर यांनी त्वरित मंजुरी देऊन वाळू लिलावाची प्रक्रिया गतीने पार पाडली. महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी पर्यावरण विभागाशी समन्वय साधून दोन महिन्यांच्या कालावधीत पर्यावरण विभागाची मान्यता प्राप्त करण्यात यश मिळवले. आणि वाळू लिलाव शांततेत पार पडला. या प्रक्रियेचा यशानंतर लिलावाची ही वाळू प्रक्रिया राज्यभर सुरू झाली.

(लेखक चंद्रपूरचे जिल्हाधिकारी आहेत.)

# सुपरफास्ट दाखले

एखाद्याला एचआयव्हीचा संसर्ग झाला आहे असे कळले की त्याला अनेक मानसिक आणि सामाजिक अडचणींना तोंड द्यावे लागते. या रोगाला सामोरे जाताना उपचारासाठी खर्चही सोसावा लागतो. रोजगार नाही, सामाजिक पाठिंबा नाही अशा स्थितीत असलेल्या व्यक्तींना शासनाकडून मदत मिळावी यासाठी ठाणे जिल्ह्याने 'स्पंदन' हे विशेष शिबिर घेऊन १०२ एचआयव्हीबाधितांना एका दिवसात आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले.

१५ तालुके असलेल्या एकट्या ठाणे जिल्ह्यात सुमारे १८ हजार HIV संसर्गित व्यक्ती असून, त्यापैकी १२ हजार अतिग्रस्त (ART) व्यक्ती आहेत. या व्यक्तींना जगण्यासाठी बराच संघर्ष करावा लागतो. कमी उत्पन्न गटातील व्यक्तींना रोजगार उपलब्ध होत नाही त्यामुळे आर्थिक मदतीची आवश्यकता असते. शासनाच्या संजय गांधी निराधार योजनेंतर्गत अशा व्यक्तींना लाभ मिळावा म्हणून ठाणे जिल्ह्यात विशेष शिबिरे दिनांक १ डिसेंबर २०१२ रोजी आयोजित करण्यात आली.

या विशेष शिबिर अभियानात संजय गांधी निराधार योजनेंतर्गत रु. २१ हजारच्या आत उत्पन्न असलेल्या एच.आय.व्ही.सह जगणाऱ्या व्यक्तींना सामाजिक जाणीव व बांधिलकी या सद्‌भावनेने आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले होते. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभ मिळण्याकरिता वास्तव्याचे दाखले, उत्पन्नाचे दाखले इ. दाखल्यांची आवश्यकता लागते.

**पी. वेलरासू**

असे सर्व दाखले मिळविताना बराच कालावधी जातो व त्यानंतर संजय गांधी योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केल्यावर समितीची बैठक झाल्यावर पात्र अर्ज मंजूर होतात. बऱ्याच वेळा एचआयव्हीबाधितांसारखे रुग्ण लाजेपोटी याची चौकशी, माहिती घेऊ शकत नाहीत व या योजनेचा लाभ घ्यायला पुढे येत नाहीत; म्हणून अशा प्रकारे एकत्रित सर्व दाखले व संजय गांधी योजना समिती सभा घेऊन सर्व दाखले एकत्रित देण्याचे ठरविण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालय - ठाणे, नेटवर्क इन ठाणे बाय पिपल लिव्हिंग विथ एच.आय.व्ही. या संस्थांची मदत घेण्यात आली. जागतिक एड्स दिनी म्हणजेच १ डिसेंबर २०१२ रोजी ठाणे जिल्ह्यात ठाणे, कल्याण, भिवंडी या तालुक्यांत 'स्पंदन' हे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर अभियानात संजय गांधी निराधार योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरिता वास्तव्याचे दाखले, उत्पन्नाचे दाखले इ. आवश्यक दाखले देऊन संजय गांधी योजनेचे अर्ज भरून घेऊन, याच शिबिरात संजय गांधी निराधार योजना समितीची खास बैठक आयोजित करून पात्र १०२ लाभार्थ्यांना मंजुरी आदेश देण्यात आले.

यात ठाणे, कल्याण, भिवंडी या तीन तालुक्यांतून एकूण ३३७ व्यक्ती शिबिरात आल्या होत्या; त्यापैकी २१६ व्यक्तींना उत्पन्नाचे दाखले देण्यात आले तर १६९ व्यक्तींना स्थानिक वास्तव्याचे दाखले देण्यात आले तर १०२ एचआयव्ही बाधितांना एकाच दिवसात सर्व प्रकारचे आवश्यक दाखले व कागदपत्रे तयार करून घेऊन संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देण्यात आला.

(लेखक ठाण्याचे जिल्हाधिकारी आहेत.)

**द्रष्टे निर्णय... अभिनव योजना**

## कुळ कायद्याखालील जमिनीची खरेदी-विक्री जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नाही

ज्या जमीनी कूळ कायद्यातील तरतुदीनुसार कूळ हक्क मान्य होऊन कुळांनी खरेदी केलेल्या आहेत, अशा खरेदीच्या दिनांकापासून १० वर्षे पूर्ण झालेल्या जमीनीची खरेदी विक्री करताना जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीची आवश्यकता राहणार नाही.

या विक्री व्यवहारापोटी शासनास जमा करावयाची आवश्यक ती नजराण्याची रक्कम (शेतसाऱ्याच्या ४० पट) खरेदीदाराने खरेदीच्या पूर्वी शासन जमा करणे आवश्यक राहील. संबंधित खरेदीदार हा शेतकरी असला पाहिजे तसेच खरेदीदाराकडे महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ मध्ये विहित केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त धारण जमीन होणार नाही, या अटीच्या अधीन राहून उपरोक्त पूर्व परवानगीची अट शिथील करण्यास व त्या अनुषंगाने संबंधित अधिनियमांमध्ये व या अधिनियमांखाली तयार करण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा करण्यात येत आहे. मुंबई कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८च्या कलम ४३, हैदराबाद कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९५०च्या कलम ५० (ब) व मुंबई कूळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग) अधिनियम १९५८च्या कलम ५७ नुसार कुळहक्काने मिळालेली जमीन जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व मंजुरीशिवाय विक्री करून, देणगी देऊन, अदलाबदल करून, गहाण देऊन किंवा पट्ट्याने देऊन हस्तांतरित करता येत नाही. उपरोक्त अधिनियम अंमलात येऊन जवळपास पाच दशकांचा कालावधी झाला आहे. कुळकायद्यातील विक्री-परवानगीची प्रचलित प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी व संबंधित खातेदारांना त्यांच्या जमीनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार विलंब न लागता पूर्ण करता यावेत या उद्देशाने जिल्हाधिऱ्यांच्या पूर्व परवानगीची अट शिथील करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

# शिवरायांची जमीन महसूल व्यवस्था

पांडुरंग बलकवडे

पूर्वापार भारत हा शेतीप्रधान देश असून, येथील बहुसंख्य लोक कमी-अधिक प्रमाणात शेतीवर अवलंबून होते. सतराव्या शतकात गावाचे प्रामुख्याने दोन भाग पडत. एक वसाहतीची जागा ज्याला पांढरी म्हणत आणि दुसरी शेतजमीन जिला काळी म्हणत. या काळीचे प्रामुख्याने दोन भाग पडत. एक निसर्गावर अवलंबून असणारी जिराईत जमीन आणि दुसरी म्हणजे पाणी उपलब्ध असलेली बागायत जमीन. बागायत जमिनीचे दोन प्रकार एक धरणाच्या किंवा तलावाच्या पाटाचे पाणी उपलब्ध असणारे पाटस्थळ आणि विहिरीवरील मोटेच्या पाण्यावरील बागायत त्याला मोटस्थळ म्हणत. याव्यतिरिक्त गावच्या शिवारातील शेतीव्यतिरिक्तची पडीक जमीन तिचा वापर कुरण किंवा गायरान म्हणून केला जाई. पडीक पडलेली जमीन जास्तीतजास्त लागवडीखाली आणून राज्याचे उत्पन्न वाढविणे हेच सरकारचे मुख्य धोरण असे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातदेखील हीच परिस्थिती होती. शिवपूर्वकाळात दक्षिण भारतातील आदिलशाही, निजामशाही आणि कुतुबशाही तसेच उत्तरेतील मुघल साम्राज्य या राजसत्ता शेतकऱ्यांचे निष्ठुरपणे आर्थिक शोषण करीत होत्या, हे स्पष्ट दिसून येते.

हिंदुस्थानातील शेती बऱ्याच प्रमाणात पावसाच्या अधीन होती. लागोपाठ दोन वर्षे पाऊस न पडल्यास शेतकरी गावे आणि जमिनी सोडून परागंदा होत. जवळपासच्या राज्यकर्त्यांच्या पडणाऱ्या धाडी ही एक नित्याची बाब होती, याचा परिणाम म्हणजे, पिकांचा विध्वंस होई. कित्येकदा नैसर्गिक रोगराईमुळेही पिकांची नासाडी होत असे. गावेच्या गावेच नव्हे, तर धान्याची कोठारेसुद्धा लुटली जात असत. त्यातही सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे लागवडीच्या कामी उपयुक्त असलेल्या जनावरांची होणारी लूटमार. अशा प्रकारच्या सर्व घडामोडींचा एकंदर परिणाम असा होई की, शेतकऱ्याला स्वास्थ्य आणि स्थैर्य कसे ते लाभत नसे. गावेच्या गावे लोक सोडून जात आणि तेथे कोणतेही पीक लावले जात नसे. गाववाड्यासंबंधीच्या अनेक कागदात गावचा मुलूख उद्ध्वस्त झाला किंवा ओस पडला, आणि रोगराईमुळे उभ्या पिकाची पायमल्ली झाली, असे उल्लेख आढळून येतात.

सर्वसाधारणपणे शेतकऱ्याची परिस्थिती बिकट व चिंताजनक असून त्यास कसेबसे जगण्यापुरते उत्पन्न हाती येत असे. कधी दुष्काळामुळे तर कधी अतिवृष्टीमुळे पीक हातचे जाई, तर कधी त्याची जनावरे रोगाने दगावत. त्यामुळे त्यास पुढील हंगामात शेती करणे दुरापास्त होई आणि त्यात भर म्हणून की काय सरकारी अधिकारी त्यांच्याकडून अवास्तव महसूल गोळा करीत. जमीनसाऱ्याचे प्रमाणदेखील अनिश्चित व चढत्या भाजणीचे असे.

शेतकऱ्यांचे आणि कुळांचे पूर्णपणे आर्थिक शोषण होत असे. त्यांच्या उत्पादनाच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक भाग महसूल अधिकारी सक्तीने वसूल करीत. शेतीसंबंधीची परिस्थिती अतिशय अस्थिर होती. मुघल, आदिलशाही, राज्यकर्ते आणि त्यांची जुलमी करवसुलीपद्धती यांच्यामुळे भरडल्या जाणाऱ्या शेतकऱ्याला कोणताही दिलासा मिळू शकला नाही. त्याचा परिणाम या देशातील शेतकरी दिवाळखोर झाला होता.

**मुघल साम्राज्यातील शेतकऱ्यांची स्थिती**

मुघल साम्राज्यात रयतेवर केल्या जाणाऱ्या जुलमाचे वर्णन काही समकालीन युरोपियनांनी आपल्या वृत्तांमध्ये केले आहे. डच ईस्ट इंडिया या कंपनीचा एक अधिकारी फ्रान्सेस्को पेलसायर्ट याने इ.स. १६२१ पासून १६२७ पर्यंत या कंपनीच्या आग्रा येथील वखारीत नोकरी केली. त्या दरम्यान इ.स. १६२७ मध्ये त्याविषयी आपल्या अहवालात मुघल साम्राज्यातील शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दल त्याने वर्णन केले आहे. तो लिहितो, 'भरघोस महसूल प्राप्तीसाठी गरीब शेतकऱ्यांवर एवढा जुलूम केला जातो की, अपार कष्ट करूनही

**रयतेवर प्रचंड कर लादून अन्यायपूर्वक सरकारी खजिना भरण्यापेक्षा विविध सुधारणा करणे आणि विविध सवलती देऊन माफक व योग्य कराने सरकारी उत्पन्न वाढवणे याचा आदर्श शिवाजी महाराजांनी साडे तीनशे वर्षांपूर्वी घालून दिला तो आजही प्रेरणादायी आहे. शिवाजी महाराजांच्या या लोककल्याणकारी धोरणामुळे त्यांना रयतेचा राजा ही उपाधी प्राप्त झाली आहे. म्हणूनच महात्मा जोतिबा फुले मोठ्या भक्तिभावाने त्यांचा 'कुळवाडी भूषण' असा गौरव करतात.**





**जमीन महसुलाची व्यवस्था लावून देण्याच्या बाबतीत शिवाजी महाराजांनी बरीच सुधारणा घडवून आणली. स्थानिक परिस्थितीनुसार, आवश्यक तेथे योग्य बदल केले. परंपरागत दोरी पद्धतीने जमिनीची मोजणी न करता काठी पद्धतीने जमीन-मोजणी करण्याची प्रथा सुरू केली. त्यानंतर शेतीव्यवस्थेचा कणा हळूहळू गिळंकृत करीत चाललेल्या वसुली - यंत्रणेतील मधल्या सर्व दलालांना व मध्यस्थांना त्यांनी नामशेष केले. पुढे जमिनीचे प्रत्यक्ष उत्पन्न निश्चित केले. त्याकरिता स्वतःच्या शासनाखालील सर्व जमिनीची तिच्या पिकाऊपणानुसार वर्गवारी केली.**

शेतकऱ्याला वर्षाच्या शेवटी पोटभर अन्न शिल्लक राहू शकत नाही. एखाद्या वर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे म्हणजेच ओल्या अथवा कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी सरकारी महसूल भरावयास असमर्थ ठरला तर सरकारी अधिकारी त्याच्या घरादारावर जप्ती आणून घरातील संपत्तीबरोबरच त्याची गुरेढोरे लुटून नेत. याने समाधान झाले नाही, तर एखादा अन्यायी अधिकारी त्याची बायका-मुले बळजबरीने लुटून नेतात व भर बाजारात त्यांना गुलाम म्हणून विकून टाकतात. या अन्यायाविरुद्ध राज्यकर्त्यांकडे दाद मागावी तर राज्यकर्ते स्वतः या कृत्यास प्रोत्साहन देतात. तर त्यांना न्याय देणार कोण? आणि शिक्षा होणार कोणाला? काझीकडे कायद्याची पुस्तके असली तरी कायदे सहसा पाळले जात नाहीत. पैशाशिवाय कोणाला दया आणि न्यायही मिळत नाही.'

इ.स.१६५८ पासून १६६७ पर्यंत मुघल साम्राज्यात वास्तव करणारा एक फ्रेंच डॉक्टर फ्रांस्वा बर्निए हा लिहितो, 'मुघल साम्राज्यातील चांगल्या जमिनीचा बराचसा भाग शेतकऱ्यांविना पडीक पडलेला आहे. कारण, या शेतकऱ्यांपैकी बरेचजण अधिकाऱ्यांच्या जुलमामुळे मरून जातात किंवा अत्यंतिक जुलमामुळे नाइलाज होऊन गाव सोडून शहरामध्ये किंवा लष्करांच्या छावणीत आश्रयाला जातात व तेथे हमाली, पानके, घोड्याचा खरारा इत्यादी हलकी कामे करण्यात जगण्याचा मार्ग स्वीकारतात. मुघल दरबाराचा थाटमाट आणि लाखोंच्या सैन्यावर होणारा अफाट खर्च यामुळे राज्याची स्थिती खालावली आहे. असे असले तरी बादशहा आणि त्याच्या मनसबदारांच्या वागणुकीत आणि शाही-शौकत यामध्ये काहीही कमतरता झाली नाही.'

**आदिलशाहीतील शेतकऱ्यांची स्थिती**

दक्षिणेतील आदिलशाहीत मुघलशाहीपेक्षा वेगळी स्थिती नव्हती. डच ईस्ट इंडिया कंपनीच्या गव्हर्नर जनरलला वेंगुर्ल्याहून पीटर वॅन सँटव्हॅलेट याने पाठविलेल्या २५ जुलै १६६४ च्या पत्रात लिहिले आहे की, 'आदिलशाहीचे जहागीरदार आपल्या जहागिरीतील महसूल गोळा करण्याचे काम एखाद्या सावकारास मक्त्याने देतात. ही पद्धत अतिशय वाईट असून हे सावकार रयतेकडून जास्तीतजास्त पैसा गोळा करतात. त्यासाठी प्रसंगी रयतेवर अन्याय, जुलूम, जबरदस्ती करीत राहतात. त्याचबरोबर लुटालूट, जाळपोळ, कत्तली व जमिनींची राखरांगोळी करून हे ठेकेदार राज्यात सन्मानाने राजरोस फिरत राहतात.'

**कुतुबशाहीतील शेतकऱ्यांची स्थिती**

कुतुबशाही सल्तनीतही हाच प्रकार राजरोस चालू होता. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा कारो मंडल वखारीचा इ.स.१६१८ ते १६२२ पर्यंतचा प्रमुख कारभारी विल्यम मेथवोल्ड हा १६२६ मध्ये लिहितो, 'भारतातील इतर राज्यकर्त्यांप्रमाणेच हा बादशहा आपल्या राज्यातील खेडी आणि परगणे खंडाने देतो. खंडाचा दर इतका अवास्तव असतो की तेथील रयतेला या पोटी देहदंड सोसावा लागतो किंवा भिकाऱ्याचे जीवन जगावे लागते. सर्व सरदार मनसबदार याच पैशाच्या लुटीवर छोट्या राजासारखे ऐश्वर्याचे जीवन जगत आहेत. तर प्रजा दुःखात खितपत पडली आहे.'

**शिवरायांचे लोककल्याणकारी धोरण**

शिवाजी महाराज हे लोकांचे राजे होते. त्यांनी शेतकऱ्यांची व कुळांची उद्ध्वस्त परिस्थिती जवळून पाहिलेली होती. म्हणून याबाबत स्वराज्यात काही सुधारणा घडवून आणण्याचे धोरण त्यांनी अंगीकारल्याचे दिसते.

आपल्या आधीच्या काळात शासनसंस्था आणि तिचे अधिकारी शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पन्नाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त सारा वसूल करीत, याची शिवाजी महाराजांना जाणीव होती. ज्यांचा मुख्य व्यवसाय शेतीचा, अशा बहुसंख्य लोकांची ही जबर पिळवणूक होती. शिवाजी महाराजांनी नवीन शेतसारा धोरण आखताना जो दृष्टिकोन अवलंबिला होता, तो सर्व प्रजाजनास, मग ते कोणत्याही धर्माचे असोत, एका समान तत्त्वाने वागविणारा होता. तसेच अन्याय्य व जुलूम - जबरदस्तीने लादले गेलेले कर नष्ट करून त्यांचे प्रेम व सहकार्य मिळवावे, ही त्यांची इच्छा होती.

आदिलशाही मुलखात त्या काळातही अस्तित्वात असलेली नजरपाहणी किंवा कोम्युला पद्धती बदलून तिच्याऐवजी त्यांनी बिघावणी म्हणजे बिघ्यांच्या परिमाणात जमीनमोजणी करून उत्पन्न निश्चित करण्यास सुरूवात केली. याबरोबरच त्यांनी पुण्यासभोवतालच्या प्रदेशात धरणे बांधली, कालव्याने जमिनींना पाटाच्या पाण्याचा पुरवठा केला. अशा तऱ्हेने गरीब शेतकऱ्यांना सरकारी मदतीची खातरजमा करून दिली.

सन १६६७-१६६९ मध्ये शिवाजी महाराजांनी आपले लक्ष जमीनमहसुलाच्या व्यवस्थेकडे वळविले. अचूक जमीनमोजणी करण्यासाठी त्यांनी अण्णाजी दत्तो याची नेमणूक केली.

अण्णाजी हा सुरनीस म्हणजे सरकारी दफ्तरदार होता. सर्व दस्तऐवज, सनदा वगैरे प्रथम तो तयार करत असे. तो कर्तबगार व अनुभवी असल्याने, राज्यातील रीतीरिवाजांची त्याला चांगली माहिती असल्यामुळे शिवाजी महाराजांनी त्याची या पदासाठी निवड केली. तो संगमेश्वराचा परंपरागत देशकुलकर्णी असल्यामुळे, कोकणातील मामले प्रभावली येथील उत्पन्नाचे सर्वसाधारण हिशेब ठेवण्याच्या कामाचा त्याला चांगला अनुभव होता.

अण्णाजीने पहिली योजना अंमलात आणली ती म्हणजे जमीन मोजणीची. या योजनेचे चावराणा, बिघावणी आणि चकबंदी असे अनुक्रमे तीन टप्पे होते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, याचा अर्थ पिकाऊ जमिनींची सीमानिश्चिती आणि अशा जमिनींचा नकाशा तयार करणे. जमिनीचा कस अजमावणे हा दुसरा टप्पा होता. पिकाऊ जमिनींची वर्गवारी करण्यात आल्यावर पिकाच्या दृष्टीने त्यांचे मूल्यमापन करीत. याला लावणी असे म्हणत. यात वर्षातील रब्बी आणि खरीप पिकांचा किंवा वर्षातील दोन पिकांचा समावेश असे. जमिनी जिराईती की बागायती यावर ही गोष्ट अवलंबून असे. बागायती जमिनीचे आणखी

दोन भाग पाडीत. उदा. मोट-स्थल आणि पाट-स्थल. म्हणजे अनुक्रमे विहिरीच्या पाण्याखाली आणि कालव्याच्या पाण्याखाली भिजलेली जमीन. अशा जमिनीच्या सीमा खुणांनी निश्चित करीत. या प्रकाराला चकबंदी म्हणत. मग ही पिकाऊ जमीन ज्यांच्या ताब्यात आहे त्यांची एक यादी तयार करीत. तिला कुळझाडा म्हणत. नंतर या जमिनीशी संबंधित अशी दुसरी यादी तयार करीत. तिला नाव होते जमीनझाडा. या याद्यांखेरीज सनदवार नावाची आणखी एक यादी आढळून येते. या यादीत, ज्यांना जमिनीच्या सनदा असत त्यांची, त्याचप्रमाणे जमीन कसणाऱ्यांची म्हणजे ज्यांना प्रज म्हणत, त्यांची नावे दिलेली असत. जमीनझाड्यामुळे जमिनीचा सारा भरण्याच्या बाबतीत सर्व गावकरी सरकारला सामूहिकरीत्या जबाबदार राहत. अशा रीतीने ही पद्धती व्यवस्थितपणे राबविल्यानंतर जमिनीच्या एकूण उत्पन्नाच्या २/५ भाग सरकारला मिळाला पाहिजे व ३/५ भाग रयतेकडे गेला पाहिजे, या निर्णयाप्रत अण्णाजी दत्तो येऊन पोहोचला. त्याने शेतकऱ्यांवरील इतर सर्व कर आणि जाचकपट्ट्या रद्द केल्या. पाटील, खोत, कुलकर्णी आणि इतर यांना त्यांच्या सनदांमध्ये नेमून दिलेल्या कामांचे व अधिकारांचे उल्लंघन करून सरकारी अधिकाऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करण्यास कडक प्रतिबंध केला होता. हा सारा सर्वोत्कृष्ट प्रतीच्या जमिनीवरच आकारीत. सामान्य प्रतीच्या जमिनीवर मात्र पूर्वीप्रमाणेच फक्त ३३ टक्के सारा वसूल करीत.

जमिनीच्या उत्पन्नावरील सारा आकारणी करण्याच्या बाबतीत शिवाजी महाराजांनी खूप काळजी घेतली. प्रजासुखाविषयी ते विशेष दक्ष असत. कोणत्याही शेतकऱ्यावर वा जमीनदारावर अन्याय होणार नाही याची त्यांनी खात्री करून घेतली. तसेच आपल्या अधिकाऱ्यांना चुकीची सारा आकारणी करण्यास त्यांनी मनाई केली. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी त्यांनी स्थानिक रहिवाशांचे साहाय्य व सहकार्य घेतले. जनहित आणि स्वराज्यविकास यांना त्यांच्या मनात सर्वोच्च स्थान होते. परंतु, स्वराज्यविकास साधण्यासाठी त्यांनी जनहिताचा कोणत्याही काळी बळी दिला नाही.

शेतकऱ्यांपुढील समस्या आणि त्यांच्यावर कोसळणाऱ्या आपत्ती यांच्याबाबतीत सरकार जाणीवपूर्वक जागरूक असून, त्यांनी स्वत:च्या जमिनी लागवडीखाली आणाव्यात यादृष्टीने उत्तेजन देणारे उपाय तत्काळ योजण्यात शिवाजी महाराज तत्पर असल्याचे दिसते.

अण्णाजी दत्तो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरून व्यक्तिश: शेतकऱ्यांना व कुळांना भेटत असे. त्याचे निरीक्षण इतके सूक्ष्म होते की काही ठिकाणची जमीन सुपीक असूनही तिचे उत्पन्न अपेक्षेइतके येत नाही हे त्यांच्या लक्षात आले.

सारा आकारणीबाबत त्यांनी दक्षता व काळजी बाळगूनही काही गावकऱ्यांच्या तक्रारी शिल्लक राहिल्याच. या तक्रारींची त्यांनी सहानुभूतीने दखल घेतली आणि ज्या तक्रारी खऱ्या आहेत अशी त्याची खात्री पटली, त्यांच्या बाबतीत फेरविचार करण्याचे आदेश त्यांनी दिले.

सरकारचे धोरण शेतकऱ्यांचे शोषण करण्याचे नसून उलट फक्त न्याय्य कर भरण्याचीच अपेक्षा केली जात होती, हे यावरून स्पष्टपणे दिसून येते.

ओस पडलेल्या एखाद्या गावात कुणबी आपल्या गुराढोरांसह परत येऊन वसाहत करायला तयार असतील तर त्यांना सरकारी करात सूट देत. तसेच एखाद्या गावात पूर आला असेल, किंवा लागोपाठ दोन वर्षे अवर्षण पडले असेल किंवा गावचा प्रदेश शत्रुसैन्याने उद्ध्वस्त केलेला असेल, तर अशा सर्व प्रसंगी सरकार गावकऱ्यांना जमिनीवरील व इतर करांत सूट देईल. गरीब शेतकऱ्यांना बैलजोड्या, नांगर यांसारखी अवजारे व पेरणीसाठी चांगले बी-बियाणे पुरवून मदत करण्यात यावी, असा शिवाजी महाराजांचा हुकूम होता. या बी-बियाणांची पैदास खास करून सरकारी जमिनीत होत असे. शिवाजी महाराजांनी इनाम जमिनीदेखील पडीक राह दिल्या नाहीत. अशा जमिनी त्यांनी काढून घेतल्या. धार्मिक संस्थांनी नापीक किंवा पडजमिनी लागवडीखाली आणून धान्योत्पादन वाढवावे या उद्देशाने त्यांनी अशा जमिनी इनाम म्हणून दिल्या.

हवेली तालुक्यातील आकुर्डी गावच्या लोकांनी शिवाजी महाराजांकडे गाऱ्हाणे नेले की, आम्ही जमिनीची मशागत करूनही पीक आलेले नाही, त्यामुळे लोक गाव सोडून परागंदा झाले आहेत; सर्वांत अन्याय म्हणजे त्या गावच्या वसुली अधिकाऱ्याने २५ रु. ऐवजी ४० रु. गावकऱ्यांकडून वसूल केले. तेव्हा शिवाजी महाराजांनी अत्यंत कडक शब्दात त्या वसुली अधिकाऱ्याची हजेरी घेतली.

दुसऱ्या एका प्रसंगी सरकारी अधिकाऱ्यांनी काही जादा करवसुली केली, तेव्हा शिवाजी महाराजांनी ताबडतोब ती परत करण्याचा हुकूम सोडला आणि तिचा काही भाग पुढील वर्षाच्या वसुलीशी जुळवून घेतला.

आपल्या अधिकाऱ्यांकडून जनतेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये म्हणून शिवाजी महाराज खूप सतर्क होते. प्रभावळी मामल्याच्या सुभेदाराला इ.स.१६७६ मध्ये पाठविलेल्या आपल्या आज्ञापत्रात महाराज त्या अधिकाऱ्याला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देताना लिहितात, 'तू इमाने इतबारे साहेब काम करावे. रयतेच्या भाजीच्या देठासही मन न दाखविता रास्त व दुरुस्त वर्तने....... रयतेचा वाटा रयतेस पावे व राजभाग आपणास येईल ते

**शिवाजी महाराजांनी घडवून आणलेली आणखी एक सुधारणा म्हणजे, पडीक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी शेतसाऱ्याबाबत शेतकऱ्यांना दिलेल्या मोठ्या सवलती. जमिनीवर चार वर्षांपासून ते बारा वर्षांपर्यंत अंशत: करवसुली होईल, असे आश्वासन त्यांनी शेतकऱ्यांना दिले. पहिल्या चार वर्षांत करआकारणी अजिबात नाही, पाचव्या वर्षी १/८ कर आकारला आणि त्यानंतरच्या वर्षात अनुक्रमे १/६, १/४ व १/२ याप्रमाणे आणि अखेरच्या वर्षी पूर्णपणे करवसुली केली. पडीक जमीन लागवडीखाली आणण्याच्या व क्रमाक्रमाने सारा आकारण्याच्या या पद्धतीस 'इस्तावा' असे म्हणतात. लोकांच्या ठिकाणी विश्वास निर्माण करून अशा रीतीने अधिकाधिक पडीक जमिनी लागवडीखाली आणल्या. राज्याच्या उत्पन्नात भर टाकली. लोकांच्या पुनर्वसनासाठी सरकारने त्यांना विविधप्रकारे साहाय्य केले.**



करणे. रयतेवर काडीचा जुलूम व गैर केलीया साहेब तुजवर राजी नाहीत ऐसे बरे समजणे....... रयतेला तवाना करावे आणि किर्द करवावी...... गावचा गाव फिरावे ज्या गावात जावे तेथील कुणबी किती आहेत ते गोळा करावे त्यात ज्याला जे शेत करावयाची कुवत असेल त्या माफीक त्यासी किर्द करवावी.'

(शिवचरित्र साहित्य खंड ९, पान ५५)

राज्यात सैन्याच्या हालचाली होत असताना आपल्या फौजेकडून रयतेला कोणत्याही प्रकारची तोशीस लागू नये याविषयी शिवाजी महाराज फार सक्त होते. इ.स.१६७४ मध्ये महाराजांनी आपल्या जुमलेदार, हवालदार इत्यादी लष्करी अधिकाऱ्यांना पाठविलेल्या आज्ञापत्रात ते लिहितात, 'रयतेस तजवीस देऊ लागाल. कोन्ही कुणब्याचे दाने आणाल, कोन्ही भाकर, कोन्ही गवत, कोन्ही फाटी, कोन्ही भाजी ऐसे करू लागलेत म्हणजे जो कुणबी जीव धरून मात्र राहिला आहे तोही जाऊ लागेल. कित्येक उपाशी मरायला लागतील म्हणजे त्याला ऐसे होईल की मोगल मुलकात आले त्याहनही अधिक तुम्ही! ऐसा तळतळाट होईल.'

(राजवाडे खंड ८, पान २८)

यावरून शिवाजी महाराजांच्या मनात रयतेविषयी असलेली ममता आपणांस दिसून येते.

१७ व्या शतकात शेतकऱ्याला कोणकोणते कर व पट्ट्या द्याव्या लागत होत्या याची कल्पना आल्यास शिवाजी महाराजांच्या जमीन-महसुलाविषयीच्या धोरणाचे व सुधारणांचे मोल यथार्थपणे आपल्याला कळून येईल. या पूर्वीच्या काळात शेतकऱ्यांना तेलपट्टी, शेंडीपट्टी, लग्नपट्टी, तूपपट्टी, जंगमपट्टी वगैरे सुमारे ५० पट्ट्या व कर भरावे लागत. या करांपैकी बहुतेक कर शिवाजी महाराजांनी यशस्वीपणे रद्द केले आणि त्या सर्वांचे एकत्रीकरण करून एकूण ४० टक्के वसुली कर लागू केला. यावरून शेतकऱ्यांचे व कुळांचे, जबरदस्तीने लादलेल्या करांपासून संरक्षण करण्याची काळजी शिवाजी महाराजांना लागून राहिल्याचे दिसून येते आणि लोकांनीही त्यांना योग्य प्रतिसाद दिला. कारण, त्यांना आपल्याला सरकारला किती सारा व कर द्यावयाचे आहेत याची कल्पना होती. कोणत्याही जुलूम जबरदस्तीशिवाय आपले देणे ते देत होते, असे दिसते.

शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या जमीनमहसूल पद्धतीत राज्याचे व शेतकऱ्याचे हितसंबंध वेगळे मानले गेले नाहीत, हे याचे विशेष होय.

फार मोठे क्षेत्र असलेल्या जमिनीवर योग्य तितका व माफक कर बसविण्याच्या या साध्या, न्याय्य व लाभकारी तत्त्वामुळे शेतकऱ्यांना व कुळांना फार मोठे समाधान लाभले असले पाहिजे. या साधनाचा उपयोग करून शिवरायांनी स्वराज्यातील जमिनीचा सर्व पृष्ठभाग, जमिनीचा प्रत्येक तुकडा व डोंगराळ भाग लागवडीखाली आणून तेथे पोषक व उपयोगी झाडाझुडपांची जोपासना केली व राष्ट्रीय उत्पन्नात भरघोस वाढ केली.

शिवाजी महाराजांचे राज्य जनतेच्या सहकार्यामुळे विकास पावले. शिवाजी महाराजांच्या जमिनीची व महसुलाची काळजीपूर्वक पाहणी करून मेजर जर्व्हिस याने असे अनुमान काढले की, - गोंधळ, लढाया आणि द्रोह करण्याच्या सार्वत्रिक वृत्तीचा हा काल असूनदेखील महसूल व्यवस्था आणि जनता यांची स्थिती सुधारली. इ.स. १८२० मध्ये महाराष्ट्रातील शेतीविषयी अहवाल तयार करणारा मेजर जर्व्हिस (जर्व्हिस, पृष्ठ ९३) आणि हे म्हणणे मान्य करण्याशिवाय आपल्याला गत्यंतर नाही.

**संपर्क : ९४२३००८३८३**

### महाराजांनी केलेल्या सुधारणा

१) स्वराज्यातील सर्व जमिनींचे अचूक मोजमाप करविले.

२) नापीक व पडजमिनी पिकाखाली आणल्या.

३) मधूनमधून जमिनींची पाहणी करून शेतीचे उत्पन्न निश्चित केले.

४) कोणत्याही आपत्तीपासून पिकांच्या, शेतसाऱ्यांच्या व गावकऱ्यांच्या रक्षणाची व्यवस्था केली.

५) हंगामातील बाजारभावाप्रमाणे धान्याच्या भागाचे रूपांतर केले.




## द्रष्टे निर्णय... अभिनव योजना

### जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांच्या वित्तीय अधिकारात वाढ

भूसंपादनाबाबत लोकन्यायालयासमोर येणाऱ्या प्रकरणांची तडजोड करण्यासाठी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांच्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्यात आली. त्याबाबत शासनाने १८ फेब्रुवारी २०१२ ला निर्णय घेतला. या निर्णयामुळे जिल्हाधिकारी यांना २५ लाख आणि विभागीय आयुक्त यांना एक कोटी रुपये इतक्या कमाल मर्यादेपर्यंत जी किंमत जास्त असेल तेवढी वाढ करून तडजोडीस मंजुरी देण्याचे वित्तीय अधिकार मिळाले आहेत.

लोकन्यायालयात भूसंपादनाबाबतची ८६ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. ही प्रकरणे तातडीने तडजोडीने निकाली निघणे आवश्यक आहे. यामुळे द्यावा लागणारा व्याजाचा भूरदंड शासनावर पडणार नाही व शासनाची आर्थिक बचत होईल. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी होईल. यासाठी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्या वित्तीय अधिकारात वाढ करण्यात आली आहे.

भूसंपादनाच्या प्रकरणात लोकअदालतीसमोर तडजोड करताना बऱ्याच अडचणी उद्भवत होत्या. बऱ्याच प्रकरणात स्पष्ट निर्देश नसल्याने तडजोड केली जात नसे किंवा काही प्रकरणांमध्ये वाजवीपेक्षा जास्त रक्कम दिल्याचा आक्षेप नोंदविला जातो. याकरिता लोकअदालतीमध्ये परस्पर तडजोड करण्यासाठी ठेवण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी वित्तीय अधिकारात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# 'पोलादी चौकटी' समोरील आव्हान

महसूल विभाग प्रशासनाचा कणा असल्यामुळे शासनाकडून प्रत्येक नवीन योजना या विभागाकडे सोपविली जाते आणि वर्षानुवर्षे हे चालत आल्यामुळे शासनाचा या विभागाप्रति असलेला विश्वास दिसून येतो. जवळजवळ १०० विविध विषयांचा अंतर्भाव असणाऱ्या २२ विभागांचे कामकाज महसूल विभागाकडून केले जाते. त्यापैकी ग्रामीण विकास, सहकार, विशेष साहाय्य, नागरी पुरवठा, आरोग्य, शिक्षण, गृह, नियोजन, आदिवासी कल्याण हे काही महत्त्वाचे विभाग आहेत. अगदी अलीकडे सोनोग्राफी उपकरणांची तपासणी करण्याचे कामही महसूल विभागास दिले आहे. भूसंपादन केलेल्या विस्थापितांचे पुनर्वसन करणे, शेतकऱ्यांना कसण्यासाठी अन्यत्र जमीन तसेच घरबांधणीसाठी जागा उपलब्ध करून देणे त्याचप्रमाणे पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही या विभागाने केलेली ठळक कामे आहेत. विभागाच्या या कामांव्यतिरिक्त शासनाच्या अनेक सामाजिक, आर्थिक उद्दिष्टपूर्तीच्या कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या योजनांची कामे महसूल विभागाकडून केली जातात. जवळजवळ १८८ ॲक्ट्स आणि योजनांची महसूल विभागाकडून अंमलबजावणी होते.

शासनाच्या अनेकविध योजना राबविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या स्थानिक महसूल प्रशासनाने नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे. राजकीयदृष्ट्या विचार केल्यास या विभागाने ग्रामपंचायत निवडणुकांपासून लोकसभा निवडणुकीपर्यंत अनेक निवडणूक प्रक्रिया यशस्वीरीत्या राबविल्याने देशातील लोकशाही प्रक्रिया बळकट करण्यास हातभार लावला आहे. देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा कसेल त्याची जमीन कायदा अंमलात आला, नवीन कूळ कायदा, तुकडेबंदी कायदा लागू करण्यात आला त्यावेळी या विभागाने बजावलेली भूमिका ही महत्त्वाचा टप्पा ठरली. सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात शासनाच्या अनेक योजनांमध्ये गरजूंना, संबंधितांना जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला इ. दाखले आवश्यक असतात. हे दाखले देण्याचे महत्त्वाचे काम महसूल प्रशासनाकडून केले जाते आणि त्यामुळे गरजू लोकसंख्येला आवश्यक ती वैधता मिळाल्याने शासकीय योजनांचा लाभ घेणे सुकर झाले. विकास प्रक्रियेमध्येही,

**वि. पा. राणे**

भूसंपादनाची प्रकरणे पूर्ण केल्यामुळे पायाभूत सुविधा उभारण्याच्या माध्यमातून आर्थिक विकास साधणाऱ्या शासकीय योजना मार्गी लावण्याच्या कामात या विभागाचा महत्त्वाचा वाटा आहे.

२१ व्या शतकातील आव्हानांचा विचार करता महसूल विभागाच्या कार्याचे मूल्यमापन तातडीने करण्याची गरज आहे. राज्याच्या विकासामध्ये महसूल विभाग यंत्रणेचा यथायोग्य वापर करून या विभागाकडे असलेल्या क्षमतेचा वापर हा विभाग भौतिक आणि गुणात्मकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी करता येईल. नायब तहसीलदार या पदासाठी आता थेट नेमणुका होत असल्याने महसूल विभागाकडे उच्चशिक्षित कर्मचारी उपलब्ध झाले आहेत. त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन झाल्यास सक्षम कर्मचारी निर्माण होऊन महसूल विभागाचे ते आधार ठरू शकतील. यासाठी काही उपाययोजना करता येतील.

**सर्वंकष प्रशिक्षण कार्यक्रम**

विशेषत: विभागाच्या सर्वच स्तरांवर सर्वंकष



जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे. कारण, सध्या जे प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात ते प्रामुख्याने उच्चस्तरीय अधिकाऱ्यांसाठी आहेत; परंतु या प्रशिक्षण कार्यक्रमांत सर्वसमावेशक उद्दिष्टांचा समावेश नसल्याने अपुरे आहेत. अधिकाऱ्यांकडून जे विषय हाताळले जातात त्याविषयाचे अद्ययावत ज्ञान व विषयाचा आवाका सातत्याने जाणून घेण्यासाठी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. कर्मचारी वर्गाची कामाची इच्छाशक्ती वाढावी यासाठी संगणक साक्षरता, परस्पर संबंध सुधारणा, प्रेरणा कौशल्य आत्मसात करणे आणि आधुनिक व्यवस्थापन कौशल्य आत्मसात करणे या बाबी प्रशिक्षणातून साध्य करता येतील. शासन संचालित व्यावसायिक प्रशिक्षण संस्था आणि अन्य प्रशिक्षण संस्था यांच्या संयोगाने शासनाने प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

सेनाविभागाच्या कर्मचारी, अधिकारी वर्गाचा १/३ सेवाकाळ प्रशिक्षण कार्यक्रमात व्यतित होतो. शासनाने या बाबींची दखल घेणे जरुरीचे आहे. यासाठी प्रशिक्षण संस्था तातडीने उभारण्याची जरुरी आहे. पुण्यातील बावधन येथे अशी एक संस्था उभारली जात आहे. तिची उभारणी लवकरात लवकर होईल यासाठी प्रयत्न केले जावेत. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांनीही

प्रशिक्षण काळ पगारी सुट्टी आहे असे समजू नये. प्रशिक्षण काळात प्रशिक्षणार्थीने दिलेला उत्कृष्ट प्रतिसाद त्याच्या पुढील प्रगतीसाठी विचारात घेतला जावा. देशात संयुक्त सरकार असलेल्या काळात राज्यातील महसूल प्रशासन विभागास महत्त्वाची भूमिका बजावावी लागणार आहे. जोपर्यंत सर्व स्तरावरील कर्मचारी प्रामुख्याने कायदेविषयक ज्ञान आणि उपयोजित ज्ञान यांचा समावेश असलेल्या प्रशिक्षणाने प्रशिक्षित होत नाहीत तोपर्यंत शासकीय सेवेद्वारे योग्य तो परिणाम साधता येईल असे वाटत नाही.

### उत्कृष्टतेला प्रोत्साहन

महसूल विभागाद्वारे कर्मचाऱ्यांमधील उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्याचा कार्यक्रम राबविला गेला पाहिजे. काही मोजक्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्वयंप्रेरणेने आपल्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करून दाखविले आहे.

उत्कृष्टता साध्य करण्याचे गमक काय असेल तर शासनाबद्दल जी नकारात्मक प्रस्थापित गृहीतके आहेत त्यात बदल करणे. लखिना पॅटर्न राज्यात लागू होण्यापूर्वी सरकारी कार्यालय म्हणजे धुळीचे साम्राज्य, फाइल्सचा पसारा, हात नसलेल्या मोडक्या खुर्च्या, स्वच्छतागृहांचा अभाव इत्यादी लोकांसाठी किमान सुविधा नसणारी जागा अशी जनमानसात प्रतिमा होती; परंतु अहमदनगरचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. लखिना यांनी ही प्रतिमा बदलली.

### कॅडर मॅनेजमेंट

कॅडर मॅनेजमेंट ही बाब अशी आहे की त्यामध्ये विलंब झाल्यास शासनास त्याची किंमत चुकवावी लागते. प्रत्येक पातळीवर असे दिसून येते की, अधिकारी, कर्मचारी वर्गास पदोन्नती मिळण्यास दशके उलटून जातात. याचे कारण असे की, कॅडर मॅनेजमेंट हा विषय पूर्णपणे दुर्लक्षिला गेला आहे. यासाठी या विषयातील परिपूर्ण ज्ञान विभागातील कर्मचाऱ्यांना असले पाहिजे आणि त्यांनी यासाठी पदोन्नतीचे आराखडे तयार केले पाहिजेत. परंतु, हे केले जात नसल्याचे दिसते. स्पर्धा परीक्षेत जे उमेदवार वरच्या क्रमांकावर असतात ते महसूल सेवा पसंत करतात; परंतु सध्या असे दिसते की, या यादीमध्ये खालचा क्रमांक ज्या उमेदवारांचा आहे आणि जे अन्य सेवांमध्ये रुजू झाले आहेत त्यांना तुलनेने अधिक लवकर पदोन्नती मिळाली आहे. यासाठी पदोन्नतीचा विषय लवकरात लवकर विचारात घेतला गेला पाहिजे. नुकतीच पदोन्नती दिली गेलेली बॅच १९८७ मध्ये म्हणजे २५ वर्षांपूर्वी सेवेत रुजू झाली आहे.



ई-अभिलेख अंतर्गत पथदर्शी प्रकल्पाची तहसीलदार मुळशी कार्यालयात पाहणी करताना अपर मुख्य सचिव (महसूल) श्री. स्वाधीन क्षत्रिय व श्री. चद्रकांत दळवी, जमाबंदी आयुक्त.

महसूल विभागाकडून अन्य विभागांच्या समन्वयाने अनेक योजनांची हाताळणी केली आहे. अधिकाऱ्यांना काम प्रभावीपणे करता यावे यासाठी त्यांना 'समन्वय अधिकारी' असे पद देणे जरुरीचे आहे. यामुळे समन्वयाचे काम सुकर होईल. या विषयाचा समग्र प्रशिक्षण कार्यक्रमात अंतर्भाव केला जावा.

### विभागाची प्रतिमा

कर्मचारी, अधिकारी वर्गाचे काम अधिकाधिक परिणामकारक व्हावे यासाठी सुधारणा, त्याबरोबरच विभागाची प्रतिमा सुधारण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. सध्या या विभागातील कर्मचारी लोकांशी उद्धटपणे वागतात, लोकांना त्रास देतात तसेच सर्वत्र दिसून येणारी लाचखोरी या विभागातही असल्याने प्रत्येक कामात विलंब केला जातो अशी जनमानसात प्रतिमा आहे. लाचखोरीचे उच्चाटन करणे ही एक राष्ट्रीय पातळीवरील गंभीर समस्या आणि आव्हान आहे.

लाचखोरी करणे आणि अशा लाचखोरीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणे ही आधुनिक भारतीय जनमानसाची नैतिक सापेक्षता लक्षात घेतली तर तथाकथित समांतर आधुनिक समाजापेक्षा ती फार मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसते. यासाठी काही कायदे निर्माण केले तरी त्यांचा फारसा उपयोग होईल असे वाटत नाही. कडक कायद्यांमधून पळवाटा शोधल्या जातील, ज्यांना नियंत्रण ठेवण्यासाठी नेमले आहे त्यांच्यावरच मात केली जाईल अथवा त्यांना विकत घेतले जाईल. यामुळे दोषींवरचा आरोप सिद्ध करता येण्याचे प्रमाण तुटपुंजे होईल त्यामुळे केवळ अर्थगर्भित परंतु परिणामशून्य कायदे करण्यात अधिक वेळ दवडू नये. भारतीय लोकमानसाला वेगळ्या उपायांची जरुरी आहे. प्रथमत: शासनाने अधिकाऱ्यांना त्यांच्या मनाप्रमाणे निर्णय घेण्याचे जे स्वातंत्र्य बहाल केले आहे त्याच्यावर नियंत्रण आणले पाहिजे. सध्या काही प्रमाणात हे होते. परंतु त्याची अंमलबजावणी व्यापक झाली पाहिजे. दुसरे असे की, लाचखोर मानवी संसाधनाचा वापर कमी करून तंत्रज्ञानाचा आधार घेतला पाहिजे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून दैनंदिन जीवनातील गरजा भागविताना मानवी हस्तक्षेप कमीतकमी राहील याची काळजी घेतली पाहिजे. रेल्वे तिकीट आरक्षण, वितरण, बिले भरणे, करनिर्धारण, परवाना वितरण, शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश अशा काही बाबी आहेत की ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात लाचखोरी होते. या बाबी पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञानाचा आधार घेतला पाहिजे. शासनाने यासाठी सामान्य लोकांमध्ये संगणक साक्षरता आणि इंटरनेटचा वापर वाढविण्यासाठी जागृती केली पाहिजे. भारतासारख्या विशाल देशात ही गोष्ट सोपी नाही; परंतु नवीन कल्पना देणाऱ्यांना सतत प्रोत्साहन दिले पाहिजे. ७/१२ चा उतारा आता इंटरनेटवर उपलब्ध होतो ही स्तुत्य बाब आहे. निबंधक कार्यालयातील संगणकीकरण ज्या प्रकारे करण्यात आले आहे त्यावरून सिद्ध होते की आपण या गोष्टी करू शकतो. याचा जोरदार पाठपुरावा करून उद्दिष्टपूर्ती करणे जरुरीचे आहे. प्रसिद्ध पत्रकार मार्क टुलीने एका ठिकाणी म्हटले आहे, 'भारत देशाची मूलभूत समस्या ही आहे की या देशाला विशिष्ट भारतीय आकार असलेले खराब प्रशासन आहे. मला खात्री आहे की, सध्याचे प्रशासन हा डाग धुऊन काढण्यासाठी पुरेसे सक्षम आहे. प्रशिक्षण कार्यक्रमात कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या मनावर ठसविले गेले पाहिजे की, ज्या खुर्चीवर तुम्ही बसणार आहात त्या खुर्चीच्या अधिकारामुळे स्वत:विषयी तुमच्या मनात भ्रामक कल्पना तयार होऊन तुमच्या व्यक्तिमत्त्वात बिघाड होऊ शकेल. त्यामुळे तुम्ही तुमच्यामध्ये सदैव नम्रता बाणवली पाहिजे. तरच तुम्ही लोकांना 'जो जे वांछिल तो ते लाहो' अशा निरपेक्ष वृत्तीने सेवा देऊ शकाल आणि हेच आपण १५ ऑगस्ट १९४७ रोजी 'नियतीशी केलेल्या करारा'चे सार आहे.

❑ ❑

मानवी जीवनामध्ये जमीन व जमिनीवरील मालकी हक्काला महत्त्वाचे स्थान आहे. देशाचा भूभाग ही प्रत्येक देशाची मूल्यवान संपत्ती आहे. जमिनीची उत्पादकता आणि त्यातून निर्माण होणारे धन यावरच देशाचा आर्थिक विकास अवलंबून आहे. देशाचा विकास विविध करांद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातूनच निर्माण होतो. त्यामुळेच आर्थिक गुंतवणूक, उद्योगधंदे, अर्थव्यवस्था आणि कृषी उद्योगांसाठी जमिनींशी संबंधित माहिती महत्त्वाची असते. राज्यकर्त्यांच्या संरक्षणाखाली जमीन कसणाऱ्यांना पिढ्यान्‌पिढ्या खात्रीने जमीन कसता यावी या गरजेतून प्रथम जमिनींची नोंद ठेवण्यास सुरुवात झाली. कसेल त्याची जमीन असा नियम मनुस्मृतीमध्ये सांगितला आहे. हिंदू धर्म शास्त्रानुसार जमिनीची मालकी वैयक्तिकरीत्या असली तरी राजाला जमिनीतील उत्पन्नाचा काही भाग घेण्याचा अधिकार असे. मुघल बादशहा शेरशहा यांनी मंत्री तोरडमल यांच्या मदतीने गज व साखळीचा जमीन मोजणीसाठी वापर करून महसूल आकारणीचा प्रयत्न केला. निजामाचा दिवाण मलिक अंबर यानेही ती पद्धत वापरली. मराठा राजवटीत गाव हे जमीन महसुलाचा घटक ठरविले. इंग्रजी राजवटीमध्येसुद्धा राज्य चालविण्यासाठी कर रूपाने उत्पन्न घेण्यात येत असे. १९ व्या शतकात पहिल्यांदा जमाबंदी लागू केली. जमिनीची वैयक्तिक मालकी घोषित करण्याचे धोरण म्हणजेच जमिनीची मालकी नोंदविण्याची व्याख्या त्यावेळी ठरविण्यात आली. मुंबई प्रांताचा तत्कालीन लेफ्टनंट गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने महसूल आकारणीसाठी स्थानिक पद्धतीला कायम ठेवण्याचे धोरण ठेवले. यासाठी कर्नल रिड याने १७९३ मध्ये मद्रास प्रांतात वापरलेली रयतवारी पद्धत मुंबई प्रांतात वापरली. या पद्धतीमध्ये शेतकरी त्याचा शेतसारा परस्पर सरकारकडे जमा करीत असे.

इ.स. १८२७ मध्ये रयतवारी पद्धतीचा परिणामकारक वापर होण्याच्या दृष्टीने जमिनीचे सर्वेक्षण करण्याची गरज ब्रिटिश राज्यकर्त्यांना वाटली; व त्या कामासाठी त्यांनी असिस्टंट कलेक्टर श्री. प्रिंगले यांची निवड केली. त्यांनी एकर, गुंठे हे इंग्रजी परिमाण वापरात आणले. त्यावेळी श्री. गुंटर नावाच्या अधिकाऱ्याने जमीन मोजणीसाठी साखळी वापरली ती गुंटर चेन नावाने प्रसिद्ध आहे. त्यांचे प्रयत्न अपुरे पडत आहेत असे लक्षात आल्यावर १८३६ मध्ये गोल्डस्मिथ व ले. विगेंट यांची

**वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरण यामुळे मूळ धारण जमिनीचे मोठ्या प्रमाणात हस्तांतरण झाले आहे व होत आहे. वाढत्या लोकसंख्येने वारसांमध्ये जमिनीची विभागणी होऊन जमिनीचे अनेक तुकडे झाले. त्यामुळे ७/१२ वर नमूद धारक, स.नं./ग.नं. व त्याचे क्षेत्र आणि नकाशा जागेवरील परिस्थितीशी मेळात नाही. त्यामुळे अधिकृतपणे एका व्यक्तीचा स्वतंत्र ७/१२ व स्वतंत्र नकाशा तयार होणे आवश्यक आहे. आधुनिक काळात जमिनी संबंधीची सर्व माहिती गतीने उपलब्ध करून त्याचा विकासकामासाठी योग्य वापर करणे ही काळाची गरज आहे. यासाठी गेल्या दोन दशकांपासून नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत गेले. सामान्य शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या वापरासाठी अचूक नकाशे व अधिकार अभिलेख तयार करणे अत्यावश्यक व अनिवार्य झाले आहे.**



# पुनर्मोजणी आणि पुनर्बांधणी

सर्वेक्षणासाठी नव्याने निवड करण्यात आली. या प्रकल्पाची सुरुवात पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे करण्यात आली. सन १८४० मध्ये ले. डेव्हिडसन याने जमिनीचा प्रकार, मातीची खोली व नैसर्गिक उणीव याद्वारे जमिनीचे वर्गीकरण केले. त्याचबरोबर जमिनीचे प्रथमच रुपया, आणे व पै या परिमाणात मूल्यांकन केले गेले. सन १८४७ मध्ये श्री. गोल्डस्मिथ, ले. डेव्हिडसन व विगेंट यांनी संयुक्त अहवाल सादर केला. तो भूमापन आणि जमाबंदीच्या इतिहासातील महत्त्वाचा दस्तऐवज मानला जातो. जमिनीचे सर्वेक्षण क्रमांक (सर्व्हे नंबर) हे कर आकारणीचे मूलभूत एकक ठरविण्यात आले. एका बैलजोडीने कसता येऊ शकेल इतकी जमीन म्हणजे एक सर्व्हे नंबर असे ठरविण्यात आले. मूळ सर्वेक्षण आणि सुधारित सर्वेक्षणांच्या नोंदी एकत्रित करून सन १९०१ मध्ये सर्वेक्षण विभाग बंद करण्यात आला. यापुढील सर्वेक्षणाचा उद्देश फक्त आकारणीच्या दरात सुधारणा करणे एवढाच होता. भूमी अभिलेखांचे सर्वेक्षण करण्यासाठी आणि ते अद्ययावत करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाची स्थापना करण्यात आली. सन १९२५ पर्यंत शंकु साखळी पद्धतीने मोजणी केली जात असे. परंतु, ती पद्धत वेळखाऊ व किचकट असल्याने फलक यंत्राने मोजणी

करण्याची पद्धत सुरू केली.

शेती कसण्यायोग्य व्हावी व संपूर्ण शेतीवर नियंत्रण व देखरेख ठेवणे सुलभ व्हावे म्हणून सन १९४७ मध्ये मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ अस्तित्वात आला; त्यास अनुसरून महाराष्ट्रातील एकूण ४३,८०३ गावांपैकी ३१,१५१ इतक्या गावांत साधारणपणे २५७ लाख हेक्टर आर क्षेत्रावर एकत्रीकरण योजना राबविण्यात आल्या. त्याबाबत निर्माण झालेल्या तक्रारी व योजना राबविताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन सन १९९३ पासून स्थगिती देण्यात आली आहे.

**पुनर्मोजणीची आवश्यकता**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ९३ मधील तरतुदीनुसार प्रत्येक ३० वर्षांनी जमाबंदी करता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे. तथापि, महाराष्ट्राच्या एकूण महसूल उत्पन्नामध्ये जमीन महसुलाचा हिस्सा आजच्या युगात नगण्य असल्याने जमाबंदी न करता पुनर्मोजणी करणे इष्ट आहे. इंग्रज राजवटीत सन १८३० ते १८७० या काळात जमिनींचे अभिलेख कागदावर तयार करण्यात आले आहेत. हे अभिलेख तयार करून साधारणपणे १०० ते १२० वर्षांचा कालावधी झाला असल्यामुळे व वारंवार हाताळणीमुळे ते जीर्ण व फाटलेले आहेत. जुने बांध, वरळ्या नष्ट झाल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हद्दीचे वाद सोडवणूक करणे कठीण झाले आहे. संबंधित शेतकऱ्यांच्या शेताची सीमा मोजणी अभिलेखाप्रमाणे निश्चित करण्यात अडचणी येत आहेत.

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयांतर्गत भूमी संसाधन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात ई-महाभूमी : एकात्मिक भूमी अभिलेख आधुनिकीकरण आणि व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्यातील अस्तित्वात असलेल्या सर्व भूमी अभिलेखांचे संगणकीकरण व अद्ययावतीकरण करणे हा कार्यक्रम भूमी अभिलेख विभागामार्फत हाती घेतला आहे. यामध्ये मुख्यत्वेकरून ऑनलाइन म्युटेशन, स्कॅनिंग ऑफ ओल्ड रेकॉर्ड, डिजिटायझेशन ऑफ कॅडस्ट्रल मॅपस्, इंटिग्रेशन ऑफ रजिस्ट्रेशन, रेव्हेन्यू व लॅन्ड रेकॉर्ड डिपार्टमेंट व राज्यातील जमिनींची पुनर्मोजणी असे कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. यामध्ये राज्याची




## पुनर्मोजणीची उद्दिष्ट्ये

- राज्यातील जमिनीसंबंधीची सर्व माहिती गतीने उपलब्ध करून देणे.
- त्याचे आकलन करून त्याचा विकासकामासाठी योग्य वापर करणे.
- नकाशा व जागेवरील वस्तुस्थिती मेळात ठेवणे. (mirror image)
- जमिनीच्या मालकी हक्काविषयी पूर्वीचे कोणत्याही हक्काचे संदर्भ ठेवण्याची आवश्यकता राहणार नाही इतपत मालकी हक्काची निर्णायक शाश्वती (title guarantee) देणे.

पुनर्मोजणी हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे.

संपूर्ण राज्याची पुनर्मोजणी करताना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मोजणी करताना अचूकता प्राप्त करण्यासाठी सर्वप्रथम मोजणी करावयाच्या जमिनीमध्ये ग्राऊंड कंट्रोल पॉईंट नेटवर्क तयार करावे लागणार आहे. ग्राऊंड कंट्रोल पॉईंट म्हणजे डी.जी.पी.एस. (Differential Global Position System) तंत्रज्ञानाचा वापर करून अचूकतेने अक्षांश व रेखांशाद्वारे पृथ्वीवरील निश्चित केलेले स्थान. अशा प्रकारचे ग्राऊंड कंट्रोल पॉईंटचे नेटवर्क सध्या सर्व्हे ऑफ इंडिया या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेकडून करण्यात येत असून, आतापर्यंत पहिल्या टप्प्यात १०० ते १५० कि.मी.वर १ पॉईंट व दुसऱ्या टप्प्यात ३० ते ३५ कि.मी. अंतरावर १ पॉईंट, याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात एकूण २४८ स्थानांची निर्मिती करण्यात आली आहे. त्या आधारे शासनामार्फत १६ X १६ कि.मी. व ४ X ४ कि.मी. व १ X १ कि.मी. याप्रमाणे अनुक्रमे प्रायमरी, सेकंडरी आणि टरशरी जी.सी.पी.चे नेटवर्क तयार करण्याचे प्रस्तावित आहे. त्या प्रत्येक ग्राउंड कंट्रोल पॉईंटचे डी.जी.पी.एस. (Differential Global Position System) या तंत्रज्ञानाने अक्षांश व रेखांश निश्चित करून पृथ्वीवरील स्थान निश्चित करण्यात येईल व सदर नेटवर्कच्या आधारे पुनर्मोजणी करणेकामी दोन पद्धतींचा वापर करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

१. उपग्रह प्रतिमा वापरून.

२. डी. जी. पी. एस. व टोटल स्टेशन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने.

सद्यःस्थितीत पुनर्मोजणीसाठी येणाऱ्या अडचणी व त्यासाठी आवश्यक असलेला खर्च याबाबत अभ्यास करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील पिरंगूट व लगतच्या एकूण १२ गावांत पुनर्मोजणी पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यामध्ये एकूण ६७३४ हेक्टर आर. इतक्या क्षेत्राची मोजणी वरील दोन्ही पद्धतीने करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे काम प्रगती पथावर आहे.

**- चंद्रकांत दळवी**

# ७/१२ : जमिनीचा आरसा



**गाव, तालुका व जिल्हा पातळीवर जमाबंदीची कामे सुलभ करणे ह्या सातबाराचा महत्त्वाचा उद्देश आहे. जमिनीमध्ये ज्यांचे हितसंबंध आहेत, अशा सर्व व्यक्तींच्या संरक्षणार्थ अधिकार अभिलेखाची तरतूद करणे, महसुली आणि दिवाणी वादांची संख्या कमी करणे, जमिनीविषयक आवश्यक सर्व आकडेवारी प्रशासनास उपलब्ध करून देणे, महसूल लेखे व गाव नकाशे अद्ययावत ठेवणे, परिपूर्ण अभिलेख, शास्त्रोक्त भूमापन व जमाबंदी यासाठी सातबाराचे महत्त्व फार मोठे आहे. सातबारा म्हणजे जमिनीचा आरसा असतो. प्रत्यक्ष जमिनीत न जाता जमिनीच्या गावाचे नाव, तालुका, जिल्हा व इतर तपशील समजतो. भूतकाळ- वर्तमानकाळातील जमिनीची मालकी, जमिनीचे स्थानिक नाव इत्यादी तपशील समजतो.**

डॉ. लक्ष्मण खिलारी

सात-बारा उताऱ्याचे महत्त्व किती आहे? त्याचे उपयोग काय आहेत? सात-बारावर नोंद करून नाव लावण्याची जबाबदारी कोणाची आहे? सात-बारा कसा वाचावा? त्यावरील वेगवेगळे रकाने काय असतात?

सातबाराविषयक सारभूत तरतुदी महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ मध्ये दिलेल्या आहेत. यातील तरतुदी शेतकरी, मालमत्ताधारक, शासकीय कर्मचारी, सुजाण नागरिक, कायद्याशी संबंधित सर्व घटकांना माहीत असणे आवश्यक आहे.

कलम १४७ ते १७६ मध्ये याची तपशीलवार माहिती आहे.

सात-बाराबरोबरच गावांचे पुढील नमुने आवश्यक आहेत.

१. गावचा नमुना नं. ६ : फेरफाराची नोंदवही.

२. गावचा नमुना नं. ६ (अ) : विवादग्रस्त प्रकरणांची नोंदवही.

३. गावचा नमुना नं. ६ (क) : वारस प्रकरणांची नोंदवही.

४. ४) गावचा नमुना नं. ६ (ड) : नवीन उपविभाग फेरफार नोंदवही.

५. गावचा नमुना नं. ७ : अधिकार अभिलेख पत्रक.

६. गावचा नमुना नं. ७ अ : कुळवहिवाट नोंदवही.

७. गावचा नमुना ७ ब : मालकाव्यतिरिक्त इतरांच्या कब्जात जमीन असेल त्याची नोंदवही.

८. गावचा नमुना १२ : पिकाची नोंदवही.

९. हक्कनोंद म्हणजेच गावचा नमुना नं. ७, ७ अ आणि १२ मिळून सात-बाराचा उतारा तयार होतो.

१०. गावचा नमुना ८ अ : खाते उतारा एकूण धारण सर्व जमिनीची नोंद.

हक्कनोंदीतील म्हणजेच सात-बारावरील अंतर्भाव पुढीलप्रमाणे-

१. जमिनीचे मालक, भोगवटा करणारे, कब्जेदार, जमीन धारण करणारे, गहाण घेणारे, भाडे घेणारे किंवा ज्यांच्या नावे जमीन महसूल केला आहे त्यांची नावे.

**सातबारातील स्तंभ**

१. गा. क्र. ७, ७ अ, व १२ (सरनामा)
२. गाव----- तालुका------ जिल्हा---------
३. भूमापन क्रमांक/ गट क्रमांक/ हिस्सा क्रमांक/ धारण प्रकार व क्षेत्र
४. स्थानिक नाव
५. लागवडीखालील क्षेत्र, जिराईत, बागायत, भातशेती, एकूण हे. आर.
६. पोटखराबा (अ) (ब) एकूण
७. आकार, जुडी, विशेष आकार, पाणी आकार एकूण.
८. मालकाचे नाव.
९. खाते क्रमांक, कुळाचे नाव, खंड, कुकाक ८४, ३२ ग वगैरे.
१०. इतर अधिकार, सीमांकन, सीमाचिन्हे.
११. वर्षे हंगाम.
१२. पिकाखालील क्षेत्र, मिश्रपिकांचे एकूण क्षेत्र, मिश्र, अमिश्र पिकांचे क्षेत्र.
१३. मिश्रपिकांचा संकेतांक, जलसिंचन, अजलसिंचन.
१४. पडीक व पिकास निरुपयोगी जमिनीचा तपशील.
१५. प्रकार व क्षेत्रे.
१६. पाणीपुरवठ्याची साधने.
१७. जमीन करणाऱ्याचे नाव.
१८. शेरा- जसे झाडझाडोरा, वहिवाटीचा रस्ता व नवीन शर्त, जुनी शर्त, अविभाज्य, तुकडेबंदी, हस्तांतरास प्रतिबंध, ४३ च्या बंधनास पात्र वगैरे.
१९. अस्सल बरहुकूम खरी नक्कल, तारीख, सही, आपण तलाठ्याकडून काढलेल्या सात-बारा ही सात-बाराची खरी नक्कल असते.

याशिवाय पोटखराब्याचे प्रकार, आणेवारी, हिस्सेवारी असे हिस्से सात-बारावर आढळतात.

याशिवाय फेरफार नंबर जे कंसात किंवा वर्तुळात लिहिले जातात.

इतर अधिकाऱ्यांची नोंदवही सात-बारावर आढळते.

२. सरकारकडून जमीन मिळाली असल्यास पट्टेदाराचे नाव.

३. मुंबई कुळकायदा वहिवाटप्रमाणे आजीव, संरक्षित अगर कायम कुळे.

४. हक्कनोंदीमधील सर्व इसमांच्या हक्काचे स्वरूप, बंधने, शर्ती वा अटी.

५. जमीन महसूल, पाणी आकार, खंड किंवा जुडी.

६. वेळोवेळी अधिसूचित मजकूर, माहिती, संपादन, राखीव वगैरे.

थोडक्यात, सात-बारा म्हणजे जमिनीचा आरसा असतो. प्रत्यक्ष जमिनीत न जाता जमिनीच्या गावाचे नाव, तालुका जिल्हा व तपशील समजतो. जमिनीची भूतकाळ-वर्तमानकाळातील मालकी, जमिनीचे स्थानिक नाव इत्यादी तपशील असतो. सात-बारा पाठपोट छापलेला असतो. काही वेळेस एकाच पृष्ठावर सर्व मजकूर असतो.

**सात-बाराचे उपयोग**

मनुष्याच्या शरीरात जसे रक्तवाहिन्यांचे महत्त्व असते, तसे मिळकतीच्या बाबतीत सात-बारावरील नोंदीस महत्त्व असते. सात-बाराचे उपयोग पुढीलप्रमाणे-

१. जमिनीची मालकी, भोगवाटा, कब्जा, हिस्सा, महसूल, खंड, कुळे, पिके, हंगाम, क्षेत्र, मगदूर, इतर अधिकार वगैरे बाबी.

२. पोलीस कारवाईबाबत.

३. महसुली कारवाईबाबत.

४. दिवाणी दाव्यांच्या कामी.

५. कब्जेवहिवाट शाबीत करण्यासाठी.

६. बँका, पतसंस्था, सोसायट्या वगैरे संस्थांकडून कर्ज येण्यासाठी.

७. न्यायालयात जामीन राहण्यासाठी.

८. शासकीय योजनांचा लाभ येण्यासाठी.

९. रहिवास, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला मिळण्यासाठी.

१०. नोंदीचे गृहीत मूल्य दाखविण्यासाठी.

११. माणसाची पत ठरविण्यासाठी (सात-बाराच्या उताऱ्यावरील uarVV या सदरात.)

- uarV - 1v म्हणजे जमीन मालक स्वत: जमीन कसणार असतो.
- uarV - 2v म्हणजे जमीन मालक मजुरांकडून जमीन कसून घेतो.
- uarV - 3v म्हणजे जमीन मालक कुळांकडून जमीन कसून घेतो.

सात-बारा हे सार्वजनिक दस्तऐवज (पब्लिक डॉक्युमेंट) आहे. ते कुणालाही पाहण्यासाठी उपलब्ध असते. तसेच तिसऱ्या माणसाचाही सात-बारा आपण काढू शकतो. अशा सात-बाराच्या नकला नाममात्र फी भरून तलाठी किंवा अलीकडे संगणकीकृत सात-बारा तहसील कार्यालयात उपलब्ध आहेत.

जमिनीच्या मालकी हक्कात मुख्यत्वे चार प्रकारे बदल होतात.


१. उपनिबंधकाकडे सब रजिस्ट्रार नोंदल्या गेलेल्या दस्तऐवजाद्वारे.

२. वारसाहक्काने किंवा वाटणीद्वारे.

३. नोंद न झालेल्या तोंडी कराराद्वारे झालेले व्यवहार.

४. दिवाणी न्यायालय किंवा महसूल अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये केलेले फेरबदल अशा बदलांना 'फेरफार नोंद' असे म्हणतात.

हे फेरफार योग्य त्या रजिस्टरमध्ये नोंदवले जातात. ही एक सतत घडत राहणारी पक्रिया आहे. असा होणारा प्रत्येक बदल हा नोंदवला गेला पाहिजे व प्रत्येकाला स्वतंत्र अनुक्रमांक दिला गेला पाहिजे. अशा रीतीने झालेले सर्व फेरबदल ओळीने नोंदवले जातात. कुठल्याही व्यक्तीने एखाद्या जमिनीमध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क संपादित केला असेल तर त्याने त्याबाबत गावच्या तलाठ्याकडे लेखी अथवा तोंडी माहिती दिली पाहिजे. अशी माहिती हक्क संपादनानंतर तीन महिन्यांच्या आत देणे बंधनकारक आहे. असा हक्क जर नोंदवलेल्या दस्तऐवजाने उदा. खरेदीखताने निर्माण झाला असेल तर किंवा वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये निर्माण झाला असेल, तर अशा प्रकारे तीन महिन्यांत हक्क संपादनाची माहिती देण्याचे बंधन महाराष्ट्र महसूल कायदा १९६६ कलम १४९ द्वारे संबंधितांवर नाही, तर ती जबाबदारी उपनिबंधकाने परस्पर 'अ'पत्रक तलाठ्याकडे पाठवून करवून घेणे बंधनकारक आहे म्हणजे महसूल खात्यावर आहे.


गाव नमुना सात
गाव नमुना बारा

वारसाने दोन प्रकारे हक्क संपादित होतो.

१. इच्छापत्र या मृत्युपत्राद्वारे मिळणारा हक्क.

२. वडिलोपार्जित जमिनीत मिळणारा वारसा हक्क.

तलाठ्यास हक्क संपादनाबद्दल माहिती मिळाल्यानंतर फेरफार रजिस्टरमध्ये रीतसर नोंद नंबर टाकून त्याची पोचही संबंधितांना देणे बंधनकारक आहे. त्यानंतर तलाठी संबंधितांवर जसे येणार-विकणार यांना हक्क संपादनाची नोटीस बजावतात. अशी नोटीस

**औरंगाबाद जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांसाठी एक स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. वरिष्ठ महसूल अधिकारी, कोर्ट किंवा नोंदणीकृत दस्तऐवजाच्या किंवा इतर हक्क संपादनाच्या नोंदी संबंधित तलाठ्याने एक महिन्याच्या आत योग्य त्या ६ ड च्या रजिस्टरला न घेतल्यास ३१ व्या दिवसापासून जोपर्यंत नोंद घेत नाहीत तोपर्यंत संबंधित तलाठ्यास दरदिवशी २५० रु. दंड ठोठावण्यात येईल. हा दंड जमीन महसूल बाब म्हणून वसूल करण्यात येईल.**

कधीही येण्याचे टाळू नये. टाळल्यास तुमची हरकत नोंदवण्याची संधी हुकू शकते. तलाठी दरवाजावर नोटीस चिकटवतात, म्हणजे अशी नोटीस योग्य प्रकारे बजावलेली आहे असेच कायदा समजतो. फेरफार नोटिशीवर हरकत घेतल्यानंतर योग्य त्या तक्रार रजिस्टरला नोंद येणे तलाठ्यावर बंधनकारक असते. त्याची सुनावणी वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यासमोर येऊन योग्य तो निर्णय होऊ शकतो.

शेवटी नोटीस बजावल्यानंतर १५ दिवसांनी संबंधित हरकतींची चौकशी सुनावणी झाल्यानंतर फेरफार नोंद मंजूर केली जाते व नंतरच त्याची सात-बारावर पक्की नोंद वर्तुळात किंवा गोलात फेरफार नंबर टाकून होते किंवा पूर्वीच्या नावास किंवा नोंदीस नवीन नोंदीने वर्तुळातील नंबरसह कंस केला जातो. मंजुरीपूर्वीसुद्धा तलाठी पेन्सिलने सात-बारावर कच्ची नोंद टाकू शकतात. साधारणत: नोंद मंजूर करण्याचे अधिकार मंडळ अधिकाऱ्यांकडे असतात. नोंद मंजूर झाल्यानंतरही काही वाद उद्भवल्यास प्रांत अधिकारी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे योग्य पुरावे देऊन नोंद रद्द करण्यासाठी दावा करता येतो.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार सात-बारा हे फक्त हक्क नोंदणीचे रजिस्टर असून, ते मालमत्तेचे 'निर्णायक प्रमाणपत्र' किंवा 'टायटल डॉक्युमेंट' नाही; त्यामुळे नोंदणीकृत खरेदी दस्तऐवजास सात-बारा हा मालकी प्रस्थापित करणारा

(पान ३८ वर)

# विक्रमी महा-फेरफार




एक कोटी दहा लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेला ठाणे जिल्हा हा देशातील सर्वांत मोठा जिल्हा आहे. येथील ७ तालुके हे आदिवासी क्षेत्रात मोडतात तर १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या ही आदिवासी आहे. किनारी भागातील डहाणू, पालघर, वसई हे तालुके तसेच डोंगरी क्षेत्रातील मुरबाड, शहापूर या तालुक्यांतील अदिवासींच्या उत्पन्नाचे साधन प्रामुख्याने शेती आहे. वाढत्या लोकसंख्येचा ताण शेती व आनुषंगिक उद्योगधंद्यावर पडून जमिनीस मोठी किंमत प्राप्त झाली आहे. त्यामुळे त्यातून निर्माण होणारे न्यायालयीन दावे, तक्रारी यांचे प्रमाण वाढत आहे. महसूल अभिलेख वेळीच अद्ययावत होणे आवश्यक असताना वारस नोंदी, बोजे, संपादनांच्या नोंदी वेळेवर झाल्या नाहीत तर त्यातून अनंत अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत होते. आदिवासी जनतेमध्ये अशिक्षितपणामुळे वेळीच अभिलेखातील नोंदी अद्ययावत केल्या जात नव्हत्या.

महा-फेरफार अदालतीमध्ये विक्रमी नोंदी घेण्यात आल्या त्यासाठी कामी आले ते कालबद्ध नियोजन. जिल्हाधिकारी पी. वेलरासू यांनी सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची बैठक घेऊन कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून दिली व टप्पानिहाय नियोजन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी सर्व तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या बैठका घेऊन महा-फेरफार अदालतीची संकल्पना स्पष्ट करण्यात आली.

जिल्ह्यामध्ये एकाच वेळी २० ते ३१ जुलै २०१२ या कालावधीत प्रत्येक गावी चावडी वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तलाठ्यांसोबत निरीक्षक म्हणून मंडळ

**मनोज रानडे**

अधिकारी/अव्वल कारकून यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर १० दिवसांत तालुक्यातील सर्व गावी चावडी वाचन पूर्ण केले. यामध्ये मयत खातेदार, कर्जफेड झालेल्या बोजा नोंदी निदर्शनास आल्या.

महा-फेरफार अदालतीमध्ये मयत खातेदार वारस फेरफार, भूसंपादन, बँकेचा बोजा, सोसायटीचा बोजा, तगाई बोजा, कुळवहिवाट ३२ ग, ३२ म चा बोजा, खरेदी-विक्री नोंदणीकृत दस्तऐवज, प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या जमिनीच्या नोंदी, वन हक्क नोंदी, सामुदायिक पट्ट्याने दिलेल्या जमिनीच्या नोंदी इ. फेरफार नोंदी घ्यायच्या असल्याने अशा प्रकरणांचा चावडी वाचनाच्या वेळी गावी आढावा घेऊन प्रकरणे तपासून आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात आली. तसेच फेरफार नोंदीसंबंधी हितसंबंध असणाऱ्या खातेदारांना १ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०१२ या कालावधीत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५०(२) नुसार नोटिसा काढण्यात आल्या होत्या. अर्जदारांकरिता खरेदी-विक्रीचे फेरफार, वारस फेरफार, बोजाचे फेरफार, इतर फेरफार याकरिता करावयाच्या अर्जाचे विहित नमुने तलाठी/मंडळ अधिकारी/महा-ई-सेवा केंद्र/तहसीलदार स्तरावर मुबलक प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात आले. त्यांना देण्यात येणाऱ्या अर्जाची नोंद घेण्यासाठी सर्व स्तरावर स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली. तलाठी, मंडळ अधिकारी यांनी ७/१२ वरून शोध घेऊन बोजाची नोंदी असणाऱ्या सोसायटी/बँकेकडून ई-करारपत्र, बोजा फेड केल्याचे दाखले प्राप्त करून घेण्यात आले. ७/१२ चे इतर हक्कातील तगाईच्या नोंदी, कुळवहिवाटीसंबंधी नोंदी तसेच वनपट्ट्याच्या नोंदी शोधून त्यासंबंधी पुराव्याचे कागदपत्र प्राप्त करून घेऊन फेरफार नोंदी घेण्यात आल्या.

२५ ऑगस्ट २०१२ रोजी जिल्ह्यामध्ये

> **ठाणे जिल्ह्यात महसूल अभिलेख अद्ययावत करण्यासाठी सुवर्ण जयंती राजस्व अभियानांतर्गत २५ ऑगस्ट २०१२ रोजी ६१ मंडळ अधिकारी मुख्यालयी महा-फेरफार अदालत आयोजित करण्यात येऊन एकाच दिवशी विक्रमी ८५,३९९ फेरफार नोंदी करण्यात आल्या.**

एकूण ६१ मंडळांच्या मुख्यालयी महा-फेरफार अदालतीचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित ८५,३९९ फेरफार मंजूर झाले. यासाठी शेतकऱ्यांना कार्यालयात मारावे लागणारे हेलपाटे व वेळ याची बचत होऊन जनतेचे मानसिक समाधान होण्यास मोठी मदत झाली. अधिकार अभिलेख अद्ययावतीकरणाचे ध्येय साध्य झाले. कर्जाचे बोजे अधिकार अभिलेखातून कमी झाल्याने आपोआपच जमिनीच्या मूल्यात वृद्धी झाली. खरेदी-विक्री, वारस, न्यायालयीन निर्णय यांच्या अद्ययावत नोंदी झाल्याने भविष्यातील वाद टाळले गेले. भूसंपादित क्षेत्राच्या नोंदी घेतल्या गेल्या. या सर्व प्रयत्नांचे फलीत म्हणजे जनतेचा प्रशासनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला.

❐ ❐

**राजापासून रंकापर्यंत सर्वांचीच नाळ 'जमिनी'शी जोडली गेली आहे. ही जमीन माझी आहे, त्यावर माझाच हक्क आहे, हे सिद्ध करण्यासाठी वाद, तंटे-बखेडे, कोर्टकचेऱ्या आणि शासन या सगळ्यांचा आधार माणसे घेतात. सर्वसामान्य व्यक्तीला त्याची जमीन मिळवून देण्यासाठी त्याचा हक्क सिद्ध करण्याचे अवघड काम राज्याच्या महसूल विभागाला कायम करावे लागते. कारण जमिनीचा संबंध महसूल विभागाशी येतो. गेली काही वर्षे कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बेदखल कुळांच्या कुळवहिवाटीचा प्रश्न शासनाला भेडसावत होता. हा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने केलेल्या प्रयत्नांना उत्तम यश आले आहे.**

# बेदखल कुळांची दखल

एस. एस. पाटील

कसेल त्याची जमीन' या तत्त्वानुसार मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ हा विशेष कायदा अंमलात आला आहे. त्यानुसार प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याचा कुळहक्क मान्य करून प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याचे नाव त्या जमिनीच्या अधिकार अभिलेखात दाखल केले जाते. अशी या कायद्यात तरतूद आहे. परंतु, अशी तरतूद असली तरी मागील काही वर्षांत राज्यात हक्क नोंदपत्रकात कूळवहिवाट नोंदी योग्य पद्धतीने न झाल्यामुळे संबंधित कुळाच्या अधिकारांना बाधा येत असल्याच्या तक्रारी शासनाकडे सातत्याने येत होत्या. विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात जमीन कसणाऱ्या व्यक्तींच्या नोंदी गावदप्तरी योग्य प्रकारे होत नसल्याबाबत व त्यामुळे अशा कुळांच्या अधिकारास बाधा येत होत्या. या दोन जिल्ह्यांतून वरचेवर शासनाकडे तक्रारी येत होत्या. या तक्रारींची दखल घेऊन व या जिल्ह्यातील विशिष्ट परिस्थिती विचारात घेऊन या कुळांना न्याय कसा मिळवून देता येईल, याबाबत शासन स्तरावर विचार विनिमय सुरू झाला.

यासाठी दोन जिल्ह्यांच्या सर्व तालुक्यांतील अधिकार अभिलेखांत व पीक पाहणीत कोण-कोणत्या कारणांमुळे कुळवहिवाटीच्या नोंदी झालेल्या नाहीत हे तपासण्यासाठी व कुळवहिवाट हक्क योग्य असल्यास अशा कुळांच्या संरक्षणासाठी कोणती कार्यवाही करणे शक्य आहे यासाठी शासनाने सप्टेंबर,१९८३ मध्ये डॉ. परुळेकर आणि डिसेंबरला बॅ. शरद पालव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने ३१ जून १९८६ मध्ये शिफारस अहवाल शासनाला सादर केला.

समितीने केलेल्या शिफारशींनुसार कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात अशी अनेक कुळे आहेत की जी वर्षानुवर्षे जमीन कसत असूनही महसूल अभिलेखात त्यांच्या नावाची नोंद नसल्यामुळे त्यांना कूळ कायद्याच्या तरतुदींचा लाभ मिळत नसल्याचे दिसून आले. महसूल अभिलेखात नावाची नोंद नसलेल्या या बेदखल कुळांना कूळ कायद्यातील तरतुदींचा लाभ मिळावा यासाठी मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम १९४८ या कायद्याच्या कलम -४ मध्ये सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध होऊन त्याप्रमाणे कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे.

**सुधारणेचे स्वरूप**

कूळ म्हणून अधिकार सिद्ध करण्यासाठी अर्जदाराने सतत १२ वर्षे जमीन कसत असल्याचा परिस्थितीजन्य पुरावा आवश्यक आहे. ज्या व्यक्तीच्या ताब्यात ती जमीन आहे त्यास सतत १२ वर्षे जमीन कसत असल्याबाबतचे त्या गावचे सरपंच, पोलीस पाटील अथवा त्या गावातील प्रतिष्ठित व्यक्तीचे प्रमाणपत्र, कसत असलेली जमीन ज्या ग्रामपंचायत अधिकार क्षेत्रात येते त्या ग्रामपंचायतीचा तशा अर्थाचा ठराव, लगतचे लागवडदार, गावातील अन्य प्रतिष्ठीत व्यक्तींचे शपथपत्र, प्रमाणपत्र लागेल. कुळाचे हक्क सिद्ध होत असल्यास जमिनीच्या खरेदीच्या किंमत सुधारणेनुसार जमिनीच्या आकाराच्या २०० पट इतकी रक्कम निश्चित करून संबंधितांचा कूळ हक्क मान्य करण्यात येईल. ही सुधारणा २४ जानेवारी २००१ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

तथापि, कायद्यात सुधारणा करूनही कुळांचा हक्क मिळवून देण्यासाठी अडचणी निर्माण होत होत्या. त्याबाबत संबंधित कूळ व लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे तक्रार अर्ज येत होते. कारण, कूळ हक्क सिद्ध करण्यासाठी कायद्यात नमूद केलेल्या अटी व परिस्थितीजन्य पुरावा म्हणून सादर करावयाची कागदपत्रे ही



सर्व कामे सर्वसामान्य कुळासाठी त्रासाची व खर्चिक होत होती. त्यामुळे कुळाला हक्क सिध्द करणे जिकिरीचे होत होते. मुंबई कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ कलम - ४ मध्ये सन २००१ मध्ये केलेल्या सुधारणा, अटी व शर्ती याबाबत कूळ आणि लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या सर्व तक्रारी व निवेदने व या जिल्ह्यातील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन त्यावर कलम-४ मध्ये फेरसुधारणा करण्याचा शासनाने २००४ मध्ये निर्णय घेऊन अध्यादेश प्रसिध्द केला. त्यानंतर कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ च्या कलम - ४ मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता २००६ चा अधिनियम प्रसिध्द करण्यात आला.

या अधिनियमानुसार रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बेदखल कुळांना त्यांचे मालकी हक्क सिध्द करता येणे शक्य व्हावे यासाठी मुंबई कुळवहिवाट आणि शेत जमीन अधिनियम १९४८ मधील कलम - ४ मध्ये करण्यात आलेल्या सुधारित तरतुदींनुसार संबंधित अर्जदाराला कूळ म्हणून अधिकार सिध्द करण्यासाठी, सतत १२ वर्षे इतक्या कालावधीसाठी अखंडितपणे व्यक्तिश: कसत असल्याचे शपथपत्रावर कथन करणाऱ्या व्यक्तीला कूळ असे मानण्यात येईल. अशी कागदपत्रे-पुरावे सादर करणे आवश्यक करण्यात आले. त्याचप्रमाणे या सुधारणेच्या अनुषंगाने परिस्थितीजन्य पुरावा म्हणून मतदार यादीचा भाग, शिधापत्रिका, विजेचे बिल किंवा त्याच गावातील घरपट्टीची पावती किंवा कृषी उत्पन्नाच्या विक्रीसंबंधितातील कोणतीही पावती किंवा झाडे तोडण्याच्या किंवा गौण खनिजाचे उत्खनन करण्याच्या परवानगीबाबतची किंवा अशा जमिनीच्या संबंधात मंजूर केलेल्या कोणत्याही परवानगी संबंधातील इतर कोणतीही कागदपत्रे या सर्व नमूद केलेल्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध असलेली कोणतीही कागदपत्रे ग्राह्य धरण्यात आली.

**फेरसुधारणेनंतर आता बेदखल कुळांना त्यांच्या जमिनीवरील मालकी हक्क सिद्ध करण्यासाठी जमिनीलगतचे खातेदार त्याचप्रमाणे गावचा सरपंच किंवा पोलीस पाटील किंवा विविध कार्यकारी सहकारी संस्थेचा अध्यक्ष यांनी दिलेले शपथपत्र पुरेसे आहे.**

बेदखल कुळांना त्यांच्या जमिनीचे मालकी हक्क देण्याची कार्यवाही रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रगतीपथावर आहे. सुधारणा अंमलात आणल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण ३७६६ प्रकरणे प्राप्त झाली होती. त्यापैकी सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यातील १८७६ प्रकरणांत कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्यक्ष निकाल दिला आहे तर १८९० अर्ज योग्य त्या पुराव्याअभावी फेटाळलेले आहेत. आज सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकही प्रकरण प्रलंबित नाही. या सुधारणेनंतर १०० टक्के अंमलबजावणी झाली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात आतापर्यंत ७०६५ दावे अर्ज दाखल झाले, त्यातील ६६३८ दावे अर्ज आतापर्यंत निकाली काढण्यात आलेले असून शिल्लक दाव्यांची संख्या ४१८ इतकी आहे. हे दावे निकाली काढण्यासाठी शासनाने दिलेल्या सूचनांनुसार प्रत्येक तालुकास्तरावर 'विशेष मोहीम' राबविण्यात येत आहे. अशा तऱ्हेने आतापर्यंत जवळपास ९९ टक्के प्रकरणे निकाली निघाली आहेत. शासनाच्या प्रयत्नांना संपूर्ण यश मिळाले आहे. राज्यातील सर्वसामान्य जनतेला त्यांचे अधिकार हक्क मिळवून देण्यास शासन कटिबद्ध आहे. रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वर्षानुवर्षे जमीन कसत असलेल्या अनेक बेदखल कुळांना महसूल अभिलेखात त्यांच्या नावाची नोंद नसल्यामुळे कूळ कायद्याच्या तरतुदीचा लाभ मिळत नव्हता. मुंबई कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियमात सुधारणा व फेरसुधारणा करून शासनाने बेदखल कुळांची दखल घेऊन त्यांना लाभ मिळवून दिला आहे, अशा प्रकारे या सुधारणेला १००% यश मिळाले आहे.

❒ ❒

# सात-बारा : जमिनीचा आरसा

(पान ३५ वरून)


दस्त नाही. हे लक्षात घेणे गरजेचे आहे. खरेदीखताने मालकी शाबीत करता येते. तशी सात-बाराने मालकी शाबीत करता येत नाही, तसेच त्यावरील फेरफाराच्या सर्व नोंदीपुरावा म्हणून ग्राह्य असतील, परंतु त्याला 'निर्णायक पुरावा' म्हणता येणार, असे उच्च न्यायालयाच्या अनेक निकालात दिसून येते.

सात-बाराचा उतारा मालकी हक्क प्रस्थापित करणारा दस्त आहे. गैरसमजुतीमुळे अनेक वित्तीय संस्था, बँका कर्ज देताना सात-बारावर सर्व भिस्त ठेवतात, परंतु त्यांनी याशिवायही मालकी दस्तांची मागणी करणे उचित ठरते.

असे जरी असले तरी सात-बाराचे महत्त्व उरतेच म्हणून प्रत्येक खातेदाराने वेळेवर सात-बाराचे उतारे काढणे व तपासणे कधीही शहाणपणाचे आहे. सातबारावरील शेरा, रकानासुद्धा महत्त्वपूर्ण असतो. यात शेतातील विहीर, तळे, झाडझाडोरा, पड, गोठे, जुनी शर्त, नवीन शर्त, अविभाज्य तुकडेबंदी, हस्तांतरास प्रतिबंध, ४३ च्या बंधनास पात्र, राखीव, संपादनाखाली वहिवाटीचा रस्ता, आकारी पड, तगाई, थकबाकी वगैरे अनेक मजकूर नोंदीसहीत किंवा विनानोंदीने येऊ शकतात.

सात-बारावरील सर्व नोंदी आणि मजकूर जोपर्यंत विरुद्ध सिध्द होत नाही, तोपर्यंत खरा असल्याचे गृहीत धरण्यात येते.

सर्वसाधारणपणे तलाठ्याकडील सात-बाराचे पुस्तक १० वर्षे चालते. त्यानंतर नवीन सात-बारा लिहून जुने तालुका रेकॉर्ड ऑफिसला जमा केले जाते.



सात-बारा हा प्रत्येक भूमिधारकाचा जिव्हाळ्याच्या विषय असतो. नागरी क्षेत्रात जेथे नगर भूमापन कार्यालयाचे कामकाज सुरू होते तेथे सात-बारा व सिटी सर्वे दोन्हीकडे एकाच वेळी कर भरण्याची गरज नाही. तसेच शेतजमीन सारा व बिगर शेतजमीन सारा एकाच वेळी भरण्याची गरज नसते. महाराष्ट्र शासनाने अंगीकारलेल्या नवीन धोरणांनुसार mahabhulekh.in.com. या संकेतस्थळावर ७/१२ प्रत्यक्षात दिसतो व प्रिंट काढता येते. मात्र, त्यातील तपशील अद्ययावत केला गेल्याची सत्यता तलाठ्याकडेच होते. सुविधा केंद्रात मिळत असलेले ७/१२ अद्ययावत असतीलच असे नव्हे.

**संपर्क : ९८९००७०४१२**

❒ ❒

# ऑनलाइन प्रशासन



ग्रामपातळीवरील नागरिकांच्या समस्या कमी वेळात दूर करण्याच्या दृष्टीने सुवर्ण जयंती राजस्व अभियान महत्त्वाचे ठरले आहे. विशेषत: नागरिकांना विविध कामांसाठी लागणारी कागदपत्रे संगणकीकृत स्वरूपात उपलब्ध होत असल्याने कामकाजाचा वेगही वाढला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात जिल्हाधिकारी आणि अपर जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानांतर्गत महसूल विभागातील सर्व कागदपत्रे संगणकीकृत करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे.

कागदपत्रांचे जतन करण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी अभिलेख कक्ष संगणकीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. या कक्षात तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या अभिलेखांचे संगणकीकरणही करण्यात येत आहे. यासाठी युनिकोडमधील सॉफ्टवेअरचा उपयोग करण्यात येत असून सर्च इंजिनद्वारे तत्काळ संचिका शोधणे सुलभ होणार आहे. या सर्व प्रक्रियेसाठी स्वतंत्र संगणक कक्ष उभारण्यात आला आहे.

संगणक कक्षात शिधापत्रिका, आम आदमी विमा योजना, भूमी अभिलेख विभागाची मिळकत पत्रिका, गाव नमुना नंबर १ आदी कागदपत्रांच्या संगणकीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. जिल्ह्यातील सर्व कार्यालयांतील महसुली वसुली प्रमाणपत्र नोंदवही संगणकीकृत करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर अकृषिक परवानगी जलद व पारदर्शक पद्धतीने देण्यासाठी नवे सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व अकृषिक परवानगींची माहिती या प्रणालीमध्ये भरण्याचे काम सुरू आहे.

जिल्ह्यातील संगणकीकृत ७/१२ चे अद्ययावतीकरण सुरू असून त्यासाठी तहसीलदार कार्यालयात संगणक कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या प्रक्रियेद्वारे जिल्ह्यातील सर्व २० लाख ५० हजार गाव नमुना नं. ७/१२ अद्ययावतीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तहसीलदार व तलाठी यांच्यामार्फत संगणकीकृत ७/१२ चे वाटप

## डॉ. किरण मोघे

सुरू करण्यात आले आहे. तलाठी स्तरावर लॅपटॉप उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्याद्वारे नाममात्र शुल्क आकारून ७/१२ उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आतापर्यंत सोळा हजारांपेक्षा जास्त गावनमुना नंबर ७/१२ लॅपटॉपद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी महसूल विभागांतर्गत सर्व कार्यालयांत शून्य प्रलंबितता आणि दैनंदिन



निर्गत अभियान राबविण्यात येत आहे. तज्ज्ञ संस्थेच्या सहकार्याने 'कार्यालयीन कामकाजाचा साप्ताहिक अहवाल' संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. त्यामुळे झालेल्या कामाच्या प्रगतीचे वरिष्ठ स्तरावर अवलोकन शक्य झाले आहे. ई-प्रगती प्रणाली अंतर्गत मंडळ स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना ऑनलाइन सुविधेद्वारे माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने या माहितीचे परीक्षण वरिष्ठ स्तरावर तत्काळ करणे शक्य झाले आहे. या सर्व प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले आहे. जुलै ते नोव्हेंबर या कालावधीत कार्यविवरण संदर्भ दोन हजाराने कमी करण्यात प्रशासनाला यश आले आहे.

सुवर्ण जयंती राजस्व अभियानांतर्गत 'शासन आपल्या दारी' ही संकल्पनादेखील प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. ग्रामपातळीवर ४२४ शिबिरांचे आयोजन करण्यात येऊन त्यात ७० हजार संगणकीकृत दाखले वितरित करण्यात आले. मंडळ स्तरावर ४२९ फेरफार अदालतींचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये साडेसोळा हजार फेरफार निर्गत करण्यात आले आणि २५ हजारांपेक्षा जास्त ७/१२ वर अंमल देण्यात आला. जिल्ह्याच्या www.collector-ratnagiri.in या संकेतस्थळावर विविध प्रकारचे आठ अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

जिल्ह्यात आधार कार्ड योजनेला गती देण्यात आली असून ६ लक्ष ४३ हजार कार्ड वितरित करण्यात आले आहेत. एकूण ४ लाख २ हजार ९५० शिधापत्रिकांपैकी ३ लाख ७१ हजार ८१२ संगणकीकृत करण्यात आल्या आहेत. बेदखल कुळांचे २००६ अखेर १५७९ दावे प्रलंबित होते. त्यापैकी १४९७ निर्णयीत करण्यात आले आहेत. फेब्रुवारी २००६ ते जून २०११ पर्यंत दाखल करण्यात आलेल्या ५४७७ नवीन दाव्यांपैकी ५३६७ दावे नोव्हेंबर २०१२ अखेर निर्णयीत करण्यात आले आहेत.

या अभियानामुळे महसूल प्रशासनाचे कामकाज अधिकाधिक पारदर्शक होत असून त्यामुळे नागरिकांत प्रशासनाबद्दल विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे. गावपातळीवरील अडचणींचे निराकरण स्थानिक स्तरावर होत असल्याने जिल्हास्तरावर येणाऱ्या प्रकरणांची संख्या कमी होत आहे. यामुळे स्वाभाविकपणे प्रशासनाची कार्यक्षमता वाढली आहे. ❒❒

# नझुल जमिनींचे धोरण

१८६३ पर्यंत शहर किंवा गावठाण सभोवताल असलेल्या मोकळ्या/खुल्या जागांचे/जमिनीच्या व्यवस्थापनाबाबतचे ब्रिटिश शासनाचे निश्चित धोरण नव्हते. परंतु, कालांतराने जमिनींच्या मागणीत आणि किमतीमध्ये वाढ होऊ लागली व ही बदलती परिस्थिती लक्षात घेऊन सर्वप्रथम ३१ जानेवारी, १८६३ रोजी तत्कालीन ब्रिटिश शासनाने शहरालगतच्या सर्व खुल्या/मोकळ्या जमिनींच्या हस्तांतरावर निर्बंध घातले. १८९० मध्ये अशा प्रकारच्या जमिनीच्या व्यवस्थापनाबाबत सविस्तर अभ्यास करून २६ ऑक्टोबर १८९१ रोजी खुल्या जमिनींच्या व्यवस्थापनाबाबत सविस्तर सूचना निर्गमित केल्या. शहर आणि शहरालगत तसेच गावठाणात असणाऱ्या सर्व प्रकारच्या (अनअलायनेटेड) खुल्या जमिनींना शासनाच्या म्हणजेच 'नझुल जमिनी' अशी संज्ञा पडली. अशा प्रकारच्या जमिनींचे सर्वेक्षण आणि सेटलमेंट करण्यात आले. तत्कालीन

**वेणुगोपाल रेड्डी**

**नझुल जमीन म्हणजे शासनाच्या मालकीची बिनशेती कामाकरिता उपलब्ध असणारी जमीन, अशा जमिनी दीर्घ मुदतीच्या भाडेतत्त्वावर मंजूर करण्याची पद्धत होती. परंतु, बेरार भागात कब्जेहक्काने जमीन मंजूर करण्याची पद्धत होती. १९१२ मध्ये जेव्हा सी.पी. भागातील नझुल जमिनीच्या व्यवस्थापनाचे नियम बेरार भागात लागू करण्यात आले, त्यावेळी कायम स्वरूपाने भाडेतत्त्वावर जमीन मंजुरीबाबत चर्चा झाली. बेरार भागातील प्रशासनास भाडेतत्त्वाने नझुल जमीन मंजुरीची पद्धत मान्य नव्हती. त्यामुळे या भागात बऱ्याच नझुल जमिनी कब्जेहक्काने मंजूर करण्यात आलेल्या आहेत. तथापि, या सर्व जमिनींची मालकी शासनाची आहे.**



सेंट्रल प्रोव्हिन्स (सध्याचे नागपूर विभागात) असलेले नझुल जमिनींच्या व्यवस्थापनाचे नियम त्यानंतर १९१२ च्या आसपास व बेरार भागात (अमरावती विभागात) लागू करण्यात आले. अशा प्रकारे नागपूर भागात १८९१ मध्ये तर अमरावती भागात १९१२ मध्ये नझुल जमिनी या शब्दाची निर्मिती झाली.

सन १९१२-१३ साली झालेल्या बंदोबस्तात शासकीय जमिनीची नझुल व मिलकीयत सरकार अशी वर्गवारी करण्यात आली. ज्या जमिनी बांधकाम व अकृषिक वापरास योग्य आहेत अशा शहरी भागांतील शासकीय जमिनी तत्कालीन अस्तित्वात असलेल्या सी.पी. ॲण्ड बेरार जमीन महसूल संहितेतील तरतुदीनुसार नझुल म्हणून मानल्या गेल्या. या नझुल जमिनी ३० वर्षांच्या भाड्याने नूतनीकरण करण्याच्या अटीवर कायमस्वरूपी तत्कालीन अस्तित्वात असलेल्या सी.पी. ॲण्ड बेरार जमीन संहितेच्या तरतुदीनुसार निर्दिष्ट कालावधीसाठी भाडेतत्त्वावर महसूल परिपत्रक भाग ४ अ.क्र. १ मधील मार्गदर्शक तत्त्वास अनुसरून देण्यात आल्या.

सी.पी. ॲण्ड बेरार जमीन महसूल संहिता संपुष्टात येऊन मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता १९५४ अंमलात आल्यानंतर जुन्या कायद्याच्या तरतुदीनुसार विविध धारणा प्रकारांचे मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता १९५४ चे कलम २४० अन्वये भूमिस्वामी व भूमिधारी या वर्गवारीत समावेश करण्यात आला. सी.पी. ॲण्ड बेरार महसूल संहिता १९१६ मधील तरतुदीनुसार अशा स्थाई भाडेपट्ट्यावर दिलेल्या नझुल जमीनधारकांचा मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता १९५४ चे कलम २४० (२) अन्वये भूमिधारी संवर्गात समावेश होतो अशी धारणा आहे.

तथापि, मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता १९५४ संपुष्टात आल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अंमलात आला. यात कलम २९ नुसार वर्ग - १, वर्ग - २ व सरकार पट्टेदार अशा वर्गवारी केल्या आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अंमलात येण्यापूर्वी, जुन्या कायद्याच्या तरतुदीनुसार धारण केलेल्या जमिनीची वर्गवारी अस्तित्वात असलेल्या वर्गवारीत कसा समावेश

झाला, याबाबत कलम ३३७ मध्ये खुलासा दिला आहे. यानुसार पूर्वीच्या स्थायी पट्टेधारकांचा वर्ग २ वर्गवारीत समावेश होत असल्याने अशा जमीनधारकास जमिनीच्या विक्रीद्वारे विल्हेवाट करावयाची असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका (खंड २) मधील महसूल परिपत्रकानुसार अनर्जित रकमेचे ५०% रक्कम शासन जमा करण्याच्या अटीवर परवानगी देण्याची तरतूद होती. तथापि, अशा जमिनीची भाडेपट्टेधारकांनी शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय विक्री केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका खंड २ मधील महसूल परिपत्रकानुसार ६५ ते ७५ टक्के अनर्जित रक्कम शासन जमा करून तसा विक्री व्यवहार नियमानुकूल करण्याची तरतूद होती.

विदर्भातील भाडेपट्ट्याच्या संदर्भात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल झालेल्या विविध रिट याचिकांमध्ये उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय नमूद आहेत. या संदर्भात नेमणूक केलेल्या 'भोगे समिती'च्या शिफारशी आणि अन्य सर्व बाबींचा विचार करून नागपूर व अमरावती विभागातील तत्कालीन मध्यप्रदेश शासन किंवा सी.पी. ॲण्ड बेरार शासनाने निवासी, वाणिज्यिक आणि औद्योगिक प्रयोजनासाठी भाडेपट्ट्याने दिलेल्या नझुल/शासकीय जमिनीसंदर्भात भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करणे, शर्तभंग नियमित करणे व अन्य बाबींच्या अनुषंगाने १९ जुलै २००७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे धोरण जाहीर केले. या धोरणाच्या विरुद्ध विविध रिट याचिकांमध्ये उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ३० सप्टेंबर २००८ रोजी दिलेल्या निर्णयातील मुद्द्यांचा विचार करण्यात आला. त्यानुसार विदर्भातील शासकीय/ नझुल जमिनीबाबतची परिस्थिती विचारात घेऊन शासनाने सुधारित धोरण निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासनाचे सुधारित धोरण**

हे धोरण जाहीर करण्यापूर्वी संपुष्टात आलेल्या भाडेपट्ट्यांच्या प्रकरणांमध्ये भुईभाड्याची रक्कम जुन्याच दराप्रमाणे ३१ डिसेंबर २०११ पर्यंत आकारणी करण्यात येणार आहे. नूतनीकरणानंतर सुधारित दराने भुईभाड्याची रक्कम १ जानेवारी १२ पासून आकारण्यात येईल. ज्या प्रकरणांमध्ये भाडेपट्टा अद्यापि संपुष्टात आला नाही, अशा प्रकरणांमध्ये भाडेपट्टा संपुष्टात येईपर्यंत जुन्या दरानेच भुईभाड्याची रक्कम आकारण्यात येईल.

१ जानेवारी २०१२ पासून भुईभाड्याचे नूतनीकरण ३० वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात येईल. या कालावधीत दर दहा वर्षांनी लगतपूर्व वर्षाच्या भुईभाड्याच्या रकमेच्या २५ टक्के वाढ करण्यात येईल. ज्या प्रकरणात भाडेपट्ट्याची मुदत संपलेली नाही तसेच नूतनीकरण करण्यात आलेल्या भाडेपट्टाधारकांना त्यांनी भाडेपट्ट्याने धारण केलेली जमीन कब्जेहक्काने द्यावयाची असल्यास अशा भाडेपट्टाधारकांना कब्जेहक्काची रक्कम भरून जमीन कब्जेहक्काने घेण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. तथापि, ही जमीन भोगवटदार वर्ग २ या संवर्गातच राहील. तसेच या जमिनीची विक्री/ हस्तांतरित केल्यानंतरही खरेदीदार ही जमीन भोगवटदार वर्ग २ या संवर्गातच धारण करील. ही कार्यवाही करताना, संबंधित व्यक्तीने हस्तांतरणाबाबतची किंवा प्रयोजनातील बदलाबाबतचे अधिकृत कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची असेल. ही जमीन कब्जेहक्काने देणे हा विकल्प फक्त दोन वर्षापर्यंतच लागू राहील. भाडेपट्टा संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून १ जानेवारी २०१२ पर्यंत भुईभाड्याचा रकमेची गणना वरीलप्रमाणे केल्यानंतर भाडेपट्टाधारकांना जमीन भाडेपट्ट्याने धारण करण्याचा किंवा भोगवटदार वर्ग २ या धारणाधिकारासह धारण करण्याचा विकल्प देण्यात येईल.

**नझुल जमिनी कायमस्वरूपी ३० वर्षांच्या कालावधीकरिता पट्ट्याने देण्यात आलेल्या आहेत. हा कालावधी संपल्यानंतर पुढील कालावधीकरिता नूतनीकरण करण्यासंबंधी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मध्ये तरतूद केली नसल्याने ११ जानेवारी १९८३च्या शासन निर्णयानुसार मार्गदर्शक तत्त्व ठरवून दिले होते. मात्र, शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय भूखंड विक्री केल्यास धारकाविरुद्ध ५० टक्के अनर्जित उत्पन्न शासन जमा करण्याच्या विक्री व्यवहारास मंजुरी देण्यात येत असे. तथापि, स्थाई पट्ट्याने धारण केलेल्या नझुल भूखंडाच्या हस्तांतरणाबाबत वसूल करावयाच्या ५० टक्के अनर्जित रकमेच्या वसुलीविरोधात पट्टेधारक न्यायालयात जात असल्याने न्यायालयीन आदेशानुसार कार्यवाही अपेक्षित असते.**

जमीन एकदा कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग २ (ocupancy right) केल्यानंतर त्या जमिनीला नियमानुसार देय अन्य महसूल रकमासहित महसूल आकारणी (Assessment) लावून ती दरवर्षी वसूल करण्यात येईल. भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करणे, हस्तांतरणास परवानगी देणे, वापरात बदल करण्यास परवानगी देणे, शर्तभंग नियमानुकूल करणे, धारण केलेल्या जमिनी/ त्यावर बांधकाम वित्तीय संस्थेकडे तारण ठेवण्यास प्रचलित धोरणांच्या अनुषंगाने परवानगी देणे या संदर्भातील संपूर्ण अधिकार अमरावती/ महसूल विभागातील संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना राहतील. तसेच हे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांना प्रदान करण्याची मुभा संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना राहील.

या निर्णयानुसार परिगणीत करावयाचा भाडेपट्टा अधिमूल्य हस्तांतरण शुल्क व तत्सम बाबी निर्धारित करताना संबंधित मिळकतींचे त्या त्या वर्षाचे शीघ्रसिद्धगणकामधील खुल्या जमिनीचे दर विचारात घेण्यात येतील. जमीन कब्जेहक्काने देणे अथवा यथास्थिती जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करण्यासंदर्भात कार्यवाही करताना संबंधित भाडेपट्टेधारकांच्या विनंतीनुसार योग्य ती शहानिशा करून संबंधित व्यक्तीस जिल्हाधिकारी नियमानुसार भरणा करावयाच्या रकमेची परिगणना करून ही रक्कम भरणा करण्यास संबंधितास कळवतील. प्रस्तावित सुधारित भाडेपट्ट्याचा दर किती येतो व तो कोणत्या आधारे निश्चित केला आहे, हे भाडेपट्टेधारकास जिल्हाधिकारी कळवतील. सुधारित दरासंदर्भात भाडेपट्टेधारकाने आक्षेप घेतल्यास त्याबाबत सुनावणीची संधी देऊन जिल्हाधिकारी भाडेपट्ट्याचे दर निश्चित करतील व संबंधितास तशी नोटीस देतील. संबंधिताने याबाबत चलनाची प्रत उपलब्ध करून दिल्यानंतर त्यानुसार आवश्यक ते आदेश जिल्हाधिकारी निर्गमित करतील.

(लेखक नागपूरचे विभागीय आयुक्त आहेत.)

❑ ❑

# शेतजमीन : व्यवहार, वाद आणि संवाद

**शेखर गायकवाड**




जर माणसं साधी असती तर न्यायसुद्धा साधा-सोपा राहिला असता, असे प्रसिद्ध विचारवंत प्लेटो यांनी म्हटले आहे. परंतु, वस्तुस्थिती संपूर्ण निराळी आहे. माणसांना साधे जीवन मानवत नाही व त्यामध्ये ते समाधानी नसतात. ते महत्त्वाकांक्षी, स्पर्धा करणारे व एकमेकांचा द्वेष करणारे आहेत. दररोजच्या वृत्तपत्रांत आपण ज्या बातम्या वाचतो त्यामध्ये जमिनीवरून झालेली भांडणे, त्यावरून झालेले खून, मारामाऱ्या इत्यादी, अशा प्रकारच्या बातम्यांचा मोठ्या प्रमाणावर समावेश असतो. त्याचबरोबर सर्वसामान्य माणूस 'कायदा गाढव आहे' हे वाक्य सर्रास वापरतानादेखील आपण पाहतो. त्यामुळे कायद्यांमध्येच काहीतरी खोट असावी असं आपल्याला वाटतं. परंतु, आश्चर्य म्हणजे कोणत्याही कायद्यात एकच जमीन अनेक लोकांना विकता येते व त्या आधारे लोकांना फसवता येतं, असं लिहिलेलं नाही! त्यामुळे शेतजमिनींच्या वादामध्ये कायद्याचा वाटा किती आणि लोकांचा किती हे पाहणे उद्बोधक ठरेल!

**खटल्यांची मोठी संख्या**

शेतकऱ्यांमध्ये जमिनीवरून होणाऱ्या भांडणांची संख्या फार मोठी आहे व गेली शेकडो वर्षे हे वाद चालू आहेत. या सर्व वादांच्या मागे मानवाच्या महत्त्वाकांक्षा, तिरस्कार, ईर्षा, विरोध, जिद्द, लोभ या मूलभूत प्रवृत्ती दडलेल्या आहेत.

गेल्या २५ वर्षांत मी उपजिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी म्हणून काम करीत असताना शेतकऱ्यांमधील वादांच्या हजारो केसेसमध्ये निकाल दिलेले आहेत. लहानलहान मुद्द्यांवरून सुरू होणारी ही भांडणे माणसांचे संपूर्ण आयुष्य, वेळ व पैसा खर्च करणारी तर आहेतच, पण संपूर्ण जीवनच एखाद्या खटल्यामुळे वाया गेलेलीसुद्धा हजारो कुटुंबे आज आपल्याला पाहायला मिळतात.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मी काम करीत असताना, १९०३ साली सुरुवात झालेली एक केस १९८९ साली माझ्यासमोर आली होती. दत्तकपत्र, कुळकायदा, वतन कायदा याची गुंतागुंत असणारे हे प्रकरण तब्बल ८६ वर्षे चालू होते. या खटल्यामध्ये भांडणारे दोन्ही शेतकरी मयत होऊन त्यांची मुलेदेखील ६० वर्षांची झाली होती. खटला चालवणारे दोन्ही बाजूचे वकील मयत होऊन त्यांची मुले ही केस चालवत होते. अशा प्रकारे ८६ वर्षे चालणाऱ्या केसमधील वादाचे कारण होते ४६ गुंठे जमीन! ४६ गुंठे जमिनीसाठी ८६ वर्षे भांडणामध्ये कोणताही व्यावहारिकपणा नाही ही गोष्ट प्रत्येक शेतकऱ्याने समजून घेतली पाहिजे. या प्रकरणात दोन्ही बाजूच्या वकिलांनी मात्र प्रत्येकी ४६ एकर जमीन याच खटल्याच्या जोरावर विकत घेतली असेल, असा विचार माझ्या मनात अनेकवेळा येई. मी जेव्हा दोघांकडे एवढी वर्षे तुम्ही का भांडता अशी विचारणा केली तेव्हा त्यातील पहिला शेतकरी मला म्हणाला, ''मी या जमिनीचा खरा मालक नाही. पण, एवढी वर्षे मी जमिनीचा ताबा ठेवला आहे. शिवाय मी या जमिनीतून ३० टन ऊस काढतो, १५ टनाचे पैसे मी घेतो व १५ टनाचे पैसे मी वकिलांना देतो.'' त्यानंतर मी दुसऱ्याला विचारणा केली असता, तो म्हणाला, ''जमीन माझी आहे. मी वडिलाना मरताना हातात हात देऊन शब्द दिला आहे की, राहिलेली सर्व जमीन विकावी लागली तरी चालेल पण या खटल्यातून मी माघार घेणार नाही.'' त्यांच्या वकिलांना विचारले असता त्यांनी सांगितले की, ''मी खटल्याची फी घेत नाही. आम्ही जर केस जिंकलो तर निम्मी जमीन मला व निम्मी शेतकऱ्याला असे आमचे ठरले आहे.'' अशा पद्धतीने सतत खटले चालत राहूनदेखील जमिनींचे बाजारभाव वाढत असल्यामुळे सगळ्यांना नफा होईल असे विचित्र चक्र निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यांमधील जमिनीच्या वादांची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला व ती कारणे अधिक स्पष्टपणे प्रत्येकाला समजली तर त्यांच्यातील वाद कमी व्हायला निश्चितच मदत होईल. शेतकऱ्यांमधील जमिनींच्या वादाची ४ मुख्य कारणे आहेत.

**शब्द न पाळण्याची वृत्ती**

शब्द न पाळता आल्यामुळे होणाऱ्या वादाचे प्रमाण फार मोठे आहे. अशा प्रकरणांमध्ये एक

**भारतात आज सुमारे ३.२ कोटी खटले वेगवेगळ्या न्यायालयात चालू आहेत. बहुसंख्य खटल्यांमध्ये पाच ते दहा पक्षकार असतात. किमान दोन ते तीन पक्षकार आहेत असे गृहीत धरले तरी या देशातील ७ कोटी पक्षकारांना व त्यांच्या कुटुंबांना खटल्यांची झळ बसली आहे. प्रत्येक कुटुंबातील सरासरी ५ माणसे या खटल्यात गुंतलेली धरली तर सुमारे ३५ कोटी माणसांचा संबंध कोणत्या ना कोणत्या तरी खटल्याशी निश्चितच येतो. याचा अर्थ असा की, भारताच्या लोकसंख्येच्या १/३ लोक हे सकाळी उठल्यापासून वकील, कागदपत्रे, पोलीस स्टेशन, दिवाणी, फौजदारी / महसुली व इतर न्यायालये, रेकॉर्डरूम यामध्ये गुंतलेले आहेत.**

जमीन मालक दुसऱ्याला शब्द देतो. दोघांमध्ये काही तोंडी व्यवहार ठरतात. दोघांपैकी एक जण या व्यवहारात ठरलेला शब्द पाळत नाही. मग, दुसरा त्याच्यावर नेमके बोट ठेवून उलट वागतो. मग, त्यांच्यात भांडणे सुरू होतात. उदा. एखादा शेतकरी अडचणींमुळे दुसऱ्याकडून हातउसने पैसे घेतो. पीक आल्यावर पैसे परत करावयाची बोली असते. परंतु, काही कारणामुळे पीक व्यवस्थित येत नाही, किंवा पिकाला योग्य तो भाव मिळत नाही व पैसे वेळेवर फेडले जात नाहीत. कर्ज देणारा माणूस घाबरतो व पैसे आपल्याला परत मिळणार नाहीत असे दिसताच जमिनीचे साठेखत किंवा खरेदीखत लिहून घेतो व यातून भांडणाला सुरुवात होते. शब्दासाठी वाटेल ते करणारे आपले पूर्वज आता इतिहासजमा झालेले आहेत, व आता शब्द न पाळणाऱ्या व्यक्तीलासुद्धा त्याचे वाईट वाटत नाही. साठेखत किंवा खरेदीखत करून दिले तरी आपण पुन्हा काही दिवसांनी पैसे परत देऊ, पण दुसऱ्याने ७/१२ ला नाव लावू नये अशी त्याची मागणी असते. यातून महसुली कोर्टात, पोलीस स्टेशनला, दिवाणी कोर्टात वाद सुरू होतात.

तसे पाहिले तर आपल्याएवढे शब्दांच्या बाबतीत बेरकी लोक आपल्याला दुसरीकडे दिसत नाहीत. एका वकिलाने एका बाईला विचारले, 'बाई तुमचे वय काय?' बाईने उत्तर दिले, 'मी १८ पावसाळे पाहिले आहेत.' मग वकील म्हणाले, 'म्हणजे तुमचे वय फक्त १८ वर्षे? तुम्ही तर चाळिशीच्या दिसता..' त्यावर बाई म्हणाली, 'मधली बरीच वर्षे दुष्काळ पडला होता ना!' आपल्या सोयीनुसार शब्द न पाळणारे व गैरसोयीचे झाल्यामुळे शब्द मोडणारे लोक जोपर्यंत आहेत तोपर्यंत अशा प्रकारचे वाद शेतकऱ्यांमध्ये चालू राहणारच.

**कायद्याविषयी अज्ञान**

एखाद्या कायद्यातील तरतूद आपल्याला माहीत नव्हती ही गोष्ट कोर्ट मानत नाही. कायदा प्रसिद्ध झाला आणि तो लागू झाला की तो आपोआप सर्वांसाठी अंमलबजावणी करण्यासाठी पात्र झाला असे कायदा मानतो. त्यामुळे कायद्याचे अज्ञान ही सबब आपल्याला सांगता येत नाही. परंतु, वेळीच कायद्याची तरतूद माहिती नसल्यामुळेदेखील वाद निर्माण होतात.

तसे पाहिले तर सर्व कायदे हे 'कॉमनसेन्स' म्हणजेच सर्वसामान्य ज्ञानावर आधारित आहेत आणि या सर्व कायद्यांच्या मागे एक नीतिशास्त्र दडलेले आहे. हजारो वर्षांच्या मानवाच्या अनुभवामुळे व ज्ञानामुळे त्याला जी सर्वमान्य तत्त्वे निदर्शनास आली त्याआधारे हे नीतिशास्त्र बनविण्यात आले आहे. कोणत्याही व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणतीही शिक्षा करू नये हे त्याचे सर्वांत महत्त्वाचे तत्त्व आहे. त्यामुळेच एक न्यायप्रणाली निर्माण झाली. त्याचबरोबर जमिनीचे कायदे अशा प्रकारे का करण्यात आले यामागची कारणमीमांसासुद्धा शेतकऱ्यांना माहीत असणे आवश्यक आहे. मुळात पृथ्वीवरच्या सर्व जमिनी या सुरुवातीला आदिवासी असणाऱ्या माणसांकडून कसल्या जात होत्या. भटक्या अवस्थेत जगत असलेल्या मानवाने प्रथम डोंगरावर व नंतर नदीच्या सुपीक भागात जमीन कसायला सुरुवात केली. अशी जमीन नापीक झाली की दुसरीकडील जंगल तोडून जमीन कसली जात होती. आयुष्यभर असे रानोमाळ फिरण्यापेक्षा एकाच ठिकाणी राहून पिके काढून उत्पन्न काढण्यास त्याने सुरुवात केली. त्यातून हळूहळू टोळ्या व त्यांची गावे तयार झाली. अशा अनेक गावांच्या समूहातून प्रदेश व राज्ये निर्माण झाली. एकाच प्रकारच्या अशा समुदायातून संस्कृतीसुद्धा उदयाला आली.

अगदी सुरुवातीच्या काळात सर्व जमिनी या राजाच्या मालकीच्या आहेत असे मानले जाई. पगार देण्याची पद्धत नसल्यामुळे राजा हा सैनिकांना व त्याच्या प्रमुखांना कसायला जमीन देत असे. अनेक गावांच्या जमिनीचा महसूल गोळा करण्याचा हक्क या जहागीरदाराला दिला जाई. केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल दिलेल्या जमिनीचे हक्क म्हणून 'जहागिरी' आणि जहागिरीच्या उपभोगाबद्दल दिलेले अधिकार म्हणजे 'मनसब' असे शब्द मोगलांच्या काळात रूढ झाले.

अशा प्रकारे दिलेल्या जमिनी या राजाने वर्षानुवर्षे व वंशपरंपरेने कसायला दिलेल्या होत्या. त्यामुळे जमिनी देताना अशा जमिनी दुसऱ्याला विकू नये अशी अट त्याला चिकटूनच आली.

स्वतंत्र भारतातदेखील, राज्यांनी वतने खालसा करण्याचा कायदा केला व या जमिनी कायमस्वरूपी वतनदारांच्या नावाने करण्याची एक संधी कसणाऱ्या वतनदाराला उपलब्ध करून दिली होती. अशा वतनदार व्यक्तीला ही जमीन अतिशय कमी किमतीला म्हणजे त्या काळी ५-१० रुपयांना मिळाली होती; आणि त्यामागेदेखील ही जमीन त्याने स्वत:च

स्वातंत्र्यानंतर केंद्र शासन व प्रत्येक राज्याने काही सामाजिक स्वरूपाचे कायदे केल्याने त्याचे निश्चितच परिणाम जमिनीवर झाले. उदा. भूसंपादन कायद्यामुळे विकासासाठी रेल्वेमार्ग, रस्ते, उड्डाणपूल, एम.आय.डी.सी. इत्यादींसाठी जमिनी सरकारकडून घेतल्या जाऊ लागल्या. भूसंपादन कायदा व त्या संबंधातील खटले निर्माण झाले. नवीन बांधण्यात आलेल्या धरणांमुळे गावे पाण्यात बुडू लागली. प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी देण्यासाठी जमिनी संपादित होऊ लागल्या. जमीन महसूल कायदा, सिलिंग कायदा, हिंदू वारसा कायदा, कुळकायदा, मालमत्ता हस्तांतरण कायदा इत्यादी कायद्यांच्या बाबतीत अशीच परिस्थिती आहे. या प्रत्येक कायद्यामागची भूमिका व तत्त्वज्ञान समजून घेतल्यास अधिक डोळसपणे शेतकऱ्यांना जमिनीचे प्रश्न सोडविता येतील. उदा. जमिनीच्या ७/१२ वर जर देवाचे नाव असेल तर ती जमीन पूर्वजांपैकी कोणीतरी किंवा तत्कालीन राजांनी देवाला दान दिलेली असून ती देवाच्या मालकीची आहे, ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. अशा जमिनीवर सरकारने काही निर्बंध लादले आहेत. धर्मादाय आयुक्त व सरकारच्या परवानगीशिवाय देवस्थान इनामाच्या जमिनी विकता येत नाही. ही भूमिका समजून घेतली तर अशा जमिनींबाबतीत अर्धवट व्यवहार करणारे शेतकरी फसणार नाहीत.





कसावी असेच धोरण होते. आता बदललेल्या परिस्थितीत जमिनीच्या किमती वाढल्यामुळे, विकास झाल्यामुळे या व्यक्तींना जमिनी विकण्यामध्ये अशा 'नवीन शर्त' शेऱ्याचा अडथळा निर्माण होतो. मुळात या सर्व जमिनी बाजारभावाने खरेदी केलेल्या नाहीत किंवा कधीही जमिनीची किंमत राजाला दिलेली नाही ही बाब जर समजून घेतली तर आता सरकारला ५० टक्के किंवा ७५ टक्के नजराणा रक्कम का भरावी लागते हे लक्षात येईल. कारण, ही जमीन त्यांनी कधीही खरेदी केलेली नव्हती. नवीन शर्तीच्या बाबतीत हा विचार समजून घेतला तर नवीन शर्तीचे व्यवहार करणाऱ्या शेतकऱ्यांमधील गैरसमज कमी होण्यास मदत होईल. परंतु, दुर्दैवाने आता तर भानगडींच्या जमिनी खरेदी करणारा एक नवा वर्ग निर्माण होऊ पाहत आहे!

असंख्य कायद्यांच्या या गदारोळात कायद्याच्या तरतुदींशिवाय खटल्याची कार्यपद्धतीसुद्धा समजून घेतली पाहिजे. अगदी इतिहासातसुद्धा अशा प्रकारची कार्यपद्धती घालून दिलेली होती. जहांगीर बादशहाने आपल्या राजवाड्याच्या समोर २८ मीटर लांबीची एक सोन्याची साखळी लावली होती. त्याला ६० घंटा होत्या. कोणत्याही माणसाला आपल्यावर अन्याय झाला आहे किंवा कोणी केला आहे असे वाटल्यास न्याय मागण्यासाठी त्याने या घंटा वाजवावयाच्या असे अपेक्षित होते.

कोणते प्रकरण कोणासमोर चालते, त्याचे अपील कोणाकडे केले पाहिजे, त्याला किती मुदत असते, मूळ दावे कोठे लावता येतात, अशा कार्यपद्धतीची माहिती प्रत्येक आधुनिक शेतकऱ्याला असली पाहिजे. त्यामुळे कायद्याच्या संदर्भात शासनाची पावले कोठे पडतात हे वेळीच जाणणारा माणूस हा खरा कायद्याचा जाणकार म्हटला पाहिजे!!

### मानवी प्रवृत्ती

शेतकऱ्यांमधील वादाच्या संदर्भात यापूर्वी पाहिलेल्या दोन कारणांपेक्षा एकमेकांमधील ईर्षा, महत्त्वाकांक्षा, अभिलाषा, विरोध, हेवेदावे, मत्सर या प्रवृत्ती या सर्वाधिक म्हणजे ३५ ते ५० टक्के वादास कारणीभूत आहेत. एकमेकांची जिरवण्याची आपल्याकडे मोठी परंपरा आहे. ग्रामपंचायत निवडणुकीला उभा राहिला म्हणून पाईपलाईन अडवणारा किंवा जमिनीला जाणारा रस्ता अडवणारा शेतकरी आपल्या प्रत्येकाच्या शेजारी आहे. सरळसरळ व्यवहार करणारी अतिशय कमी माणसे दुर्दैवाने आज ग्रामीण भागात पाहायला मिळतात. एखाद्याने रजिस्टर खरेदीखताने जमीन विकून पैसे घेतले तरी, त्याला फार कमी पैसे मिळाले असे म्हणून, 'तुला फसविले' असे सांगितले की लगेच या शेतकऱ्याचे डोके फिरते. तो लगेच खरेदीची नोंद करू नये असा अर्ज द्यावयास पुढे सरसावतो. आपण कागदावर एक बोलतो व प्रत्यक्ष कृती वेगळीच असते. एकाच वेळी २-३ माणसांना एकच जमीन विकणारा जमीन मालक, एकाच जमिनीचे एकाला साठेखत व दुसऱ्याला खरेदीखत करून देणारा जमीन मालक, बँकेचा बोजा असतानासुद्धा तो न सांगता दुसऱ्याला जमीन विकणारा जमीन मालक, संपादन झालेल्या जमिनीचे दोनदा पैसे घेणारा जमीन मालक, गावातील असाहाय्य म्हाताऱ्या विधवा आजीला गोड बोलून तिच्याकडून दत्तकपत्र करून घेणारा माणूस, राजकारणामुळे एकमेकांवर पोलीस केस दाखल करणारा, दुसऱ्याचे पीक जास्त आले तर त्याचे पीक बाजारात जाऊ नये म्हणून रस्ता अडविणारी व्यक्ती अशी असंख्य मानवी प्रवृत्तींची उदाहरणे प्रत्येक गावामध्ये घडत असतात व या सर्वांमध्ये उभा असतो एक वकील नावाचा इसम! काही ना काही सबबी सांगून आलेल्या केसेस वर्षानुवर्षे कशा चालू राहतील यासाठी प्रयत्न करणारा वकील हा घटक प्रत्येक शेतकऱ्याने स्वत:च्या हिताला कितपत सुसंगतपणे काम करतो हे तपासले पाहिजे. खटल्याचे अर्थशास्त्र प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे, हे महत्त्वाचे.

माझ्याकडे येणाऱ्या शेकडो शेतकऱ्यांच्या बोलण्यामध्ये आणखी एक वाक्य असते ते म्हणजे, ''लोकांना आमचे चांगले बघवत नाही.'' विशेषत: नातेवाइकांमध्ये चालू असणाऱ्या खटल्यांमध्ये भाऊबंदकीतून निर्माण झालेल्या खटल्यांच्या जास्त समावेश असतो. किंबहुना भाऊबंदकी हा महाराष्ट्राला लाभलेला मोठा शापच म्हणावा लागेल.

### प्रशासकीय चुका

शेतजमिनीविषयक वाद होण्यामध्ये प्रशासकीय चुकांचादेखील १० ते १५ टक्के एवढा हिस्सा आहे. खालील अनेक स्वरूपाच्या प्रशासकीय चुकांमुळे सर्वसाधारणपणे जमिनीचे वाद होतात.

- लेखनिकी स्वरूपाच्या चुका - प्रशासकीय पातळीवर तलाठी, मोजणी करणारा भूकरमापक, नोंद मंजूर करणारा मंडळ अधिकारी किंवा निर्णय देणारे महसूल अधिकारी यांच्याकडून लेखनिकी स्वरूपाच्या चुका होतात. परंतु, त्याचा मोठा मनस्ताप कित्येक महिने शेतकऱ्यांना भोगावा लागतो.
- कार्यपद्धतीतील चुका - प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीमध्ये जरी चूक झाली तरी वाद निर्माण होऊ शकतो.
- कायद्याचे अज्ञान - कायदा किंवा नियम माहीत नसला तरी बहुसंख्य शेतकरी कागदोपत्री भांडत राहातात. त्यामध्ये त्यांचे वेळेचे व आर्थिक नुकसान होते. वेळीच कायदा

समजून घेतला तर मागावून पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही.

■ कायद्याचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे होणाऱ्या चुका - अनेकवेळा कायदा माहीत असतो परंतु कायद्याचा आपल्याला सोईचा असलेला अर्थ लावला जातो.

■ वरिष्ठांचे चुकीचे निर्देश - अनेकवेळा प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी हे त्या विषयातील तज्ज्ञ नसतात. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल प्रासंगिक इलाज शोधून प्रश्न सोडविण्याकडे त्यांचा कल असतो. त्यांनी त्या त्या वेळी दिलेल्या तोंडी सूचनेनुसार सर्वसामान्य माणसे वागतात. परंतु, काही काळानंतर शोधलेला प्रासंगिक इलाज चुकीचा होता असे निदर्शनास येते व त्यामुळेदेखील वाद निर्माण होतात.



■ जमीन रेकॉर्डमधील मूलभूत चुका - मोजणीच्या वेळी झालेल्या नकाशातील चुका, मूळ आकारबंदात झालेल्या चुका, ७/१२ चे पुनर्लेखन करताना झालेल्या चुका, टिपण व फाळणीमध्ये झालेल्या चुका, एकत्रीकरणामध्ये झालेल्या चुका अशा मूलभूत रेकॉर्डमध्ये झालेल्या चुका या वाद निर्माण करण्यासाठी कारणीभूत होतात.

■ कोणत्याही प्रकारच्या चुका न करता अमर्याद काळ निर्णय प्रलंबित ठेवण्याची वृत्ती - वरीलपैकी कोणत्याही चुका न करता कोणताच निर्णय न घेणारे काही अधिकारी असतात. अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणामुळे असे खटले कमी होण्यास मदत होऊ शकते.

**उपाययोजना**

याचा अर्थ शेतकऱ्यांमधील वाद अखंड व हजारो वर्षे चालू राहतील असे मात्र नाही. निदान नव्या पिढीने थोडी खबरदारी घेतली व खालीलप्रमाणे काही उपाय केले तर खटल्यांची संख्या निश्चितच कमी होऊन वेळेचा व पैशाचा अपव्यय टाळता येईल.

■ साधे, सोपे व सरळ व्यवहार केले पाहिजे.

■ भानगडींच्या जमिनी खरेदी करणे टाळले पाहिजे.

■ स्वत:च्या जमिनीचे रेकॉर्ड सतत अद्ययावत ठेवले पाहिजे.

■ जमीन महसूल वेळेवर भरला पाहिजे व कर्जाच्या रकमेची परतफेड केल्यानंतर त्या त्या वेळी जमिनीचे रेकॉर्ड अद्ययावत करून घेतले पाहिजे.

■ जमिनीचे वाटप करताना पुढच्या पिढीमध्ये भांडण होणार नाही याची दक्षता घेऊनच जमिनीचे वाटप केले पाहिजे.

■ विहीर, बोअरवेल, फळझाडे इत्यादीच्या नोंदी त्या त्या वेळी ७/१२ वर करून घेतल्या पाहिजेत.

■ आवश्यक असेल तेव्हा किंवा ठरावीक काळानंतर स्वत:ची जमीन स्वत:हून मोजून घेतली पाहिजे.

■ एखादा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर कोणत्यातरी तांत्रिक मुद्द्यांचा आधार घेऊन वाद निर्माण न करता दिलेला शब्द पाळला पाहिजे.

■ शासनाने वाटप केलेल्या शर्तीच्या जमिनी, वतनाच्या जमिनी, आदिवासींच्या जमिनी, कुळ कायद्याच्या जमिनी, देवस्थान व ट्रस्टच्या जमिनी, पुनर्वसनात वाटप केलेल्या जमिनी अशा सर्व नवीन शर्तीच्या जमिनींच्या बाबतीत अगोदर परवानगी घेतल्याशिवाय कोणताही व्यवहार करू नका.

■ कोणताही दस्तऐवज करताना तो नोंदणीकृत असला पाहिजे हे ध्यानात घ्या.

■ भूसंपादन, पुनर्वसन किंवा शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेच्या संदर्भात देण्यात आलेली नोटीस घ्यायचे टाळू नका. त्याऐवजी नोटीस स्वीकारून पुराव्यासहीत आपले म्हणणे योग्य त्या अधिकाऱ्यासमोर मांडा.

मानवी प्रवृत्तीमुळे होणाऱ्या भांडणाच्या बाबतीत शेकडो वर्षांच्या मोठमोठ्या संतांच्या प्रयत्नानंतरसुद्धा फारसा बदल झालेला दिसत नाही. निदान डोळसपणे व कायद्याची माहिती घेऊन सरळ व्यवहार केला व स्वार्थ मर्यादित ठेवला तर मोठ्या प्रमाणावर वाद कमी होण्यास मदत होईल. जागतिकीकरण व वाढते शहरीकरण या पार्श्वभूमीवर शेतकऱ्याला आपल्या जमिनीबद्दल व आपल्या कुटुंबाबद्दल आता निर्णायक भूमिका ठरवावी लागेल.

(लेखक हे मुख्यमंत्री सचिवालयात सह सचिव आहेत.)

❐ ❐

## द्रष्टे निर्णय... अभिनव योजना

### कोतवालांचे मानधन २ हजारांवरून ५ हजार रुपये

राज्यातील कोतवालांना सध्या मिळणारे २ हजार रुपयांचे मानधन वाढवून ते ५ हजार रुपये करण्यात आले आहे. ही वाढ १ जानेवारी २०१२ पासून लागू करण्यात होईल. कोतवालांना शिपाई म्हणून पदोन्नतीसाठी १० टक्केऐवजी २५ टक्के कोटा राखीव ठेवण्यात येणार आहे.

गाव वतने नष्ट झाल्यानंतर वतनदारी कोतवाल संपुष्टात आणून राज्यात १ डिसेंबर १९५९ पासून पगारी कोतवाल पद्धत अंमलात आणण्यात आली. राज्यातील कोतवाल हे शासनाचे अवर्गीकृत कर्मचारी आहेत. कोतवालांना महाराष्ट्र नागरी सेवेचे नियम लागू नाहीत. कोतवालांना सुरुवातीला अत्यल्प मानधन देण्यात येत असे. त्यात वेळोवेळी शासनाने वाढ केली. सध्या कोतवालांना दरमहा दोन हजार रुपये मानधन देण्यात येते. कोतवालांचे सेवाप्रवेश नियम महसूल आणि वन विभागाने विहित केले आहेत. राज्यात सध्या १२ हजार ६३८ तलाठी सज्जे कार्यान्वित आहेत. सध्या १२ हजार १५५ पदांवर कोतवाल कार्यरत आहेत. कोतवालांच्या मानधनात वाढ केल्याने ४५ कोटी ४९ लाख ६८ हजार रुपये एवढा अतिरिक्त वार्षिक बोजा शासनावर पडणार आहे.

# कोल्हापूरची 'ई-चावडी'

महसूल हा सर्वांत जुना विभाग. इंग्रजांपूर्वी मुघल आणि बाबरांच्या काळात जमीन महसुलाची वसुली केली जात होती. त्या काळात जमिनीची पद्धतशीर मोजणी नव्हती. त्यामुळे सर्वसाधारण ठोकताळा वापरून व राज्याला जेवढ्या निधीची गरज आहे याचा अंदाज घेऊन जमिनीवरील महसूल कराची निश्चिती व्हायची.

पहिल्यांदा शेतीची पद्धतशीर मोजणी शेर शहा सुरीच्या काळात मलिकअंबर यांनी सुरू केली. छत्रपतींच्या काळात मराठा राजवटीमध्येसुद्धा जमीन महसूल वसूल केला जायचा. इंग्रजांच्या आगमनानंतर खऱ्या अर्थाने सूक्ष्म जमिनीची मोजणी म्हणजेच एकर, गुंठ्यामध्ये जमीन महसुलाची मागणी होऊ लागली. याच काळात इंग्रजांनी महालवारी पद्धत बंद करून प्रत्यक्षात रयतवारी पद्धत अंमलात आणली. जो जमीन मालक आहे व प्रत्यक्ष जमीन कसतो त्याच्याकडून जमीन

## आप्पासाहेब धुळाज

महसुलाची वसुली होऊ लागल्याने ती शास्त्रोक्त पद्धतीने होऊ लागली.

जमिनीच्या मोजणीनंतर प्रत्यक्ष जमिनीचा मूळ मालक, वहिवाटदार, खातेदार, संयुक्त खातेसहधारक इ. संकल्पनेतून आहे ज्या-त्या भूधारकांकडून एकर/गुंठ्यांच्या क्षेत्रफळावरून जमीन महसुलाची वसुली सुरू झाली. ही सर्व कार्यवाही मुंबई महसूल अधिनियम १८७९ अन्वये करण्यात येत होती. स्वातंत्र्यानंतर जमीन सुधारणेचे विविध कायदे अंमलात आले. जसे कूळ कायदा १९४७, कमाल जमीन धारणा कायदा १९६१, इनाम व वतन खालसा कायदा १९५२ व १९५८ यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर १९६६ साली विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र यांना सोईचे होईल अशा रीतीने प्रत्यक्षात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ हा कायदा अंमलात आला. त्या अंतर्गत ४ खंड निर्माण करण्यात आले. खंड ४ हा 'तलाठ्याची गीता'. यामध्ये तलाठी व मंडल अधिकारी यांनी अधिकार अभिलेख अद्ययावत करणे व सुस्थितीत ठेवणे या संबंधीच्या तरतुदी आहेत.

तत्कालीन जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कल्पनेतून सर्वप्रथम 'ई-चावडी' संकल्पना मांडली गेली व कोल्हापूर जिल्ह्यात तिची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली.

प्रदीर्घ इतिहास असलेल्या महसूल विभागाचे जमीन महसूल विषयक विविध कायदे आहेत. दरवर्षी लोकसंख्येमुळे अथवा कुटुंबातील व्यक्तींच्या संख्येच्या वाढीमुळे खातेदार व पोट-हिश्शांमध्ये सातत्याने वाढ होत राहिली. उदा : एकेका ७/१२च्या पानावरती दीडशे ते पावणेदोनशे नावेसुद्धा आढळून आली. तलाठ्याकडील जमीन महसूल, जमाबंदी, ठरावबंद बाबी, अधिकार अभिलेख, फेरफार, जमीन महसुलाची मागणी, वसुली, वसुलीच्या पावत्या, चलनाद्वारे त्यांचा भरणा, प्रत्येक पिकाचे वर्ष व हंगामनिहाय जिन्नसवार नोंदी, सिंचनाची साधने, गुरे-ढोरे व लोकसंख्येच्या नोंदी, स्थायी आदेश व इतर आनुषंगिक प्रशासकीय नमुने हे हस्तलेखनाद्वारे अचूकपणे ठेवणे जिकिरीचे व गुंतागुंतीचे झाले.

जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे सर्व सहकारी अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी, तलाठी संघटनेचे प्रतिनिधी व सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी यांना ही संकल्पना पटवून दिली. विशेष आनंदाची बाब म्हणजे जिल्ह्यातील तलाठी संघटनेने या प्रक्रियेत सहभाग घेऊन क्रियाशीलपणे अहोरात्र प्रयत्न करून 'ई-चावडी' संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणली. त्यामुळे नागरिकांनीही मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. ही प्रक्रिया यशस्वीपणे अंमलात आणण्यासाठी सर्वांत महत्त्वाचे तांत्रिक स्वरूपाचे योगदान लाभले ते म्हणजे मॅग्नमचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गिरीश लाड, संदीप पाटील, राहुल महाजन, राहुल इंग्रोळे या टीमने जिल्ह्यातील ज्या-ज्या ठिकाणी अडचणी असतील त्या प्रत्येक गावात जाऊन

**ग्रामस्तरावरील महसुली कार्यालय म्हणजेच तलाठी कार्यालयांचे अद्ययावत तंत्रज्ञानाने बळकटीकरण करण्यात येत आहे. 'दिवाणजी' म्हणजे ७/१२ लिहिणारा व फेरफाराची नोंद करणारा तलाठी 'ई-चावडी'च्या माध्यमातून हायटेक तलाठ्यात रूपांतरित झाला आहे. जमीन महसुलाची जुन्या काळापासून सुरू ठेवलेली विविध प्रपत्रे व त्याचा परस्पर संबंध व त्या अनुषंगाने सर्व नमुने अद्ययावत ठेवणे गुंतागुंतीचे झाले आहे. ही गुंतागुंत सुलभ करण्यासाठी 'ई-चावडी' हा प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. ई-गव्हर्नन्सचा एक भाग म्हणून 'ई-चावडी' या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.**



अभिलेख्यातील बदलानुसार सॉफ्टवेअरमध्ये बदल करून वेळीच त्रुटींची पूर्तता केली. त्यामुळे कमीतकमी वेळेत प्रभावी अंमल करणे शक्य झाले.

जिल्ह्यातील कार्यरत ४६७ तलाठ्यांपैकी ४३४ तलाठ्यांनी स्वखर्चाने लॅपटॉप खरेदी केले. त्यामध्ये मॅग्नम ओपसने तयार केलेली आज्ञावली अपलोड करण्यात आली. 'ई-चावडी'च्या माध्यमातून कोणती कामे शक्य आहेत ते सांगण्यात आले. 'ई-चावडी'मध्ये नागरिकांनी अर्ज केल्यानंतर तत्काळ त्याच वेळी, त्याच दिवशी रहिवासी दाखला देणे, उत्पन्नाचा दाखला देणे, स्थानिक चौकशी करून जातीच्या दाखल्यासाठी तहसीलदारांना प्रतिवेदन देणे, शेतकरी, शेतमजूर असल्याचा दाखला देणे, हयातीचा दाखला याशिवाय प्रत्यक्ष लॅपटॉपद्वारे फेरफार व ७/१२ अद्ययावत करून त्याचे वितरण, शेतावर लॅपटॉप घेऊन पीक पाहणीच्या वेळी प्रत्यक्ष पिकाची नोंद शेतावर उभे राहून करणे, अशा कार्यवाहीस सुरुवात झाली व त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. या दोन वर्षांच्या कार्यकाळात १९ लाख ५७ हजार दाखले व ७/१२ 'ई-चावडी'च्या माध्यमातून लोकांना वाटप केले.

सुरुवातीच्या काळात बऱ्याच तलाठ्यांनी लॅपटॉप पाहिलेले नव्हते. परंतु, प्रशिक्षण दिल्याने सहजपणे व सुलभरीत्या ते लॅपटॉप हाताळू लागले हे या योजनेचे सर्वांत मोठे फलित आहे. एनआयसीमधील डीबीझ्डेड या फॉरमॅटमधील डाटा घेऊन त्या-त्या गावचा डाटा संबंधित तलाठ्याच्या लॅपटॉपवर अपलोड केला गेला. त्यांच्याकडे असलेल्या गाव नमुन्यातील अद्ययावत असलेल्या अभिलेख्यांची नोंदणी पहिल्या टप्प्यात डाटा एन्ट्री करून करण्यात आली. हेच सर्वांत पहिले व तितकेच जिकिरीचे कार्य होते. कारण, एका गटात अनेक सहधारक, संयुक्तधारक, इतर हक्कातील नोंदी, फेरफाराच्या नोंदी, गट नंबर व त्याचे पोट हिस्से भूधारणेचा प्रकार, पडीक जमीन, कूळ असल्यास त्याबद्दलच्या नोंदी तसेच पेरे पत्रकामध्ये संकेतांक क्रमांकानुसार पिकांच्या नोंदी करून प्रत्येक ७/१२ वरील क्षेत्र व जमीन महसूल याचे एकत्रीकरण करून एकूण गावाचे क्षेत्रफळ व जमीन महसूल म्हणजेच ठरावबंद बाबी या लॅपटॉपवर करणे शक्य झाले.

तलाठ्यांचे १ ते २१ गाव नमुने एकमेकांस पूरक असल्याने त्यांचे संलग्नीकरण करून त्याची नोंद करण्याच्या प्रक्रियेत दीड-दोन वर्षांच्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना मॅग्नम ओपसच्या सहकार्याने सुलभता आणण्यात यश आले. राधानगरी तालुक्याचे तहसीलदार रणजीत देसाई व त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांनी या कामी उत्कृष्ट काम केले. राधानगरी तालुक्यात प्रथम प्रयोग करून त्याची अंमलबजावणी अचूक झाल्याने इतर ११ तालुक्यांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सध्या 'ई-चावडी'च्या माध्यमातून जिल्ह्यातील जवळपास ९५ टक्के अधिकार अभिलेख ९,१६,७६६ खातेदारांचे ९,६५,३६४ सातबारा संपूर्णत: अद्ययावत करून नागरिकांना एका क्लिकवर उपलब्ध केले जातात.

### ई-चावडी फायदे

'ई-चावडी'मुळे 'ई-ऑफिस' ही संकल्पना व 'ई-गव्हर्नन्स' ही संकल्पना केवळ राज्य अथवा जिल्हा मुख्यालयाची न राहता सर्वप्रथम महसुली ग्रामस्तरापर्यंत नेण्याचे काम तत्कालीन जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या पुढाकाराने करण्यात आली.

दरवर्षी या सर्व १ ते २१ नमुन्यांची मागणी मुद्रणालयाकडे करावी लागायची त्याची आता आवश्यकता उरली नाही. मुद्रणावर होणारा खर्च यामुळे वाचला.

प्रशासनात संपूर्ण पारदर्शकता आणण्यात आली. पूर्वी १ ते २ आठवड्यांत होणारे काम या 'ई-चावडी'द्वारे शक्यतो त्याच दिवशी करणे शक्य झाल्याने विविध दाखले वाटप करण्यात येत आहेत. संबंधित गावचे क्षेत्र, वहिवाट क्षेत्र, महसूल आकारणी व वसुली याचा मेळ घेऊन अचूक जमाबंदी करणे शक्य झाले.

पूर्वीच्या ७/१२ मध्ये सहधारकांमध्ये जुन्या पद्धतीनुसार त्यांचा हिस्सा आण्याच्या रूपात उदा : ४ आणे, ८ आणे असे लिहिले जायचे, त्याचे सुलभीकरण करून या आणेवारीसोबत त्यांच्या समोर प्रत्यक्ष किती हेक्टर, आर व चौरस मीटर आहे याचा अंदाज अचूक येऊ लागला.

वनाखालील, पडीक, देवस्थान, वतन आदी जमिनींची माहिती एका क्लिकद्वारे मिळू शकते.

१ ते २१ नमुने हे एकमेकास संलग्न करता आल्यामुळे हस्तदोष किंवा इतर आनुषंगिक चुका या कामी टाळणे शक्य झाले आहे.

हस्तलिखित ७/१२ वर जास्तीतजास्त आठ सहधारकांची नावे सुवाच्च अक्षरात लिहिणे शक्य होते. परंतु, उर्वरित नावे त्याच नमुन्यावर तलाठी इतरत्र लिहीत होते. या नव्या पद्धतीने एका ७/१२ वर २०० सहधारकांची नावे लिहिणे शक्य झाले.

पूर्वीच्या ७/१२ त चौरस मीटरपर्यंतचे क्षेत्रफळ लिहिण्याची तरतूद नव्हती, पण ई-चावडी प्रक्रियेत एक फॉर्म्युला वापरून (जंत्री) अकृषिक प्लॉट किंवा शेत जमिनीचेसुद्धा चौरस मीटर इतक्या लहान परिमाणाची नोंद शक्य झाली आहे. या प्रक्रियेत तलाठी संघटना व सर्व तलाठी यांनी त्यास प्रतिसाद देऊन स्वत: कर्ज काढून लॅपटॉप व प्रिंटर खरेदी करून प्रतिसाद दिला नसता तर ही अशक्य गोष्ट होती. त्यांच्या प्रतिसादामुळे 'ई-चावडी' कोल्हापूर जिल्ह्यात यशस्वीपणे राबविणे शक्य झाले. सुवर्ण जयंती राजस्व अभियानांतर्गत राज्य शासनाने कोल्हापूरची 'ई-चावडी' योजना राज्यभर आखली आहे व त्याच्या अंमलबजावणीस प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. जिल्ह्यात पाणंदमुक्ती अभियान राबविले जात आहे. १० डिसेंबर २०१२ अखेर सुमारे ५८५ कि.मी.चे ३८२ रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यात आले असून, त्याचा ६ ते ६५ हजार शेतकऱ्यांना फायदा होत आहे.

**एखाद्या गावाचे एका विशिष्ट पिकाखालील क्षेत्र किती आहे त्याची माहिती हवी असल्यास प्रत्येक पान शोधून त्याची यादी करावी लागायची. परंतु, 'ई-चावडी'मुळे एका क्लिकवर कोणत्या पिकाखाली किती क्षेत्र आहे याचा अचूक अंदाज येऊ लागला.**



**नोंदणी आणि मुद्रांक विभाग हा राज्याच्या महसूल विभागाचा प्रमुख घटक आहे. या कार्यालयात विविध प्रकारच्या दस्तऐवजांची नोंदणी केली जाते. त्या आनुषंगाने दीड ते दोन कोटी लोक प्रत्यक्ष नोंदणी कार्यालयास भेट देतात. पूर्वी दस्तऐवजांची नोंदणी करण्याचे काम वेळकाढू व किचकट होते. आय-सरिता या वेबसाइटमुळे सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने नोंदणी प्रक्रिया सुलभ व जलद झाली आणि नागरिकांच्या वेळेची बचत होऊन कार्यालयीन कामकाजात पारदर्शकताही आली.**

# सहज नोंदणीला 'सरिते'चे साहाय्य

नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत शासनाला महसूल मिळवून देण्यासाठी नोंदणी अधिनियम व मुद्रांक अधिनियम या दोन कायद्यांची अंमलबजावणी करण्यात येते. या विभागाने २०११-१२ मध्ये १४,८०० कोटी रुपये इतका महसूल जमा केलेला आहे. राज्याच्या महसुलापैकी जवळजवळ १४ टक्के महसूल या विभागामार्फत वसूल केला जातो. सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या विभागांपैकी या विभागाचा राज्यात दुसरा क्रमांक आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत प्रामुख्याने नोंदणी अधिनियम १९०८, नोंदणी नियम १९६१, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८, भारतीय मुद्रांक अधिनियम १८९९, विशेष विवाह कायदा १९५६, पारसी विवाह कायदा, विवाह नोंदणी कायदा इ. कायद्यांची अंमलबजावणी करण्यात येते.

नोंदणी अधिनियम १९०८ मधील तरतुदींच्या अंतर्गत स्थावर मालमत्ता अभिहस्तांतरासंबंधीचे विविध दस्तऐवज उदा. खरेदी खत, बक्षीसपत्र, गहाणखत इ. दस्तऐवजांची नोंदणी करणे व नोंदवलेल्या दस्तऐवजांचे अभिलेख कायमस्वरूपी जतन करणे व सर्वसामान्य जनतेस त्यांच्या मागणीप्रमाणे अभिलेखांच्या प्रती, सत्य प्रती उपलब्ध करून देणे, तसेच मालमत्तेच्या हक्काबाबत अभिलेख शोध घेण्यासाठी उपलब्ध करून देणे हे नोंदणी व मुद्रांक विभागाचे कार्य आहे.

**नोंदणी व मुद्रांक विभागात दरवर्षी २२ लाखांपेक्षा जास्त दस्तऐवजांची नोंदणी केली जाते. त्या अनुषंगाने दीड ते दोन कोटी लोक नोंदणी कार्यालयास प्रत्यक्ष भेट देतात. याशिवाय मुद्रांक खरेदी, अभिनिर्णय, परतावा व अपिल, स्थावर मिळकतीचा सर्च करणे, मूल्यांकन करून घेणे या कामासाठी सुमारे ५० लाख लोक अप्रत्यक्षपणे विभागाच्या संपर्कात येतात. या सर्व बाबींमुळे हा विभाग सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचणारा शासनाचा महत्त्वाचा विभाग ठरला आहे.**

सर्वसामान्य जनतेला त्यांचे काम करण्यास या कार्यालयात येणे कटकटीचे होऊ नये तसेच लवकरात लवकर सुलभ व सोप्या पद्धतीने त्यांचे काम व्हावे यासाठी व्यापक जनहित व सामान्य माणूस केंद्रबिंदू धरून बदललेल्या परिस्थितीनुसार या विभागाने सन २००२ पासून संगणकीकृत दस्तनोंदणी प्रणालीचा वापर सुरू केला आहे. त्यासाठी विभागाने 'आय-सरिता' ही वेबबेस्ड प्रणाली तयार केली आहे.

सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने नोंदणी प्रक्रिया ही सुलभ व जलद व्हावी यासाठी मुद्रांक, मुद्रांक कागद, फ्रँकिंग, चलन, ई-स्टॅम्पिंग या मुद्रांकाच्या आणि धनाकर्ष, चलन, रोख इत्यादी नोंदणी फी जमा करण्याच्या प्रचलित पद्धतींऐवजी आता आय-सरिताच्या माध्यमातून हा विभाग ई-सर्च, ई-स्टेपईन, ई-पेमेंट, ई-एएसआर, बारकोड उपयोगिता, ई-रजिस्ट्रेशन (ई-नोंदणी) व इतर निरनिराळे उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. ही प्रणाली हस्तांतरण होणाऱ्या सर्व प्रकारच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सर्वसामान्य जनतेला फायदेशीर ठरत आहे.

### आय-सरिता संकल्पना

विभागाच्या मध्यवर्ती सर्व्हरवर 'आय-सरिता प्रणाली' स्थापित करण्यात आली आहे. राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयातील संगणक एमपीएलएस व्हीपीएन कनेक्टिव्हिटीने विभागाच्या मध्यवर्ती सर्व्हरशी जोडण्यात येत असून, त्याद्वारे मध्यवर्ती सर्व्हरवरील आय-सरिता प्रणालीचे इनपुट मॉड्यूल, रजिस्ट्रेशन मॉड्यूल व स्कॅनिंग मॉड्यूलचा ॲक्सेस दस्तनोंदणीसाठी प्राप्त केला जातो.



### ई-पेमेंट

या उपक्रमांतर्गत नोंदणी फी, मुद्रांक शुल्क आणि विभागास जमा होणाऱ्या इतर रकमा या ई-चलनमार्फत ग्रास (GRAS) ऑनलाइन भरण्याची सुविधा प्रथम टप्प्यात मुंबई, ठाणे व पुणे या शहरांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना एका शासकीय कामासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे शुल्क एकाच वेळी एकाच ठिकाणी भरणे शक्य होत असून, रांगेत उभे न राहता विनाप्रतिक्षा सोयीस्कर वेळेनुसार शासनाकडे रक्कम जमा करून कमी वेळात दस्तनोंदणी पूर्ण होण्यास मदत होत आहे.

### ई-सर्च

या प्रकल्पाद्वारे नागरिकांना राज्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयामधील सूची क्र. २ च्या अभिलेखांचा घरबसल्या इंटरनेटद्वारे शोध घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामुळे निबंधक कार्यालयातील गर्दी कमी होण्यास साहाय्य होईल.

### ई-स्टेपइन

इंटरनेटच्या माध्यमातून दस्त नोंदणीसाठी टोकन आरक्षण करून पूर्वनियोजित सोयीस्कर दिवस व वेळ आणि सोयीस्कर कार्यालयाची निवड करून दस्त नोंदणीची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे नागरिकांच्या वेळ व श्रमात बचत होत असून, पूर्वनियोजित वेळेवर दस्त नोंदणी होत

असल्यामुळे नागरिकांना कार्यालयात अनावश्यक प्रतीक्षा करावी लागत नाही. विभागाच्या कामातही पारदर्शकता आली असून, अनावश्यक गर्दी कमी होत असल्याचे दिसून येते. राज्यात सामाईक कार्यक्षेत्रात सर्व नोंदणी कार्यालयांत ही प्रक्रिया सुरू झाली आहे.

**ई-एएसआर**

या प्रकल्पाद्वारे राज्यातील सर्व मिळकतींचे २०१० ते २०१२ पर्यंतचे बाजारमूल्य तक्ते नागरिकांना इंटरनेटवर कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही वेळी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे मालमत्तेच्या मूल्यांकन प्रक्रियेत पारदर्शीपणा येत आहे.

**सार्वजनिक डाटा एंट्री व बारकोड उपयोगिता**

विभागाच्या वेबसाइटवर नागरिकांसाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पक्षकाराने स्वत: किंवा इतरांच्या मदतीने नोंदवावयाच्या दस्तामधील महत्त्वाचा डाटा बारकोडमध्ये रूपांतरित करून घेण्याची सुविधा नागरिकांना देण्यात आली आहे. पक्षकाराने डाटा एंट्री केल्यानंतर ११ अंकी क्रमांक घेऊन नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात आल्यानंतर निबंधक त्यांच्याकडील बारकोड रिडरद्वारे हा डाटा त्वरित मूळ स्वरूपात संगणकावर रूपांतरित करून सर्व्हरवरील आय-सरिताच्या संबंधित फील्डमध्ये येतात आणि त्वरित दस्तनोंदणी केली जाते. या उपक्रमामुळे दस्तनोंदणी कमी वेळात होत असल्यामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होत आहे; तसेच पक्षकार स्वत:च डाटा एंट्री करून आणत असल्यामुळे अधिक अचूकता येऊन विभागाच्या कामकाजात गतिमानता येत आहे.

**ई-रजिस्ट्रेशन**

लिव्ह अॅण्ड लायसन्स (संमती व परवानगी) या दस्तांची ऑनलाइन नोंदणी प्रणाली प्रस्तावित आहे.

**आय-सरिता प्रणालीचे फायदे**

आय-सरिता प्रणाली व त्याचा डाटा मध्यवर्ती सर्व्हरवर उपलब्ध असल्यामुळे सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांमधील कामकाजावर तांत्रिक नियंत्रण, आपत्कालीन साहाय्य, प्रणालीची श्रेणीवाढ, अद्ययावतीकरण, त्याची ऑनलाइन अंमलबजावणी ही कार्यवाही सातत्याने (Real time) करता येणार आहे; आणि त्याचबरोबर दुय्यम निबंधक कार्यालयातील कामकाजाची माहिती घेणे, वेगवेगळे अहवाल प्राप्त करून घेणे, सूचना व निर्देश देणे हेदेखील ऑनलाइन करण्यात आले आहे.

- शासनाची ग्रास प्रणालीदेखील आय-सरिता प्रणालीशी संलग्न असल्यामुळे पक्षकारांनी ई-पेमेंटद्वारे भरलेल्या शुल्काची खातरजमा दस्त नोंदणीचे वेळी करणे शक्य झाले आहे.
- सरिता आज्ञावलीद्वारे दस्तनोंदणी करताना पक्षकारांना मूळ दस्तऐवजाबरोबर एक छायांकित प्रत आणावी लागत होती. मूळ दस्ताप्रमाणे या प्रतीवर सही, शिक्के, पेजिंग करून ही प्रत कार्यालयात जतन केली जात असे. त्यामुळे दुय्यम निबंधक कार्यालयातील अभिलेखांची व्याप्ती वाढत होती; तसेच नोंदणीकृत दस्तांचा स्कॅन केलेला डाटा सीडीवर जतन करण्यात येत होता. या दोन्ही प्रकारच्या अभिलेख जतनाचा प्रश्न निर्माण झाला होता. आता आय-सरिता प्रणालीद्वारे दस्तनोंदणी करताना, पक्षकारांना दस्तांची झेरॉक्स प्रत आणण्याची आवश्यकता उरली नाही. दस्तनोंदणी पूर्ण झाल्यावर दस्ताचे स्कॅनिंग करून त्याच्या दोन थंबनेल प्रिंट घेण्यात येतात. पक्षकारांना एक प्रत दिली जाते. त्यांच्याकडून, सर्व पानांचे व्यवस्थित स्कॅनिंग झाल्याची खातरजमा करून थंबनेल प्रिंटच्या दोन्ही प्रतींवर पक्षकार व दुय्यम निबंधक यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जातात. त्यातील एक प्रत दुय्यम निबंधक कार्यालयात जतन केली जाते आणि मूळ दस्ताबरोबर दुसऱ्या थंबनेल प्रिंटची छोटी सीडी पक्षकारांना दिली जाते. यामुळे कार्यालयातील अभिलेखांच्या व्याप्तीचे प्रमाण कमी झाले असून, ही कार्यालये अधिक प्रशस्त होत आहेत.
- आय-सरिता प्रणालीच्या वापराने दस्तनोंदणी पश्चात करावयाचे कार्यालयीन कामकाज बऱ्याच प्रमाणात कमी झाल्याने दस्त नोंदणीची प्रक्रिया पारदर्शक व लोकाभिमुख होत आहे.

**मुद्रांक विभागाची वैशिष्ट्ये**

- दरवर्षी साधारण दीड कोटी लोकांचा प्रत्यक्ष संपर्क.
- स्टॉक मार्केटकडून सुसूत्रीतरीत्या मुद्रांक शुल्क वसूल करणारे देशातील पहिले राज्य.
- बाजारमूल्यदर तक्ते दरवर्षी अद्ययावत केले जातात.

> **आय-सरिता प्रणालीची अंमलबजावणी दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये ११ जुलै, २०१२ पासून सुरू झाली. सध्या राज्यातील १२४ दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये ही प्रणाली कार्यान्वित आहे. या प्रणालीद्वारे दररोज सरासरी २३०० इतके दस्त नोंदले जात आहेत. आजपर्यंत ५१,००० इतक्या दस्तांची नोंदणी झाली आहे. ऑक्टोबर २०१२ अखेरपर्यंत राज्यातील सर्व ४९२ दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये आय-सरिता प्रणालीचा वापर सुरू करण्यात आला.**

- इतर राज्यांपेक्षा मुद्रांक शुल्काचे दर कमी असूनही वसुलीत भरीव वाढ. वेबबेस्ड संगणकीय आज्ञावली वापरून मध्यवर्ती नोंदणी करणारा विभाग.
- नोंदणीसाठी सार्वजनिक ग्राहकाभिमुख डाटा एंट्रीची सुविधा
- डाटा एंट्री रिडींगसाठी बारकोडचा वापर.
- सन २०११-१२ मध्ये राज्यात ऑनलाइन पद्धतीने सर्वांत जास्त महसूल वसूल.

**नोंदणी विभागाची वैशिष्ट्ये**

- संगणकीकृत दस्त नोंदणी प्रणाली २० मिनिटांत मूळ दस्त पक्षकारास परत (यामध्ये सुधारणा प्रस्तावित).
- ई-स्टेपइनद्वारे इंटरनेटद्वारे टोकन बुकिंग.
- राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत तालुका स्तरावरील तहसीलदार कार्यालय, तालुका भूमी अभिलेख कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय यांची समांतर जोडणी.
- LR-SRO Linkage आज्ञावलीचा वापर पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात सुरू आहे.
- दस्त नोंदणी केल्यानंतर तत्काळ फेरफाराची ऑनलाइन नोंद करण्यात येते.
- तालुक्याच्या कार्यक्षेत्रात एकापेक्षा जास्त नोंदणी कार्यालयांपैकी कोणत्याही कार्यालयात दस्त नोंदणी.
- सन २०११ -१२ मध्ये एकूण नोंदविलेले दस्त २३,१४,२१८.
- सन २०११-१२ मध्ये जमा केलेली नोंदणी फी रु. १३७०.१४ कोटी.

**– मुक्ता पवार**

> **आय-सरिता प्रणालीद्वारे दस्त नोंदणीचा डाटा त्या त्या वेळी (real time) मध्यवर्ती सर्व्हरवर साठविला जात असल्याने, त्या डाटाच्या आधारे दस्त नोंदणीच्या वेळी दस्तातील माहितीची पडताळणी online करता येते. त्यामुळे फसवणुकीच्या प्रकारांना आळा बसला आहे.**

# शेतरस्त्यांचा मोकळा श्वास

**एकनाथ डवले**

**दिवसेंदिवस शेतीमधील कमी होणारी मनुष्यबळाची उपलब्धता ही कृषी क्षेत्रातील विकासाला अडचणीची ठरत आहे. त्यामुळे कृषीक्षेत्राचे यांत्रिकीकरण ही अपरिहार्य बाब झाली आहे. मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये शेतमाल बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी तसेच शेतीसाठी आवश्यक अवजारे, साधने व यंत्रसामग्री शेतीपर्यंत जाण्यासाठी गरज आहे ती बारमाही शेतरस्त्यांची...**

भारत हा कृषीप्रधान देश असून भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राच्या उत्पन्नास अनन्यसाधारण महत्त्व आहे. जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्था अंगीकारल्यामुळे व्यापार तसेच सेवाक्षेत्रांसारख्या तत्सम क्षेत्रांचा दरडोई उत्पन्नातील (GDP) वाटा जरी वाढता असला तरीही अर्थव्यवस्थेतील प्रमुख कृषी या प्राथमिक क्षेत्राकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. भारतातील १२१ कोटी जनतेचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेती व्यवसायाची औद्योगिक विकासासोबतच भरभराट होणे तितकेच गरजेचे आहे. शेतीसाठी सुपीक जमीन, मुबलक पाणी, पुरेसे भांडवल यासोबतच आवश्यकता आहे ती, आधुनिक तंत्रज्ञान, सुधारीत बी-बियाणे, विज्ञान आणि इतर मूलभूत सुविधांची. हरित क्रांतीनंतर आता भारतीय शेती संक्रमण अवस्थेत असल्याचे म्हटले जाते. बदलत्या अर्थव्यवस्थेमध्ये मनुष्यबळाची उपलब्धता ही महत्त्वाची बाब झालेली आहे.

**शेतरस्त्यांची आवश्यकता**

अतिक्रमणामुळे शेतरस्त्यांविषयी अवकळा निर्माण झाली. मोहिमेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना जाण्या-येण्यासाठी सुयोग्य रस्ता उपलब्ध करून देणे हा आहे. याची आवश्यकता खालील बाबींवरून जाणवते.

- बऱ्याच शेतकऱ्यांना इच्छा असूनही ऊस, केळी, फळबाग, भाजीपाला यांसारखी नगदी पिके, शेतरस्ता उपलब्ध नाही यामुळे घेता येत नाहीत.
- शेतरस्ता उपलब्ध नसल्याने तसेच बैलगाडी किंवा इतर वाहने अतिक्रमित रस्त्यावरून जाऊ शकत नसल्याने पावसाळ्यात पेरणी वेळेवर होऊ शकत नाही.
- आंतर मशागतीसाठी आवश्यक अवजारांची शेतरस्ता नसल्याने ने-आण करणे कठीण होते. तसेच अतिक्रमित पाणंदीमध्ये कमरेइतक्या चिखलामधून बैलगाडी शेतापर्यंत घेऊन जाणे हे कठीण काम ठरते. अशा परिस्थितीमुळे शेतीस आवश्यक साहित्य, बी-बियाणे, खते, औषधे वगैरे पावसाळ्यापूर्वीच शेतात पोहोचविणे क्रमप्राप्त ठरत होते.
- शेतरस्त्याची अनुपलब्धता खताची वेळेवर वाहतूक, पिकांना योग्य अवस्थेत (Critical Stage) खताचा डोस, औषध फवारणी तसेच शेतकऱ्यांना वेळोवेळी रात्री-अपरात्री आपल्या शेतीवर लक्ष ठेवणे यावर अनिष्ट परिणाम करत होती.
- फळे, भाज्या यांसारखी नाशवंत कृषी उत्पादने सुयोग्य स्थितीत असताना तत्काळ बाजारपेठेपर्यंत पोहोचविणे शेतरस्त्याअभावी जिकिरीचे होते. नाशवंत कृषी माल जागीच सडून जाऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान



होते. अशा प्रकारे एखाद्या शेतकऱ्याचे नुकसान झाल्यास किफायतशीर ठरणारी पिके घेण्यास शेतकरी धजावत नाहीत.

■ शेतरस्त्याअभावी काढणी / कापणी यंत्रे शेतापर्यंत घेऊन जाणे शक्य होत नाही. शेतकऱ्यांना अनावश्यक तोटा सहन करावा लागतो.

■ शेतरस्त्यावरील अतिक्रमणामुळे प्रशासन, न्यायालयात अनेक वाद आणि दावे दाखल होतात. यात शेतकऱ्यांचा अमूल्य वेळ व पैसा वाया जातो. पर्यायाने वैयक्तिक द्वेष वाढत जातो. अनेक ठिकाणी जीवानिशी मारण्याच्या घटना घडतात.

■ शेतरस्ता उपलब्ध नसल्यामुळे इच्छा नसतानाही अनेक शेतकऱ्यांना शेतजमिनी विक्री कराव्या लागतात किंवा शेतजमिनी विक्री करण्यास भाग पाडले जाते.

■ शेती व्यवसायास पूरक असणारे कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय आणि इतर पूरक व्यवसाय केवळ शेतरस्त्याअभावी शेतकरी करू शकत नाही. याचा परिणाम त्याची आर्थिक स्थिती खालावण्यात होतो.

■ सिंचन सुविधा वाढविण्यासाठी अनेक ठिकाणी तलाव, कालवे निर्माण झाले. यामुळे पारंपरिक रस्ते बुडीत क्षेत्रात गेल्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्याचे प्रश्न उद्‌भवले. यासाठी पर्यायी सोय म्हणून अतिक्रमित शेतरस्ते मुक्त करण्याची आवश्यकता भासू लागली.

■ काही गावांच्या पुनर्वसनामुळे गावठाण बदलले. यामुळे पूर्वीच्या गावठाणातून शेतावर जाण्याकरिता असलेले रस्ते आणि नवीन गावठाणातून शेताकडे जाणारे रस्ते याचा नवीनच प्रश्न निर्माण झाला.

या सर्व बाबी विचारात घेता शेतीच्या अर्थकारणामधील बारमाही रस्त्यांचे महत्त्व अधोरेखीत होते. ज्याप्रमाणे मानवी शरीरात रक्तवाहिन्यांचे महत्त्व आहे त्याचप्रमाणे शेतीमध्ये शेतरस्त्यांना महत्त्व आहे. शेतरस्ते हा शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. लातूर जिल्हा प्रशासनाने २०१० च्या गाळ काढण्याच्या मोहिमेमधून १४० रस्ते अतिक्रमणमुक्त केल्याच्या अनुभवाच्या आधारे शेतरस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार झाला.

**'रस्ते मुक्ती' संकल्पना**

लोकसहभागातून तलावातील साचलेला गाळ काढण्याची मोहीम लातूर जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात आली. शासनाच्या तिजोरीवर एक पैशाचाही खर्च न पडू देता महसूल व सिंचन विभागाच्या मदतीने लोकांनी ७२ कोटी रुपये खर्चून एकूण २०५ तलावांतून ९०.२३ लक्ष घनमीटर गाळाचा उपसा केला.

२००९ मध्ये कमी पावसामुळे लातूर जिल्ह्यात उद्‌भवलेली दुष्काळसदृश परिस्थिती हे संकट न समजता तिचे संधीत रूपांतर करीत जिल्हा प्रशासनाने गाळ काढण्याची मोहीम परिणामकारकरीत्या राबवली. १९ हजार एकर माळरान क्षेत्रावर गाळ पसरवला, त्यामुळे ते क्षेत्र उत्पादनक्षम होण्यासोबतच जिल्ह्यातील तलावांची साठवण क्षमता जवळ जवळ ९०.२३ दशलक्ष घनमीटरने वाढली. मात्र, या दरम्यान वाहतुकीच्या वेळी प्रशासनासमोर शेतरस्त्यांची गंभीर समस्या आली. त्याच वेळेस लोकसहभागातून तलावातील गाळाचा उपसा करण्याचा उपक्रम यशस्वीपणे राबवलेल्या प्रशासनाने रस्तेमुक्तीचे आव्हान स्वीकारले.

शेतरस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याच्या प्रचलित शासन पद्धतीत भौतिकदृष्ट्या अतिक्रमण काढणे शक्य होत नव्हते वा तशी यंत्रणाही



उपलब्ध नव्हती. पंचनामा कागदोपत्री स्वरूपात होऊन तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी स्तरावर तक्रार अर्ज निकाली निघाला म्हणून नस्तीबद्ध व्हायचा. प्रत्यक्षात अतिक्रमण व शेतकऱ्यांचा त्रास कायम असे. याकरिता जोपर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनीच्या कायम खुणा निश्चित होत नाहीत तोपर्यंत शेतकऱ्यांचा शेतरस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकालात निघणार नाही ही बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या लक्षात आली. त्यामुळे यावरील खर्च शेतकऱ्यांनीच केल्यास प्रश्न प्रत्यक्षात सुटेल ही बाब त्यांनी शेतकऱ्यांच्या लक्षात आणून दिली. त्यानुसार लोक सहभागातूनच सर्वसंमतीने उपाययोजना करण्याचे ठरवण्यात आले.

सर्वप्रथम अतिक्रमण करणाऱ्यांना प्रेमाने समजावून सांगणे, वेळ पडल्यास कायद्याचा वापर करणे याबाबत सर्वांचे एकमत झाले. त्यानंतर शेतरस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी कालबद्ध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

**कृती आराखडा**

शेतरस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी आखण्यात आलेल्या कालबद्ध कार्यक्रमाचे नियोजन यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हास्तरीय विविध अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेतली. त्यांना गाव नकाशा व रस्ते याबाबत प्रत्यक्ष नकाशावरून माहिती समजावून देण्यात आली. बैठकीत प्रत्येक तालुक्यातील गावनिहाय अतिक्रमित शेतरस्त्यांचा आढावा घेण्यात आला. नकाशावर असलेला शेतरस्ता अतिक्रमित झालेला असेल तर तो मोकळा झालाच पाहिजे असे आदेश बैठकीतच देण्यात आले.

शेतरस्ते अतिक्रमण विरहित करताना प्रत्येक यंत्रणेची जबाबदारी आणि करावयाची कामे याबाबत सविस्तर सूचना देऊन ग्रामपंचायत तंटामुक्ती समिती, महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग आणि शेतकरी यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या.

**मोहिमेची अंमलबजावणी**

प्रत्यक्ष मोहीम राबविण्यास सुरुवात झाल्यानंतर शेतकऱ्यांना कल्पना देणे, लोकवाटा जमा करणे, रस्त्याच्या दुतर्फा मोजणीचा टेप लावणे व चुण्याच्या खुणा करत त्वरित चर घेणे व निघालेली माती, दगड, मुरूम रस्त्यावर पसरवून वाहतुकीस योग्य बनविणे व वाहतूक सुरू करणे ही नित्याची बाब होऊ लागली. ही परीस्थिती निदर्शनास येताच इतरांच्या मनात आपल्या शेतालाही असाच रस्ता असावा, असे वाटू लागले. याचा परिणाम म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतरस्त्याबाबतच्या आकांक्षा वाढल्या. अडचणीच्या ठिकाणी कायदेशीर भाषेत समजावून अतिक्रमित रस्ते मोकळे करण्यात आले. याचा सकारात्मक परिणाम म्हणजे नकाशात दर्शविण्यात आलेल्या रुंदीपेक्षाही रुंद रस्ते तयार झाले.

लातुर तालुक्यातील तांदुळजा - टाकळगाव हा निजामकालीन अतिक्रमित रस्ता ३३ फूट रुंद करण्यात आला. यामुळे तांदुळजा आणि टाकळगावात १३ रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यात आले. तळणी, बारोळ, उजेड या गावातील रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांना प्रेरणा मिळाली. लोकसहभागातून रस्ते निर्माण होऊ शकतात असा संदेश सर्वांना मिळून या मोहिमेने लोकचळवळीचे स्वरूप धारण केले.

**लोकचळवळ**

मोहिमेने लोकचळवळीचे स्वरूप धारण केल्यामुळे दरदिवशी २० ते २५ फूट रुंदीचे ६ ते ८ रस्ते तयार होऊ लागले. पाहता पाहता १९४८ कि.मी. लांबीचे ११३६ रस्ते अतिक्रमणमुक्त झाले.

या सर्व बाबींना विविध वृत्तपत्रांनी चांगली प्रसिद्धी दिली. त्याचा सकारात्मक परिणाम होऊन नकाशावरील रस्ता असेल तर मोकळा सोडावाच लागेल अशी मानसिक तयारी झाली. एक प्रकारचे सामाजिक दडपणही निर्माण झाले. गावातील वजनदार व्यक्तींविरोधातही तक्रार करण्याचे धारिष्ट्य सामान्य शेतकऱ्यांमध्ये आले. अतिवरिष्ठ अधिकारी हे प्रामाणिकपणे व मनापासून काम करणाऱ्या अधिकारी त्याचप्रमाणे शेतकरी यांना शाबासकी देत आहेत हे दृश्य बघून मोहिमेतील सर्वांचा हुरूप वाढला. त्यांच्या कार्यक्षमतेत आणि कार्यतत्परतेत वाढ झाली.

नकाशात दर्शविलेला रस्ता अडवता येत नाही आणि कुठल्याही परिस्थितीत सोडावाच लागणार, या विचाराने अडथळे करणाऱ्यांचे मनोबल खच्ची झाले.

**शासनाचे शेतरस्त्याबाबतचे निकष**

या मोहिमेला मिळालेल्या शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे लातूर जिल्ह्यातील अतिक्रमणमुक्त रस्ते कायमस्वरूपी अस्तित्वात राहावे म्हणून शासनाच्या मदतीने प्रचलीत नियमात शेतरस्ते / शीवरस्ते करण्यासाठी असलेली ३३ फूट रुंदीची अट ४ मार्च २०११ च्या शासन निर्णयाने शिथिल करण्यात आली. स्थानिक पातळीवरील परिस्थितीनुरूप निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

(लेखक पशुसंवर्धन आयुक्त या पदावर कार्यरत आहेत.)

## योजनेचे फलित

- मराठवाडा महसूल विभागामध्ये ११,५९० कि.मी.चे ६,९७२ रस्ते मार्च २०१२ अखेर निर्माण होऊन त्यामुळे ३,५८,२६८ हेक्टर क्षेत्र मुख्य रस्त्यांशी जोडले गेले.
- लोकसहभागातून शेतकऱ्यांनी या उपक्रमात मराठवाडा विभागामध्ये ४२ कोटी रूपये खर्च केले.
- शेतरस्ते अतिक्रमण मुक्त झाल्यामुळे कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, पशुपालन, कृषीप्रक्रिया उद्योग इत्यादी शेती पूरक व्यवसायांसाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली.
- पालेभाज्या आणि फलोत्पादन इत्यादी नाशवंत शेतमालाची सहजसोपी वाहतूक शक्य झाल्याने संभाव्य नुकसान व वेळेचा अपव्यय टळला.
- शेतीसाठी आवश्यक अवजारे, साधन सामग्री, खते, औषधे व बी-बियाणे वेळेत शेतापर्यंत पोहचविणे शक्य झाले.
- शेतरस्त्यांबाबतचे न्यायालयीन वाद, प्रशासकीय तक्रारी यामध्ये घट होऊन शेतकऱ्यांचा वेळ व पैसा यांचा अपव्यय टळला.
- पारंपरिक शेतीबरोबरच नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढला.
- शेतरस्त्यासाठी पिढयान-पिढयांमधील असलेले वैमनस्य आणि त्यातून निर्माण होणारे वैर कमी होऊन सामाजिक सलोखा वाढीस लागणार आहे.
- शेतरस्ता नाही म्हणून शेती पडीक पडणे किंवा कंटाळून शेत विकणे अशा प्रकारांना आळा बसेल.



> **कुठलाही प्रश्न हिंसक मार्गाने सुटत नाही. राज्यातील खंडकरी शेतकरी हे याचे उत्तम उदाहरण आहे. गेली ६० वर्षे खंडकरी शेतकऱ्यांनी कुठेही अनुचित घटना घडू न देता स्वत:ची जमिन मिळविण्यासाठी सातत्याने कायदेशीर मार्गाने संघर्ष केला आणि त्यात यश मिळविले.**

# खंडकऱ्यांचा यशस्वी लढा

## पांडुरंग गायकवाड (पाटील)

खंडकरी शेतकरी म्हणजे संपूर्ण राज्यामध्ये १९३२ ते १९४५ दरम्यानच्या कालावधीमध्ये ज्या शेतकऱ्यांनी खाजगी उद्योजकांना शेती करण्यासाठी जमिनी खंडाने (भाडेपट्ट्याने) दिल्या होत्या, त्या शेतकऱ्यांना खंडकरी शेतकरी असे संबोधले जाते. या जमिनी साधारणत: ३० वर्षांच्या कराराने (भाडेतत्त्वावर) खाजगी उद्योजकांना खंडकरी शेतकऱ्यांनी दिल्या होत्या. त्या बदल्यात आम्हा शेतकऱ्यांना सुरुवातीला एकरी २ रु. ते ५ रुपये असा नाममात्र खंड मिळत होता. त्यावेळेस आमचे बरेचसे शेतकरी गरीब, गरजू व अशिक्षित होते. हा खाजगी कंपनीकडून दिला जाणारा खंड ६० रुपयांपर्यंत वाढला व १९८२ पासून शासनानेही खंड देणे बंदच केले होते.

खाजगी कंपन्यांकडून दिला जाणारा खंड शेतकऱ्यांना पुरेसा नव्हता म्हणून रत्नपुरी मळ्यावरील शेतकऱ्यांना योग्य मोबदला तथा खंड मिळावा म्हणून माजी मंत्री स्व. शंकरराव बाजीराव पाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू घेऊन खाजगी कंपन्यांना खंडाची रक्कम वाढविण्यास भाग पाडले. तसेच पुढे स्व. शंकरराव भाऊंनी खंडकऱ्यांना त्यांची जमीन परत मिळविण्याकामी महत्त्वाची भूमिका बजावली व त्यात त्यांना १९७२ व १९७८ ला यश आले. अशाप्रकारे शंकरराव भाऊंनी शेतकऱ्यांना योग्य न्याय दिला; तीच परंपरा सध्याचे सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी चालू ठेवून २०१२ मध्ये खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी पाट-पाण्याच्या हक्कासहीत सिलिंगमर्यादेपर्यंत माघारी करण्यामध्ये मोलाचे सहकार्य केले.

खंडकरी शेतकऱ्यांना खासगी उद्योजकांना खंडाने दिलेल्या जमिनी परत मिळण्यासाठी १९५२ पासून आंदोलनाला सुरुवात झाली. यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांनीही सहभाग घेतला. यासाठी त्यांना हद्दपारीची शिक्षा झाली होती. तसेच स्वांतत्र्यसेनानी माजी खासदार माधवराव गायकवाड, पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, शंकरराव बाजीराव पाटील, अण्णासाहेब शिंदे यांचा आंदोलनामध्ये सहभाग होता. हे आंदोलन २०१२ पर्यंत शांततेच्या मार्गाने सुरू आहे. सर्वाधिक काळ चाललेले आंदोलन म्हणून या आंदोलनाकडे पाहिले जाते. या वर्षी ११ हजार खंडकरी



शेतकऱ्यांना सुमारे २४ हजार एकर जमीन पाटपाण्याच्या हक्कासह देण्यात येणार असल्याने २४ हजार एकरांवर पिके बहरणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी सोन्याचा नांगर धरून ज्या पद्धतीने बळीराजाला केंद्रबिंदू मानून स्वराज्याची उभारणी केली त्याच पद्धतीने शासनाने खंडकरी शेतकऱ्यांना नांगर घालून जमिनीचे वाटप केले. यामुळे शेतकऱ्यांचा शासनाच्या प्रति असलेला विश्वास अधिक दृढ केला.

**कमाल जमीन धारणा कायदा**

१९६१ मध्ये महाराष्ट्र शासनाने कमाल जमीन धारणा कायदा अस्तित्वात आणला. हा कायदा फक्त खासगी उद्योजकांसाठी लागू केला. यामुळे राज्यामध्ये उद्योजकांच्या ताब्यातील सुमारे ८५ हजार एकर जमीन शासनाने ताब्यात घेतली आणि १९६३ मध्ये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची स्थापना केली. हे शेती महामंडळ राज्य सरकारतर्फे चालविले जात होते, यामध्ये सुमारे १५ हजार कामगार काम करीत होते. या जमिनीमध्ये बहुतांश प्रमाणात उसाचे उत्पादन घेतले जात होते. उसाबरोबर ज्वारी, बाजरी ही पिके घेण्यात येत होती. याबरोबरच आंबा, चिकू, नारळाच्या फळबागाही होत्या. रत्नपुरी व शिवपुरी या मळ्यावर दुग्धव्यवसाय केला जात होता. राज्यातील सात जिल्ह्यांमधील १४ मळ्यांचा या जमिनीमध्ये समावेश आहे. यामध्ये पुणे, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, नगर, औरंगाबाद, सातारा या सात जिल्ह्यांचा समावेश आहे. रत्नपुरी (इंदापूर), शिवपुरी सदाशिवनगर, श्रीपूर (माळशिरस), साखरवाडी (फलटण), कोल्हापूर टिळकनगर (नगर), हरेगाव (श्रीरामपूर), साखरवाडी (शिर्डी), लक्ष्मीवाडी (कोपरगाव), रावळगाव (मालेगाव), गंगापूर (औरंगाबाद), चांगदेव (कोपरगाव) या १४ मळ्यांवर आजही शेती महामंडळाचे अस्तित्व आहे.

**कोट्यवधींचे नुकसान**

शेती महामंडळाने ३ एप्रिल २००८ रोजी पीकपाणी योजना बंद केल्यापासून आजपर्यंत म्हणजे सुमारे चार वर्षे सध्या ७० हजार एकरांतील किरकोळ जमिनीचे क्षेत्र वगळता सर्व जमीन पडीक आहे. या जमिनीवर सध्या वेड्या बाभळी व इतर निरुपयोगी वनस्पती उगवल्या आहेत. यामुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. सध्या या जमिनीमधील वेड्या बाभळी काढण्यासाठी शासनाला खूप मोठा निधी उपलब्ध करावा लागत आहे. जेणेकरून या जमिनीची मोजणी करून खंडकरी शेतकऱ्यांना परत करण्यासंदर्भात उपाययोजना कराव्या लागत आहेत.



**१९६२ नंतर शासनाची लढा**

१९५२ सालापासून खंडकरी शेतकरी जमीन परत मिळविण्यासाठी खासगी उद्योगपतींच्या विरोधात लढा देत होते. मात्र, १९६२ नंतर हा लढा शासनाशी सुरू झाला. शेती महामंडळातील कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळू नये, यासाठी १९७० मध्ये गरीब आणि गरजू शेतकऱ्यांना जास्तीतजास्त साडेचार एकर जमीन देण्याचा निर्णय झाला. यामध्ये ज्या शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न चार हजार रुपयांपर्यंत आहे, जे फक्त शेतीच करतात, त्यांना गरीब व गरजू संबोधण्यात आले. १९७२ व १९७८ मध्ये ८५ हजार एकरांपैकी १५ हजार एकर जमिनीचे खंडकऱ्यांना वाटप करण्यात आले. खंडकरी शेतकऱ्यांची राहिलेली जमीन परत मिळावी, यासाठी खंडकऱ्यांची मागणी सुरूच होती. यासाठी त्यांनी उपोषणे, मंत्रालयावर मोर्चे काढणे, शेती नांगरणे अशी आंदोलने केली. यामध्ये अनेक खंडकऱ्यांवर खटलेही भरण्यात आले होते. १९७५ मध्ये सीलिंग कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. यामध्ये एका शेतकऱ्याला १८ एकर बागायती व ५४ एकर जिरायती क्षेत्र धारण करण्याचा निर्णय देण्यात आला. सीलिंग मर्यादेपर्यंत जमीन मिळण्याची मागणी खंडकरी शेतकऱ्यांनी सुरू केली.

**जमिनी परत देण्याचा निर्णय**

१९९७ मध्ये खंडकरी शेतकऱ्यांना शेतजमीन परत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी सभागृहामध्ये मांडलेल्या विधेयकाला सर्वांनी मंजुरी दिली व हे विधेयक मान्य झाले.

**समितीची स्थापना**

खंडकरी शेतकऱ्यांनी जमिनी परत देण्यासंदर्भात राज्य सरकारने २००० मध्ये समिती नेमली. या समितीचे अध्यक्ष रामराजे निंबाळकर व सदस्य हर्षवर्धन पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत ससाणे हे होते. या समितीने कामगारांचे अस्तित्व सुरक्षित ठेवून खंडकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत देण्यासंदर्भातील अहवाल २००१ मध्ये शासनाला व न्यायालयाला सादर केला. या अहवालाला शासनाने मान्यता दिली.

**राष्ट्रपतींची मंजुरी**

खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी देण्यासंदर्भात राज्य सरकारने कायदा केला. याला २३ एप्रिल २००३ मध्ये राष्ट्रपतींची मंजुरी घेण्यात आली. त्यानंतर खंडकरी शेतकऱ्यांनी ९० दिवसांच्या आत अर्ज करावेत, अशी अधिसूचना काढण्यात आली. परंतु खंडकऱ्यांनी या संदर्भात मुदतीत अर्ज केले नव्हते. दरम्यान, खंडकरी शेतकऱ्याना जमिनी परत दिल्यास शेती महामंडळातील कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळेल, महामंडळाचे अस्तित्व धोक्यात येईल व कामगारांच्या रोजीरोटीचा प्रश्न उद्भवेल म्हणून प्रथम आमचा प्रश्न मार्गी लावा व नंतर खंडकऱ्यांच्या जमिनींचे वाटप व्हावे यासारख्या अनेक मागण्यांच्या संदर्भातील याचिका कामगार संघटनांनी औरंगाबाद उच्च व

**'एखादी बाजू न्याय स्वरूपाची असेल तर त्यासाठी चर्चा करायला हवी. चर्चेने आणि अहिंसक पद्धतीने प्रश्न सुटतात, हे खंडकरी शेतकऱ्यांनी तब्बल ६० वर्षे कायदेशीर मार्गाने लढा देऊन दाखवून दिले. सरकारही खंबीरपणे शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहिले. कामगारांचे सर्व प्रश्न सोडविण्यास सरकार बांधील आहे, शिवाय उर्वरित ४५ हजार एकर जमीन शेती महामंडळाच्या ताब्यात असल्याने कामगारांवर कोणताही अन्याय होणार नाही.'**

**- मुख्यमंत्री**

सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केली होती. परंतु, न्यायालयाने राज्य शासनाच्या विरोधात दाखल केलेली कामगारांची याचिका फेटाळली. शासनाने खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत केल्यानंतर महामंडळाकडे जी उर्वरित जमीन राहणार आहे त्यावर कामगारांना सामावून घेतले जाईल, असे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दिल्यामुळे न्यायालयाने शासनाच्या बाजूने निर्णय दिला आणि खंडकऱ्यांना जमिनी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

**कामगारांच्या मागण्या**

शेती महामंडळ चालू ठेवावे, कामगारांना राहते घर व दोन गुंठे जागा नावावरती करावी, कामगरांची थकीत देय रक्कम ८५ कोटी रुपये एकरकमी द्यावी, पीकपाणी योजना चालू ठेवावी, ५ वा वेतन आयोग द्यावा अशा अनेक मागण्या कामगार संघटनांच्या होत्या. या सर्व मागण्यांची पूर्तता करण्यासंदर्भात शासन वेळोवेळी आश्वासन देत होते. तरीही या संघटना सरकारकडे व न्यायालयाकडे धाव घेत होत्या. यामुळे खंडकरी शेतकऱ्यांना जमीन मिळण्यासंदर्भात विलंब होत होता.

**२ फेब्रुवारीची अधिसूचना**

राज्य सरकारने खंडकऱ्यांना जमिनी परत देण्याची तयारी सुरू केली. २ फेब्रुवारी २०१२ रोजी राज्यपालांच्या सहीने अधिसूचना काढून ९० दिवसांच्या आत खंडकऱ्यांनी जमीन मागणीचे अर्ज करावेत, असे सांगितले व जमीन वाटपाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. परंतु, कामगार संघटनांनी ९० दिवसांची मुदतवाढ ही नियमबाह्य असल्याची याचिका पुन्हा एप्रिल २०१२ मध्ये औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये दाखल केली. यामुळे खंडकऱ्यांच्या जमिनी वाटपास पुन्हा तात्पुरती स्थगिती मिळाली. ऑक्टोबर २०१२ मध्ये औरंगाबाद उच्च न्यायालयाने खंडकऱ्यांना जमिनी वाटपासंदर्भात दिलेला स्थगिती आदेश उठवला व तोच निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम केला, यामुळे खंडकऱ्यांनी ९० दिवसांच्या मुदतीत केलेले अर्ज कायदेशीर ठरविण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाचा निकाल राज्य शासनाच्या बाजूने लागल्यानंतर खंडकरी शेतकऱ्यांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या जमिनीसंदर्भातील न्यायालयीन सर्व अडथळे दूर झाले होते. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांची सर्व खंडकरी शेतकऱ्यांनी भेट घेतली आणि या भेटीत सर्वांनी दिवाळीपूर्वी (२०१२) खंडकरी शेतकऱ्यांना तुमच्या जमिनी शासन परत करेल, असे वचन दिले. जमीन वाटप प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले.

जमीन वाटपाचा शासनाने घेतलेला हा निर्णय खरोखरच ऐतिहासिक व क्रांतिकारक असाच आहे. खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी सिलिंग मर्यादेपर्यंत परत केल्याने खंडकरी शेतकरी त्या जमिनीमध्ये विविध पिके घेऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढच करणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारून आर्थिक स्थैर्य प्राप्त होणार आहे. आमच्या शेतकऱ्यांना शासनाने जमिनी परत केल्यामुळे आम्हा शेतकऱ्यांना आनंद झाला आहे.

खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी परत करण्यामध्ये अनेकवेळा न्यायालयीन अडथळे आले; परंतु न्यायालयामध्ये चांगल्यात चांगले वकील शासनाची बाजू मांडण्यासाठी उभे केले. उच्च न्यायालयामध्ये डी.जे. खंबाटा, ॲडव्होकेट जनरल, सर्वोच्च न्यायालयामध्ये, गोपाल सुब्रह्मण्यम्, आर.एफ. नरीयन असे दिग्गज वकील उभे करून खंडकरी शेतकऱ्यांना त्यांना त्यांच्या जमिनी परत करण्याचा शासनाचा निर्णय कसा योग्य आहे हे सांगितले व पटवूनही दिले. प्रत्येक वेळी हे सर्व घडत असताना त्याचा मी स्वत: साक्षीदार आहे.

मी स्वत: खंडकरी शेतकरी असून मुंबई उच्च न्यायालयात वकिली व्यवसाय करतो. वेळोवेळी घडणाऱ्या घटना, न्यायालयीन निकाल, शासनामधील निघणारे अध्यादेश, परिपत्रके यांचा मी अभ्यास करीत असतो. त्याचाच फायदा म्हणजे मला महसूल मंत्र्यांनी खंडकरी शेतकऱ्यांसंबधी शासनाचा मदतनीस म्हणून उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयामध्ये काम करण्यास संधी दिली. सध्याचे अप्पर मुख्य सचिव महसूल, विभागीय आयुक्त, जिल्हा अधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, महसूल अधिकारी व कर्मचारी यांचे उत्तम सहकार्य जमीन वाटप प्रक्रियेसंबंधी मिळाले. जमिनी अधिग्रहीत करणे याबाबत महसूल विभाग व शासन यांच्यावर वारंवार टीका होत असते. या पार्श्वभूमीवर खंडकरी शेतकऱ्यांना मिळालेला न्याय अभूतपूर्व आहे. कायदेशीर व कोणतीही अनुचित घटना न घडता सर्वाधिक काळ चाललेले आंदोलन म्हणून या आंदोलनाकडे पाहिले जाते. सर्व न्यायालयीन लढाई संपुष्टात आल्यानंतर अध्यादेश काढणे, अर्ज मागविणे, अर्जांची छाननी करणे, देय क्षेत्र निश्चित करणे व प्रत्यक्ष जमिनीची मोजणी करून जमिनीचे वाटप करणे अतिशय किचकट व अवघड काम महसूल विभागातील सर्वच अधिकाऱ्यांनी अतिशय उत्कृष्टपणे केलेले आहे. मी खंडकरी शेतकऱ्यांच्या वतीने शासनाचा ऋणी आहे.

**संपर्क : ९९६७८३६९४२**

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडे १९६३ साली ८५ हजार एकर जमीन ताब्यात होती. त्यापैकी १९७२ ते १९७८ साली १५ हजार एकर जमीन मूळ खंडकरी शेतकऱ्यांना परत केली आहे. सध्या या महामंडळाकडे ७० हजार एकर जमीन आहे. यापैकी ११ हजार खंडकरी शेतकऱ्यांना २४ हजार एकर जमिनीचे वाटप करण्यात येणार आहे. ही जमीन बारमाही पाटपाण्याच्या हक्कासहीत देण्यात येईल. खंडकऱ्यांना २४ हजार एकर जमीन वाटप करून शासनाकडे ४६ हजार एकर जमीन शिल्लक राहील.**



नागरिकांना दाखले देण्याच्या अस्तित्वात असणाऱ्या पद्धतीबरोबरच जनतेच्या गरजेनुसार विविध नावीन्यपूर्ण पद्धती राबविण्यात आल्या. इंद्रधनू म्हणजे सप्तरंग, या इंद्रधनूच्या सात रंगांप्रमाणे दाखले वितरणाचे सात महामार्ग बांधले. एक खिडकी योजना, सेतू सुविधा केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, एक दिवसीय दाखले शिबिर अभियान, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी विशेष दाखले वितरण अभियान, शाळा - महाविद्यालयातील इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष दाखले वितरण अभियान आणि ऑनलाइन ई-दाखले वितरण अभियान. अशा सात पद्धतींचा वापर करून दाखले वाटप करण्यात आले. या ७ योजनांच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यात सन २०१० मध्ये ५,३७,७५६ दाखले वितरित करण्यात आले.

# इंद्रधनू : संकल्पना आणि यश

शासनाच्या नवनवीन योजना, शाळा, महाविद्यालय प्रवेशासाठी व नोकरीसाठी बदलणारे नियम व अटींमुळे वेगवेगळ्या दाखल्यांची गरज जनतेला भासते. ठाणे जिल्हा / तालुका कार्यालयात वेगवेगळे अर्ज करणाऱ्या नागरिकांपैकी ८०% नागरिक हे दाखले प्राप्त करण्यासाठी येत असतात. लाखोंच्या लोकसंख्येपुढे दाखले वितरण करण्यासाठी कोणताही स्वतंत्र कर्मचारीवृंद उपलब्ध नसल्याने, उपलब्ध मनुष्यबळातून दाखल्यांचे कामकाज करणे अतिशय जिकिरीचे होऊन बसले होते. हा ताण विशेषत: तहसील, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयात पडतो. तुटपुंजा कर्मचारीवर्ग, तुटपुंजा वेळ व त्याच्या व्यस्त प्रमाणात असलेली दाखल्यांची मागणी यासाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता भासू लागली. त्यातूनच दाखल्यांच्या मागणीसाठी कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होऊ लागल्याने, 'इंद्रधनू:एकात्मिक दाखले वितरण अभियान' ही नावीन्यपूर्ण संकल्पना अस्तित्वात आली.

**दाखले शिबिर अभियान**

तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली यशदा, पुणे येथे ४ व ५ फेब्रुवारी २०१० रोजी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांची महसूल विभागाच्या बळकटीकरणाबाबत बैठकीत सूचना दिल्या होत्या. सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयोगी पडेल अशी दाखले वितरणाच्या शिबिरांचे नियोजन करण्यांत आले.

ठाणे जिल्हयात मे, जून, जुलै या महिन्यात दाखल्यांसाठी असणारी मोठी मागणी विचारात घेऊन एक दिवसीय दाखले वितरण अभियानात ५४ ठिकाणी शिबिरे आयोजित करून ३६ हजार २७० दाखले निर्गमित केले.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ऑगस्टच्या तिसऱ्या व चौथ्या आठवड्यामध्ये शिबीरांचे आयोजन करुन एकूण ६३ शिबीरे आदिवासी क्षेत्रात घेण्यांत आली. त्यापैकी ३० शिबीरे शासकीय सुट्टीच्या दिवशी घेण्यात आली. यामध्ये जातीचे दाखले १२,१६३ व उत्पन्नाचे दाखले २१६४७ असे एकूण ३३८१० दाखले वितरीत झाले.

शाळा - महाविद्यालयातील इयत्ता ८ वी ते

**ए. एल. जऱ्हाड**

१२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी विशेष दाखले वितरण या अभियानांतर्गत पुढील शैक्षणिक वर्षात ७२७ शाळा/महाविदयालयातील विद्यार्थ्यांना एकूण ६३,६९६ दाखले वितरण करण्यात आले.

**शिबिरांमुळे झालेले फायदे :**

कमी श्रमात, कमी वेळेत आवश्यक दाखले उपलब्ध झाले.सुट्टीच्या दिवशी शिबिरे आयोजित केल्याने पालकांच्या रजेची बचत झाली. योग्य वेळेस शिबिरांचे आयोजन केल्याने पालकांची, विद्यार्थ्यांची गैरसोय टाळता आली. अधिकारी, कर्मचारी यांना लोकाभिमूख सामाजिक काम, मोहीम स्वरूपात राबवून पूर्ण केल्याचे समाधान लाभले.

शिबिरांमुळे कामकाजाचे दिवशी दाखल्यांमुळे होणारा कामाचा ताण कमी होण्यास मदत झाली. मे, जून, जूलै महिन्यात सेतू सुविधा केंद्रांवर होणारी गर्दी कमी झाली.

या एकदिवशीय शिबीर संकल्पनेची शासन पातळीवर दखल घेण्यात आली व या दाखले वितरण शिबीर अभियानास मिळालेला प्रतिसाद व जनतेची गरज पाहून हा पॅटर्न राज्यभर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

**फलनिष्पत्ती**

नागरिकांच्या दाखल्यांच्या प्रश्नांसाठी अस्तित्वात आलेली सर्वात शाश्वत व राज्यभर अंमलात येत असलेली ही योजना आहे. सर्वसामान्य नागरिकांचा जिव्हाळयाचा प्रश्न तत्परतेने आणि तत्काळ सोडविण्यास मदत झाली आहे. राज्यात सर्वत्र प्रसार व प्रचार झालेली तसेच गावच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचलेली ही एकमेव योजना आहे. यामध्ये आर्थिक पाठबळाची, अतिरिक्त मनुष्यबळ वा कर्मचाऱ्यांची आवश्यकता नाही. नागरी, ग्रामीण, आदिवासी अशा सर्व क्षेत्रांतील जनतेच्या तसेच समाजातील सर्व स्तरावरील घटकांच्या दैनंदिन जीवनाशी/कामाशी निगडित असलेली ही एकमेव योजना आहे. सुवर्ण जयंती राजस्व अभियानांतर्गत विविध जिल्हाधिकारी यांनी यशस्वीपणे राबविलेल्या ११ विविध योजना राज्यातील सर्व जिल्हयात लागू केल्यानंतर सर्वात जास्त प्रतिसाद मिळालेली ही एकमेव योजना दिसून येते.

**(लेखक सध्या संचालक, नगरपालिका व्यवस्थापन या पदावर आहेत. त्यांनी जिल्हाधिकारी ठाणे म्हणून काम पाहिले आहे.)**

**संपर्क : ९८६७२०५०४५**

# द्रष्टे निर्णय... अभिनव योजना

## भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरणाबाबतचे नवीन धोरण

उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय विचारात घेऊन शासनाने भाडेपट्ट्याचे सुधारित धोरण निश्चित केले आहे. या धोरणाची ठळक वैशिष्ट्ये:-

(अ) दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याच्या जमिनीची किंमत ही १ जानेवारी २०१२ रोजीच्या सिध्दशिघ्रगणकानुसार (रेडी रेकनर) येणाऱ्या किंमतीप्रमाणे निश्चित केल्यानंतर येणाऱ्या किंमतीत शासन व भाडेपट्टे धारक यांचा उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या आधारे अनुक्रमे २५:७५ प्रमाणे शासनाचा २५ टक्के हिस्सा विचारात घेऊन येणाऱ्या रकमेवर निवासी, औद्योगिक, वाणिज्यिक आणि निवासी व वाणिज्यिक प्रयोजनासाठी अनुक्रमे २ टक्के, ४ टक्के, प्रत्येकी ५ टक्के प्रमाणे १ जानेवारी २०१२ पासून सुधारित भूईभाडे आकारण्यात यावे.

(ब) १ जानेवारी २०१२ पासून भाडेपट्टयाचे नूतनीकरण ३० वर्षासाठी करण्यात यावे. या कालावधीमध्ये दर ५ वर्षांनी सिध्दशिघ्रगणकानुसार येणाऱ्या बाजारमूल्याच्या रकमेवर वरील दराने भूईभाडे निश्चित करण्यात येईल.

(क) जमिनी भाडेपट्टयाऐवजी कब्जेहक्काने (भोगवटादार वर्ग-२) करण्यासाठी विकल्प :-

ज्या भाडेपट्टेधारकांना शासकीय जमीन भाडेपट्टयाऐवजी कब्जेहक्काने (Occupancy right) भोगवटादार वर्ग-२ मध्ये रुपांतरित करुन घ्यावयाच्या असतील त्यांच्याकडून भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनी कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ (Occupancy



right) म्हणून नियमित अटी व शर्तीवर देण्यात याव्यात. त्याकरिता मंजुरीच्या दिनांकाला असलेल्या बाजार किंमतीच्या पुढीलप्रमाणे रुपांतरण शुल्क आकारण्यात यावे.

१. केवळ निवासी — प्रचलित बाजारभावाच्या २०टक्के
२. केवळ औद्योगिक — प्रचलित बाजारभावाच्या २५ टक्के
३. केवळ वाणिज्यिक — प्रचलित बाजारभावाच्या ३० टक्के
४. मिश्र निवासी व वाणिज्यिक निवासी व वाणिज्यिक वापराच्या क्षेत्राप्रमाणे वरील दरानुसार.

हा विकल्प फक्त भाडेपट्ट्याचा कालावधी संपुष्टात आलेला आहे किंवा पुढील १० वर्षात संपुष्टात येणार आहे, अशा भाडेपट्टाधारकांनाच उपलब्ध असेल. तसेच, हा विकल्प देण्यासाठी २ वर्षांची मुदत असेल.

## नोंदणी व मुद्रांकांसाठी विस्तारित वेळेत कार्यालय सुरू

नगारिकांचा वेळ वाचावा म्हणून नोंदणी व मुद्रांक विभागासह राज्यातील सामायिक कार्यक्षेत्र असलेल्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या दुय्यम निबंधक कार्यालयांपैकी काही कार्यालये सकाळी ७.०० ते दुपारी २.०० आणि काही कार्यालये दुपारी २.०० ते रात्री ९.०० या वेळेत नागरिकांच्या सोयीसाठी सुरु केली आहे. याला चांगला प्रतिसाद मिळत असून दिवसभरात पूर्वीपेक्षा जास्त दस्तऐवजांची नोंद केली जात आहे.




सध्या पुणे येथे दुय्यम निबंधक हवेली क्र. २१ हे कार्यालय दुपारी १२.०० ते रात्री ८.०० या वेळेत कार्यरत असून मुंबई येथे दुय्यम निबंधक मुंबई शहर-४ या वेळेत तर दुय्यम निबंधक मुंबई शहर -५ दुपारी २.०० ते रात्री ९.०० या वेळेत सुरु होत आहे. याच धर्तीवर राज्यात विस्तारित वेळेत दुय्यम निबंधकाची कार्यालये सुरु करण्यात आली आहेत.

Department Of Registration & Stamps
Government Of Maharashtra, Pune
नोंदणी व मुद्रांक विभाग
महाराष्ट्र शासन


वाचू आनंदे

# अभिजात अनुवाद

**डॉ. अशोक चौसाळकर**

कौटिल्याचे अर्थशास्त्र हा प्राचीन भारतातील राज्यशास्त्रावरचा अनन्यसाधारण असा ग्रंथ असून कौटिल्याने तो इ.स.पू. चौथ्या शतकात लिहिला. या ग्रंथाचे पहिले मराठी भाषांतर हिवरगावकर यांनी केले तर त्याचे जास्त काटेकोर व अधिकृत असे भाषांतर संस्कृतचे नामवंत प्राध्यापक र.पं. कंगले यांनी केले. त्याची पहिली आवृत्ती १९८२ मध्ये प्रकाशित करण्यात आली. १९९५ साली त्याचे पुनर्मुद्रण करण्यात आले. आता पुन: त्याचे २०१२ मध्ये दुसरे पुनर्मुद्रण करण्यात आले आहे. याचा अर्थ असा की हा ग्रंथ लोकप्रिय झालेला आहे.

कौटिल्य किंवा आर्य चाणक्य याने हा ग्रंथ लिहिला. कौटिल्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या अनेक अर्थशास्त्रांच्या आधारे कौटिल्याने तो ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचा उल्लेख नंतरच्या काळात हजार - दीड हजार वर्षे होत राहिला. पण, नंतर त्या ग्रंथाच्या प्रती मिळेनाशा झाल्या. १९०७ मध्ये केरळमध्ये पुन: या ग्रंथाच्या प्रती मिळाल्या व एक अनन्यसाधारण असा ग्रंथ पुन: प्रकाशात आला. गणपतीशास्त्री, डॉ. श्यामशास्त्री, डॉ. जॉली यांनी संपादित केलेल्या प्रती प्रकाशित झाल्या. मुंबई विद्यापीठातील संस्कृतचे प्राध्यापक प्रा. र. पं. कंगले यांनी अर्थशास्त्राच्या सर्व उपलब्ध प्रतींचा अभ्यास करून या ग्रंथाची चिकित्सक आवृत्ती तयार केली. या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत, तिचे इंग्रजी भाषांतर व त्याचे टीकात्मक परीक्षण अशा तीन खंडांत कौटिल्याचे अर्थशास्त्र मुंबई विद्यापीठाने १९६० च्या दशकात प्रकाशित केले. या संशोधन कार्यामुळे प्रा. कंगले यांना विद्वान म्हणून जागतिक स्तरावर मान्यता मिळाली. प्रा. कंगले हे मराठी भाषिक असल्यामुळे आपल्या मराठी भाषिक वाचकांसाठी त्यांनी या ग्रंथाचे मराठी भाषांतर तयार केले व १९८२ मध्ये महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळाने ते प्रकाशित केले.




हे भाषांतर प्रा. कंगले यांच्या असामान्य विद्वत्तेचे उत्तम असे उदाहरण आहे. या ग्रंथाच्या सुरुवातीस कंगले यांनी ४८ पृष्ठांची अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना लिहिली असून, ग्रंथाच्या शेवटी सुमारे ६१ पृष्ठांच्या टिपा जोडल्या आहेत. यामध्ये अवघड शब्द व संकल्पना यांचे अर्थ सांगितले असून, ग्रंथातील निरनिराळ्या अपरिचित वाक्प्रयोगांमागील गोष्टींची माहिती दिली आहे.

पुस्तकाच्या प्रस्तावनेत प्रा. कंगले यांनी कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे स्वरूप, कौटिल्यापूर्वी निर्माण झालेली अर्थशास्त्र परंपरा, कौटिल्याच्या राजकीय विचारांचे महत्त्व यांची चर्चा केली आहे. त्यांच्या मते अर्थशास्त्राची रचना इ.स.पू. चौथ्या शतकात मौर्यकाळात झाली असून, ग्रंथ लिहिताना कौटिल्याने त्याच्या पूर्वसूरींच्या ग्रंथांची मदत घेतली आहे. पण, विषयाबाबत निष्कर्ष काढताना तो त्याची स्वतंत्र दृष्टी व विवेकबुद्धी दाखवून देतो. कंगले यांनी त्यांच्या विचारांची प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकेव्हली यांच्यासारख्या विचारवंतांच्या विचारांशी तुलना करून या ग्रंथात मांडलेल्या राजकीय विचारांचे सद्य:कालीन औचित्य स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते हे शास्त्र वास्तवावर आधारलेले असून, प्रत्यक्षात आढळून येणाऱ्या परिस्थितीच्या अनुरोधाने रचण्यात आले आहे. त्यामुळे राज्य कारभाराच्या बाबतीत या ग्रंथाकडून काहीच शिकण्यासारखं नाही असा समज करून घेण्याचे कारण नाही. प्रा. कंगले सांगतात की, हे भाषांतर जरी शब्दश: केलेले असले तरी ते सुबोध करण्याचा प्रयत्न केला आहे.

कौटिल्याने त्याच्या अर्थशास्त्राची १५ प्रकरणांत विभागणी केली आहे. सुरुवातीस तो असे म्हणतो की, ''पृथ्वीच्या लाभाच्या व पालनाच्या विषयासंबंधी जेवढी अर्थशास्त्रे पूर्वीच्या आचार्यांनी प्रस्थापित केलेली आहेत ती बहुतेक सर्व एकत्र करून हे अर्थशास्त्र रचले आहे.'' या पुस्तकातील १५ प्रकरणांत कौटिल्याने राज्य शास्त्राबाबतचे वेगवेगळे विषय हाताळले आहेत. या प्रकरणांची मुख्यत: आपणास तीन भागांत विभागणी करता येईल. त्यातील पहिला भाग राजकीय सिद्धान्तांच्या बाबत आहे. दुसऱ्या भागात राज्याच्या प्रशासन व्यवस्थेची, निरनिराळ्या खात्यांची व न्याय विषयात प्रशासनाची चर्चा करण्यात आली आहे तर तिसऱ्या भागात आंतरराज्य राजकारण, राजनय आणि राज्याच्या संरक्षणाबाबत विस्ताराने चर्चा करण्यात आली आहे. या पुस्तकाच्या शेवटच्या पंधराव्या प्रकरणात आपण कोणत्या संशोधन पद्धतीचा स्वीकार केला आहे याचे विवेचन केले आहे. या ग्रंथाच्या निर्मितीसाठी आपण ३२ तंत्रांचा वापर केला असे 'तंत्रयुक्ती' प्रकरणात कौटिल्य सांगतो. या शास्त्राचा अभ्यास धर्म, अर्थ व काम यांना प्रवृत्त करते व अधर्म, अनर्थ आणि द्वेष यांना नष्ट करते असे तो सांगतो.

कौटिल्याने राजकीय सिद्धान्ताच्या काही मूलभूत प्रश्नांची चर्चा या पुस्तकात केली आहे. राजाने या शास्त्रांचा अभ्यास करावा असे त्याने सांगितले आहे. त्यात तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यांचा समावेश होतो. त्याच्या मते तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. कारण, त्यामुळे आपणास प्रत्येक गोष्टीत योग्यायोग्य काय आहे हे समजते व त्यामुळे विचार, उच्चार व

कृती या तिन्ही क्षेत्रांत पारंगत बनता येते. त्याने राज्याच्या सात अंगांचा वा प्रकृतींचा उल्लेख केला आहे. त्याच्या मते राज्य ससांगापासून बनलेले असून हे सर्वच घटक परस्परांवर अवलंबून असतात. त्याने राज्याच्या ससांगावर पडणाऱ्या संकटांची व व्यसनांची देखील चर्चा केली आहे. त्याच्या मते सर्व प्रकारच्या दोषांपासून व व्यसनांपासून राज्याचे संरक्षण झाले तरच राज्याचा विकास होईल कारण प्रत्येक राज्य वृद्धी, स्थिती व लक्ष्य या तीन अवस्थांतून जात असते. राजाने राज्यशास्त्र वा दंडमीतीच्या साहाय्याने राज्यकारभार केला पाहिजे; कारण दंडमीतीचा उद्देश मुळी अप्राप्त वस्तू प्राप्त करणे, त्यांचे संरक्षण करणे व त्यांचे संवर्धन करणे व संवर्धित वस्तूंचे पात्र व्यक्तींमध्ये वितरण करणे हा आहे. यातूनच लोकांना योगक्षेम प्राप्त होतो.

वर सांगितलेला राज्याचा उद्देश पूर्ण करण्यासाठी राज्यास प्रशासन यंत्रणेची गरज असते. या प्रशासन व्यवस्थेत असणाऱ्या विविध विभागांची चर्चा त्याने केली असून, या विभागांच्या अध्यक्षांच्या कामाचेही विवेचन केले आहे. त्याने धर्मस्थित (दिवाणी) आणि कंटकशोधन (फौजदारी) न्यायालयांच्या कामकाजाचीही माहिती दिली आहे.

राज्याचे परकीय आक्रमक व अंतर्गत शत्रू यांच्यापासून रक्षण झाले पाहिजे असे कौटिल्याचे मत होते. म्हणून त्याने असे सांगितले की, राजाने साम, दाम, दंड व भेद या चार उपायांचा वापर करावा. राजनयात त्याने संधी यात आसन, संश्रय, द्वैधीभाव व विग्रह यांचा वापर करावा. कौटिल्याने १२ राज्यांच्या राजमंडलाचा सिद्धान्त मांडून असे मत व्यक्त केले की, या मंडलात सत्तेचा समतोल साधत राजाने आपले वर्चस्व सिद्ध करावे. किल्ले व त्याचे प्रकार, चतुरंग सेना व तिचे प्रशिक्षण, शत्रूविरुद्ध वापरावयाचे गूढ उपाय यावरही त्याने आपले विचार व्यक्त केले आहेत.

कौटिल्याचे अर्थशास्त्र हा राज्यशास्त्र विषयावरचा अभिजात ग्रंथ असून, आता तो जगभरच्या अभ्यासकांसाठी कुतूहलाचा विषय ठरला आहे. अशा महाग्रंथाचे मराठी भाषांतर मराठी वाचकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल मी महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळाचे हार्दिक अभिनंदन करतो.

## पुस्तक कुठे मिळेल?

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री, प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई - ४००००४. दूरध्वनी : २३६३१४३३, २३६३१७९९.

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथकार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ.नजीक, पुणे - ४११००१. दूरध्वनी : २६१२५८०८.

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथकार, सिव्हिल लाइन्स, नागपूर - ४४०००१. दूरध्वनी : २५६२६१५.

४. सहायक संचालक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद - ४३१००१. दूरध्वनी : २३३१५२५.

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३. दूरध्वनी : २६५०३९५, २६५०४०२.

किंमत - रु. ९८५/-

## द्रष्टे निर्णय... अभिनव योजना

# शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा

राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध विभागांना व उपक्रमांना जमिनीच्या किमान गरजेनुसार शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार काही अटी व शर्तींच्या अधीन राहून जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना देण्याचा निर्णय २७ जुलै २०११ रोजी शासनाने घेतला. या निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांना १ हेक्टरपर्यंत तर विभागीय आयुक्त यांना १ हेक्टरपेक्षा जास्त मात्र ५ हेक्टर मर्यादेपर्यंतचे जमीन देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. सिंचन प्रकल्प (तलाव) व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक शासकीय जमिनीचा ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.



शिक्षण, आरोग्य, सिंचन, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक असलेली जमीन, अत्यावश्यक व पायाभूत सेवांसाठी तसेच विकासकामांसाठी आवश्यक जागा आणि अत्यंत अपवादात्मक बाब वगळता महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना पूर्वी नव्हते. त्यामुळे शासकीय प्रकल्पांच्या प्रयोजनाकरिता अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधीचा वापर वेळेत होत नव्हता व निधी अखर्चीक म्हणून पडून राहत होता किंवा परत करावा लागत होता. ही कामे वेळेत पूर्ण न झाल्यामुळे प्रकल्पांकरिता अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेल्या निधीमध्ये वाढ होत होती. या सर्व बाबींचा विचार करून विविध प्रयोजनांकरिता शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना देण्यात आला. जमीन उपलब्धतेची तातडी व निकड लक्षात घेऊन पोलीस स्टेशन, सामाजिक न्याय व आदिवासी विभागाच्या योजना, पर्यटन विकासाच्या योजना इत्यादी अपवादात्मक प्रयोजनासाठी आवश्यक शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकारही जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

❑ ❑

# ठाणे : महत्त्वाकांक्षी आणि झपाटलेले

**ऐतिहासिक महत्त्व असणारा जिल्हा, पाणी पिकविणारा जिल्हा, सर्वाधिक लोकसंख्या असणारा जिल्हा, नागरी, डोंगरी व सागरी भूप्रदेशाचा जिल्हा, सर्वाधिक नागरीकरण झालेला जिल्हा, सर्वाधिक महापालिकांचा जिल्हा, सर्वाधिक महसूल देणारा जिल्हा, आदिवासींच्या दारावर लक्ष्मीची सोनपावलं उमटविणारा जिल्हा, हळद, रेशीम आणि मोगऱ्याचं उत्पादन फुलविणारा जिल्हा अशी अनेक वैशिष्ट्ये जपत विकासाच्या बाबतीत गरुडझेप घेण्यासाठी ठाणे जिल्हा सिध्द झाला आहे. भव्यता, नवीनता आणि भरारी यामध्ये त्याला आकाशाला गवसणी घालायची आहे. १६० वर्षापूर्वी देशातल्या पहिल्या रेल्वेगाडीच्या वाफेच्या इंजिनाचं जिल्ह्याने जंगी स्वागत केले होतं. विकासाच्या बाबतीत 'ग्रोथ इंजिन' ठरलेला ठाणे जिल्हा आता रेल्वे आणि आंतरराष्ट्रीय विमानतळावरील विमानांची उड्डाणे यांची स्वप्ने पाहण्यासाठी उत्सुक झाला आहे.**

श्री. वा. नेर्लेकर

पूर्वीचे ठाणे आणि आत्ताचे ठाणे! जमीन अस्मानाचा फरक व बदल नजरेला दिसून येतो. त्या बदल-फरकाचे अर्थ सांगावे तितके थोडेच. ठाणे जिल्ह्याला फार मोठा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आहे. त्याचे एक स्वत:चे स्थान व अस्मिता आहे. त्याला प्राचीनतेचा गंध आहे. त्याच्या पुसट झालेल्या खाणाखुणा अनेक ठिकाणी अस्तित्वात आहेत. इतिहास, भूगोल, संस्कृती, साहित्य, कला, क्रीडा, शिक्षण, उद्योग, आरोग्य, सामाजिक क्षेत्र आदी सर्व क्षेत्रात आपले वेगळेपण जपत आज त्याने गरुडझेप घेतली आहे.

भारताच्या नकाशावर ठाणे जिल्हा आज महाविराट जिल्हा ठरला आहे. घडणारा बदल थक्क करणारा आहे. काळानुसार होणारा हा बदल अपरिहार्य म्हणावा लागेल. जिल्ह्यानं जुनी कात केव्हाच टाकून दिली आहे. नव्याचं, भव्यतेचं, उंचीचं आणि भरारीचं स्वागत करीत ठाणे जिल्हा आता पुढेपुढेच धावणार आहे. त्याच्या गतीला आता कुणीही थोपवू शकणार नाही. एका वाक्यात वर्णन करायचं झाल्यास महत्त्वाकांक्षी माणसाप्रमाणे ठाणे हा महत्त्वाकांक्षेने झपाटलेला महाजिल्हा झाला आहे.

ठाणे जिल्ह्याच्या झपाटलेपणाच्या प्रवासात त्याच्या ऐतिहासिकतेचा गंध आजही प्रसन्नतेनं दरवळत आहे. इतिहासाच्या या पाऊलखुणा कालौघात पुसट होत चालल्या असल्या तरी 'हेरिटेजच्या कुपीत' त्याचा सांभाळ करण्याची आवश्यकता आहे. ठाण्याचा इतिहासाशी सबंध इ.स.६३६ पासून येतो. अरब इतिहासकार, तत्त्वज्ञ आणि प्रख्यात प्रवासी अलमसुदी याने ठाण्याचा उल्लेख तान्हा आणि तबेह या नावाने केल्याचे आढळून येते. इ.स.९७० मध्ये अल्बिनेरुनीने ठाण्याचा उल्लेख 'ताना' असा आपल्या प्रवासवर्णनात केला आहे. ठाणे जिल्हा हा कोकणभूमीचाच एक अविभाज्य भाग. इ.स. पहिल्या शतकापासून ते अगदी इंग्रजी अंमलापर्यंत भेट देऊन गेलेल्या ग्रीक, रोमन, इटालियन, इजिप्शीयन, चिनी, अरब, पोर्तुगीज, फ्रेंच, मुसलमान आणि इंग्रजी आदी ठिकाणच्या बहुतेक सर्व प्रवाशांनी आपल्या नोंदीत कोकणचा उल्लेख केल्याचे आढळते. १४०० खेडयांवर प्रभुत्व गाजवणाऱ्या शिलाहार राजांच्या राजधानीचे ठिकाण असा ठाण्याचा उल्लेख १०१८ च्या ताम्रपटात असून त्यावेळी त्याचे नाव श्रीस्थानक म्हणून प्रचालित होते. शिलाहारांच्या कारकिर्दीत ठाण्यात ६० मंदिरे व ६० तलाव होते. टिटवाळयाचा गणपती, जोंधळीबाग आणि मासुंदा तलाव येथे सापडलेल्या श्रीगणेशमूर्तीमध्ये विलक्षण साम्य आढळून येत असून अशा अनेक प्रकारच्या गणेशमंदिरांमुळे या गावाला श्रीस्थानक असे नाव पडले असावे.

इ.स.१५३३ मध्ये ठाणे पोर्तुगीजांच्या वर्चस्वाखाली मराठ्यांच्या वाढत्या कारवाईला रोखण्यासाठी पोर्तुगीजांनी भुईकोट किल्ला बांधला. पुढे मराठे व पोर्तुगीज यांचा संघर्ष निकराला पेटल्याचे दिसून येते. चिमाजी आप्पांनी इ.स.१७३७ मध्ये वसईची मोहीम आखून ती फत्ते केली. २८ मार्च १७३८ ला मराठ्यांनी ठाणे काबीज केले व ठाण्याच्या किल्ल्यावर आपला अंमल गाजवला. त्याच्या खाणाखुणा ठाणे, वसई व अन्य भागात आजही





चर्चेस व शाळांच्या रुपातून अस्तित्वात आहेत. १७६१ च्या पनिपतच्या रणसंग्रामांनतर पेशवाईची ठाण्यावरील पकड ढिली झाली. इ.स.१७७४ मध्ये इंग्रजांनी ठाणे शहर व जिल्हा काबीज केला. २८ डिसेंबर १७४४ पासून ठाणे जिल्ह्यावर ब्रिटिशांची राजवट सुरू झाली.

### मनोरंजक प्रवास

श्रीस्थानक ते ठाणे हा जिल्ह्याच्या नावाचा प्रवासही मोठा मनोरंजक आहे. श्रीस्थानक-स्थान-तान्हा-ताना-कुकीन ताना-थान-आणि ठाणे असा या नावांचा प्रवास आहे. कालौघात नावांमध्ये अपभ्रंश होऊन नावे कशी बदलली जातात त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. ब्रिटिशांच्या राजवटीत ठाणे या नावानं जिल्ह्याच्या नावाचं बारसं झालं असावं. ठाणे ही जिल्ह्याची राजधानीच झाली. ठाणे या शब्दाचा अर्थ स्थान किंवा ठिकाण असाच आहे. श्रीस्थानक या प्राचीन नावाशी ते मिळते जुळते आहे. अर्थाच्या दृष्टीनेही जिल्ह्याचे नाव अगदी समर्पक म्हणता येईल. इंग्रजी राजवटीपासून ठाणे या नावांनं ठाण मांडलय. आता ते बदलण्याची शक्यता नाही. ठाणे जिल्ह्याचं विभाजन जरी झालं तरी मूळच्या भागाला ठाणे हे नाव कायम राहणार आहे. दोन अक्षरी व उच्चारण्यासाठी सोपं व सुटसुटीत असलेले ठाणे आता प्रत्येकाचे जीवनगाणे होऊन बसले आहे.

ठाणे या ऐतिहासिक जिल्ह्याचा प्राचीन भूगोलही पाहण्यासारखा आहे. भौगोलिकदृष्ट्या ठाणे जिल्हा हा महाराष्ट्राच्या कोकण विभागातील सर्वात उत्तरेकडील आहे. जिल्ह्याच्या पूर्वेकडे सह्याद्री पर्वताच्या रांगा तर पश्चिमेस अरबी समुद्र आहे. ठाणे जिल्ह्याचे सध्याचे क्षेत्रफळ ९५५८ चौ. कि. असले तरी पूर्वीही हा जिल्हा खूप विस्तारलेला होता. १८५३ मध्ये आत्ताच्या रायगड जिल्ह्यातील पेण, रोहा, रायगड, उंदेरी व रेवदंडा आदी भाग ठाणे जिल्ह्यात होता. एवढेच नव्हे तर आत्ताच्या मुंबईतील कुर्ला, घाटकोपर, वांद्रे, अंधेरी, पार्ले, माहीम ही महत्त्वाची उपनगरे ठाणे जिल्ह्यातच होती. सध्या गुजरातमध्ये असलेले उंबरगाव हे पूर्वी ठाणे जिल्ह्यातच होते. कोकण किनारपट्टीत असलेल्या ठाणे जिल्ह्याला अरबी समुद्राची ११२ कि. मी. इतकी किनारपट्टी लाभलेली आहे. अरबी समुद्रामुळे जिल्ह्यामध्ये खाड्यांचे प्रमाण जास्त असून ठाणे, कल्याण, भिंवडी, भाईंदर, वसई, केळवे, सातपाटी, पालघर, तारापूर, चिंचणी या गांवाच्या नावानेच त्या खाड्या ओळखल्या जातात. समुद्र आणि खाड्या असल्यामुळे नैसर्गिक बंदरे स्वाभाविकपणे आलीच. प्राचीनकाळी शुर्पारक (सोपारा) व कलियान (कल्याण) ही बंदरे व्यापारीदृष्ट्या भरभराटीस होती. भौगोलिक परिस्थितीमुळे जिल्ह्याचे जंगलपट्टी आणि बंदरपट्टी असे दोन भाग पडत असले तरी गेल्या पंचवीस-तीस वर्षांतील विकासामुळे काही भागांत मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले. त्यामुळे नागरी हा स्वतंत्र विकासोन्मुख भाग उदयास आला.

### सर्वाधिक नागरीकरण

२०११ च्या जनगणना अहवालानुसार लोकसंख्येच्या बाबतीत ठाणे जिल्हा हा भारतातील पहिल्या क्रमांकाचा सर्वात मोठा जिल्हा ठरला असून त्याची लोकसंख्या १ कोटी १० लाखावर गेली आहे. ७२.३८ टक्के नागरी लोकसंख्या असलेला ठाणे जिल्हा सर्वाधिक नागरीकरण झालेला राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा आहे. शहरी लोकसंख्या ८० लाखांच्या जवळपास असून ग्रामीण भागाची लोकसंख्या ३० लाखांच्या आसपास आहे. लोकसंख्येची घनता प्रती चौरस कि.मीला ११५७ इतकी पडते.

### नागरी... डोंगरी... सागरी

ठाणे जिल्ह्यात आजमितीस पंधरा तालुके आस्तित्वात असून त्यात जव्हार, मोखाडा, वाडा, शहापूर, तलासरी, विक्रमगड , डहाणू व पालघर हे आठ तालुके आदिवासी बहुल वस्तींचे आहेत. तर ठाणे, कल्याण, अंबरनाथ, उल्हासनगर, भिवंडी, मुरबाड आणि वसई हे सात तालुके संमिश्र वस्तीचे आहेत. नागरी, डोंगरी आणि सागरी असा भूप्रदेशाचा भारतातील एक वैशिष्ट्यपूर्ण जिल्हा अशी ठाणे जिल्ह्याची ओळख असून भारताची एक छोटी प्रतिकृती असे त्याचे वर्णन करणे संयुक्तिक होईल.

बदलत्या ठाणे जिल्ह्याचा विचार करताना आपल्याला जुन्या ठाणे जिल्ह्याचा चेहरा पुन्हा एकदा नजरेसमोर आणावा लागेल! बारीकसारीक गल्ल्या व बोळ, खडी व मुरमाचे रस्ते, लाल-काळी माती, रस्त्यावरचे मिणमिणते दिवे, छोट्या-मोट्या चाळी, कौलारु घरे, लहान-मोठे पाडे, टोपल्यांचे संडास, लहान व प्रशस्त विहिरी, भातखाचरे, तलाव व खाड्या, खाड्यांजवळची मीठागरे, मोजक्या शाळा, कुडाची घरं, दाट जंगल, हिरवी गर्द झाडी, त्यावरील कोकिळा व अन्य पक्षांचे मधुर गुंजन, ग्रंथालये व वाचनालये, एखाद दुसरे टॉकीज, घोडयाच्या टांग्याचा टपटप आवाज, बैलगाड्या, एखाद दुसरी एस टी, मंदिरे, चर्चेस आणि मशिदी, किल्ले आणि डोंगर, एकमेकांना नावानं ओळखणारी माणसं, आपुलकीने साजरे होणारे सण-उत्सव, मोजकी दुकानं, चौकात व नाक्यावर जमणारे दुधविक्रेते व परंपरागत भातशेती असे स्वरूप जुन्या ठाणे जिल्ह्याचे होते.

### बदलाची नांदी

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून त्यात हळूहळू बदल होऊ लागला. १६ एप्रिल १८५३ रोजी वाफेच्या इंजिनची पहिली रेल्वेगाडी मुंबई ते ठाणे मार्गावर धावली. रेल्वेच्या आगमनापाठोपाठ स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती झाली. त्यानंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती व महापालिका स्थापना

झाली. प्रामुख्याने या चार गोष्टींमुळे ठाणे जिल्ह्याच्या रंगरूपात हळूहळू नाविन्याची भर पडू लागली. लोकवस्ती वाढू लागली. जुने वाडे आणि चाळी यांनी कात टाकली. आकर्षक रचना असलेल्या इमारतींची विविध सुखवस्तोयींनी सजलेली निवासी संकुले उभी राहिली. ठिकठिकाणी हाऊसिंग सोसायट्या उभ्या राहिल्या. कोऱ्या ब्लॉकमधल्या खिडक्यांतून कोरे पडदे नव्या संसाराचं दर्शन घडवू लागले. गावागावातील टांग्यांना टांग मारुन रस्त्यावर रिक्षा धावताना दिसू लागल्या. मातीच्या व धुळीच्या रस्त्यांचे रुपांतर डांबरीकरणात झाले. मिणमिणत्या कंदिल दिव्यांची जागा विजेच्या प्रखर दिव्यांनी घेतली. गगनचुंबी टॉवर्स, अलिशान मॉल्स, विशाल गृहसंकुल, उंची हॉटेल्स, देखणी उद्यानं, आकर्षक दुकाने, भव्य कलादालन, प्रशस्त रस्ते, सुशोभित चौक, गुळगुळीत व चकचकीत रस्ते अशा कितीतरी गोष्टींनी जिल्ह्यातील १०-१२ शहरांच्या लौकिकात भर पडत आहे.

ठाणे जिल्हा हा बृहन्मुंबईच्या उंबरठ्यावरील जिल्हा. पूर्वी हा जिल्हा प्रत्येक गोष्टीसाठी मुंबईवर अवलंबून असे. गेल्या ३०-३५ वर्षांत झालेल्या धनधान्य, भाजीपाला, दागदागिने, आंबे व इतर फळफळावळ, अद्ययावत फर्निचर अशा अनेक गोष्टींच्या खरेदीसाठी ठाणे जिल्ह्यातला माणूस गिरगाव, दादर, भायखळा येथे धावत असे. ठाणे जिल्ह्यातल्या मोठ्या शहरांमध्ये आज काय मिळत नाही! असा उलट सवाल आता करता येईल. ठाणे जिल्हा व मुंबई यात काही आता विशेष फरक राहिलेला नाही. आता इथल्या दुकानांच्या शोकेसमध्ये लावलेल्या तलम, रंगीत आणि आकर्षक कपड्यांचे सौंदर्य नजरेत ठरत नाही अशी आज अवस्था आहे. सोन्या-चांदीच्या पेढ्यांमधील सोनेरी लखलखाट आणि चंदेरी चमचमाट गृहिणींच्या डोळ्यांना आणि मनाला आज सुखावीत आहे. हिरव्यागार भाज्या आणि ताजी फळफळावळ यांची येथील रेलचेल ग्राहकांना खरेदीसाठी सुखावत आहे. धान्य खरेदीसाठी आकर्षक मॉल्सची मांदियाळी ठिकठिकाणी उपलब्ध आहे. फर्निचर, विविध क्रीडा साहित्य, रंगीत दूरदर्शनसंच, देखणे कॅमेरे, फ्रीज, टेपरेकॉर्डर, मोबाइल फोन्स, सीडीज, उपयुक्त उपकरणे आदी अनेक सोयी-सुविधांच्या दुकानांनी पावलोपावली ठाण मांडलं आहे. रस्त्यावरचा बाजार ते मॉल्समधील बिगबझार असा त्याचा आलेख आहे.

### पहिली कलाटणी

बदलत्या ठाणे जिल्ह्याचा विचार करताना एक गोष्ट ठळकपणे जाणवते की, १८५३ हे वर्ष ठाणे जिल्ह्याच्या जीवनाला कलाटणी देणारे वर्ष ठरले. मुंबई ते ठाणे या मार्गावर पहिली प्रवासी रेल्वे धावली या घटनेला जागतिक प्रसिध्दी मिळाली. २१ मैलाच्या मुंबई ते ठाणे रेल्वेमार्गाची लांबी वर्षभरातच वाढवावी लागली. रेल्वे प्रवासाला ठाणे-मुंबईतील लोकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. जातीपातीमध्ये विभागल्या गेलेल्या भारतीय समाजाला एकरस, एकात्म करण्याचे प्रयत्न थोर समाजसुधारकांनी व संत-महात्म्यांनी केले याबद्दल शंकाच नाही. पण त्यांना खऱ्या अर्थाने वेग आला तो एकोणिसाव्या-विसाव्या शतकात. एकरस-एकात्म समाजनिर्मितीच्या प्रयत्नांना नकळत परंतु खऱ्याअर्थाने आकार आणि रूप दिले ते रेल्वेने! रेल्वेमुळे माणसे अधिक जवळ आली. परस्परांच्या अंगाला अंग घासून उदरनिर्वाह करती झाली आणि पुढेपुढे तर रोटी बरोबरच बेटी व्यवहारालाही ती उपयुक्त झाली. ठाणे जिल्ह्यातील लोकांना या समाज परिवर्तनाचे पहिले श्रेय द्यायला हवे.

### दुसरी कलाटणी

ठाणे जिल्ह्याच्या जीवनशैलीला कलाटणी देणारी दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती ही होय. स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास प्रामुख्याने ब्रिटीश काळात झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामपंचायती होत्या. १९२४मध्ये शहापूर ग्रामपंचायतीची स्थापना झाली आहे. संपूर्ण कोकणात ज्या जुन्या नगरपालिका आहेत. त्यात पनवेल नगरपालिका ही पहिली नगरपालिका म्हणावी लागेल. ठाणे जिल्ह्यातील पहिली नगरपालिका म्हणून कल्याण नगरपालिकेचा उल्लेख करावा लागेल (१ नोव्हेंबर १८५५) त्यानंतर ठाणे (१८६२) वसई (१८६४) भिवंडी-निजामपूर(१८६५, जव्हार (१९१८) अशा नगरपालिका स्थापन झाल्या. पुढे कल्याण-डोंबिवली, बदलापूर-कुळगाव, उल्हासनगर, डहाणू, पालघर आदी अनेक नगरपालिकांची त्यात भर पडली.

शंभरी पार केलेल्या व दीडशे वर्षांची परंपरा असलेल्या नगरपालिका या जिल्ह्याला लाभल्या ही जिल्ह्याच्या दृष्टीने भाग्याची घटना म्हणावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे लोकशाही यंत्रणेत राज्यकारभार शिकण्याच्या शाळा होत असे म्हटले जाते. नगरपालिकांच्या माध्यमातून राज्यकारभाराचे प्रशिक्षण शेकडो लोकप्रतिनिधींना मिळाले. शिवाय रस्ते, पाणी, आरोग्य, दिवाबत्ती, शिक्षण, कायदा, न्याय, वाहतूक, दळणवळण, व्यापार, उद्योग अशा अनेक क्षेत्रांच्या विकासाला त्यामुळे चालना मिळाली.

### उद्योग पंढरी

१९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या व द्रष्ट्या नेत्याने या राज्याचे केलेले नेतृत्व जिल्ह्याच्या सर्वांगीण व भरीव विकासाला कारणीभूत ठरले. त्याच साली आशिया खंडातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत म्हणून वागळे इस्टेटची स्थापना करण्यात आली.

सर्व प्रकारचे उद्योग या वसाहतीमध्ये



एकवटले. नव्या मुंबईतील रासायनिक कारखाने, शहाड-मोहने भागातील रेयॉन उद्योग, अंबरनाथ भागातील सरंक्षण उत्पादने, भिवंडीतील यंत्रमाग, तारापूर भागातील इंजिनियरिंग, औषधी आदी संमिश्र उद्योग, डोबिवली एमआयडीसी विभागातील कारखाने, ठाणे व नवी मुंबईत नव्याने सुरू झालेले आयटी पार्क, उल्हासनगरमधील कुटीरोद्योग आणि अनेक भागांतील लघुउद्योग अशा अनेक उद्योगांमुळे ठाणे जिल्ह्याची ख्याती 'उद्योगपंढरी' अशी झाली.


**लोकसंख्येचा स्फोट**

ठाणे जिल्ह्याचे उद्योग क्षितीज त्यामुळे मोठे झाले. स्वंयरोजगारात वाढ होणे क्रमप्राप्तच होते. गेल्या ५०-५२ वर्षांत ठाणे जिल्ह्याच्या लोकसंख्येवर नजर टाकली तर हे स्पष्टपणे जाणवते की, दर दहा वर्षांनी लोकसंख्या प्रचंड प्रमाणावर वाढत आहे. २०११ च्या जनगणनेच्या अस्थायी अहवालानुसार ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या १ कोटी १० लाखावर पोहोचली आहे. महाराष्ट्र आणि बृहन्मुंबईच्या तुलनेत जिल्ह्याची दशवर्षीय लोकसंख्यावाढ अधिक तर आहेच. शिवाय संपूर्ण देशात सर्वाधिक लोकसंख्या असलेला हा महाजिल्हा ठरला आहे. देशातील १६ राज्यांपेक्षा ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या अधिक असून लोकसंख्येचा स्फोट या एकमेव शब्दातच त्याचे वर्णन करावे लागेल. लोकसंख्या वाढण्याच्या या प्रक्रियेमुळेच १९८२ मध्ये प्रथम सरकारला ठाणे महापालिका द्यावी लागली. आज परिस्थिती अशी आहे की ठाणे जिल्ह्यात ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर आणि मीरा-भाईंदर या सात महापालिका आहेत. सर्वधिक महापालिका असलेला संपूर्ण भारतातील एकमेव जिल्हा म्हणून ठाणे जिल्ह्याची आज ओळख आहे.

**परस्पर विरोधी वैशिष्ट्ये**

एकीकडे प्रचंड नागरीकरण तर दुसरीकडे अतिमागास भाग हे ठाणे जिल्ह्याचे परस्परविरोधी वैशिष्ट्य अधोरेखित होणारे आहे. संपूर्ण राज्यात एकूण १२५ अतिमागास तालुके आहेत. त्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा, तलासरी, डहाणू, शहापूर व वाडा या आठ तालुक्यांचा समावेश आहे. २०११-१२ च्या अंतर्गत मानवविकास कार्यक्रमात त्याचा समावेश शासनाने केला आहे. रोजगार व औद्योगिकीकरणाचा अभाव, पारंपरिक भातशेतीचे अत्यल्प दरडोई उत्पन्न शेतीसाठी जमिनीची कमतरता, आदिवासी शेतकऱ्यांची

भारतातला पहिला रेल्वेमार्ग ठाणे शहराला जोडणारा होता.



आर्थिक स्थिती हलाखीची, शिक्षण व आरोग्य यांचा अभाव, कुपोषणाची गंभीर समस्या आणि पोटाची खळगी भरण्यासाठी दरवर्षी होणारे आदिवासींचे स्थलांतर अशा अनेक समस्यांच्या विळख्यात ग्रामीण आदिवासी समाज वर्षानुवर्षे अडकलेला आहे.

गेल्या तीन-चार वर्षात माजी जिल्हाधिकारी आबासाहेब जऱ्हाड यांनी घेतलेल्या आदिवासी पुनरुत्थान योजनेत नावीन्यपूर्ण व टिकाऊ कार्यक्रम घेतल्याने वरील समस्यांवर मात करण्याचा यशस्वी प्रयत्न मोठ्या प्रमाणावर झाला. नवीन जिल्हाधिकारी पी. वेलरासू यांनी तेच धोरण चालू ठेवले आहे. हळद उत्पादन, रेशीम लागवड व मोगरा व सोनचाफा फुलांच्या उत्पादनामुळे आदिवासी शेतकऱ्यांचा दारात प्रथमच लक्ष्मीची सोनपावलं उमटल्याचे चित्र दिसून आले. शेततळी, सिंचन विहिरी, वीज व पंपाची टिकाऊ मदत त्यांना मिळाल्यामुळे वरील उत्पन्न कायमस्वरुपी काढण्याबाबत त्यांच्यात विश्वास निर्माण झाला आहे. दाखले वाटप, वनहक्कपट्टे आणि महाफेरफार अदालत या उपक्रमांची यशस्वी जोड त्यांना मिळाल्यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या ६५ वर्षात प्रथमच मोठ्या प्रमाणावर त्यांचे पुनरुस्थान झाल्याचा अनुभव आला. शेकडो आदिवासी शेतकरी आयुष्यात प्रथमच लखपती होऊन त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. ग्रामीण भागात झालेल्या या विकासामुळे मोठी आर्थिक क्रांती झाली असून मोठ्या प्रमाणावर मेहनत घेण्यासाठी शेतकरी पुढे येत आहे.

**पाणी पिकवणारा जिल्हा**

ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागाचे फार पूर्वीपासून नजरेत भरणारे वैशिष्ट्य म्हणजे येथे नद्या, तलाव आणि धरणांचा सुकाळ आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्याला पाणी पिकविणारा जिल्हा असे म्हणावे लागेल. उल्हास आणि वैतरणा या जिल्ह्यातील मुख्य नद्या आहेत. पिंजाळ, तानसा, सूर्या, काळू, बारवी, भातसा, कामवाडी, वरोली मुरबाडी, भारंगी, शाई, डोयफोडी, वालधुनी अशा अनेक छोट्या-मोठ्या नद्यांमुळे जिल्ह्याची जलसंपदा किती भरीव आहे, याची कल्पना यावी.

ठाण्यात पूर्वी ६० तलाव होते. तलावांचे शहर म्हणून त्याची ख्याती होती. कल्याण, अंबरनाथ, टिटवाळा, भिवंडी, वसई आदी ठिकाणीही तलाव आहेत.तानसा, वैतरणा, भातसा, बारवी, सूर्या, धामणी, मोडकसागर, कवडास, वांद्री चोंढा मध्यवैतरणा, वाघ, खोच, लेंडी, खडखड, टिकणी आदि अनेक धरणांची नावे ऐकल्यावर तर संपूर्ण राज्यात सर्वाधिक धरणे असलेला ठाणे हा एकमेव जिल्हा असावा याची खात्री पटते, शहापूर तर धरणांचा तालुका म्हणूनच ओळखला जातो. तानसा हे धरण सर्वात जुने असून १८९० साली ते बांधण्यात आले. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला ठाणे जिल्हाच पाणी पुरवीत असून ठाणेकर आणि मीरा-भाईंदरवासीय देखील त्यावरच अवलंबून आहेत. अडीच कोटी तृषार्त लोकांची तहान भागविणारा जिल्हा अशी ग्रामीण भागाची ओळख आहे. ठाणे जिल्ह्याच्या या त्यागाला खरोखरच तोड नाही.

(संपर्क : ९८९२९७५२५३)

भ्रमती

# मातृतीर्थ

गुलाबराव खेडेकर

बुलडाणा जिल्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर राजमाता जिजाऊंचे माहेर अर्थात मातृतीर्थ सिंदखेडराजा या ठिकाणामुळे प्रसिद्ध आहे. ऐतिहासिक पुतळा, बारव, निळकंठेश्वर मंदिर, निळकंठेश्वर बारव, रामेश्वर मंदिर, लखुजी राजांची समाधी, काळाकोट, शिवणीटाका यासारख्या वास्तुंची स्थापत्यकला आजही अनाकलनीय आहे. विश्वविख्यात खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर याच जिल्ह्यात आहे. प्राचीन मंदिराचे माहेरघर म्हणूनसुद्धा लोणारची ओळख आहे. शेगावनेसुद्धा बुलडाणा जिल्ह्याचे नाव जगात नेले आहे. ३०० एकरावर वसलेले 'आनंदसागर' हे अत्याधुनिक पर्यटन केंद्र असून दररोज येथे हजारो पर्यटक येतात. साखरखेडा येथील पुरातन मशीद आजही अनेकांचे लक्ष वेधून घेते. देऊळगावराजाचा बालाजी, आशिया खंडातील सर्वांत मोठा चिखलीचा 'महाबीज'चा बियाणे प्रकल्प, खामगावजवळील गारडगाव येथील बौद्ध विहार, मेहकरचा सारंगधर बालाजी, नांदुऱ्याची भव्यदिव्य हनुमंत मूर्ती, चिखली तालुक्यातील सैलानी बाबा, रोहीणखेड (ता. मोताळा) येथील ऐतिहासिक मशीद, चिखली तालुक्यातील सातगाव, साकेगाव, अंत्रीखेडकर येथील पुरातन महादेव मंदिरे ही व यासारखी अनेक प्रेक्षणीय स्थळे बुलडाणा जिल्ह्यात आहेत.



बुलडाणा हे निसर्गरम्य असे शहर आहे. या शहराचे वर्णन कवी बी यांनी १९३० च्या दरम्यान खालील कवितेद्वारे केले आहे.

विदर्भात डोंगरात आहे गांव नांव बुलढाणे  
वनलक्ष्मीच्या श्रृंगाराचे एक अलौकिक लेणे!  
गांवाच्या उत्तरेस आहे जवळचि डोंगर मोठा  
द्वारपाल हा कडा पहारा देऊनी रक्षी वाटा  
तिकडे वस्ती पासूनि लागे उतरण कांही थोडी  
चढत लागले पुढे जराशी जाया अंच पहाडी  
त्यावर उंचावर आहे मोळा एक कडा तुटलेला  
दृष्टी देखणी एकवटे ती शोभा निरखायला!  
पायाखाली उंच कड्याच्या गोलाकार दरी ती  
पश्चिमेस मुख करुनि दूरवर घसरून गेली होती!

वरील निसर्गसृष्टीचे वर्णन नुसते वाचून मन प्रसन्न होते. प्रत्यक्ष या घाटातून पायी चालताना मिळणारा आनंद अवर्णनीय आहे. हा घाट चढताना किंवा उतरताना विशेषत: एसटीतून बुलडाणा - मोताळा किंवा मोताळा - बुलडाणा हा प्रवास निसर्गसौंदर्याचा अलभ्य लाभ करून देतो. श्रावण महिन्यातून कड्यावरून दरीकडे वाहणारे ओढे, नाले, झरे मनमोहक वाटतात. अजिंठा डोंगराच्या पठारावर हे गाव वसलेले आहे. गावाच्या पूर्वेला वनसंरक्षक अधिकाऱ्यांचे कार्यालय हे निसर्गसृष्टीत सामावले गेले आहे. नुकतेच बुलडाणा - मलकापूर रोडवर बुलडाणा शहरापासून २ कि.मी. अंतरावर बालाजीचे आधुनिक भव्यदिव्य मंदिर बांधण्यात आले आहे. बुलडाणा तालुक्यात देऊळघाट, चांडोळ, वरवंड ही प्राचीन गावे आहेत.



बुलडाणा जिल्ह्यातील राजकीय केंद्र म्हणून चिखली तालुक्याची ख्याती आहे. दलितमित्र माजी खासदार पंढरीनाथ पाटील यांची ही कर्मभूमी. पंढरीनाथ पाटलांनी शाहू, फुले, आंबेडकरांच्या वैचारिकतेचा वसा घेऊन व शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुखांच्या खांद्याला खांदा लावून या ठिकाणी बहुजन समाजासाठी शैक्षणिक संस्था सुरू करून खऱ्या अर्थाने चिखली शहराला विद्यानगरी म्हणून नावलौकिक मिळवून दिला. चिखलीत प्रसिद्ध असे रेणुका देवी मंदिर, अंधाऱ्या महादेवाचे मंदिर आहे. चिखली हे पूर्वी ज्वारीच्या उत्पादनामध्ये अग्रेसर होते. महाराष्ट्रास लागणारे ४० टक्के बियाणे चिखली परिसरात निर्माण होते; म्हणूनच या ठिकाणी (चिखली-देऊळगावराजा महामार्गावर) आशिया खंडातील सर्वांत मोठे महाबीजचे बियाणे प्रक्रिया केंद्र आहे. चिखलीपासून ५५ कि.मी. अंतरावर देऊळगावराजा हे राजे लखुजींचे खापर पणतू राघोजींचे पणतू रावजगदेव यांनी वसविलेले आहे. रावजगदेवने बालाजी व्यंकटेशाची स्थापना केली. देऊळगावराजा हे बालाजी यात्रेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. दरवर्षी दसरा या सणाच्या दिवशी येथे मोठी यात्रा भरते. या यात्रेत दरवर्षी गाढवांचा बाजार भरतो. आडगावराजा, मेहुणाराजा, किनगावराजा, सिंदखेडराजा या लखुजींच्या चार पुत्रांच्या चार शाखा होत्या. देऊळगावराजा ही लखोजी राजाचे खापर पणतू रावजगदेव यांनी वसविलेली बाजारपेठ होय. रावजगदेवने पळसखेड, तुळजापूर, जानेफळ येथेही गढ्या उभारल्या होत्या.

सिंदखेडराजाला शिवशाहीची गंगोत्री मानली जाते. मल्हारराव होळकरांनी सिंदखेडकर मानसिंगराज जाधवरावांना, 'तुम्ही मऱ्हाटेयाची काशी आहात', असे गौरवोद्गार

सिंदखेडराजाच्या बाबतीत काढले होते. (जाधवरावांची बखर पृ. ६०९) काशीला जाऊन गंगेत स्नान करून जे समाधान मिळते त्यापेक्षा मातृतीर्थ सिंदखेडराजाला जाऊन जिजाऊंच्या दर्शनाने, जिजाऊंच्या पराक्रमाच्या इतिहासाने प्रत्येकाला स्फुरण चढते. नवीन कार्य करण्याची प्रेरणा मिळते, दिशा मिळते.

सिंदखेडराजा कुठल्याच मुख्य रस्त्यावर नाही, परंतु फार पूर्वीच्या काळी नागपूर - पुणे डाक लाइन महामार्गावर महत्त्वाचे ठिकाण म्हणून सिंदखेडराजा प्रसिद्ध होते. विमानाने औरंगाबाद, औरंगाबादवरून बसने सिंदखेडराजाला जाता यायचे. हे अंतर १०० किलोमीटर आहे. तसेच आता मेहकर सुलतानपूर -दुसरबीड -सिंदखेडराजा -जालना हा राज्यमार्गसुद्धा झाला आहे. जालना ते सिंदखेडराजा हे अंतर ३० कि.मी. आहे.

सिंदखेडराजा हे एक प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. लखुजीराजाच्या समाधीच्या दक्षिणेस रामेश्वर मंदिर आहे. मंदिराचे विटांमधील बांधकाम दगडी चौथऱ्यावर केले आहे. मुख्य मंदिर दगडाचे असून कळस विटांनी बांधून काढलेला आहे. मंदिराच्या चारही बाजूंनी पडवी काढलेली होती. आईच्या इच्छेनुसार लखुजींनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. रामेश्वराच्या दक्षिणेकडून इतिहासप्रसिद्ध पुणे-नागपूर डाक लाइन गेलेली आहे.

रामेश्वर मंदिरासमोरच विस्तीर्ण राम बारव होती. ती आता पूर्णपणे बुजलेली आहे. पूर्वी रामेश्वर मंदिराच्या चारही बाजूने २० X २० एकराचे विस्तीर्ण मैदान असल्याचे सांगतात. रामेश्वर मंदिराच्या समोरच आजच्या आठवडी बाजराला लागूनच निळकंठेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. याच ठिकाणी चौरसाकृती ३४ X ३४ मीटर आकाराची प्राचीन बारव आहे. पश्चिमेला भैरव तसेच शनीची देवळी आहे. पुढे निळकंठेश्वराचे देवालय आहे. समोर नंदी आहे. नंदीच्या पाठीमागे एका खांबावर ११ ओळींचा शिलालेख कोरलेला आहे. यामध्ये देवालयाचा जीर्णोद्धार जिजामातेचे बंधू रायोजी यांनी केल्याचा उल्लेख आहे. निळकंठेश्वराच्या देवालयामधील उत्तराभिमुख हरिहराची मूर्ती हा या देवळातील सर्वांत प्राचीन अवशेष म्हणावा लागेल. मूर्तीची उंची ९० सेंटिमीटर आहे. मूर्ती अत्यंत आकर्षक असून आजही ती पर्यटकांचे लक्ष वेधून घेते.

रामेश्वर मंदिराच्या उत्तरेला लखुजीराजांचे समाधी मंदिर आहे. ही समाधी १६३० ते १६४० या १० वर्षांत लखुजींचे धाकटे बंधू भूनजी ऊर्फ रावजगदेव यांनी बांधली. या वास्तूची बांधणी ओतीव शिल्पासारखी अप्रतिम वाटते. मध्यभागी घुमट असून घुमटाच्या आत सिंहासनारूढ पंचधातूचा लखुजींचा पुतळा होता, असे जाणकार सांगतात. आज मात्र तेथे पुतळा नाही. समाधीच्या घुमटाला चार भिंती असून शंकराच्या पिंडीकडे चौकात उतरण्यासाठी असलेले मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख आहे.

गाभाऱ्याच्या चार कोपऱ्यांत चार खोल्या असून प्रवेशद्वारातून आत शिरताच डाव्या बाजूला असलेल्या खोलीत दत्ताजींची तर उर्वरित तीन खोल्यांमध्ये अनुक्रमे अचलोजी, रायोजी व यशवंतराव यांच्या समाध्या आहेत. या समाधी मंदिराला एकूण तीन दरवाजे आहेत. मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख व अन्य दोन दरवाजे दक्षिण व उत्तर भिंतीत काढलेले आहेत. ठाशीव चिरेबंदी बांधकाम आजही सुस्थितीत आहे. वास्तूचे बांधकाम कमानी घाटाचे असून एकूण २४ कमानींवर प्रचंड घुमट उभारलेला आहे.

प्रवेशद्वाराच्या बाजूला हत्तीवर आरूढ असलेल्या सिंहाच्या शिल्पाकृती कोरलेल्या आहेत. दर्शनी भागावर गणेशपट्टी आणि अनेक मूर्ती तसेच कमळाचे तबक, वेलबुट्टी काळ्या पाषाणात कोरलेल्या आहेत. समाधीच्या पूर्वमुखी प्रवेशद्वारासमोर जाधव घराण्यातील काही व्यक्तींच्या समाध्या आणि सतीशिला दिसतात.

तहसील कार्यालयाच्या मागे १०० मीटर अंतरावर काळा कोट किल्ला असून त्याचे बांधकाम अर्धवट स्थितीत दिसते. प्रशस्त जागेवर लखुजी जाधवरावांचा खापर पणतू रावजगदेव याने काळ्या कोटाचे काम केले आहे. हा एक बलदंड भुईकोट किल्ला बांधावयाचा होता. परंतु मोगल बादशहाच्या मनाई हुकुमामुळे तो अर्धवटच राहिला. काळ्या कोटाची बांधणी चौकोनी आकाराची असून चार कोपऱ्यांवर चार बुरूज बांधलेले आहेत. बुरूज वर्तुळाकार असून बुरूजाचा व्यास १० मीटर आहे. तटबंदीची रुंदी ३ मीटर असून उंची ५.२० मीटर आहे. तटबंदीवर जाण्यासाठी पश्चिम व दक्षिण बाजूच्या बुरुजाजवळ पायऱ्या आहेत. दक्षिण तटबंदीजवळ एक विहीर असून या विहिरीच्या पाण्याने शस्त्रांची धार लावल्यास ती उतरत नाही असे सांगतात.

काळ्या कोटात गुप्त नहार आणून सोडल्याची नोंद बखरीमध्ये आहे.

सजना बारव






मोती तलाव



रेणुकामाता मंदिर



राजे लखुजींचा राजवाडा



रामेश्वर मंदिर



भुयारी मार्ग

**भव्यदिव्य राजवाडा**

सिंदखेडराजाची प्रमुख ऐतिहासिक वास्तू म्हणजे लखुजीराजाचा राजवाडा. लखुजीराजाने राहण्यासाठी हा राजवाडा बांधला. हा राजवाडा म्हणजे स्थापत्यशास्त्राचा आधुनिक तंत्रज्ञानाला लाजवेल असा अजब नमुना आहे. बांधकाम रेखीव, मजबूत, आकर्षक आहेच परंतु त्यामधील प्रकाशयोजना, तत्कालीन वातानुकूलिन योजना ही वैशिष्ट्ये लखुजीराजांच्या कल्पकतेची व बुद्धिमत्तेची साक्ष पटवतात.

वाड्याचे भव्य प्रवेशद्वार तीन मजली आहे. देवड्या, त्यावर नगरखाना आणि त्यावर संरक्षक भिंती उभारलेला सज्जा असे अत्यंत सुरक्षित प्रवेशद्वाराचे स्वरूप आहे. दगडी कमानीच्या दोन्ही अंगांस कोरलेली दोन कमळांची तबके तर चौदा नारळांचे तोरण म्हणजे कारागिरीचा दुर्मिळ नमुनाच. वाडा पूर्व-पश्चिम असा विभागलेला १०२.२० मीटर लांब आणि ९० मीटर रुंद. प्रवेशद्वाराजवळ दगडी बांधकाम केलेले दोन्ही बाजूला जोते. या जोत्यांवर आता या परिसरात सापडलेल्या विविध वस्तू, मूर्ती ठेवलेल्या आढळतात. वाड्यात समोर एकूण १२ दालनांचे असलेले तळघर सुस्थितीत आहे. या तळघरात प्रकाशासाठी आणि हवा खेळती राहण्यासाठी पश्चिमेच्या अंगाने झरोके काढलेले आहेत. ते झरोके वरच्या मजल्यावरील चौकोनाच्या दिशेने उघडतात.

चौकात त्यावेळी पाणी साठवून ठेवण्याची व्यवस्था केलेली आढळून येते. या पाण्यावरून आत सरकणाऱ्या थंडगार हवेमुळे तळघर थंडगार राहत असे.

हरिहर शिल्प



**जिजाऊंच्या जन्माची जागा**

या राजवाड्याच्या आत गेल्यावर नैऋत्येला म्हाळसा राणीचा महाल होता आणि त्या महालातच जिजाऊंचा जन्म झाला. आज त्या ठिकाणी एक खोली दाखविली जाते. परंतु, म्हाळसा महाल आज अस्तित्वात नाही. आज असलेल्या खोलीत जिजामाता आणि बालशिवाजी राजाचा पांढराशुभ्र पुतळा बसविलेला आहे.

राजवाड्याच्या पूर्वेस लखुजीराजांच्या राजदरबाराची वास्तू दिसते. तिचा नुकताच लाकडी दरवाजे लावून जीर्णोद्धार केलेला दिसतो. हा राजवाडा म्हणजे लखुजीराजांच्या तत्कालीन वैभवाची साक्षच म्हणावी लागेल. आज या राजवाड्यासमोर नगरपालिकेने एक भव्यदिव्य असा जिजाऊंचा पुतळा बसवून सुशोभीकरण केलेले आहे. स्वातंत्र्यानंतर सर्वप्रथम महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अब्दुल रहेमान अंतुले यांनी सिंदखेडराजा विकासाची सुरुवात केली आहे.

**सावकार वाडा-** राजवाड्याच्या पश्चिमेस पडक्या अवस्थेत नृत्यशाळा आहे. तेथूनच काही अंतरावर ही टोलेजंग वास्तू उभी आहे. या वाड्याच्या तटबंदीचा अर्धा भाग चिरेबंदी दगडी बांधकाम तर वरचा अर्धा भाग विटांचे बांधकाम केलेला आहे. प्रवेशद्वारावरील विटांचे नक्षीकाम अतिशय सुंदर आहे. प्रवेशद्वारावरील शत्रूवर गरम तेलाचा मारा करण्याचे तत्कालीन काम उत्कृष्ट सुरक्षा व्यवस्थेचा नमुना होय. इतिहासाच्या पाऊलखुणा ठळकपणे जपणारा हा जिल्हा पर्यटकांसाठी, अभ्यासकांसाठी पर्वणी आहे.

❑ ❑



राजवाडा दर्शनी भाग

## कसे याल?

- सिंदखेडराजा- मुंबईहून औरंगाबाद रेल्वे, विमान, बस. पुढे १०० कि.मी. बस अथवा खाजगी वाहन.
- लोणार- मुंबईहून औरंगाबाद रेल्वे, विमान, बस. येथून बस व खाजगी वाहन. येथे एम.टी.डी.सी.चे रिसॉर्ट आहे.
- शेगाव- मुंबईहून थेट रेल्वेने शेगाव. हे मुंबई-नागपूर मार्गावरील महत्त्वाचे ठिकाण आहे. श्री गजानन महाराज मंदिर विश्वस्तांतर्फे आनंद सागरला जाण्यासाठी अखंड व मोफत बससेवा उपलब्ध. येथे निवासासाठी एक हजारपेक्षा अधिक खोल्या उपलब्ध.
- बुलडाणा- औरंगाबादवरून धाड-माहोरा मार्गे १३५ कि.मी. बसने. जालना-चिखली मार्ग १६५ कि.मी. अथवा मुंबईहून रेल्वेने मलकापूर स्थानक व पुढे बसमार्गाने जाता येते.

# महा ई-सेवा

## (महा ई-सेवाकेंद्रामार्फत दिली जाणारी प्रमाणपत्रे/दाखले)

- ऐपतीचा दाखला (तहसील कार्यालय रु.१ लाखाच्या आत)
- प्रमाणित प्रत (तहसील कार्यालय)
- खाद्यपदार्थ परवाना नूतनीकरण
- वारसा प्रमाणपत्र
- श्रावणबाळ सेवा योजना (राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना) (शहरी)
- संजय गांधी निराधार/आर्थिक दुर्बलासाठी अनुदान योजना (शहरी)
- इंदिरा गांधी निराधार व भूमिहीन शेतमजूर महिला अनुदान योजना (शहरी)
- कुटुंब अर्थसाहाय्य योजना (शहरी)
- जमीन मोजणीचा अर्ज (साधी मोजणी)
- जमीन मोजणीचा अर्ज (तातडीची मोजणी)
- जमीन मोजणीचा अर्ज (अतितातडीची मोजणी)
- आखीव पत्रिका-सहीसुध नक्कल
- नामांतरासाठी अर्ज
- मृत्युनोंदणीचा दाखला (एक वर्षावरील नोंद)
- जातीचे प्रमाणपत्र- एस.सी.
- जातीचे प्रमाणपत्र- ओ.बी.सी.
- जातीचे प्रमाणपत्र- व्ही.जे.एन.टी.
- जातीचे प्रमाणपत्र- एस.बी.सी.
- जातीचे प्रमाणपत्र- एस.टी.
- स्टँप रिफंड मिळण्याबाबत
- नातेवाईकाचे प्रमाणपत्रासाठी शपथपत्र
- विद्युत मीटर हस्तांतरण करण्याबाबत
- नळ कनेक्शन मिळण्याबाबत
- सुशिक्षित बेरोजगारांना कर्ज व अनुदान मिळण्याबाबत
- विभक्त शिधापत्रिका मिळण्याबाबत
- एस. टी. प्रवासासाठी सवलतीचा पास मिळण्याबाबत
- शाळा सोडल्याचा डुप्लिकेट दाखला मिळण्याबाबत
- टी.सी. वर जन्मस्थळ नसल्याबाबत
- गॅप सर्टिफिकेट मिळण्याबाबत
- ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र
- भूखंड नसल्याबाबत शपथपत्र
- बौद्ध जातीचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत
- नॉनक्रिमिलिअर जातीचे प्रमाणपत्र नूतनीकरण
- माहेरचा पुरावा असण्याबाबत
- अशिक्षित असण्याबाबत
- विवाहित असण्याबाबत
- 'क' पत्रक नसण्याबाबत
- जन्माचा दाखला मिळण्याबाबत
- शिधापत्रिका/निवडणूक ओळखपत्र/मतदारयादी/लाईट बिल/घरपावती
- 'वंशावळ'चे प्रतिज्ञापत्र
- जन्म व मृत्यू दाखला प्रमाणपत्र
- सैन्य भरतीसाठी प्रमाणपत्र
- केंद्र सरकारसाठी OBC चे प्रमाणपत्र
- सैन्य भरतीसाठी शपथपत्र
- केंद्र सरकारसाठी OBC चे शपथपत्र
- अल्पभूधारकाचे प्रमाणपत्र
- इतर शपथपत्रे
- ७ / १२
- ८ अ


R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, January 2013.
Date of Publication : 10th of every Month

# २०१२ : संग्रहणीय अंकांचे संस्मरणीय वर्ष




आता लोकराज्यची
वर्गणी ऑनलाइन भरा...
भेट द्या
आमच्या वेबसाइटला
http://dgipr.maharashtra.gov.in




O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

प्रति / To :

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक **प्रमोद त्र्यं. नलावडे**, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे